# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०४/ २०१७** **दिनांक २८.०४.२०१७**

**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २८.०४.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३४३/ २०१७, दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दिनांक २८.०४.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य
०४. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०५. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०६. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग, सदस्य
०७. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०८. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०९. मा.सौ. योगिता अभय शेळके पाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, मा.डॉ.मनिषा शामसुंदर कायंदे- सदस्या यांनी ई-मेलव्दारे पुढीलप्रमाणे कळविले आहे, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२८.०४.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस मी हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव मा.श्री.अनिल देसाई व पर्यावरण मंत्री मा.श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२८.०४.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास स्वारस्य नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२८.०४.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. मात्र मुख्यमंत्र्यांनी वचनपुर्ती केली नाही. माननीय शिवसेना पक्षप्रमुख श्री.उध्दवजी ठाकरे यांना दिलेला शब्द पाळत नसल्याने, आम्हाला बैठकीस हजर राहण्यास स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २७.०३.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२७८** दिनांक २७.०३.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.२३०-**

जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर यांना देणगी स्वरुपात एम.आर.आय. मशिन दिल्यास इतरही जिल्हे अशा प्रकारची मागणी करतील, असे कार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, चंद्रपुर हा आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा असल्याने जिल्हा रुग्णालय चंद्रपूर येथे मोठया संख्येने आंतरबाहय रुग्ण असतात. जिल्हा शल्यचिकित्सक,चंद्रपुर यांनी १ नग एम.आर.आय.मशिन उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे. मात्र एम.आर.आय.मशिन उपलब्ध करुन न देता, मानव जातीचे कल्याण या उदात्त हेतुने जिल्हा रुग्णालय,चंद्रपुर यांना १ नग एम.आर.आय.मशिन खरेदीसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे. सध्या संस्थानचे रुग्णालय विभागाची ई-निविदा प्रक्रियेव्दारे पात्र न्युनतम दरधारकाचे दरानुसार येणारी रक्कम अनुदान म्हणून देण्यात यावी. मात्र तत्पुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर यांनादेणगी स्वरुपात एम.आर.आय. मशिन दिल्यास इतरही जिल्हे अशा प्रकारची मागणी करतील, असे कार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, चंद्रपुरहा आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा असून त्याच्या शेजारीच गडचिरोली हाही नक्षलग्रस्त जिल्हा आहे. त्यामुळे जिल्हा रुग्णालय चंद्रपूर येथे नक्षली कारवायांमुळे जखमी झालेले जवान/ नागरीक अथवा इतर कारणास्तव मोठया संख्येने आंतरबाहय रुग्ण असतात. तसेच सध्या श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी साठी एम.आर.आय. (1.5 थ्रीस्ला) मशिन खरेदी करणेकामीची ई-निविदा प्रक्रिया अंतीम टप्प्यामध्ये आहे. या सर्व बाबीचा विचार करता मानव जातीचे कल्याण या उदात्त हेतुने चंद्रपुर व गडचिरोली या दोन्ही जिल्हयासाठी रुग्णांच्या सोयीसाठी जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर यांना श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता एम.आर.आय. मशिन खरेदीकामी प्राप्त होणाऱ्या निम्नतम दराची रक्कम अनुदान म्हणून देण्यात यावी. मात्र तत्पुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**(२) निर्णय क्र.२३४ (११)-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रुग्णांना दिले जाणाऱ्या वैद्यकिय आर्थिक अनुदानासाठीच्या सुधारित नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, त्यामधील अ.नं.१४ वगळता इतर नियमास मान्यता देण्यात यावी.

अ.नं.१४ मध्ये अर्जासोबत जोडाव्या लागणाऱ्या सर्वकागदपत्राची सक्षम अधिकारी यांनी साक्षांकित केलेली प्रमाणित प्रति लिपी ऐवजी स्वत: साक्षांकित केलेली प्रमाणित प्रति लिपी असावी, असा बदल करणेत यावा. तसेच सदरहू नियमावलीची दि.०१ एप्रिल २०१७ पासून अंमलबजावणी करणेत येऊन, महाराष्ट्र शासनास माहितीसाठी पाठविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षीका)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रुग्णांना दिले जाणाऱ्या वैद्यकिय आर्थिक अनुदानाचा फायदा मोजक्याच रुग्णालयांमधील रुग्णांना होत आहे, असे निदर्शनास आले आहे. काही रुग्णालयांनी संस्थानमार्फत वैद्यकिय आर्थिक अनुदान मंजुर करणेसाठी प्रतिनिधींची नेमणूक केली असल्याचे कळत आहे. ही बाब गंभीर असून, या प्रकरणाची समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी सखोल चौकशी करावी व सदरहू चौकशी पुर्ण होईपर्यंत तुर्तास पुणे शहर/ जिल्हयामधील रुग्णालयातील रुग्णांना देण्यात येत असलेले वैद्यकिय आर्थिक अनुदान बंद करणेत यावे.**

**तसेच गरीब/ दुर्बल/ गरजू रुग्ण पैशाअभावी वैद्यकिय उपचारांपासून वंचित राहू नयेत, याकरीता संस्थानमार्फत वैद्यकिय आर्थिक अनुदान देणेकामी नवीन रुग्णालयांची यादी व वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावली तयार करणेत येऊन, ती प्रथमत: रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावी. याचबरोबर संस्थानकडून थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांना इतर रक्तपेढयांमार्फत मोफत रक्तघटक उपलब्ध करुन देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षीका)

---

**(३) निर्णय क्र.२३८-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे इतर राज्यांमध्ये संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेकामी समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा.श्री.सचिन तांबे व जनसंपर्क अधिकारी यांचे मंडळ गठीत करणेत आले. या मंडळाने एका महिन्यामध्ये माहिती केंद्रासाठीची जागा व इतर अनुषंगीक बाबींची पाहणी करुन, त्याचा अहवाल समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे इतर राज्यांमध्ये संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेकामी समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा.श्री.सचिन तांबे व जनसंपर्क अधिकारी यांचे मंडळ गठीत करणेत आले. या मंडळाने **<u>सहा</u>** महिन्यामध्ये माहिती केंद्रासाठीची जागा व इतर अनुषंगीक बाबींची पाहणी करुन, त्याचा अहवाल समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**(४) निर्णय क्र.२३९-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८ मध्ये श्री साईबाबांच्या समाधीला १०० वर्ष पुर्ण होत असल्याने विकास कामांची पुर्वतयारी करणे व संस्थानच्या प्रशासकीय कामाचा वाढता व्याप या सर्व बाबींचा विचार करता, संस्थानचे आकृतीबंधामधील रिक्त असलेल्या प्रशासकीय अधिकारी या पदावर श्री.कमलाकर बाळासाहेब रणदिवे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधूदूर्ग यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक होणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे शिफारसवजा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८ मध्ये श्री साईबाबांच्या समाधीला १०० वर्ष पुर्ण होत असल्याने विकास कामांची पुर्वतयारी करणे व संस्थानच्या प्रशासकीय कामाचा वाढता व्याप या सर्व बाबींचा विचार करता, संस्थानचे आकृतीबंधामधील रिक्त असलेल्या प्रशासकीय अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी मिळणेबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे शिफारसवजा प्रस्ताव सादर करणेत यावा. तसेच शासनाला सादर करावयाच्या प्रस्तावामध्ये कोणत्याही एका विशिष्ट व्यक्तीच्या नावाचा उल्लेख करणेत येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(५) निर्णय क्र.२५३-**

उपरोक्त प्रस्तावावर चर्चा सुरु असताना सभेस अशी माहिती देण्यात आली की, श्री.राजेंद्र मारुतराव जाधव, तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी कनकुरी साठवण तला कॅनव्हास प्रुफिंग करणेकामी निम्नतम दराचे ठेकेदारास कार्यादेश देणेस व उर्वरित ठेकेदारांची अनामत रक्कम विलंबाने परत केली तसेच देणगी स्वरुपात प्राप्त झालेला रवा व आटा खराब झाल्याचे दाखवून त्याची परस्पर विल्हेवाट लावली याबाबत त्यांचेकडून लेखी खुलासा मागविणेत आला असता, त्यांनी या दोन मुद्द्यांचा अद्यापपावेतो खुलासा सादर केलेला नाही.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री.राजेंद्र मारुतराव जाधव, तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचेकडून उपरोक्त दोन्ही मुद्द्यांचा तातडीने खुलासा प्राप्त करुन घेण्यात यावा व त्यासह सदरहू प्रस्ताव समितीसमोर फेरसादर करणेत यावा. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**उपरोक्त प्रस्तावावर चर्चा सुरु असताना सभेस अशी माहिती देण्यात आली की, श्री.राजेंद्र मारुतराव जाधव, तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी कनकुरी साठवण तलावास कॅनव्हास प्रुफिंग करणेकामी निम्नतम दराचे ठेकेदारास कार्यादेश देणेस व उर्वरित ठेकेदारांची अनामत रक्कम विलंबाने परत केली तसेच देणगी स्वरुपात प्राप्त झालेला रवा व आटा खराब झाल्याचे दाखवून त्याची परस्पर विल्हेवाट लावली याबाबत त्यांचेकडून लेखी खुलासा मागविणेत आला असता, त्यांनी या दोन मुद्दयांचा अद्यापपावेतो खुलासा सादर केलेला नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री.राजेंद्र मारुतराव जाधव, तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचेकडून उपरोक्त दोन्ही मुद्दयांचा तातडीने खुलासा प्राप्त करुन घेण्यात यावा व त्यासह सदरहू प्रस्ताव समितीसमोर फेरसादर करणेत यावा.**

**तसेच उपरोक्त प्रस्तावावरुन अतिरिक्त तांदुळ खरेदी केल्याचे निदर्शनास येत आहे, हा अतिरिक्त तांदूळ का, कशामुळे खरेदी केला व यामध्ये जबाबदार कोण आहे, याची समिती सदस्य मा.अॅड मोहन मोतीराम जयकर, मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे व मा.श्री.सचिन भागवत तांबे यांनी चौकशी करुन त्याचा अहवाल सभेसमोर सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**(६) निर्णय क्र.२५४-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदींमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक त्या बदलांचे अवलोकन करणेत आले. त्यामध्ये विश्वस्त नेमणूकीसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२४ जानेवारी, २०१३ रोजीचे अधिसुचनेमधील कलम ४ (२) मध्ये अधिकतम वयोमर्यादा ७० वर्षापेक्षा अधिक असता कामा नये, अशी तरतूद आहे. सदर वयाची अट शिथील करणेबाबतचा समावेश उपरोक्त बदलांमध्ये करणेत यावा.

तसेच प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या New section to be added in Shri Saibaba Sansthan Trust Act 2004 मधील मुद्दा क्र.२, Power of Chief Executive Officer to request the Committee to reconsider the resolution in certain cases, वगळणेत यावा व मुद्दा क्र.३ मध्ये मान्यवरांना भेटवस्तु देण्याचे अधिकार अध्यक्ष व कार्यकारी अधिकारी यांचेबरोबरच सर्व विश्वस्तांनाही राहतील, असा बदल करणेत येऊन, सदरहू प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**या विषयावरील चर्चेच्या वेळी, समिती सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीमध्ये बदल करणेबाबतचा प्रस्तावावर सखोल चर्चा करुन, धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित आहे. परंतु सदरहू विषय आयत्या वेळेच्या विषयांमध्ये चर्चेसाठी आल्यामुळे त्याचा अभ्यास करता आला नाही. याकरीता हा विषय पुन्हा चर्चेला घेण्यात यावा व त्यास सभेने मान्यता दिली. याकरीता सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवणेत येऊन, व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(७) निर्णय क्र.२५६-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने दि.०१ एप्रिल, २०१७ ते दि.३१ मार्च, २०१९ या कालावधीकरीता प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाचे अधिकारी प्रतिनियुक्तीने संस्थानवर घेण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त शिर्डीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने कामकाजाचा समन्वय राखणे तसेच उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांचे योग्य व्यवस्थापन करणेसाठी शताब्दी कक्षाकरीता आवश्यक असलेल्या नव्याने प्रस्तावित पदांचा प्रस्ताव व शासनाने मागविलेल्या मुद्यांची उपरोक्तप्रमाणे माहिती मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेसमान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ शताब्दी कक्ष प्रमुख/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने दि.०१ एप्रिल, २०१७ ते दि.३१ मार्च, २०१९ या दोन वर्ष कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाचे अधिकारी प्रतिनियुक्तीने संस्थान सेवेत घेण्यात यावे. याकरीता तात्पुरती/ अस्थायी पदे श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या आस्थापनेवर निर्माण करणेत यावी.**

**या अधिकाऱ्यांमधील उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकाऱ्यांना Joint Executive Officer असे पदनाम देण्यात यावे. तसेच संस्थानचे बांधकाम विभागाच्या आकृतीबंधामध्ये उपअभियंता, बांधकाम विभाग या रिक्त असलेल्या एका पदावर उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम या वर्गातील**

**एका अधिकाऱ्याची व संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये रिक्त असलेल्या आय.टी.मॅनेजर या पदावर राज्य शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातील एका अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने तात्पुरते दोन वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत यावी, असे ठरले.**

तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त शिर्डीत होणाऱ्या गर्दीचे अनुषंगाने कामकाजाचा समन्वय राखणे तसेच उपलब्ध केलेल्या सोयी सुविधांचे योग्य व्यवस्थापन करणेसाठी शताब्दी कक्षाकरीता आवश्यक असलेल्या नव्याने प्रस्तावित पदांचा प्रस्ताव व शासनाने मागविलेल्या मुद्यांची उपरोक्तप्रमाणे माहिती मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेसमान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ शताब्दी कक्ष प्रमुख/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०२** **संस्थानचे नियोजीत साईगार्डन प्रकल्पाअतंर्गत लेजर शो उभारणी करणेकामी मा.उच्च न्यायालयाचे दि.०७.०४.२०१७ रोजीचे आदेशाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे म्हणणे मा.उच्च न्यायालयास सादर करणे.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद–** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१)च्या खंड (ड) अन्वये श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय –**

१) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.०३/०६/२००६ रोजीचे सभेतील नि. क्र.४१५.
२) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेतील नि. क्र.२४१.
३) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.१८/१०/२००८ रोजीचे सभेतील नि. क्र.७४९.
४) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेतील नि. क्र.२७९.
५) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.२२/०५/२०१० रोजीचे सभेतील नि. क्र.५१७
६) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.०१/०६/२०१० रोजीचे सभेतील नि. क्र.५२०.
७) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.०४/०७/२०१० रोजीचे सभेतील नि. क्र.५३५.
८) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.०५/०९/२०१० रोजीचे सभेतील नि. क्र.६९३.
९) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.२१/११/२०१० रोजीचे सभेतील नि. क्र.८६३
१०) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.०५/१२/२०१० रोजीचे सभेतील नि. क्र.९७४.
११) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.१९/०२/२०१२ रोजीचे सभेतील नि. क्र. १७१
१२) मा.व्यवस्थापन समीतीचे दि.२५/०३/२०१२ रोजीचे सभेतील नि. क्र. २५८
१३) मा.त्रिसदस्यसमितीचे दि.०६/०४/२०१२ रोजीचे सभेतीलनि.क्र.३५५.
१४) मा.त्रिसदस्यसमितीचे दि.३०/११/२०१२ रोजीचे सभेतील नि.क्र.८८४.
१५) मा.त्रिसदस्य समीतीचे दि.०७/०२/२०१३ रोजीचे सभेतील नि. क्र.११०.
१६) मा. त्रिसदस्यसमितीचेदि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२.
१७) मा. व्यवस्थापन समीतीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील नि. क्र.६३७ (०३).
१८) मा. व्यवस्थापन समीतीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील नि. क्र.७६८.

**प्रस्तावना:** समाधी मंदिरातून दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या भक्तांची मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. शिर्डी येथे येणारे साईभक्त हे श्री साईबाबांचे समाधीचे दर्शन घेणे या एकमेव उद्देशानेच येतात. गर्दीच्या वेळी मंदिर परिसरातील दर्शनरांगेत न मावणारे भक्त परिसराबाहेर गावात इतरत्र जातात. या दिवसेंदिवस वाढणाऱ्या गर्दीमुळे निर्माण झालेली परिस्थिती सुसहय करणेबाबत विचार केला असता, ज्या भक्तांना त्या दिवशी दर्शन मिळण्याची शक्यता नाही, त्यांनी मंदिर परिसरात गर्दी करणे उचित नाही. यावर एक स्वाभाविक उपाय म्हणजे संस्थानने मंदिरापासून काही अंतरावर जमीनी संपादीत केलेल्या आहेत. त्याठिकाणी साईभक्तांसाठी एक आकर्षण केंद्र निर्माण केल्यास मंदिर परिसरातील गर्दी विभागली जाईल. असा मा. व्यवस्थापन समितीचा मानस होता. यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.०३/०६/२००६ रोजीचे सभेतील नि. क्र.४१५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय संमत करणेत आला आहे.

"..आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, नवी दिल्ली यांनी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन, त्यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे Landscape Park, Saibaba Museum, Information Centre, प्रसंग-प्रदर्शन व त्यास ध्वनीमुद्रीत निवेदनाची जोड तसेच श्रीसाईबाबांची भव्य प्रतिमा (Holographic Image) आधुनिक तंत्रज्ञानासह, खुले नाट्यगृह, विविध शिल्पे, मेडिटेशन गार्डन, म्युझिक गार्डन इ. बाबींचा सर्व समावेशक असा

आराखडा व खर्चाचा तपशील मे.माथुर ॲण्ड काप्रे आर्किटेक्टस्, नवी दिल्ली यांचेकडून तयार करुन घेणेस व यासाठी जागा निश्चित करणेस मान्यता देण्यात आली. तसेच मंदीर परिसरातील सोयी-सुविधांची पुनर्रचना करणे व त्यासाठी मंदीर परिसरसरातील फार आवश्यक नसलेल्या सुविधा, स्टॉल इतरत्र स्थलांतरीत करावेत, असे ठरले."

त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेत नि. क्र.२४१ नुसार मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे गट नं. १९८, १९९, २०० व २०१ मध्ये साईगार्डन करण्याचे ठरले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८/१०/२००८ रोजीचे सभेत थीम डिस्प्ले संबंधिची कामे वगळता बांधकाम विषयक कामांचे रु.३५.५० कोटी मात्र रकमेचे आर्किटेक्ट यांनी सादर केलेले अंदाजपत्रकानुसार साईगार्डनचे बांधकाम व अनुषंगीक कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

नियोजित साई गार्डनचे एकूण ०३ टप्प्यांच्या बांधकामासाठी विहीत पध्दतीने कार्यवाही करणेस व ते संपूर्णपणे अंमलात येईपर्यन्त साधारणत: ०३ ते ०४ वर्षाचा कालावधी लागेल, असा अंदाज आहे. या कालावधीमध्ये बांधकामासह इतर अनुषगिक साहित्यांच्या दरामध्ये तसेच वैशिष्टयपूर्ण करावयाचे कामांच्या तांत्रिक कामांच्या तंत्रज्ञानमध्ये मोठय प्रमाणावर बदल होण्याची शक्यता आहे.

संस्थानकडे नियोजित साई गार्डन च्या विविध कामांसाठी आवश्यक असणारे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नाही. या सर्व बाबी लक्षांत घेतां, सदरहू सभेतील नि. क्रं. ७४९ अन्वये संस्थानमार्फत सदरहू प्रकल्पाची उभारणी करतांना त्यासाठी करावयाची देखभाल दुरुस्ती, त्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग व इतर बाबींवरील मनुष्य व तांत्रिक बळ उपलब्ध नसल्याने सदर प्रकल्प BOT तत्वावर राबविणेबाबत ठरले त्याबाबत खालील प्रमाणे निर्णयझाला. "यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे यांचेमार्फत याकामी सविस्तर आराखडा व अंदाजपत्रक तयार केलेले आहेत. त्यानुसार ३० वर्षाचे कालावधी करिता बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर उपरोक्त नमूद केल्यानुसार साईगार्डनची निर्मिती करण्यास व याकामी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करुन बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) या तत्वावर साईगार्डन निर्मितीसाठी इच्छुकांकडून कालावधी, अपेक्षित खर्च, संस्थानसाठी यामधुन किती उत्पन्न मिळेल या सर्व बाबींसह सविस्तर प्रस्ताव मागविणेत यावेत, याकरिता शिफारस करण्यात आली ती मान्य करण्यात आली."

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेत साईगार्डन प्रकल्पासाठी प्राप्त खालील दोन इच्छुक संस्थाचे B.O.T. तत्वावरील सिलबंद प्रस्ताव सादर करण्यात आले.

01. AMBICA AGARBATHIES & AROMA INDUSTRIES LTD., ELURU (A.P.)
02. VARDHMAN GROUP, FORT, MUMBAI- 400 001

उपरोक्त सभेतील नि. क्र.२७९ अन्वये याकामी फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्याने, निविदा न उघडता, सदर कामासाठी जादा इच्छुक निविदा सादरकर्त्यांना सहभाग घेता यावा, म्हणून निविदा मागविणेची मुदत वृत्तपत्रात आणि संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.१०/०५/२०१० अखेर वाढविण्यात आली. तथापि, वाढीव मुदत देऊनही दोनच प्रस्ताव प्राप्त झाले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१० रोजीचे सभेत वरील प्रमाणे प्राप्त झालेले दोन संस्थांचे प्रस्तावाबाबत सादरीकरण झाले. दोन इच्छुक संस्थाचे सादरीकरण पाहून त्यावर नि. क्रं.५२० अन्वये याबाबत सविस्तर अभ्यास करुन व्यवस्थापन समितीचे पूढील सभेत अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले. तद् नंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०५/२०१० रोजीचे सभेमध्ये, साई गार्डन हा नियोजित व प्रस्तावित प्रकल्प राबविण्याचे अनुषंगाने, सिंगापूर येथील सेन्टोसा आयलंड या थीम पार्कची पहाणी मा. व्यवस्थापन समिती सदस्यांनी व संस्थान अधिकाऱ्यांनी करावी, जेणेकरुन शिर्डी येथे उभारण्यात येणाऱ्या नियोजित व प्रस्तावित साई गार्डन प्रकल्पासाठी काही नवीन संकल्पना राबविता येईल असे ठरले.

त्यादृष्टीने मा. व्यवस्थापन समिती सदस्यांनी व अधिकारी यांनी दि.०१/०६/२०१० ते ०५/०६/२०१० अखेर, सिंगापूर येथील सेन्टोसा आयलंड येथे भेट देऊन तेथील मनोरंजनात्मक सोयी-सुविधांची पहाणी केली. व पाहणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१० रोजीचे सभेमध्ये सादर करण्यात आला सदरहू सभेतील नि.क्र.५३५ अन्वये अभ्यास व पाहणी दौऱ्याचे नोंद घेऊन त्यानुसार संस्थानमार्फत उभारण्यात येत असलेल्या साई गार्डन प्रकल्पामध्ये खालील बाबींचा समावेश करण्याचे ठरविण्यात आले.

1) संस्थानमार्फत उभारणेत यावयाच्या नियोजित साई गार्डन थीम पार्क मध्ये लेजर शो उभारणे प्रस्तावित आहे. सदरचा लेजर शो सिंगापूर येथे उभारण्यात आलेल्या लेजर शो सारखा भव्य व आकर्षकरित्या उभारणे.
2) संस्थानमार्फत उभारणेत यावयाच्या नियोजित साई गार्डन थीम पार्क मध्ये 3D Imax थिएटरचा समावेश करणे ऐवजी 4D Magic या संकल्पनेचा समावेश करणे..

3) संस्थानमार्फत उभारण्यात येणाऱ्या गार्डन मध्ये मुलांसाठी पाळणे, खेळणी, वृध्दांसाठी नाविन्यपूर्ण घटक यांचा समावेश करणे.

मा. व्यवस्थापन समीतीचे दि.०५/०९/२०१० राजीचे सभेतील नि. क्रं.६९३ अन्वये सदर प्रकल्प BOT ऐवजी संस्थानमार्फत करणेबाबत खालील प्रमाणे निर्णय झाला.

सदरहू प्रकल्प हा BOT तत्वावर राबविणेऐवजी थेट संस्थानतर्फे राबविण्यात यावा, असे ठरले. त्यामुळे BOT तत्वावरील प्रकल्पासाठी प्राप्त झालेले दोन प्रस्ताव रद्द करण्यात यावेत. याकामी लेझर शो उभारणीसाठी जागतिक पातळीवर निविदा मागविणेत याव्यात. लेझर-शोचे उभारणीसाठी आवश्यक सिव्हील वर्क व संपूर्ण गार्डन विकसीत करणेसाठी आवश्यक असलेल्या इतर कामांसाठी स्वतंत्ररित्या राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात. तसेच, 4D- शो व इतर वैशिष्टयपूर्ण कामांचे परिपूर्ण उभारणीसाठी राष्ट्रीय पातळीवर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले."

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, प्रस्ताव मागविणेकामी टाईम्स् ऑफ इंडिया व महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रातून व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. उपरोक्त प्रकल्पाबाबत खालिल संस्थानी स्वारस्य असल्याचे कळविले होते.

1. Laservision Mega- Media Ltd., Hong Kong.
2. Baji- Rao- Pawar and Sons and Associates, Worli, Mumbai
3. Emotion Media Factory, Germany
4. Laser Events Private Limited, Bangalore
5. Premierworld Technology Ltd., Kolkata
6. Samarth Enterprises, Mumbai
7. 3P Infrastructure Pvt. Ltd., Mumbai.

उपरोक्त पैकी विहीत मुदतीत खालील संस्थांनी आपले सिलबंद प्रस्ताव सादर केल्या होत्या.

1) Laservision Mega- Media Ltd., Hong Kong.
2) Laser Events Private Limited, Bangalore
3) Premierworld Technology Ltd., Kolkata

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या तीन सिलबंद प्रस्तावातील तांत्रिक माहितीचा लिफाफा क्र.१ दि.२१/११/२०१० रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडण्यात आले. सदरहू लिफाफ्या मधील निविदा सादरकर्त्यांनी सादर केलेली कागदपत्रे तांत्रिक छाननी आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोशियटस् प्रा. लि., नवी दिल्ली यांचेकडून करण्याछत आली. तसेच उपरोक्त निविदा सादरकर्त्यांचे प्रतिनिधींना त्यांचे प्रस्तावाबाबत सादरीकरण करणेकामी दि.०५/१२/२०१० रोजीचे सभेपुढे निमंत्रित करण्यात आले होते.सदर सभेत निविदा सादरकर्त्यांचे तांत्रिक पूर्व पात्रतेबाबत चर्चा करुन व त्यांचे सादरीकरण बघून प्रस्ताहव सादरकर्त्यां पैकी Laservision Mega- Media Ltd., Hong Kong ही संस्था विषयांकीत प्रकल्पासचे उभारणीसाठी तांत्रिकदृष्टया योग्य असल्याचे आढळून आल्याने फक्त या संस्थेचा वित्तीय देकार लिफाफा (Financial Bid) उघडणेत यावा, असे ठरले.

त्यानुसार Laservision Mega- Media Ltd., Hong Kong यांचा वित्तीय देकार लिफाफा दि.०५/१२/२०१० रोजीचे सभेपुढे उघडण्याnत आला. सदर संस्थेकने विषयांकीत प्रकल्पातचे कार्यान्वीत करणासाठी US$ ६२,९८,५००/- इतका अंदाजे गंतवणुक खर्च येइल असे नमूद केलेले होते.

सदर गुंतवणूक खर्चाबाबत, Laservision Mega- Media Ltd., Hong Kong यांचे उपस्थित प्रतिनिधी Mr. John Kehoe, Project Manager आणि Mr. Jeyendran Naidu, Co-ordinator यांचेशी चर्चा करण्यात आली सदर प्रतिनिधीनी विषयांकीत प्रकल्पाचा कार्यान्विकरण गुंतवणूक खर्चात सवलत देऊन US$५५,००,०००/- या अंदाजे अंतिम खर्चास सहमती दर्शवली.

तसेच Laservision Mega- Media Ltd., Hong Kong यांचे प्रतिनिधीनी उपरोक्त प्रकल्प खर्चात खालील बाबी व त्यावर होणारा खर्च समाविष्ट नसल्याने या सर्व बाबी संस्थान खर्चात करण्यात याव्यात, असे सुचित केले.

१) संस्थेला अदा करण्यात यावयाची रक्कम US$ चलनात, संस्थेच्या सूचनेनुसार थेट बॅक खात्यात जमा करावी. याकामी येणारे बॅक चार्जेस, बॅक कमिशन चार्जेस, सेवाकर, परदेशी चलनविनिमयासंबंधीत कर व इतर अनुषंगिक शासकीय कर संस्थानमार्फत स्वंतत्ररित्या आदा करण्यात यावेत.

२) संस्थेमार्फत पुरविण्यात येणा-या तांत्रिक मशिनरी व इतर बाबींवरील सीमाशुल्क व इतर लागू असणारे शासकीय कर संस्थानने स्वतंत्र आदा करावेत.

३) प्रकल्पाचे उभारणी, कार्यान्वीकरण व दैनंदिन वापरासाठी आवश्यक असणारी योग्य क्षमतेची वीज व पाणी संस्थानने स्वः खर्चाने उपलब्ध करून द्यावे.

४) संस्थेच्या आवश्कतेनुसार व मार्गदर्शनानुसार, प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांचे समन्वयाने प्रकल्पासाठी आवश्यक असणारे प्रेक्षागृह व इतर अनुषंगिक सोयी-सुविधांचे (कार्यालय, नियत्रंण कक्ष, प्रसाधनगृहे, संरक्षक भिंत आदि) बांधकामे संस्थानमार्फत व संस्थान खर्चाने करण्यात यावीत.

५) प्रकल्प उभारणीनंतर, दैनंदिन प्रकल्प सुरू ठेवणे, त्याची देखभाल करणे, दुरूस्ती करणे आदी बाबींसाठी स्वतंत्रपणे खर्च येईल, त्यासाठी उभयपक्षी सहमतीने अलाहिदा आर्थिक बाबींसह स्वतंत्र करारनामा करणेत यावा.

६) प्रकल्पासंबंधी भविष्यात काही वाद-विवाद उद्भवल्यास, त्यासाठी आवश्यक असणा-या लवादाची तरतूद उभयपक्षी सहमतीने करारनाम्यात समाविष्ट करण्यात यावी.

७) प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक असणारी स्थानिक प्राधिकरणाची मान्यता, परवाने आदि बाबी संस्थानने स्वःखर्चाने पूर्ण कराव्यात. तथापी, प्रकल्पासाठी आयात करावी लागणारी मशिनरी व त्यासंबंधीत इतर अनुषंगिक बाबीं व त्यासाठीचा खर्च संस्थने करावा. त्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे संस्थानने द्यावीत.

त्याजनुसार लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना साई गार्डन प्रकल्पातंर्गत लेजर शो निर्माण करणेसाठी दि.०६/१२/२०१० रोजी कार्यादेश देणेत आला.लेजर शो प्रकल्पाकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेसमवेत दि.१२/०५/२०११ रोजी सिंघानीया ॲण्ड कंपनी, सॉलीसिटर ॲण्ड ॲडव्होकेट्स, इंटरनॅशनल लिगल कनसल्टंट, मुंबई यांचे सल्ल्याने करारनामा करण्यात आला आहे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना खालील स्टेजनुसार रक्कम अदा करण्याचे ठरले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Payment 1 | Advance- Due up on execution of Contract | 1.82 % |
| 2. | Payment 2 | Due upon arrival at Shirdi of Project Manager | 10.00 % |
| 3. | Payment 3 | Due upon departure from Shirdi of Concept Phase Staff | 10.00 % |
| 4. | Payment 4 | Due upon Submission of Concept Phase Report | 3.18 % |
| 5. | Payment 5 | Due upon Completion of the deliverables for 50% of the Design Phase. | 14.00 % |
| 6. | Payment 6 | Due upon Completion of the deliverables for 100% of the Design Phase. | 14.00 % |
| 7. | Payment 7 | Due upon Concept Signoff | 5.00 % |
| 8. | Payment 8 | Visual production phase to commence upon receipt of funds | 9.00 % |
| 9. | Payment 9 | Equipment purchases to commence upon receipt of funds | 10.00 % |
| 10. | Payment 10 | Due upon completion of water based assets installation | 2.50 % |
| 11. | Payment 11 | Due upon completion of lands based assets installation | 2.50 % |
| 12. | Payment 12 | Due upon achievement of Practical Completion | 10.00 % |
| 13. | Payment 13 | Due upon achievement of Final Completion | 8.00 % |
| | | Total: | 100.00 % |

लेजर शोसाठी तयार करावयाच्या श्री साईंच्या जिवनावरील प्रासंगीक कथनकांसाठी (Story Board) दि.१८/०८/२०११ रोजी मुंबई येथे Laser Vision यांचे प्रतिनीधी समवेतझालेल्या बैठकीमध्ये सात (०७) कथा निवडण्यात येवून निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

१. बाबांचे शिर्डीत प्रगटीकरण
२. बाबांनी स्वहस्ते अन्न शिजवणे
३. श्री खंडोबा मंदिरात म्हाळसापतीव्दारे आओ साई संबोधन
४. बाबांनी दिवाळीला पाण्याने लावलेले दिवे.
५. उदीचा प्रभाव दर्शविणारा प्रसंग
६. साईबाबांचा ब्रम्हांडनिवास
७. दासगणूंचे प्रयागस्नान.

लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे कन्सेप्ट टीमने दि.१९/०८/२०११ ते दि.२३/०८/२०११ या कालावधीत मुंबई व शिर्डी येथे संस्थान अधिकारी, आर्किटेक्ट व सिव्हील कामाचे ठेकेदार यांची भेट घेवून शो कन्सेप्ट व प्रकल्पाबाबत चर्चा केली.

मा.व्यवस्थापन समीतीचे दि.१९/०२/२०१२ राजीचे सभेपुढे मे.लेजर व्हिजन यांचे Mr. John Kehoe, Director of Business Development व Mr.Lloyed Weir, Laservisions Creative Director हे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी श्री साईबाबांचे जीवन चरित्रावर आधारीत कथानक (Story Board) चे सादरीकरण व कथेचे विश्लेषण (Concept Phase Report Presentation) केले. तसेच त्यावेळी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी दि.१९/०२/२०१२ रोजीचे पत्रान्वये Concept Phase Report जमा केलाव Mr.Lloyed, Creative Director यांनी खालीलप्रमाणे कथानाक सादरीकरण केले.

**(१) प्रस्तावना: लेजर शो (Preclude & Introduction)**

- प्रथम सदर लेजर शो सुरु होणे आधी साईभक्त आपआपल्या जागेवर बसे पर्यन्त साईबाबांची मधुर व शांत आवाजातील भजन संगीत वाजविणेत येतील.
- त्यानंतर, ऑडीटोरीयममध्ये काही क्षणांसाठी अंधार करुन प्रेक्षकांची उत्सुकता वाढविली जाईल व श्री साईंचा मोठ्या आवाजात जयघोष ऐकू येईल.
- तदनंतर तळ्यातील संगीतमय पाण्याचे कारंजे सुरु होऊन भक्तीमय वातावरण बनवतील व कार्यक्रम सुरु झाल्याचे प्रेक्षकांना जानवेल.
- पाण्याचे कारंजे विशिष्ट पद्धतीने गाण्यावरती उडतील व प्रेक्षकांना कार्यक्रमात जिवंतपणा आढळेल.
- त्यानंतर सर्व प्रकाश तळयातील पाण्यावर पडेल व तळयातील पाणी दिव्य प्रकाशमय होईल. यावेळी आकर्षक संगीत लावलेले असेल.
- त्याबरोबरच श्री साईबाबांच्या आवाजात "सबका मालीक एक" असे शब्द ऐकु येतील व पाण्याच्या तळयातून एक पांढरा शुभ्र प्रकाश उंच आकाशापर्यंत जाईल.

**(२) बाबांचे शिर्डीत प्रगटीकरण (Baba's Appearance) :**

- इथपासून श्री साईंच्या पहिल्या कथेला सुरुवात होईल. प्रथम पाण्याचे दोन कारंजे एकामागोमाग उडतील त्यावर हिरव्या रंगाचा प्रकाश सोडलेला असेल.
- पाण्याचे कारंजे वाढवून सुंदर वेलीत परिवर्तीत होतील.पुढे त्या वेलीचे सुंदर लिंबाचे झाडात (Neem tree) रुपांतरीत होईल.
- त्या लिंबाचे झाडाखालील श्री साईनाथ महाराज 16 वर्षाच्या वयातील सुंदर मुलाच्या रुपातील प्रतिमा प्रगट होईल.
- त्यानंतर मधल्या मोठ्या स्क्रिनवर तरुण वयातील ध्यानस्त बसलेले बाबांची प्रतिमा दिसेल व दोंन्ही बाजूच्या स्क्रिनच्या सहाय्याने एका बाजूने सुर्योदय होऊन दुसऱ्या बाजूस अस्त झाल्याचे दिसेल. पाण्याच्या कारंजावर चंद्र, तारे व चांदण्या दिसतील. सदरचे भव्य रुप पाहून बाबा चराचरात व्याप्त असल्याचे जाणवेल.
- उपरोक्त प्रसंग पाहून शिर्डी गांवकरी आपसात चर्चा करतांना दाखविणेत येतील. "हा मुलगा कोण आहे.? "कोठून आला?,किती सुंदर अद्धुत आहे.! वगैरे वगैरे.
- श्री साईंची माहिती मिळविणेसाठी खंडोबाचे वारे आल्यानंतर लोकांनी प्रश्न विचारले त्यावेळी निंबवृक्षाच्या जवळ खोदणेस त्यांना खंडोबाने सांगीतले
- त्यावेळी गावंकऱ्यांनी त्या ठिकाणी खोदल्यावर गो मुखी आकाराच्या पाटावर चार समया पेटलेल्या दिसतील व सर्व गांवकरी आश्चर्य चकित होतील.

- वॉटर स्क्रिनवर चार ज्योती (समया) प्रज्वलीत होतील व संपूर्ण ऑडीटोरीयम मधील वातावरण मंत्रमुग्ध होऊन जाईल.

**(३) श्री खंडोबा मंदिरातील "आओ साई" (Welcome Sai) Arrival, recognition & place.**

- स्टेडीयममध्ये घोड्याच्या ओरडण्याचा आवाज घुमेल व पाण्याचे तळयावर घोडा पाण्यातून चालल्यामुळे उडणारे पाणी कारंजांचे माध्यमातून दाखविणेत येईल.
- दोन कारंजे उडून वेल तयार करतील या वेळी हिरव्या रंगाचा प्रकाश त्यावर सोडण्यात येईल व त्यातच काही केशरी रंगाचे स्पॉट असतील.
- वेलीपासून आंब्याचे झाड तयार होताना दिसेल व त्यांचे फांद्यांना केशरी रंगाचे आंबे लटकलेले दिसतील.
- आंब्याचे सुंदर मोठे झाड तयार झालेले दिसेल.
- आंब्याचे झाड पाण्याच्या कारंजावर हळूवार गोल फिरेल व त्याखाली साईबाबा तरुण रुपात आराम करतांना दिसतील.
- यावेळी श्री साईबाबा प्रेक्षकांना प्रथमच तरुण रुपात व फकीर वेशात दिसतील.
- श्री साईबाबा एका बाजूला पाहतील.
- प्रखर उन पडलेले लाईटच्या माध्यमातून दाखविणेत येईल.
- क्षितीज रेषेकडून कोणी मनुष्य चालत आल्याचे छोटे चित्र दिसेल.
- मनुष्याची प्रतीमा स्पष्ट दिसून तो मनुष्य वाकून चालत असल्याचे जाणवेल.
- चांदपाटलाचा चेहरा थकलेला दिसेल व त्याच्या पाठीवर घोड्याचे खोगीर घेतल्यामुळे तो वाकुन चाललेला असेल.
- चांदपाटील घामाघुम व घोडी हरवल्यामुळे दु:खी झालेले दिसतील.
- साईबाबा त्यांचेकडे पाहूण हाक मारतील "चांदपाटील, जरा सावलीत बस."
- चांदपाटील थकीत होऊन बाबांकडे पाहतील व झाडाखाली बसलेली व्यक्ती कोण आहे. असा विचार त्यांचे मनात येईल.
- चांदपाटील खोगीर खाली ठेवून आपली घोडी हरवल्याचे सांगतील व सावलीत बसतील
- त्यावेळी बाबा त्यांना नाल्याकडे बोट दाखवून तेथे शोध म्हणून सांगतील.
- चांदपाटील नाल्याकडे जाऊन पाहतो.
- पाण्याच्या तळयातील दोन बाजूच्या कारंजावर एका बाजूस, घोडी चरतानां दिसेल व दुसऱ्या बाजूस चांदपाटील आश्चर्यचकित झालेले दिसतील यावेळी मधील स्क्रिनवर नाला दाखविला जाईल.
- घोडी डाव्या बाजूच्या स्क्रिनवरुन चांदपाटलाकडे आल्याचे दिसेल. घोड्याच्या पायाने पाणी उडाल्याचे जाणवेल.
- घोडी मिळाल्यावर चांदपाटील अत्यंत खुश दिसतील व बाबांकडे येतील
- बाबांनी चिलीम हातात घेतलेली असेल.
- बाबांनी चिलीम पेटविण्यासाठी दुसऱ्या हातात चिमटा घेवून जमिनीवर मारतील.
- संपूर्ण पाण्यात अत्यंत सुंदर लाल प्रकाश पडेल, जमिनीतून निखारे व ज्वाला निघतील.
- बाबा चिमट्याने निखारा घेवून चिलीम पेटवतील.
- त्यानंतर वॉटर स्क्रिनवर बाबांची सटका हाता घेतली प्रतीमा दिसेल.
- छापी भिजविण्यासाठी बाबा जमिनीवर सटका मारतील व जमिनीला पाण्याप्रमाणे कंपने येतील.
- संपूर्ण पाण्याच्या तलावात निळा प्रकाश दिसेल व सटका मारलेल्या जागेतून पाण्याचा कारंजा उडेल हा दिव्य चमत्कार बघून प्रेक्षक आश्चर्यचकित होतील.
- बाबा स्वत: चिलीम ओढून चाँद पाटलास चिलीम पिण्यास देतील.
- प्रसंग पूर्ण झाल्याचे दर्शविण्यासाठी आकाशातील सुर्याचे प्रतिबिंब दाखविण्यात येईल.
- सुर्याचे किरणापासून कारंजा तयार होईल.
- यानंतर काही वर्षाचा कालावधी दर्शविण्यासाठी विवीध प्रकारच्या कारंजे वापरले जाईल.
- लग्नाच्या वऱ्हाडामध्ये येणाऱ्या बैलगाड्या व बैलांच्या घुंगरांचा आवाज ऐकु येईल.

- तिसऱ्यांदा कारंजाचे सहाय्याने वेली पासून वडाचे झाड तयार होईल.
- खंडोबाचे मंदिर दाखविले जाईल
- मध्यल्या वॉटरस्क्रिनवर खंडोबा मंदिर व वडाचे झाड दर्शविण्यात येवून म्हाळसापती व साईबाबा एकमेकांच्या समोर आल्याचे दाखविले जाईल व तिसऱ्या कारंजावर चाँद पाटील साईबाबांचा निरोप घेवून जातानां दिसतील
- पाण्याचे तिनही वॉटरस्क्रिन मिळून साईबाबा व म्हाळसापती यांची भव्य प्रतीमा तयार होईल व म्हाळसापती आओ साई म्हणून स्वागत करतील.
- संपूर्ण प्रेक्षकासमोर श्री साईबाबांची वडाच्या झाडाखाली बसलेली भव्य प्रतीमा तयार होईल श्री साईचे विवीध लाईट व कारंजाच्या सहाय्याने स्वागत होईल.

**(४) बाबांनी पाण्याने लावलेले दिवे (Lighting of Lamps With Water)**

- दिवाळीचे वातावरण दर्शविण्यासाठी पाण्याच्या तलावात दिवे लागलेले दिसेल व दिवाळीचे गाणे दाखविण्यात येईल.
- कारंजाच्या सहाय्याने संगीतावर दिवे पेटलेले दाखविले जाईल.
- डफलीच्या तालावर साईबाबा नृत्य करतांना दिसतील.
- दिवाळी तेल घेण्यासाठी साईबाबा वाण्याकडे तेल मागतानां दाखवले जाईल.
- परंतू दुकानदार तेल देत नाही असे चित्र दाखविण्यात येईल.
- साईबाबा दुसऱ्या दुकानदाराकडे तेल घेण्यासाठी जातील .
- तोही दुकानदार तेल देण्यास मनाई करेल व सर्व दुकानदार मिळून बाबांना तेल न देण्याचे ठरवतील.
- परंतू बाबांच्या चेहऱ्यावर कोणतीही काळजी दिसणार नाही.
- साईबाबा दिव्यात वाती घालतांना दाखविण्यात येईल.
- सर्व दुकानदार साईबाबांची गंमत पाहण्यासाठी मशिदीभोवती जातील.
- बाबा टमरेल हाती घेवून त्यात पाणी टाकतील व त्यातील एक घोट पाणी पितांना दिसतील.
- बाबा टरमेल मधील पाणी दिव्यामध्ये ओततांनां दिसतील
- दिव्यामध्ये तेलाऐवजी पाणी टाकलेले पाहुन दुकानदार हसतील असे दाखविले जाईल.
- पाण्याने लावलेले दिवे प्रज्वलीत होतील व प्रेक्षकांना संपूर्ण पाण्याच्या तलावावर दिवे पेटल्याचा आभास होईल.
- बाबांची गंमत पाहण्यासाठी आलेले दुकानदार आश्चर्यचकित होऊन तोंडात बोटे घालतानं ा दिसतील.
- संपूर्ण पाण्याचा तलाव दिव्यांनी प्रज्वलीत होईल व प्रेक्षकांना प्रत्यक्षात साईबाबांच्या सानिध्यात दिवाळी साजरी केल्याचा आनंद मिळेल.
- भव्य लाईट व कारंजांच्या सहाय्याने संपूर्ण स्टेडीयम व्यापून टाकणारा प्रकाश सोहळा दिसेल श्री साईबाबांची भव्य प्रतीमा मधल्या कारंजावर येवून प्रेक्षकांना दोन्ही हाताने आशिर्वाद देईल.
- हा दिवाळीचा भव्य सोहळा पाहून लेजर शो पाहणारे हजारो भावीक त्यात भारावून जातील.

**(५) उदीचा प्रभाव (Power of Udi)**

- लेजर शो मधील हि कथा उदीचे महात्म्य वर्णन करणारी असेल दोन वॉटरजेटच्या सहाय्याने एक कमान करुन लेजरच्या माध्यमातून ब्रम्हांडांचे चित्र दाखविणेत येईल.
- सदर चित्रात साईबाबांचे रेखांकन लेजर किरणाच्या माध्यमातून दिसेल.
- श्री साईबाबांचे रेखंकनातील डोळ्यावर प्रेक्षकांचे लक्ष केंद्रीत होईल
- बाबांचे डोळ्यात प्रेक्षकांना प्रसुती वेदनेने त्रासलेल्या महिलेचे चित्र दिसेल.
- प्रेक्षकांना पुन्हा श्री साईंचा डोळा दिसेल व संपूर्ण चेहरा दिसेल आणि श्री साईबाबांना आपल्या भक्तांच्या वेदनांची खबर/ माहिती असल्याचे प्रेक्षकांना दिसेल.
- संपूर्ण तलावातील पाण्यावर ज्वाला दाखवून त्याच्या प्रकाशात श्री साईबाबांचा तेजस्वी चेहरा दिसेल.

- धुनीच्या ज्वालांमधून निघणारी राख बाबा आपल्या हाता धरतील व आपल्या झोळीत ठेवतील.
- नानासाहेब चांदोरकरांना देणेसाठी बाबा रामगीर यांना उदी देवून जामनेरला जाणेस सांगतील
- रामगीर साईबाबांना आपल्याकडे पैसे नसल्याचे सांगतील परंतू बाबा तु काळजी करु नकोस. सर्व व्यवस्था होईल असे आश्वासन देतील.
- संपूर्ण तलावातील कारंजावर अंधार दाखवून आगगाडी/ रेल्वेचा आवाज प्रेक्षकांना ऐकू येईल. अचानक वॉटर स्क्रिन चालू होऊन, ट्रेन एका बाजूने दुसरीकडे जाताना दिसेल. व रेल्वेच्या इंजिनाचा धुर दाखविण्यात येईल.
- रामगीर जळगांवच्या स्टेशनवर उतरलेले दाखविणेत येईल.
- एक टांगा चालवणारा रामगीर यांना भेटून त्यांना चांदोरकरांच्या वाड्यावर घेऊन जाण्याचे चित्र दाखविण्यात येईल.
- रामगीर टांग्यामध्ये चांदोरकरांच्या वाड्याकडे जातानां चित्र दिसेल पाण्याच्या कारंजांवर टांग्याची चाके पळताना दिसतील.
- चांदोरकरांचा वाडा दुरुन दिसेल व टांगा वाड्यासमोर थांबेल.
- रामगीर टांग्यातून उतरेल व वॉटरस्क्रिन वरुन बाजूला गेल्याचे दिसेल परंतू रामगीर पुन्हा येईल पण यावेळी टांगा व टांगेवाला अदृश्य झालेले असतील
- चांदोरकरांचा सेवक रामगीरांना घेवून वाड्याकडे जाईल व रामगीरांनी टांग्याबद्दल विचारले असता त्याबद्दल आपणांस माहिती नसल्याचे सेवक सांगेल
- रामगीर उदी नानांना देतील व टांग्याबद्दल विचारतील यावेळी टांगा घेवून साक्षात बाबाच आल्याचे त्यांना विश्वास वाटेल या प्रसंगाने भाविकांच्या/ प्रेक्षकांच्या अंगावर शहारे येतील
- नानांच्या सुनेला उदी पाण्याबरोबर प्यायला दिली असता निर्विघ्न प्रसुती प्रसंग घडेल व एका सुंदर बाळाचा जन्म झाल्याचे दिसेल.
- पाण्याच्या कारंजावर बाळाला व स्टेडीयममध्ये बसलेल्या प्रेक्षकांना लेजरव्दारे आशिर्वाद देताना साईबाबांची मोठी प्रतीमा दिसेल.

**(६) श्री साईबाबांचे ब्रम्हांडगमन (Leaving of the Body by Sainath)**

- ह्या कथानकातील श्री साईबाबा म्हाळसापतींना आपण ब्रम्हांड गमणासाठी जात असल्याचे सांगतात व तिन दिवसापर्यंत माझा देह सोडून न जाणेस सांगतात
- मधल्या वॉटरस्क्रिनवर म्हाळसापतींनी बाबांचे डोके आपल्या मांडीवर घेतलेले दिसते तर उरलेल्या दोन्ही वॉटर स्क्रिनवर पहिल्या दिवसांचा कालावधी दाखविणेसाठी सुर्यास्त व चंद्रोदय दाखविला जाईल.
- दुसऱ्या दिवशीचा प्रसंग दाखविण्यात येईल. लोकांमध्ये बाबांची समाधी खोदण्या करण्याबद्दल चर्चा चालू असेल व दुसरीकडे म्हाळसापती बाबांचा देह घेवून बसलेले असतील.
- मेणबत्ती व सर्च लाईटच्या सहाय्याने बाबांची प्राणजोत दर्शविण्यात येईल. मेणबत्ती व सर्च लाईट हळूहळू कमी होऊन बंद झाल्याचे दिसेल
- मेणबत्ती विझुन संपूर्ण स्टेडीयममध्ये अंधार हाईल व प्रेक्षकांमध्ये उत्सुकता व शांतता निर्माण होईल.
- श्री साईचे विवीध धर्माचे भक्त बाबांचे भजन म्हणताना व रडताना दिसतील " साईबाबा बोलो "या भजनाचा आवाज स्टेडीयममध्ये येईल.
- साईबाबा हळुवार डोळे उघडून, उठून बसतील व आपल्या भक्तांना आर्शिवाद देतील.
- व्हाईट लेजर व सर्च लाईटच्या साहाय्याने सर्व स्टेडीयम प्रकाशमय होईल व पाण्याचे कारंजावर साईची मोठी प्रतीमा दिसेल.

**(७) दासगणुचे प्रयाग तिर्थस्नान (Das Ganu’s Bath at PrayagTirth)**

- दासगणुंचे प्रयाग तिर्थस्नान करण्याची इच्छा होते. तिकडे प्रयागात हजारो भाविक स्नानासाठी गेलेले असतात.

- डाव्याबाजूचे वॉटरस्क्रिनवर दासगणु चालतांना दिसतील उजवीकडे प्रयाग तिर्थ व मध्ये नदी वाहताना दिसते.
- साईबाबा दासगणुना प्रयाग तिर्थाकडे जाण्याची गरज नसल्याचे व स्वत:चे भक्तीवर विश्वास ठेवणेस सांगतात.
- भक्तांना हृदयस्पर्शी प्रसंग दाखविणेत येईल यासाठी बाबांचे दोन्ही पायांतुन गंगा- यमुना वाहताना दिसतील व दुसऱ्या स्क्रिनवर दासगणू दर्शन घेताना दिसतील.

**(८) बाबांनी स्वहस्ते अन्न शिजविणे (Cooking & the Vessel)**

- एका जाळावर जेवण बनविण्यासाठी भांडे ठेवेलेले दिसते. भांड्याचे तोंड मोठे होऊन, वॉटर पुलमध्ये मर्ज होते.
- तलावातील पाणी उकळताना दिसेल व बाबा त्यात अन्न शिजवताना दिसेल.
- बाबा अन्न शिजवून वाढण्यासाठी हाती घेतील व प्रेक्षकांना प्रसाद दिल्याचे आभास होईल.

**(९) शोचा समारोप (Finale)**

- लेजर शोची सांगता करणेसाठी लेजर, कारंजे, लाईटस् यांचे माध्यमाने भव्यता दाखविली जाईल.
- मधल्या वॉटर स्क्रिनवर साईबाबांची आर्शिवाद देताना प्रतीमा दिसेल व दोन्ही बाजूला श्रध्दा, सबुरी नांवे येतील.
- लेजर शोच्या शेवट एक प्रकाशाचे मंदिर तयार होईल त्यात साईबाबांची प्रतीमा असले व अल्लाह मालीक या आवाजाने कार्यक्रमाची सांगता होईल.
- मोठ्या आवाजात श्रीं ची ललकारी दिली जाईल व प्रेक्षकांना स्टेडीयमच्या बाहेर जाणेसाठी लाईटस् चालू होतील.

लेजर व्हिजन लि., यांचे प्रतीनीधींनी वरिलप्रमाणेचे सादरीकरण केले असून, यावर मा. व्यवस्थापन समितीचे सदस्यांनी विस्तृत चर्चा करुन काही बदल करणे बाबत सूचना दिल्या. त्यानुसार आवश्यक त्या दुरूस्त्याकरून Laser Vision यांचे प्रतिनीधींनी मारोजीचे सभेपुढे २०१२/०३/०४.उपसमीती सभेचे दि . .लेसादरीकरण केलेजर व्हिजन लि., यांनी माविश्वस्तांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे क.थानकामधे व लेजर शोच्या प्रतिमांमधे बदल करुन पुन्यावेळी लेजर व्हिजन .श्च प्रत्येक कथानकाचे सविस्तर व वर्णनानुसार सादरीकरण केले: करण करणेयांना कथानक तयार करुन त्यानुसार प्रत्यक्ष कलाकारांचे चित्री Computer Graphic Creation व Digital Sequencing करुन लेजर शो पूर्ण करणेस सूचना देणेत आल्याकार्यदेशानुसार लेजर व्हिजन यांना . .पुढील टप्प्यांची रक्कम विहित पध्दतीने अदा करण्यात यावी असे ठरले

त्यानुसार लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी केलेल्या कामानुसार व त्यांचेशी या कामासाठी केलेल्या करारनाम्यानुसार त्यांना Payment Stages ०१ ते०४ व ०७ ते ०८ पोटी खालील प्रमाणे US$ २१,४५,००० अदा करणेत आले आहे.

| Sr. No. | Payment Schedule | Percentage | Amount US$ |
|---|---|---|---|
| 01. | Payment 1- Advance- Due up on execution of Contract | 1.82% | 100,000 |
| 02. | Payment 2- Due up on arrival at Shirdi of Project Manager | 10% | 550,000 |
| 03. | Payment 3- Due up on departure from Shirdi of Concept Phase Staff | 10% | 550,000 |
| 04. | Payment 4- Due up on Submission of Concept Phase Report | 3.18% | 175,000 |
| 05. | Payment 7- Due upon Concept Signoff | 5% | 275,000 |
| 06. | Payment 8- Visual production phase to commence upon receipt of funds | 9% | 495,000 |
| **Total Bill Paid US$:** | | | **21,45,000** |

दरम्यान, मा. उच्च न्यायालयाचे दि.१३/०३/२०१२ आदेशानुसार श्री साईबाबा संस्थानची तत्कालीन व्यवस्थापन समिती रद्द करुन संस्थायनचे कामकाज पाहणेसाठी मा. प्रधान जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थामन विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची त्रिसदस्य समिती नियुक्ति केली होती. त्यानंतर मा.उच्च न्यायालयाचे दि.१६/१०/२०१२ रोजीच्या आदेशात "(c) Shall not take any major financial decision of whatsoever nature." असे नमूद करणेत आले होते.

Laser Vision Ltd., Hong Kong यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ अन्वये करारनाम्यातील Payment Schedule नुसार Payment ०५व ०६ प्रमाणे पुढील बिले सादर केली आहेत.

| Sr. No. | Date | Payment Schedule | | % | Amount US$ |
|---|---|---|---|---|---|
| 01. | 05/11/2012 | Payment 05 | Due upon Completion of the deliverables for 50% of the Design Phase. | 14% | 770,000 |
| 02. | 17/12/2012 | Payment 06 | Due upon Completion of the deliverables for 100% of the Design Phase. | 14% | 770,000 |
| | | | | **Total Payment US$:** | **1,540,000** |

Laser Vision Ltd., Hong Kong यांनी वरीलप्रमाणे सादर केलेली बिले अदा करणेबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.०७/०२/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ११० खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, करारनाम्यातील शर्त क्र.१७/१ नुसार, साई गार्डन प्रकल्पाच्या बांधकामास होणाऱ्या संभाव्य विलंबाबाबत मे. लेजर व्हिजन लि. हाँगकाँग यांना त्यांचे देयक तुर्त स्थगीत ठेवणेत आलेले आहे व त्यांचेमार्फत लेजर शो चे प्रकल्पावर होत असलेले सर्व कामही तुर्तास थांबवावे, असे संस्थानतर्फे विनंती पत्राद्वारे कळविण्यात यावे तसेच आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवी दिल्ली यांच्या अभिप्रायानुसार मे.लेजर व्हीजन लि., हाँगकाँग यांना तुर्तास रक्कम आदा करणेत येऊ नये व सदरची कार्यवाही करणेपुर्वी मा. औरंगाबाद खंडपीठात संस्थानच्या वतीने काम पहाणारे ॲड. चौकीदार यांचा सल्ला घेण्यात यावा, असे ठरले."

प्रस्तु त प्रकरणी ॲड. चौकीदार यांनी खालील प्रमाणे सल्लादिला होता.

*".. In view of order dated 16.10.2011 passed by the Hon'ble High Court wherein restrictions have been imposed that no major financial decision shall be taken by the Committee appointed by the Hon'ble High Court without soliciting prior permission of the Hon'ble High Court. The payment proposed to be made to Laser Vision Mega Media Limited,Hongkong is more than nine crores as per the schedule of the payment. This, in my opinion, is major financial decision which requires prior permission of the Hon'ble High Court In this regard a separate application has been already been prepared and settled for soliciting permission for issuance of separate tender for civil work.*

*I am hopeful that Hon'ble High Court may grant permission for construction of civil work, however, in my opinion, since payment to be made is more than nine crores rupees; separate application needs to be filed before payment is to be released. You may advise the concerned department to approach me for filing separate application."*

उपरोक्त निर्णयानुसार मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना इकडील जा.नं.५५६६/२०१३ दि.०७/०३/२०१३ रोजीचे पत्राने प्रकल्पावर त्यांचेमार्फत होत असलेले काम स्थगीत ठेवणेबाबत कळविणेत आले.

त्याकनंतर मा. त्रिसदस्यसमितीचेदि.१५/०३/२०१४ रोजीचेसभेतीलनि.क्र.१८२अन्वयेमे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले आहे. त्यानुसार संस्थानचे वकील श्री. संजय चौकीदार यांनी CAST/ ८७०८/ २०१४ दि.२५/०७/२०१४ अन्वये मा.मुंबई उच्चन्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल केले आहे.

मे.लेजर व्हीजन लि., हाँगकाँग यांनी वेळोवेळी बिलाची मागणी करणेसाठी खालील तारखेप्रमाणे पत्र दिलेली आहेत.

दि.०६/०८/२०१३, दि.०१/०८/२०१४, दि.०७/०७/२०१४, दि.०१/०९/२०१४, दि.०२/१०/२०१४, दि.०३/११/२०१४, दि.०१/१२/२०१४, दि.०१/०१/२०१५, दि.०१/०२/२०१५, दि.०१/०३/२०१५, दि.०१/०४/२०१५, दि.०१/०५/२०१५, दि.१७/०६/२०१५, दि.१४/०९/२०१५, दि.१०/१२/२०१५, दि.२१/०१/२०१६, दि.१५/०२/२०१६, दि.०९/०३/२०१६, दि.१३/०४/२०१६, दि.०३/०५/२०१६, दि.०१/०६/२०१६, दि.०६/०७/२०१६

मा.उच्च न्यायालयात उपरोक्त सिव्हील अर्जावर दि.२४/०६/२०१६ रोजी सुनावणी होऊन, खालीलप्रमाणे आदेश केले आहेत.

1. The present civil application is filed seeking permission to make payment of US$ 15,40,000/- in favour of Laser Vision Mega Media Limited, Hongkong or alternatively provide guidance to the committee as to the course of action to be adopted in respect of either continuation of the contract or termination thereof.
2. It is submitted by Mr.Choukidar, the learned counsel that, up till date an amount of Rs. 10,72,00,000/- is paid to the Laser Vision Company towards the part work done. The said company claims to have done work up to 8 stages and according to the applicant payment is made up to 6 stages. It is submitted that, the contractor to whom the civil work was allotted has left the work and action is taken against him.
3. According to the applicant, the remaining quantum of the work as per contract with M/s. Laser Vision would be approximately to the tune of Rs. 22,00,00,000/-
4. It is stated that, the completion of laser work will be of no use until the civil work is also done.
5. The viability of the said project will have to be considered i.e. about the condition of the project. It would be appropriate if the expert committee gives its opinion about the viability of the project.
6. We had asked the learned A. G. P. to give the names of the experts. The learned A. G. P. has provided the names of the persons from the Information and Technology Department, Maharashtra State.
7. Considering the above, we appoint the committee of the said persons to consider the nature of the project, its viability and give its recommendation as to whether it would be beneficial to proceed with the project and if yes, the manner in which the same is to be proceeded with. The Applicant / Sanstha shall co-operate with the said committee and provide all the details as would be asked by the said committee. The committee shall expeditiously take up the said matter and give his report on priority basis. The names provided by the learned A. G. P. are as under -
    1. Shri M. Sankaranarayanan, Director (IT)
    2. Shri MukeshSomkuwar, Section Officer (Technical)
    3. Shri AshwinGayatri, Head SEMT
    4. Shri Manish Anawadia, Sr. Consultant, SEMT
    5. Shri MithleshBolawat, Consultant, SEMT
8. The learned A. G. P. shall communicate this order to the members of the said committee. Place the matter after four (4) weeks.

वरीलप्रमाणे नेमण्यात आलेल्या तज्ञ समितीस दि.०३/०८/२०१६ रोजीचे बैठकीत प्रकल्पाच्या संबंधी सर्व माहिती व कागदपत्रे सादर करण्यात आलेले आहे.

दरम्यान, मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३७ (३) अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

आजचे सभेत मे. लेजर व्हिजन लि., हॉगकॉंग यांचे प्रतिनिधी उपस्थित होते, त्यांनी श्री साईबाबा मल्टीजमिडीया थीम पार्क प्रकल्पाचे समितीसमोर सादरीकरण केले.समितीने त्यां चेबरोबर लेजर शो च्यास सादरीकरणाबाबत चर्चा केली असता, सिव्हीञल वर्कचे काम अपुर्ण असल्यानमुळे मे. लेजर व्हिजन लि., हॉगकॉंग यांना पुढील काम करता येणे शक्य  नाही, असे समितीचे निदर्शनास आले. समितीने सदरहु प्रकल्पारवर किती /काय काम केले आहे व त्यां ना आतापर्यंत किती रक्कसम देणेत आलेली आहे तसेच करारनाम्यानुसार सध्याक किती रक्काम दयावयाची आहे याची माहिती घेतली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यालयालयाचे आदेशानुसार याकामी तज्ञांची चौकशी समिति तयार केलेली आहे हि तज्ञ समिती मा. उच्च. न्या यालयामध्येल आपला अहवाल सादर करणार असुन त्या नंतर मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले."

तज्ञ समितीने दि.०७/१०/२०१६ रोजी त्यांचा प्राथमिक अहवाल मा. उच्च न्यायालयात सादर केला, तूयावर मा. उच्च न्यायालयाने दि.२५/१०/२०१६ रोजी पाच तज्ञांचे समितीमध्येल आणखी दोन 1) Shri S. R. Shinde, Executive Engineer, P.W. (West Division), Aurangabad, 2) Shri Sayyad MunirPasha, Executive Engineer,P.W. (Electrical), Aurangabad यांची नेमणूक केली आहे.

या तज्ञ समितीची दि.०२/१२/२०१६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. सदरहू तज्ञ समितीने त्यांचचा दि.०४/०२/२०१७ रोजीचा अहवाल मा. उच्च न्यायालयात सादर केला असून, त्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**Report from Executive Engineer Shri. S. R. Shende, PW (West) Division Aurangabad for CIVIL Work: VISIT DATE to SITE: 19th NOVEMBER, 2016.**

Sai Sansthan Trust was responsible for the civil work without which Laservision limited could not carry out work. Till date civil work of water screen pond is completed. Water proofing and 3 cabins for Laser show are not constructed. The work of construction of Stadium is only at excavation stage.

Based on the situation, Civil Engineer is recommending that trustshould split the work in two parts i.e. water work and stadium. Allot the work to separate two agencies which can expedite the civil work and further, work of Laservision limited can proceed further. The total civil work amounting to Rs.1,11,90,830/- has been completed till date.

**A. Report from Executive Engineer Shri. S. M. Pasha, Public Work Electrical Division Aurangabad and Expert Committee member, Sai Garden (Theme park), Saibaba Sansthan, Shirdi: VISIT DATE TO SITE: 16th November, 2016.**

The necessary civil work required for the Theme park is at very initial stage and has been suspended for many years.

Further, there has been no electrical work initiated due to which it is not possible to evaluate the amount spend on electrical work for the said Theme park.

B. **OBSERVATIONS OF THE COMMITTEE:**

Based on the above reports submitted by Executive Engineer for civil and Electrical, Committee made the following observations:

1. The project of Multimedia Theme Park at Shirdi, envisaged to 3D Multimedia presentation involving Light and Water to showcase the based specifically on Shri Saibaba's life.
2. The Laservision project is based on the site preparation through civil and electrical work which is the responsibility of Sansthan as per the contract.
3. The Civil work initiated by the Trust as their part of responsibility is at very initial stage and would take more time as currently there is no civil work in progress. M/s Lservision are entirely dependant upon completion of the civil works and hence M/s Laser vision is not able to initiate the work.
4. Sansthan trust issued order to both Laservision and civil contractor in same time period. The required civil work should have been ready at signing of the contract with Laservision. As per the contract condition, Sansthan was not able to hand over ready site for laservision work.
5. As per the contract, till date Sansthan has made the payment for 39% of the contract value in USD without initiation of actual filed work.

Further, it will take time to complete the required civil-electrical work which is still pending.

6. Considering contract conditions and current status of the project wherein no actual field work done by Laservision, on technical points, this committee is not in a stage to offer comments. The status of the project is almost at the initial stage, beneficial to processed with the project is more of administrative decision considering till date payment made to Laservision, pending od required Civil-electrical work, delay in the project implementation, increased in USD value."

तज्ञ समितीच्या उपरोक्त नमुद अहवालाबाबत दि.०७/०४/२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यावेळी मा. उच्च न्यायालयास मे. लेजर व्हिजन यांनी दिलेल्या नोटीसबाबत ॲड संजय चौकीदार यांनी माहीती दिली. प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

"The learned AGP has placed on record a copy of the report submitted by the Committee. The same is taken on record.

2. We would like toknow the stand of the Committee in the matter. Stand over to 21.04.2017.

प्रस्तुतत प्रकरणी मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांरची Payment Schedule ०५ व०६ नुसार US$ १५,४०,००० ची बिले प्रलंबीत असल्यामुळे दि.०३/०३/२०१७ रोजीच्या (संस्थांनकडे प्राप्त दि.२३/०३/२०१७) पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीफीकेशन पत्र दिले आहे. त्यानुसार सदर पत्र संस्थानला प्राप्ते झाल्यापासून २० दिवसांचे आत पूर्तता न केल्यास करार रद्द समजण्यात येईल असे कळविले होते. याबाबत कायदेशिर अभिप्राय घेणे व मे.लेजर व्हिजन लि., यांना उत्तर देणेकामी पत्राचा मसुदा तयार करुन घेणेसाठी ॲड संजय चौकीदार यांना संस्थानचे दि.३१/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते.

ॲड संजय चौकीदार यांनी त्यां चे दि.३१/०३/२०१७ रोजीचे पत्रासोबत मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांना द्यावयाचे पत्राचा मसुदा दिलेला होता. त्या/नुसार सदरहू मसुद्यात आवश्यक दुरुस्त्या करुन ॲड संजय चौकीदार यांचे सहमतीने संस्थानचे दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्राने मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना उत्तर पाठविणेत आले आहे.

साईगार्डन प्रकल्पातंर्गत पहिल्या टप्प्यातील सिव्हील कामांसाठी ई-निविदा मागविणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावरील निर्णय क्र. ७६८ अन्वये, खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. "यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ (०३) मध्ये ठरलेप्रमाणे मा. उच्च न्यायालयाचा आदेश प्राप्त झालेनंतर सदरहू विषय चर्चेसाठी ठेवण्यात यावा असे ठरले."

**प्रस्ताव:**

१) संस्थानचे तत्कालीन मा.व्यवस्थासपन समितीच्याय विविध निर्णयानुसार आतापर्यंत मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी केलेल्या कामाचे पोटी US$२१,४५,००० मात्र अदा करण्यात आलेले आहे. तसेच पेमेन्टथ स्टेंज ५ व ६ पोटी देय असलेली US$१५,४०,००० बिल अदा करणेसाठी मा. त्रीसदस्य समितीच्यान मान्येतने सिव्हील अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी तज्ञ समितीच्या अहवालाचे अवलोकन करून मा. उच्च न्यायालयाचे दि.०७/०४/२०१७ रोजीचे आदेशानुसार नियोजित साईगार्डन प्रकल्पांनतर्गत लेजर शो उभारणी विषयी मा.व्यवस्थापन समितीचे मत मा.उच्च न्यायालयास सादर करणेबाबत आदेश दिले आहेत. त्या नुसार मा. व्यवस्थापन समितीचे म्हणणे मा. उच्च न्यायालयात सादर करणेकामी उपरोक्तल प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

२) साईगार्डन प्रकल्पातंर्गत पहिल्या टप्प्यातील सिव्हील कामासाठी ई-निविदा मागविणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

तरी उपरोक्त बाबींवर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२७९** **मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग संदर्भात मा.उच्च न्यायालयात समितीचे मत सादर करावयाचे आहे. या प्रकल्पाबाबत सविस्तर विषय चर्चेला ठेवणेत आलेला असून सदर प्रकल्प मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेमार्फत पूर्ण करायचा की, सदर प्रकल्पाबाबत करारनामा रद्द करायचा याचा निर्णय समितीने घ्यायचा आहे. यापूर्वी मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना २१,४५,००० मात्र डॉलर्सचे बिल अदा करणेत आलेले असून त्यांनी पुढील कामाचे १५,४०,००० मात्र डॉलर्स बिलाची मागणी केलेली आहे. सदर बिले या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.कापरे यांनी प्रमाणित केलेली आहेत. तसेच मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना पुढील काम थांबविणेत यावे, असे पत्र दि.०७.०३.२०१३ रोजी संस्थानचे वतीने देणेत आले होते. त्यामुळे मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी त्यानंतरचे काम थांबविले आहे. परंतू तत्पुर्वी त्यांनी केलेल्या कामाची व करारनाम्यातील Payment Schedule नुसार देय असलेल्या रकमेची मागणी केलेली आहे. सदर प्रकल्प व करारनामा रद्द झाल्यास त्यांना देय असलेल्या १५,४०,००० मात्र डॉलर्स रकमेबाबत संस्थानवर जबाबदारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत समितीने निर्णय द्यावा, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी समिती सदस्यांना दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईगार्डन प्रकल्प लवकर कार्यान्वीत होणेकामी, तत्कालीन व्यवस्थापन समितीने लेझर शो उभारणी व त्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम करणे ही दोन्ही कामे एकाच कंपनीला द्यायला हवी होती. तसेच लेझर शो उभारणीकामी मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग या कंपनीचा करारनामा व त्यामधील बीले अदायगीसाठीची कलमे सदोष असल्याचे दिसून येते. याकरीता सदर करारनामा रद्द करुन अर्बिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरु करणेची कार्यवाही करणेत यावी. याचबरोबर गेल्या १० वर्षामध्ये तंत्रज्ञानामध्ये खुपच बदल झालेला असून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमतीही कमी झालेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणेत येऊन, त्यांना अदा करण्यात आलेली बीलाची रक्कम वसूल करणेबाबत कायदेशीर कारवाई करणेत यावी व साईगार्डन प्रकल्पामधील लेझर शो उभारणीकामी विहीत पध्दतीने नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. तसेच या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तींमार्फत चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्तीची नेमणूक होणे व मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणे यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकरीता त्यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतीक व सामाजीक कार्यक्रमांची रुपरेषा व स्वरुप ठरविणेकामी साईभक्त, शिर्डी ग्रामस्थ तसेच जागतीक साई मंदिर विश्वस्त/ पदाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सुचना व अभिप्राय यावर चर्चा होऊन धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय**

१) मा. त्रिसदस्य समितीचे दि. १८/०२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४७.

२) मा. त्रिसदस्य समितीचे दि. २१/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५८

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६८९

**प्रस्तावना-** थोर संत श्रीसाईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल. या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे. सदर कार्यक्रमांचे स्वरुप व रुपरेषा ठरविणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

अ) संस्थानचे संकेतस्थळावरुन साईभक्तांसाठी केलेले जाहीर आवाहन.

आ) मा. राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्ष नेते, विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५/०२/२०१६ रोजी शिर्डी ग्रामस्थ व शासकिय व निमशासकिय विभाग यांचे समवेत झालेली बैठक.

इ) धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रुपरेषा ठरविणेबाबत संस्थानचे समन्वय विभागांची दि. २४/०६/२०१६ रोजी झालेली बैठक.

ई) ड) मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये श्री. नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि.मुंबई यांची इव्हेंट मॅनेजमेंटसाठी सल्लागार म्हणून नियुक्ती केलेली असल्याने त्यांनी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे ४० दिवसांचे दिवसागणिक दिलेले वेळापत्रक.

उ) शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम-उपक्रम याबाबत देश-विदेशातील साई मंदिराचे विश्वस्त यांच्या सुचना वजा अभिप्राय प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या साई मंदिरांच्या व्यवस्थापनांनी या शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम/ उपक्रम याबाबत सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी येथे दि.११/१२/२०१६ रोजी संपन्न झालेली जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद.

**प्रस्ताव-** उपरोक्त नमूद केलेप्रमाणे वेळोवेळी झालेल्या बैठका, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच साईभक्तांकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा अभिप्राय यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता.

सदर सभेत या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन झालेल्या निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते १८ ऑक्टोंबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले आहे.

तरी शताब्दी महोत्सवाच्या कार्यक्रमांची रुपरेषा व स्वरुप ठरविणेकामी विचार विनिमय होऊन धोरणात्मक निर्णय होणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.२८०** **श्रींचे समाधी शताब्दी महोत्सवामधील कार्यक्रमांची रुपरेषा व स्वरुप ठरविणेकामी शताब्दी कक्ष या विभागाने तयार केलेले सादरीकरण सभेमध्ये दाखविणेत आले. परंतु वेळेअभावी सादरीकरणावर चर्चा होऊ शकली नाही. याकरीता सदरहू सादरीकरणाच्या छायांकीत प्रती सर्व मा.समिती सदस्यांना पुरविणेत याव्यात व समिती सदस्यांनी आपले सुचना-वजा-अभिप्राय पुढील सभेपर्यंत शताब्दी कक्षास कळवावे, असे ठरले.**

**याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, जे सर्वसामान्य साईभक्त श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाही, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी, समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश-विदेशामध्ये ठिकठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. यासाठी जी साईमंदिरे बाबांच्या पादुकांची मागणी करतील, त्यांची योग्य ती चौकशी व खातरजमा करुन, त्यांनाही चांदीच्या पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन द्याव्यात. या पादुकांसोबत संस्थानची दक्षिणा पेटी व देणगी पावती पुस्तक ठेवण्यात यावे. मंदिर विभागाने या संबंधीची नियमावली तयार करावी व समाधी शताब्दी वर्षातील मुळ पादुका दर्शन सोहळयाची सुरुवात आंध्रप्रदेश राज्यातील विजयवाडा येथून करणेत यावी, याठिकाणी श्रींच्या भक्तांची संख्या जास्त प्रमाणात आहे. तसेच समाधी शताब्दी वर्षामध्ये आयोजित कार्यक्रमांमधील भजन/ किर्तन/ प्रवचन या प्रकारचे कार्यक्रम मंदिराचे उत्तरेस सरंजाम बागेत ठेवावेत व मोठया स्वरुपाच्या कार्यक्रमांसाठी जागेची निश्चिती करावी.**

(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख/ मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५००/- कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ (क) | (१ क) पोटकलम (१) च्या तरतुदीस अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्यशासनाच्या पूर्व मंजुरीने आणि राज्य शासनाकडुन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देता येईल. |

**प्रस्तावना:-** तात्कालीन कृषी व पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी तात्कालीन मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित दि.२०/०८/२०१२ व दि.०८/०४/२०१३ रोजीचे पत्राची प्रत संस्थान कार्यालयास प्राप्त झालेली होती. सदरचे पत्रात निळवंडे धरणांतून पाणी आरक्षण ठेवण्यापोटी निळवंडे धरणांचे डाव्या कालव्याच्या कामांसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५०० कोटी निधी राज्यशासनास उपलब्ध करुन देणेस विनंती करण्यात आलेली होती. सदरहु प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता.

**मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय:-** सदरहू प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेत आयत्या वेळचा विषय नं.०१, निर्णय क्रं.७९३ अन्वये खालीप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.नामदार राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री, कृषी व पणन- महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि०८/०४/२०१३ रोजी दिलेल्या पत्रास अनुलक्षून आता चर्चेअंती मात्र असे ठरविण्यात आले की, मंत्री महोदयांनी मागणी केलेला निधी किंवा त्यापैकी निधी शासन दरबारी परवानगीसाठी मागणी करणे उचित होणार असल्याने तसा प्रस्ताव शासनास दाखल करावा व शासन मान्यतेनंतर निधी टप्प्याटप्प्याने, उसनवारीने, ठराविक मुदतीत देता येऊ शकेल असे मान्य झाल्यास मा.उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी तसा प्रस्ताव दाखल करावा."

मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७९३ अनुसरुन जा.क्रं.एसएसएस/ वशी/ पाणी पुरवठा/२८६७/२०१४, दि.१२/०९/२०१४ अन्वये सदरहू प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. याविषयी शासनाकडुन अंतिम मान्यता/ निर्णय प्राप्त नाही.

निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून रु५०० कोटी निधी उपलब्ध होणेबाबत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे जा.क्र.गोमपाविम/ तां-५/७३०२, दि.२०/०८/२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास दि.३१/०८/२०१६ रोजी प्राप्त झालेले आहे. त्यासोबत मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि.१९/०३/२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त जोडलेले आहे. बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्दा क्रं.२ च्या अनुषंगाने रु.५०० कोटी संस्थानमार्फत उपलब्ध करणेबाबत चर्चा झालेली असून त्याअनुषंगाने प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयास उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आलेली आहे व त्यानुसार प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी शासनास पाठविणे शक्य होईल, असे नमुद होते.

तसेच, महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील क्रं..सासंवि-२०१४/६११/प्र.क्रं.८८/का.१६, दि.०३/११/२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदरचे पत्रात नमुद केलेप्रमाणे निळवंडे धरणांतून पाणी आरक्षण ठेवण्यापोटी संस्थानने डाव्या कालव्यांच्या कामासाठी रुपये पाचशे कोटी इतका निधी शासनास उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव नवनियुक्त व्यवस्थापन समितीचा अभिप्राय प्राप्त करुन घेऊन प्रस्ताव शासनास फेरसादर करण्यात यावा असे कळविलेले होते.

निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५०० कोटी निधी उपलब्ध होणेबाबत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांचे जा.क्र.गोमपाविम/तां-५/७३०२, दि.२०/०८/२०१६ रोजीचे पत्रात सदरचा निधी परत करण्याचा बोलीवर देण्यात यावा असा स्पष्ट उल्लेख नाही. सदरचे पत्रात संस्थानचा प्रस्ताव उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करण्यात आलेली होती. तसेच निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५०० कोटी निधी देणेबाबतचे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७९३ अनुसरुन सदरहू प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. यावर शासनाकडुन निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याचे कामांसाठी संस्थानने निधी उपलब्ध करुन दयावा अथवा परत करण्याचा बोलीवर निधी देण्यात यावा देण्यात यावा असा आदेश नाही.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांचे दि२०/०८/२०१६ रोजीचे पत्रास अनुसरुन निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचेकडुन रु५०० कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत केलेल्या मागणीबाबत व महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील क्रं..सासंवि-२०१४/६११/ प्र.क्रं.८८/ का.१६, दि.०३/११/२०१६ रोजीचे पत्रानुसार सदरचा प्रस्ताव नवनियुक्त व्यवस्थापन समितीचा अभिप्राय प्राप्त करुन घेऊन शासनास फेरसादर करणेबाबत दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तुत प्रकरणी निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णयार्थ फेर सादर करणेत आलेला होता.

प्रस्तुत प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.८६३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानमार्फत दर्शनरांगेतील साईभक्तांसाठी चहा, कॉफी, दुध, बिस्कीटे व प्रसादालयामधील प्रसाद भोजन मोफत पुरविणेत येत आहे तसेच संस्थानमार्फत धर्मदाय रुग्णालय चालविले जाते व बाहेरील रुग्णालयातील रुग्णांना गंभीर आजारांसाठी वैदयकिय आर्थिक अनुदानही पुरविण्यात येत आहे. तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करावयाचे असून समाधी शताब्दी वर्षामध्ये श्री क्षेत्र शिर्डी येथे मोठया प्रमाणात साईभक्त येतील, या साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी मोठया स्वरुपाचे विविध प्रकल्प राबवावयाचे आहेत, त्यासाठी संस्थानकडे निधी अपुरा असून याकामी संस्थानने शासनाकडे निधीची मागणी केलेली आहे व शासनाने संस्थानला निधी पुरविणे अभिप्रेत आहे. या बाबींमुळे पाण्याला प्राधान्य असूनही निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याच्या कामासाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही, असे शासनास कळविणेत यावे."

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८६३ अनुसरुन जा.क्रं.एसएसएस/ वशी/ पाणी पुरवठा/५२५५/२०१६, दि.१०/०१/२०१७ अन्वये व जा.क्रं.एसएसएस/वशी/ पाणीपुरवठा/ ६३६८/ २०१७, दि.२०/०३/ २०१७ अन्वये सदरहू प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे माहितीस्तव सादर करण्यात आलेला आहे.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद उर्ध्व प्रवरा कालवा विभाग, संगमनेर यांनी जा.क्रं.उप्रकावि/ प्रशा-१/१४८/ सन-२०१७, दि.३१/०१/२०१७ रोजीचे पत्रानुसार शासनाच्या जलसंपदा विभागास संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत या विषयाबाबत संमत करण्यात आलेल्या ठरावाच्या प्रतीची आवश्यकता असलेबाबत कळविलेले होते.

यावर उपकार्यकारी अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद, उर्ध्व प्रवरा कालवा विभाग, संगमनेर यांना इकडील विभागाकडील जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/५८२०/२०१७, दि.०८/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये ठरावाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**प्रस्ताव-** निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५०० कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान हे जागतिक दर्जाचे धार्मिक स्थळ असून येथे येणाऱ्या भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे संस्थानसाठी मोठया प्रमाणावर पाण्याची आवश्यकता भासणार आहे. सदर डाव्या कालव्याचे काम लवकरात लवकर पुर्ण झाल्यास पाणी टंचाईच्या परिस्थितीत संस्थानला त्यामधून पाणी उपलब्ध होऊ शकेल, असे चर्चेअंती सर्व सदस्यांचे मत झाले. त्यामुळे सदर रकमेतून डाव्या कालव्याचे काम पुर्ण झाल्यास भक्तांना सोयी/ सुविधा व पायाभूत**

**सुविधा उपलब्ध करुन देण्यास मदत होणार आहे. तसेच निळवंडे धरणामध्ये पाणी आरक्षणाची व धरणाच्या भाग भांडवलाची रु.१८३.९३ कोटी मात्र रक्कम माफ करावी, अशी मागणी शासनाकडे करावी.**

**उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे, निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५००/- कोटी मात्र निधी परतीच्या बोलीवर महाराष्ट्र शासनास उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली. सदरहू रु.५००/- कोटी मात्र निधी कोण-कोणत्या कामांवर व कशा पध्दतीने वापरणार आहे, याचा बृहद आराखडा समितीसमोर सादर करणेबाबत जलसंपदा विभागास कळविणेत यावे. परंतु या डाव्या कालव्याचे आत्तापर्यंत झालेल्या कामाच्या खर्चासाठी किंवा देयके अदा करणेसाठी हा निधी वापरता येणार नाही व एक विशेष बाब म्हणून हा निधी फक्त निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याचे यापुढील कामासाठीच वापरण्यात यावाव या डाव्या कालव्याचे काम जस-जसे काम पुर्ण होईल, त्याप्रमाणात टप्प्या-टप्प्याने निधी वर्ग करणेत येईल, अशी अट ठेवणेत यावी.**

**सदर रु.५००/- कोटी मात्र रक्कम टप्या-टप्प्याने परत करणेबाबत व इतर मुद्दयांबाबत जलसंपदा विभागाशी सविस्तर चर्चा करुन व कायदेशीर/ प्रशासकीय बाबींची पुर्तता करुन सदर रक्कम देणेची कार्यवाही करणेत यावी. तसेच सदर निधी हा मा.राज्यपाल महोदयांच्या विकास महामंडळांच्या निधी वाटपाच्या (निर्देशाबाहेर) सुत्रांबाहेरठेवून फक्त डाव्या कालव्याच्या कामासाठी देण्यात येत आहे.**

**तसेच निळवंडे धरणामधून संस्थान पाणी पुरवठा योजनेसठी आणावयाची बंदिस्त पाईपलाईन या कालव्याच्या भराव्यामधून टाकता येईल का, यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा अभिप्राय घेण्यात येऊन, त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.**

**याचबरोबर याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाची मान्यता मिळाल्यानंतर निधी वर्ग करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **निळवंडे धरणातून शिर्डी पर्यंत येणारी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन कोपरगाव शहरासाठी आणणेबाबत.**

**प्रस्ताव–** संस्थानचा WTP हा १९९२ साली तयार करणेत आलेला असून तो ६.६० MLD क्षमतेचा आहे. प्रस्तावित WTP हा २३ MLD क्षमतेचा आहे व संस्थानचे ०४ साठवण तलावांची एकुण क्षमता ही ३११ ML इतकी आहे. सदरहू साठवण तलावातील पाणीसाठा हा आता साधारणत ६५ ते ७० दिवस पुरतो. सदरची पाणी पुरवठा योजना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, कनकुरी व पिंपळवाडी अशी संयुक्त पाणी पुरवठा योजना आहे. सदर योजनेतून श्री साईबाबा संस्थान, पिंपळवाडी व कनकुरी या गावांसाठीही पाणी पुरवठा करण्यात येतो. सदरहू योजना १९९२ साली कार्यान्वित झालेली असल्याने, सदरचा ६.६० MLD क्षमतेचा प्लान्ट सध्या २४ तास कार्यान्वित ठेवावा लागतो. तसेच सदर योजनेची सध्याची पाईपलाईन जीर्ण झालेली आहे व ती ब-याच वेळी लिकेज होते. त्यामुळे सदर नविन योजना हाती घेणे गरजेचे आहे.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे इ. कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.

सदरहू योजनेचा उद्भव निळवंडे धरण (ता.अकोले) असून निळवंडे धरण ते शिर्डी पाईपलाईन एकुण लांबी अंदाजे ८० कि.मी. आहे. जलशुध्दीकरण क्षमता- २३ द.ल.लिटर असून सदरहू योजनेत मुख्य जलवाहिनी, वितरण व्यवस्था इ. कामांचा समावेश आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दि.१३/०१/२०१४ रोजी शासनाकडे सादर केलेल्या सदरहू योजनेत शिर्डी संस्थान तसेच सभोवतालची २ गांवे कनकुरी व पिंपळवाडी यांचा समावेश आहे या योजनेची एकुण किंमत रु.२१५.९७ कोटी असून, त्यापैकी योजनेतील २ गावांसाठी किंमत रु.१९.०४ कोटी इतकी येते. त्यामुळे एकुण योजनेच्या किमतीपैकी शिर्डी संस्थानसाठी रु.२१५.९७ - रु.१९.०४ = रु.१९६.९३ कोटी इतकी किंमत येते. सदर योजनेत संस्थानसाठी रु.१९६.९३ कोटी इतका हिस्सा येतो.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण योजना मंडळ, अहमदनगर यांचे मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण नागरी व ग्रामीण, ठाणे यांना अग्रषित दि.०७/०२/२०१३ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार, या योजनेचे सर्वेक्षणाचे वेळी खात्रीशीर उदभव म्हणून प्रामुख्याने १) निळवंडे धरण. २) मुळा धरण. ३) गोदावरी

उजवा तट कालवा यांचा विचार करण्यात आलेला असून, निळवंडे धरणाचे अंतर जरी जास्त असले तरी पाणी हे गुरुत्ववाहिनीने येत असल्याने योजना तयार करणे किफायतशीर होणार आहे हे गृहीत धरुन निळवंडे धरणात पाणी आरक्षण प्रस्ताव पाटबंधारे खात्याकडे पाठविण्यात आलेला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सादर केलेल्या सदर योजनेसाठी निळवंडे धरण हा उद्भव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. निळवंडे धरणांतून पाणी आरक्षणास पाटबंधारे खात्याची तत्वत: मान्यता आहे. पाटबंधारे खात्याच्या दि.१०/०४/२०१३ च्या पत्रान्वये सदरहू प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेसाठी १४.६५ दलघमी (५१७.२९ दलघफु) आरक्षणाचा प्रस्ताव असून, रु.१८३.९३ कोटी हिस्सा शिर्डी संस्थानने उचलावा, असे कळविण्यात आलेले आहे. वरीलप्रमाणे योजनेची किंमत रु.१९६.९३ कोटी व पाणी आरक्षणासाठी प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी याप्रमाणे एकुण रु.३८०.८६ कोटी मात्र इतकी रक्कम होते.

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

*"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन आणणेच्या योजनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजुच्या गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे संस्थान आणि शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायसवरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक नागरीकांबरोबरच साईभक्तांनाही याचा लाभ होणार आहे. तसेच श्री साईबाबा शताब्दी महोत्सवापुर्वी याबाबत कार्यवाही होणे गरजेचे असल्याने सदरच्या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घेवून स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक व आवश्यक लोकवर्गणी उपलब्ध करुन देणे समितीला आवश्यक वाटते.*

*यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावित बाब धोरणात्मक व मेजर फायनान्शीयल असल्यामुळे समिती त्यावर निर्णय घेऊ शकत नाही. यासाठी, सदरहू योजना का आवश्यक आहे, याबाबतची सर्व कारणे नमूद करुन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा काय? अशा मार्गदर्शनपर सुचना व आदेश मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत यावा व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असे ठरले."*

वाढीव शिर्डी संस्थान, पिंपळवाडी व कनकुरी संयुक्तीक प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेविषयी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे आदेशास अनुसरुन ॲड. आर.एन.धोर्डे यांचेमार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. १२३४६/२०१४ दाखल करण्यात आलेले होते.

प्रस्तुत सिव्हील ॲप्लिकेशनमध्ये मे.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी व दि.२१/०४/२०१६ रोजी तारीख नेमलेली होती. उपरोक्त सिव्हील अर्जामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दि.२२/१२/२०१४ व दि.२१/०४/२०१६ रोजीचे आदेशान्वये सदर प्रकरणी शासनास त्यांचे म्हणणे त्वरीत सादर करणेबाबत आदेश दिलेले होते.

मा.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी सदर योजनेचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेबाबत दिलेल्या आदेशान्वये मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे जा.क्रं.एसएसएस/ वशी/ पाणीपुरवठा/ ४०२६/२०१५, दि.१९/१०/२०१५ व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे जाक्रं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/१३९०/२०१६, दि.२२/०६/२०१६ अन्वये प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

तसेच शिर्डी शहरासह खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, केलवड, नांदुर्खी खु., नांदुर्खी बु. या गावांचा सदरहु योजनेत समावेश करणेबाबत मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दि०७/०४/२०१६ रोजी शपथपत्र सादर करण्यात आलेले होते.

अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अहमदनगर यांनी दि.२०/०६/२०१६ रोजीचे पत्रानुसार केलेल्या मागणीप्रमाणे शिर्डी शहरासह खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, केलवड, नांदुर्खी खु., नांदुर्खी बु. या गावांचा सदरहू योजनेत समाविष्ट करणेबाबत त्यांना जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणी पुरवठा/१४३२/२०१६, दि.२४/०६/२०१६ अन्वये "ना हरकत दाखला" देण्यात आलेला होता.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि१५/०७/२०१६ रोजी दिलेले आदेशात सरकारी वकील यांनी सादर केलेल्या म्हणण्यानुसार या प्रकरणी या तारखेपासून पुढील चार आठवडयात पाणी पुरवठा व

स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांची तांत्रिक मान्यता घेवून पुढील दोन आठवडयात प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येईल असे आदेशात नमुद आहे.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रंसासंकि-२०१५/ १००७/ प्र.क्र.१७७/ का.१६ दि.१९/०७/२०१६ रोजीचे प्राप्त पत्रानुसार प्रस्तुत प्रकरणी प्राप्त निर्देशास अनुसरुन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने सुचित केल्याप्रमाणे या योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थानमार्फत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडे सादर करावा तसेच या संदर्भात व्यक्तिश: पाठपुरावा करुन अधिकाधिक तीन आठवडयाच्या कालावधीत तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेवून मान्यता प्राप्त प्रस्ताव पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी या विभागास सादर करण्यात यावा असे कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी प्राप्त निर्देशास अनुसरुन जा.नं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/२०१६, दि.२७/०७/२०१६ अन्वये या योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग नाशिक यांचेकडे सादर करणेत आलेला होता.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेमार्फत जा.क्रं/मुअ/नाशिक/तांशा-२/१५२७/ २०१६, दि.१२/०८/२०१६ रोजीचे पत्रान्वये प्राप्त झालेले आहे. त्यानुसार रु.१६३४२.९६ लक्ष निव्वळ व रु.१९१९१.४० लक्ष ढोबळ (९% ETP Charges सह) किमतीचे सविस्तर अंदाजपत्रक व आराखडयांना बाब क्रं.३० माहे ऑगस्ट २०१६ पत्र क्रं.मजीप्रा/तांमा/१५३२, दि.१२/०८/२०१६ नुसार तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये लाखो साईभक्त श्री साईंचे महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील. त्यावेळी साईभक्तांची गैरसोय होवू नये यासाठी सदरहू योजना तातडीने पूर्ण होवून कार्यान्वित होणे गरजेचे असलेने महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रंसासंकि-२०१५/ १००७/ प्र.क्र.१७७/ का.१६, दि.१९/०७/२०१६ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार, तांत्रिक मान्यता घेवून योजना तांत्रिक मान्यतेसह विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावी असे निर्देश दिलेले असलेने, इकडिल जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/२५७३/२०१६, दि.२३/०८/२०१६ अन्वये प्रस्ताव मान्यतेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत आलेला होता.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंकि-२०१५/१००७/ प्र.क्र.१७७/ का.१६, दि.३१ ऑगस्ट, २०१६ अन्वये वाढीव शिर्डी संस्थान, पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेवून) या योजनेच्या रु.१६३,४२,९५,५५५/- निव्वळ व रु.१९१,९१,३९,५००/- ढोबळ (९% ETP Charges सह तसेच रु.१८३९३/- लक्ष निळवंडे धरण हिस्सा वगळून) किमतीच्या अंदाजपत्रकासह अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदरहू शासन निर्णयाची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडलेली आहे.

सदरचे आदेशात सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर निधी पूर्ण ठेव पध्दतीने ठेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाव्दारे ही योजना केवळ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थानसाठी राबविण्यात येईल असे नमुद असून, शिर्डी शहरासह खडकेवाके, को-हाळे, डो-हाळे, केलवड, नांदुर्खी खु., नांदुर्खी बु. या गावांचा सदरहु योजनेत समावेश करणेत आलेला नाही.

विषयांकित योजनेबाबत वर नमूद शासन निर्णयास अनुसरुन पुढील कार्यवाही करणेसाठी सर्वप्रथम सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करणे, सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत करणे व श्री साईबाबा समाधी महोत्सव कालावधीत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना पाण्याची कमतरता भासू नये याकरीता योजनेतील WTP, RCC MBR Pure Water Gravity Mains, Pure water Rising Main, Automation, Pumping Machinery, ESR, Distribution Network या उपांगांची कामे पहिल्या टप्यात हाती घेणेकामी कार्यवाही करणे या बाबींविषयी निर्णय होणेकरीता प्रस्ताव दि.०९/१०/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत आला होता.

त्यावर निर्णय क्रं. ७३९ पुढीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"... यावर सवितस्तर चर्चा होऊन , श्री साईबाबा संस्थान शिर्डीकरीता निळवंडे उद्भव घेऊन, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेचे काम संसथानमार्फत करावे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेमार्फत करावे याबाबतचा तौलानिक प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणोत यावा असे ठरले. "*

महाराष्ट्र जीवन प्राधिकारण यांचेमार्फत सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन याप्रकल्पाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे या क्षेत्रातील तज्ञ

असुन ते महाराष्ट्र शासनाचा एक उपविभाग आहे . उपरोक्त शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकारणमार्फत करावयाची आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे याबाबत आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध आहे. तसेच या योजनेसाठी आवश्यक शासनाचे सर्व शासकीय विभागांचे ना हरकत दाखले मिळविणे , तांत्रिक मंजुर्या घेणे, निळवंडेपासुन ते शिर्डीपर्यंत सर्व्हे करुन लेव्हल घेणे, त्याचे डिटेल डिझाईन व ड्रॉईंगतयार करणे, ई-निवीदा तयार करुन ई-निविदा प्रक्रीया राबविणे, पाईप लाईनचे कामातील अडचणींचे निरसन करणे, पाईप / इतर मटेरीयलच्या तत्सम बाबींची तपासण्या करणे, सुरु असलेल्या कामावर दैनंदिन पर्यवेक्षण करणे, कामाचा दर्जा राखणे बाबत आवश्यक त्या बाबींची तपासण्या करणे, कामाचा मासिक अहवाल तयार करणे, प्रत्यक्ष झालेल्या कामांबाबत ठेकेदार यांचे देयके तपासणे व सदर देयके आदा करणेबाबत कार्यवाही करणे, प्रकल्प आढावा बैठकांना उपस्थीत राहणे, मिटिंग इतिवृत्त तयार करणे इत्यादी सर्व कामे करावी लागणार आहे.

वर नमूद कार्यवाही करण्यासाठी संस्थानकडे पुरेशे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नाही. संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी महोत्सव कालावधीत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना पाण्याची कमतरता भासू नये याकरीता पहिल्या टप्प्यात सदर योजनेतील WTP, RCC MBR, Pure Water Gravity Mains, Pure water Rising Main, Automation, Pumping Machinery, ESR, Distribution Network या उपांगांची कामे संस्थानमार्फत हाती घेणेकामी कार्यवाही करणे व या प्रकल्पातील निळवंडे ते शिर्डी पाईपलाईनचे उर्वरित काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता.

त्यावर निर्णय क्रं. **३१** पुढीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, निळवंडे धरण उद्भव घेवून, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेपैकी शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP,ESR,Distribution Network व पाईपलाईनची कामे समाधी शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर तातडीने पुर्ण करुन घ्यावीत व सदर संपूर्ण योजना संस्थानमार्फत राबविण्यात यावी. याकामी तज्ञप्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करणेत येऊन, त्यांना शासकिय दराने सल्लागार फी देण्यात यावी. तसेच याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी फेर प्रस्ताव सादर करणेत यावा."

श्री साईबाबा शताब्दी महोत्सव २०१७-१८ करीता सदरहू योजना कार्यान्वित करणेसाठी सदरहू योजनेची निकड व काम लवकर पुर्ण होण्याचे दृष्टीने शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे, टप्पा क्रं.२ मध्ये निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद या अंदाजे ८० कि.मी.पाईपलाईन टाकणे, याकामी तज्ञप्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्तीकरणे, सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत न करता संपुर्ण संस्थानमार्फत राबविणे चे काम करणेस मान्यता मिळणेसाठी मा.विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणी पुरवठा/२८/२०१७, दि.०३/०४/२०१७ अन्वये फेर प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांचेशी दि३१/०३/२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेदरम्यान मा.मुख्यमंत्री महोदय यांनी सदर प्रकल्पास तत्वत: मान्यता दिलेली आहे.

**प्रस्ताव:-** निळवंडे धरणातून शिर्डी पर्यंत येणारी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन पुढे कोपरगांव शहरासाठी आणणे संदर्भात मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७/०४/२०१७ रोजी बैठक संपन्न झाली. सदरहू बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी महाराष्ट्र शासन, क्र.बैठक २०१७/प्र.क्रं.२१/पापु-०९, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई, दि.१९/०४/२०१७ अन्वये प्राप्त झालेली आहे.

या बैठकीत खालील मुद्द्यांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

| अ.क्रं. | बैठकितील विषय | बैठकित चर्चा होऊन घेण्यात आलेला निर्णय | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| ०१ | निळवंडे धरणातून शिर्डी पर्यंत येणारी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन कोपरगांव शहरासाठी आणणे. | निळवंडे धरण उद्भव धरुन साईबाबा शताब्दी निमित्त शिर्डी संस्थानासाठी रु.१९१.९१ कोटी किमतीच्या योजनेस शासनाच्या विधी व न्याय विभागाने दि.३१/०८/२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यता दिली आहे. या योजनेसाठी आवश्यक निधी संस्थान स्वत:च्या निधीतून उपलब्ध करुन देईल. सदर शासन निर्णयात सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांमार्फत करण्यात येईल. सदर योजनेसाठी आवश्यक निधी श्री | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | साईबाबा संस्थानाव्दारे पुर्ण ठेव पध्दतीने ठेवून मजीप्राव्दारे सदर योजना केवळ शिर्डी संस्थानासाठी राबविण्यात येईल असे स्पष्ट नमूद केलेले आहे.<br>सदर योजना कोपरगांव पर्यंत वाढविण्याच्या प्रस्तावाबाबत चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला. | |
| | | १) सर्व प्रथम कोपरगांव पर्यंत आवश्यक सर्वेक्षण करुन योजनेचे संकल्पने व अंदाजपत्रके व आराखडे मजीप्रा मार्फत सुधारीत करणे आवश्यक आहे. | शिर्डी संस्थान व मजीप्रा |
| | | २) शिर्डी संस्थानने कोपरगांव सहीत शिर्डी संस्थान असा पाणी पुरवठा योजनेची व्याप्ती वाढविणे व निधी उपलब्धतेबाबतचा ठराव करावा. | शिर्डी संस्थान |
| | | ३) सदर योजनेस शिर्डी संस्थानने निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे कोपरगांव सह शिर्डी संस्थान सुधारित पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव पुन्हा विधी व न्याय विभागास सादर करणे, मान्यता घेणे यांची आवश्यकता दिसून येत नाही ही बाब शिर्डी संस्थानच्या अखत्यारीतील दिसून येते. याची खात्री करुन आवश्यक ती कार्यवाही करावी. | शिर्डी संस्थान |
| | | ४) वाढीव पाणी आरक्षणाचा प्रस्ताव तयार करुन सादर करावा. | शिर्डी संस्थान, मजीप्रा विभाग, संगमनेर, जलसंपदा विभाग. |

सदरहू बैठकीत वरीलप्रमाणे नमुद मुद्दयांवर चर्चा होवुन निर्णय घेण्यात आलेले आहेत. याबाबत श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडुन आवश्यक ती अंमलबजावणी करणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

तरी निळवंडे धरणातून शिर्डी पर्यंत येणारी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन पुढे कोपरगांव शहरासाठी आणणेसंदर्भात मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७/०४/२०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील नमुद केलेप्रमाणे आवश्यक कार्यवाहीसाठी होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, निळवंडे धरणातून शिर्डी पर्यंत येणारी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन पुढे कोपरगांव शहरासाठी आणणेसंदर्भात मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७/०४/२०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील नमुद केलेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच याचवेळी मा.नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत तथा व्यवस्थापन समिती सदस्या यांनी शिर्डीसाठीही या पाईपलाईनमधून पिण्याचे पाणी मिळावे, असे लेखी पत्र संस्थानला दिले.**

**यावर चर्चा होऊन, निळवंडे धरणातून संस्थानसाठी येणाऱ्या पाण्याच्या पाईपलाईनमधून कोपरगाव व शिर्डी शहरासाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकामी, कोपरगाव व शिर्डी नगरपंचायतींना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तांत्रिक बाबींची पुर्तता करुन सविस्तर आराखडा संस्थानकडे सादर करणेबाबत कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **सोने, चांदी व इतर मौल्यवान धातूच्या वस्तु/ साहित्य देणगी म्हणून स्वीकारणेकामी मार्गदर्शक तत्वे-वजा- नियमावली निश्चित करणे.**

**प्रस्ताव–** **(अ)** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईचे समाधी दर्शनासाठी देश-विदेशातून दररोज हजारो भक्त येत असतात. श्री साईबाबांवर असलेल्या श्रध्देपोटी शिर्डी येथे येणारे भक्त संस्थान व्यवस्थापनास विविध स्वरुपात देणगी/ दान देत असतात, यामध्ये विशेषतः रोख रक्कम, सोने-चांदीचे मौल्यवान अलंकार/ वस्तू, रुग्णालयांशी संबंधीत साहित्य विविध स्वरुपातील यंत्रे/ उपकरणे यांचा समावेश होतो. यातही प्रामुख्याने समाधी मंदिरासाठी आवश्यक असणारी नित्य वापरातील सोने-चांदीची भांडी/ वस्तू देणेकडे भक्तांचा मोठा कल असतो. तसेच याव्यतिरिक्त काही भक्त अलंकाराचे स्वरुपात (उदा. मुकूट, छत्र, चेन, अंगठी इत्यादी ) सोने-चांदीच्या वस्तू श्री साईंना देणगी रुपाने अर्पण करीत असतात. यापैकी बरेचसे भक्त आपले दान दानपेटीत अर्पण करीत असतात. तर काही भक्त समक्ष देणगी कार्यालयात येऊन वर उल्लेख केलेले सोने-चांदीच्या मौल्यवान वस्तू-अलंकार देणगी म्हणून देतात. याबाबत सध्या खालीलप्रमाणे ढोबळमानाने कार्यपध्दती अवलंबिली जात आहे -

०१. वरील स्वरुपात देणगी देणेसाठी भक्त देणगी कार्यालयात आलेनंतर, सोने-चांदीचे मुल्यांकन करणेसाठी सर्वप्रथम संस्थानचे स्थानिक पातळीवरील सोने-चांदी मुल्यांकनकार यांना पाचारण केले जाते.

०२. अशा प्रकारचे मुल्यांकन करणेसाठी लेखाशाखेमार्फत विहित नमुन्यात फॉर्म तयार करणेत आलेला असून, त्यामध्ये भक्तांचे नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, देणगी देऊ इच्छित असलेल्या धातूचे नाव, वस्तूचे नाव, कॅरेट / टंच, आजचा बाजारभाव व त्यानुसार होणारी किंमत, भक्ताची व मुल्यांकनकार यांची स्वाक्षरी इत्यादी तपशील नमुद करणेत आलेला आहे. त्यानंतर सोने-चांदी मुल्यांकनकार, भक्त देणगी म्हणून देऊ इच्छित असलेल्या मौल्यवान वस्तूंचे कस लावून, तपासणी करुन व वजनमापे घेऊन, त्या दिवशीचे बाजारभावानुसार वस्तूंचे मुल्यांकन करुन देत असतात.

०३. मुल्यांकनकारांनी केलेल्या मुल्यांकनानुसार लेखाशाखेमार्फत भक्तांस विहित पध्दतीने देणगी पावती व उदीप्रसाद दिला जातो. यामध्ये सोने-चांदीचे देणगी मुल्य साधारणतः रुपये २५,०००/- मात्र व त्यापेक्षा जास्त आहे अशा देणगीदार साईभक्तांना फक्त एकदास श्री साईचे दर्शन/ आरतीची सुविधा विनामुल्य दिली जाते.

**परंतु आता असे निदर्शनास आले आहे की,** समाधी मंदिरासह इतर मंदिरात नित्य वापरासाठी तसेच आवश्यक ठिकाणी मौल्यवान सोने-चांदीच्या वस्तू तयार करुन, देणगी म्हणून श्री साईचे चरणी अर्पण करणेचा भक्तांचा कल वाढलेला आहे. यामध्ये मंदिरातील मखर, फोटोफ्रेम, सिंहासन, दक्षिणा पेटी, श्री साईचे समाधीस/ पादुकांना, समाधी मंदिरातील भिंतींना आवरण इत्यादीचा समावेश होतो. अशा वस्तू तयार करणेसाठी सोने-चांदी बरोबरच तांबे, स्टील, लोखंड, लाकूड इत्यादी धातूंचाही वापर करणेत येतो. अशा वेळेस या वस्तूंचे मुल्यांकन करणे सोने-चांदी मुल्यांकनकारांसह संस्थान व्यवस्थापनास किचकट व जिकिरीचे होत आहे. तसेच अशा वस्तू/ साहित्य द्यावे म्हणून मंदिर, जनसंपर्क अथवा इतर विभागातील अधिकारी/ कर्मचारी थेट भक्तांशी संपर्क साधत असल्याने अशा वस्तूंचे मुल्यांकन करतांना येणाऱ्या अडचणीबाबत ते अनभिज्ञ असतात व त्यातून गैरसमजुतीने वाद-विवादाचे प्रसंग उद्भवून संस्थान व्यवस्थापनास चुकीचे प्रसिध्दी स सामोरे जावे लागत आहे.

**(ब)** वर नमुद केलेल्या सर्व विवेचनास अनुसरुन, एखाद्या भक्ताने सोने-चांदी वस्तू/ साहित्य देणगी म्हणून देणेची इच्छा व्यक्त केल्यास अशी सोने-चांदीसह इतर मौल्यवान वस्तू / साहित्य स्वीकारणेसाठी काही मार्गदर्शक तत्वे-वजा-नियमावली असणे हितकारक व गरजेचे आहे, असे मत आहे. यामध्ये खालील मार्गदर्शक बाबींचा समावेश करता येईल –

०१. जे साईभक्त सोने-चांदी या मौल्यवान धातूपासून बनविलेल्या वस्तू/ साहित्य देणगी रुपाने देऊ इच्छितात अशा साईभक्तांना प्रशासकीय अधिकारी/ मुख्यलेखाधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/ मंदिर विभाग प्रमुख यांचेकडेस आपली संकल्पना मांडणेकामी आमंत्रित करावे.

०२. भक्त देणगी देऊ इच्छित असलेल्या सोने-चांदी वस्तू/ साहित्यात इतर धातूंचा समावेश होणार असेल तर त्यासाठी स्थानिक सोने-चांदी मुल्यांकनकारांसह तो भक्त ज्यांचेकडून अशी वस्तू बनवून घेऊ इच्छित आहे त्यांचे प्रतिनिधीसह सविस्तर चर्चा करणेत यावी.

०३. संबंधित भक्ताकडून देणगी बाबतचा प्रस्ताव लेखी स्वरुपात घेऊन, त्याबाबत प्रथम संस्थान प्रशासनास व प्रशासनाचे सुचनेनुसार व्यवस्थापनासही अवगत करावे. आवश्यकता भासल्यास याबाबत प्रस्ताव सादर करुन, रितसर मान्यता घेणे हितावह राहिल. यामध्ये प्रामुख्याने देणगी म्हणून देणेत येणारी वस्तू/ साहित्य कोण-कोणते धातू वापरुन बनविणेत येणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख असावा.

०४. वर नमुद केलेप्रमाणे, प्रत्यक्ष काम सुरु होईल त्यावेळेस त्यामधील घटकांचे स्वतंत्र वजन (उदा. सोने, चांदी, तांबे, लाकूड अथवा इतर) स्थानिक मुल्यांकनकारांसह संबंधित विभागाचे प्रतिनिधी व भक्त अथवा त्याचे प्रतिनिधीसमोर करणेत येऊन त्याच्या नोंदी ठेवणेत याव्यात.

०५. अशा देणगी रुपाने द्यावयाचे वस्तूचे काम पूर्ण झालेनंतर, बाकी रहाणारे उरलेल्या साहित्याचेही स्वतंत्र वजन व स्थानिक मुल्यांकनकारांसह संबंधित विभागाचे प्रतिनिधी व भक्त अथवा त्याचे प्रतिनिधी समोर करणेत येऊन त्याच्या नोंदी ठेवणेत याव्यात.

अशा विविध धातू/ घटक एकत्र असलेल्या वस्तूचे/ साहित्याचे बनविणेचे संपूर्ण कामकाज शिर्डी येथेच करणेत यावे, जेणेकरुन त्यामध्ये असलेल्या घटक धातूंचे/ घटकांचे स्वतंत्र वजन करुन, त्यांच्या उचित नोंदी करणे व त्यानुसार मुल्यांकन करणे सोयीचे होईल.

०६. प्रत्यक्षात ज्या दिवशी वर नमुद केलेली वस्तू / साहित्य देणगी रुपाने संस्थान प्रशासनाचे अथवा संबंधित विभागाचे ताब्यात मिळाले त्यादिवशी, अ.नं. ०४ व ०५ मध्ये नमूद केलेल्या नोंदी लक्षात घेऊन, प्रत्यक्ष वजनाप्रमाणे व त्यादिवशी असणारे बाजारभावाप्रमाणे हिशोब करुन देणगी पावती देणेत यावी.

०७. बहुतांशी भक्त सुवर्णलेप असलेल्या चांदीच्या वस्तू देणगी रुपाने देतात, या वस्तूंची देणगी पावती ही त्यामध्ये वापरलेल्या चांदीचे टंचनुसार चांदी वस्तू म्हणून करणेत यावी

०८. बहुतांशी भक्त खडे (Stones)असलेले मुकूट व इतर वस्तू देणगी रुपाने देतात, या वस्तूंची देणगी पावती खड्यांचे अंदाजे वजन वस्तूचे एकूण वजनातून वजा करुन निव्वळ सोने-चांदीचे मुल्यांकन करुन, त्यानुसार देणगी पावती देणेत यावी.

०९. देणगी पावतीप्रमाणे तसेच वेळोवेळी करणेत आलेल्या नोंदीप्रमाणे संबंधित विभागांनी अशा वस्तूंची चल-अचल मालमत्ता नोंदवहीत उचित नोंदी घेणेची कार्यवाही त्वरीत पूर्ण करावी व कार्यपूर्तता अहवाल मा. कार्यकारी अधिकारी यांचे अवलोकनार्थ सादर करावा.

**(क)** उपरोक्तप्रमाणे सोने-चांदी वस्तू/ साहित्य देणगी रुपाने स्वीकारणेकामी मार्गदर्शक तत्व-वजा-नियमावली निश्चित करुन कार्यवाही करणेकामी उपरोक्त प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला साईभक्तांकडून देणगी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सोने-चांदी व इतर मौल्यवान धातूच्या वस्तु/ साहित्य देणगी म्हणून स्वीकारणेकामी या क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शनानुसार नियमावली तयार करणेत येऊन, ती मान्यतेस्तव समितीसमोर सादर करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०७** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ०६ रस्ते भूसंपादीतकरुन विकसीत करणे.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था .खालील प्रमाणे तरतुद आहे (२) २१ चे कलम २००४ (शिर्डी)

क १) आणि (१) पोट कलम) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन सुधारणा व वाढमध्येनिक नागरी सेवा सुविधा यांच्यास्था (होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

**मा .व्यवस्थापन समिती निर्णय:**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | निर्णय क्र. २६३ दि. २४/०४/२००६. | ०६. | निर्णय क्र. ७५० दि. ११/०९/२०१४. |
| ०२. | निर्णय क्र. १६ (ब) दि. १०/०१/२०१०. | ०७. | निर्णय क्र. ७९९ दि. ११/०९/२०१४. |
| ०३. | निर्णय क्र. ५३८ दि. २४/०७/२०११. | ०८. | निर्णय क्र. ४६७ दि. १०/११/२०१५. |
| ०४. | निर्णय क्र. ७०६ दि. २४/०९/ २०११. | ०९. | निर्णय क्र. ६५६ दि. २८/१२/२०१५. |
| ०५. | निर्णय क्र. ७८ दि. ०८/०१/२०१४. | १०. | निर्णय क्र. ३३ दि. २५/०२/२०१७. |

मा. शासन निर्णय : मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.

१. सासंवि/२००६/८७६/(१३१) का.सोळा, दि.०४/०९/२०१४

२. सासंवि-२०११/५१४/ प्र. क्र. ७४/का.१६, दि.२१/०८/२०१४

**प्रस्तावना**: शिर्डी शहरातील सार्वजनिक सोयीसुविधांचा विस्तार करण्याचे दृष्टीने व ज्यांचा साईभक्तांना प्रामुख्याने उपयोग होईल अशी विकास कामे हाती घेवून पूर्ण करणेसाठी संस्था न व्यवस्थापन शिर्डी नगरपंचायतीस मदत करीत आहे. या विविध पायाभूत सुविधांअंतर्गत शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरुन शिर्डी शहरातील रस्ते संस्थान निधीतुन विकसीत करणेस तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०४/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६३ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

**अ)** **<u>शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील रस्ते विकसीत करणे</u>**: मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार प्रथम प्राधान्य गटातील १०.०६ किलोमीटर लांबीचे एकुण ११ रस्ते संस्थान निधीतून भूसंपादन व विकसीत करणेसाठी येणारे रु.८८ कोटी मात्रचे खर्चास दि.०४/०९/२०१४ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली असून, सदर प्रकल्पासाठी आजपावेतो रु.७०,०७,८४,७६९/-

इतकी रक्कम खर्च झाली आहे. सदरहू प्रकल्पातील रस्ता क्र. ०९ अ भूसंपानासाठी व रस्ता क्र.०८ साठी मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी मागणीनुसार सदर प्रकल्पासाठी रु.३०,७५,३३,१४५/- वाढीव खर्च येत आहे. याकामी येणारे वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाचे विधी व न्याय विभागाकडे दि.१७/१०/२०१६ अन्वये सादर करणेत आलेला आहे. त्यास अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही. याबाबत पाठपुरावा करणेत येत आहे.

**ब)** **<u>शिर्डी शहरातील सहा रस्ते भूसंपादन करुन विकसीत करणे.</u>** मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी दि.१०/०६/२०११ व दि.१६/०७/२०११ रोजीचे पत्रान्वये, सदरहू प्रकल्पातील एकुण ०६ रस्त्यांचे भूसंपादनासाठी रु.४३.७३ कोटी व या सहा रस्त्यांसह भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्ते विकसीत करणेकामी अंदाजे रु.८२.३७ कोटी असे एकुण रु.१२६.१०० कोटी खर्चाचा खालील रस्त्यांचे भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करणे व रस्ते विकसित करणेबाबतचा प्रस्ताव संस्थानला सादर केला होता. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३८ अन्वये, द्वितीय प्राधान्य गटातील रस्ते विकसीत करणेस मान्यता देणेत आलेली आहे. सदर निर्णयानुसार खालील सहा रस्ते भूसंपादनासाठी रु४३.७३ कोटी व विकसनासाठी रु.५७.२८ कोटी असा एकुण रु.१०१.०१ कोटी खर्चाचा प्रस्ताव इकडील दि.०४/०४/२०१२ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेसादर करणेत आला होता.

| अ. नं. | रस्त्याचे नांव | लांबी (मी.) | लांबी (मी.) | अस्तित्वातील रुंदी (मी.) | भूसंपादन करावयाची रुंदी (मी.) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | विकास योजनेतील २४ मीटर रुंद वळण रस्ता (साई श्रध्दा हाउसिंग सोसायटी कॉर्नर ते सन एड सॅन हॉटेल रस्ता) | २६५० | २४ | - | २४.०० |
| ०२ | विकास योजनेतील १२ मिटर रुंदीचा हॉटेल गोराडीया समोरील | ५५० | १२ | ५.५० | ६.५० |
| ०३ | रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता) | ५०० | १५ | १० | ५.०० |
| ०४ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा बिरेगांव रस्तां (नविन पिंपळवाडी रस्ताप- वराह चौक ते कालिकानगर- १५ मीटर व पुढे बिरोबा मंदिरापर्यंत वहिवाटीप्रमाणे) | ३२० | १५ | - | १५.०० |
| ०५ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ताप (जैन मंदिरालगत | १००० | १५ | १० | १५.०० |
| ०६ | नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता ) | ३०० | १५ | -- | १५.०० |
| | एकूण लांबी | ५३२० | | | |

त्यानंतर उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी या सहा रस्त्यांचा भूसंपादन खर्च रु.४३.७३ कोटी ऐवजी रु.५४.२६ कोटी येत असलेबाबत कळविले होते. त्यानुसार सदरहू कामी एकुण रु.१११.५४५ कोटी सुधारीत खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.७८ अन्वये मान्यता मिळाली. त्यानुसार दि.१०/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये शासन मान्यतेसाठी सुधारीत प्रस्ताव सादर करणेत आला.

याबाबत विधी व न्याय विभागाने दि.१८/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये, भूसंपादनाची आवश्यकता असणारे सात रस्ते विकसीत करणेबाबतचे प्रस्तावास सद्यस्थितीत कार्यरत त्रिसदस्य समितीची मान्यता घेऊन, मा. उच्च न्यायालयाच्या सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१२०५६/२०१२ दि.१६/१०/२०१२ च्या आदेशानुसार उच्च न्यायालयाकडे जाऊन प्रथम मान्यता घेण्यात यावी असे कळविले. त्यानुसार द्वितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता असलेले सहा रस्त्यांचे भूसंपादन व विकसनासाठी आवश्यक असणारा रु.१११.५४५ कोटी मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेकामी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अर्ज क्र.८७०९/२०१४ अन्वये सादर करणेत आला होता.

तदनंतर या सहा रस्त्यांचे भूसंपादन करणेकामी रु.५४.२६ कोटी ऐवजी आता नवीन भूसंपादन कायदा सन २०१३ दि.०१/०१/२०१४ पासून लागू करण्यात आला असल्याने, या कायद्याचे कलम २४ तसेच कलम २६ ते ३० प्रमाणे हिशोबीत करुन द्यावी लागणार असल्याने सुधारीत भूसंपादन खर्च एकुण रु.१५०,१८,८८,७९७.०० इतका येत असलेबाबत उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी कळविले. याकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० खालील प्रमाणे झाला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, यापूर्वी प्रस्तावित कामी येणा-या रु.१११.५४५ कोटी मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज सादर केलेला असून, अद्याप पर्यंत या अर्जावर काहीही निर्णय झालेला नाही. मा. औरंगाबाद खंडपीठाकडे याबाबत पाठपुरावा करणेत यावा व मा. औरंगाबाद खंडपीठाचे मंजूरी मिळालेनंतर वाढीव रकमेचा प्रस्तव्र समितीपुढे सादर करणेत यावा असे ठरले."

मा. व्ययवस्थावपन समितीचे दि.१०/११/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.४६७ अन्वरये, "..यावर सविस्तार चर्चा होऊन असे ठरले की, व्दितीय प्राधान्यर गटात नमूद केलेल्याच १७ रस्यापैकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर झालेले ०८ रस्ते वगळणेत येऊन, उर्वरीत ०९ रस्यांनग ची सद्यःस्थिती, निकड, खर्चाची रक्कंम यासह सुधारीत खर्चाचा प्रस्ताव तयार करावा तसेच भूसंपादनाची आवश्य्कता असलेल्याथ ०६ रस्यांचे भूसंपादन व इतर अनुषंगीक खर्चाबाबतचा सुधारीत तपशील शिर्डी नगरपंचायतीकडून घेण्यात् यावा व त्याडसह सविस्तचर प्रस्ताभव सभेसमोर सादर करणेत यावा. "तसेच मा.त्रिसदस्य समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र .६५६ खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"...यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील ०६ रस्ते भू-संपादीत करुन विकसीत करणे व ०९ रस्ते विकसीत करणेबाबतचे प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून सुधारीत सविस्तर अंदाजपत्रकासह प्रस्ताव मागविणेत यावा, त्यांचेकडून प्रस्ताव आल्यानंतर मान्यतेसाठी मा. उच्च न्यायालयामध्ये सादर करणेत यावा, असे ठरले."*

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.३०/०६/२०१६ रोजीचे पत्राने उर्वरीत एकूण १५ रस्त्यांपैकी शिर्डी हद्दीतील नगरमनमाड रस्ता कॉन्क्रीटीकरण करणे कामाचा खर्च वगळता इतर १४ रस्त्यांचे खर्चाचा सुधारीत प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केला.

| | | |
|---|---|---|
| **(अ)** | ०६ रस्ते भूसंपादन खर्च | : रु.१६३,५५,२६,२१०.०० |
| | ०६ रस्ते विकसन खर्च | : रु.४३,७२,२७,५४३.०० |
| | **०६ रस्ते एकूण खर्च** | **:** रु.२०७,२७,५३,७५३.०० |
| **(ब)** | ०८ रस्ते विकसन खर्च | : रु.२२,६९,९१,५१०.०० |
| | **एकूण खर्च (अ+ब)** | : **रु.२२९,९७,४५,२६३.००** |

सदरहु प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी सादर करणेबाबत कार्यवाही विधी विभागामार्फत सुरु होती. दरम्यान दि.२८/०७/२०१६ रोजी पासून मा.व्यवस्थापन समिती अस्तीत्वात आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार विधी विभागामार्फत सिव्हील अर्ज मागे घेणेबाबतची कार्यवाही करणेत आली आहे.

तसेच याबाबत मुख्यलेखाधिकारी यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

*"..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ नियम क्रमांक २१ (२) नुसार विश्वस्तव्यवस्थेच्या शिल्लक रकमेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या ३०% पेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस अधिनियमात नमूद प्रयोजन व संस्था तसेच शिर्डी नगरपंचायत यांना देता येतो*

*एकूण वितरणयोग्य निधी रु.५१.४१ कोटी आहे. त्यामुळे सदर रस्त्यांची कामे टप्प्याटप्प्याने निधिच्या उपलब्धतेनुसार करावी लागतील किंवा साई शताब्दी आराखड्यात समाविष्ट असल्यास प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शासनास सादर करण्यास हरकत नसावी."*

याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र.३३ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमूद केलेल्या रस्त्यांपैकी ज्या रस्त्यांचे भू-संपादन करण्याची आवश्यकता नाही, अशा रस्त्यांविषयी तसेच दि.२१/०८/२०१४ रोजीच्या शासन आदेशान्वये मान्यता मिळालेल्या शिर्डी शहरातील द्वितीय प्राधान्य गटातील १७ रस्त्यांविषयी व शिर्डी नगरपंचायतीला सुवर्ण जयंती नगरोथ्थान महभियान योजनेअंतर्गत मंजूर ८ रस्त्यांविषयीचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

तसेच द्वितीय प्राधान्य गटातील ६ रस्त्यांचे भूसंपादन व विकसन करणे संदर्भातील स्वतंत्र प्रस्ताव सभेसमोर ठेवण्यात यावा."

**प्रस्ताव:** मा. व्यवस्थावपन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार शिर्डी शहरातील ०६ रस्ते भूसंपादन करुन विकसीत करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीने दि.३०/०६/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार याकामी रु. २०७,२७,५३,७५३/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तरी याकामी येणारे खर्चास व याकामी अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२८४** **यावर सविस्तर चचा्र होऊन असे ठरले की, समाधी शताब्दी वर्षामध्ये साईभक्तांच्या सोयीसाठी कोणते रस्ते व कसे महत्वाचे आहेत, याचे पुढील सभेसमोर सादरीकरण दाखविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८** **केंद्र शासनामार्फत चलनातून बाद करणेत आलेल्या परंतु संस्थान व्यवस्थापनाकडे जमा होत आलेल्या जुन्या रु.१०००/- व रु.५००/- मात्र दर्शनी मुल्यांच्याचलनी नोटांबाबत.**

**प्रस्ताव–** **विषयाची पूर्वपीठीका-**

**(अ)** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईचे समाधी दर्शनाकरीता दररोज हजारो साईभक्त येत असतात. हे साईभक्त श्री साईंवरील श्रध्देपोटी देणगी रुपाने विविध स्वरुपात रोख रक्कम, मौल्यवान अलंकार आदि श्री साईंना अर्पण करीत असतात. यापैकी बहुतांशी भक्त रोख स्वरुपात गुप्तदान करीत असतात, अशा गुप्तदानासाठी समाधी मंदिरासह मंदिर परिसरात व संस्थानचे परिसरात विविध ठिकाणी सिलबंद देणगी पेटया बसविणेत आलेल्या आहेत. या देणगी पेटयांमधील रक्कमेची मोजणी शक्यतो मंगळवार व शुक्रवार या दोन दिवशी करणेत येत असते. सदरहू देणगी पेटी रक्कम मोजणीकामी संस्थान अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचेसह मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांचे व बॅकेच्या प्रतिनिधी यांचेसह सर्वसामान्य भक्तांचे सहकार्याने करणेत येत आहे या देणगी पेटयांमधून रोख रक्कमेच्या स्वरुपात विविध किंमतीच्या भारतीय चलनासह विदेशी चलनातील विविध किंमतीच्या सर्वप्रकारच्या नोटा प्राप्त होत असतात. या गुप्तदानाने प्राप्त होणारे भारतीय अथवा विदेशी चलनातील नोटांच्या मुल्यांवर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण ठेवणे शक्य नाही.

**(ब)** वित्त विभाग, भारत सरकार यांनी दिनांक ०८ नोव्हेंबर,२०१६ रोजीचे शासन निर्णयानुसार, रुपये १०००/- मात्र व रुपये ५००/- मात्र या मुल्यांच्या जुन्या चलनी नोटा व्यवहारातून बाद (बंद) केलेल्या आहेत. सदरहू केंद्र शासनाचे निर्णयानुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे -

**०१.** मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ रोजी परिपत्रकानुसार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१६ ते दिनांक ३० डिसेंबर, २०१६ अखेर दान / देणगी पेटीतून प्राप्त झालेल्या जुन्या व बाद करणेत आलेल्या चलनी नोटा दररोज बॅकेत जमा न करतां, संस्थानचे सुरक्षागृहात (स्ट्रॉग रुम) सिलबंद करुन ठेवणेत आलेल्या होत्या. सदरील नोटांचा भरणा दिनांक ३० डिसेंबर, २०१६ अखेर व रोजी संबंधित बॅकेत करणेत आलेला आहे. दिनांक ३० डिसेंबर, २०१६ अखेरचा हिशोब पूर्ण करणेत आलेला आहे.

म्हणजेच, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१६ ते दिनांक ३० डिसेंबर, २०१६ या कालावधीत संस्थान व्यवस्थापनास दानाव्दारे/ देणगी पेटीव्दारे तसेच रुग्णालय विभागांस रुग्णांव्दारे प्राप्त झालेल्या एकूण रक्कम रुपये ६,४६,२०,५००/- मात्रच्या जुन्या बाद (बंद) नोटांचा भरणा संबंधित बॅकांकडे करणेत आलेला आहे.

**०२.** त्यानंतर, दिनांक ३१ डिसेंबर,२०१६ (म्हणजेच दिनांक ०१ जानेवारी, २०१७) ते दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेर जमा झालेल्या रुपये ७०,६६,५००/- मात्र रक्कमेच्या नोटा तारीखवार स्वतंत्ररित्या कापडी पिशवीत सिलबंद करुन, लेखाशाखेच्या सुरक्षागृहात (स्ट्रॉग रुम) ठेवणेत आलेल्या आहेत.

**०३.** उपरोक्त जमा झालेल्या रक्कमेबाबत संस्थान व्यवस्थापनाचे स्तरावरुन मा. महाव्यवस्थापक, चलन व्यवस्थापन विभाग, रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया यांना दिनांक ११ जानेवारी, २०१७ व दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ रोजी मार्गदर्शन-वजा-निर्देश मिळणेसाठी पत्र देणेत आलेले आहे, परंतु त्याबाबत रिझर्व्ह बॅकेकडून कुठल्या प्रकारचा प्रतिसाद मिळालेला नाही. सदर पत्राची प्रत मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनाही माहितीस्तव अग्रेषित करणेत आलेली आहे.

**०४.** याव्यतिरिक्त प्र. लेखाधिकारी, लेखाशाखा यांनी समक्ष रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया, मुंबई कार्यालयास समक्ष भेट देऊन याबाबत मार्गदर्शन-वजा-निर्देश मिळणेबाबत विनंती केलेली होती. त्यानुसार मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांनी रिझर्व्ह बॅक ऑफ इंडियाचे प्रतिनिधी श्री. पी. विजयकुमार यांचेशी

दूध्वनीवरुन चर्चा केलेली आहे. या चर्चेतील संदर्भानुसार, श्री. सौरभ गर्ग, (भाप्रसे), संयुक्त सचिव, वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिनांक १६ मार्च,२०१७ रोजी विषयांकित बाबत अर्धशासकीय पत्र देणेत आलेले आहे.

०५. तसेच जुन्या चलनी नोटा रिझर्व्ह बँकेने स्वीकाराव्यात म्हणून मा. शासन स्तरावरुन विनंती करणेबाबत संस्थान व्यवस्थापनामार्फत मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन दि. २९ मार्च, २०१७ रोजी पत्र देणेत आलेले आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेनुसार तसेच भारत सरकार व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी ज्या रुपये १०००/- व रुपये ५००/- मात्र दर्शनी मुल्यांच्या जुन्या नोटा चलनातून बाद (बंद) केलेल्या आहेत, त्या आज रोजीसुध्दा दान/ देणगी पेटीतून प्राप्त होत आहेत. दिनांक ०३ एप्रिल, २०१७ रोजी देणगीपेटी व्दारे रक्कम रुपये ६,६७,०००/- मात्र इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे. सदर बाद (बंद) नोटा स्वतंत्ररित्या कापडी पिशवीत सिलबंद करुन लेखाशाखेकडील सुरक्षा गृहात (स्ट्रॉंग रुम) ठेवणेत आलेल्या आहेत. सदर रक्कमेचा समावेश कुठल्याही लेख्यांमध्ये करणेत आलेला नाही अथवा सदर रक्कम कुठल्याही हिशोबात गृहीत धरणेत आलेली नाही.

**(ड)** उपरोक्तप्रमाणे, भारत सरकारने दि. ०८ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे राजपत्राव्दारे चलनातून बाद (बंद) केलेल्या परंतु आजही संस्थानचे देणगी/ दान पेटीतून प्राप्त होणा-या जुन्या रुपये १०००/- व रुपये ५००/- मात्र दर्शनी मुल्यांच्या नोटांबाबत करणेत आलेली कार्यवाही व सद्यःस्थिती मा व्यवस्थापन समितीचे माहितीस्तव तथा अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.२८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भारत सरकारने दि. ०८ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे राजपत्राव्दारे चलनातून बाद (बंद) केलेल्या परंतु आजही संस्थानचे देणगी/ दान पेटीतून प्राप्त होणा-या जुन्या रुपये १०००/- व रुपये ५००/- मात्र दर्शनी मुल्यांच्या नोटांबाबत करणेत आलेली कार्यवाही व सद्यःस्थितीचे अवलोकन करणेत आले. तसेच जुन्या रुपये १०००/- व रुपये ५००/- च्या नोटा आज रोजीही दान पेटीमध्ये येत आहेत व या बंद करणेत आलेल्या नोटा कायद्यानुसार आपल्याला ठेवता येणार नाहीत, यामुळे जुन्या रुपये १०००/- व रुपये ५००/- च्या नोटांची विल्हेवाट लावणेसाठी रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचेकडे पाठपुरावा करणेत यावा. तसेच विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेही मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०९** **आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये केलेल्या गुंतवणूकीचा अहवाल व आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये होणाऱ्या गुंतवणूकीसमान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ कलम २०(३) अन्वये विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तु केवळ राष्ट्रीयकृत बँकेत किंवा बँकामध्ये ठेव म्हणुन ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम २ च्या खंड(१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक रोख्यांमध्ये गुंतविण्यात येतील, अशी तरतुद आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र.९५२/दि.६.११.२०१४ अन्वये बचत खाते असलेल्या राष्ट्रीयकृत बँकाची आर्थिक स्थिती विचारात घेऊन, त्यांचेकडुन व्याजदर मागवुन, जास्तीत जास्त व्याजदर देणा-या बँकांकडे टप्याटप्याने गुंतवणुक करण्यास मा. कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊन गुंतवणुक करावी व त्याचा वार्षिक अहवाल आर्थिक वर्षाच्या शेवटी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर करण्यात यावा असा निर्णय संमत झाला आहे.

त्यास अनुसरून राष्ट्रीयीकृत बँकाची आर्थिक् स्थिती पाहून केलेल्या गुंतवणुकांची मुदतपूर्ती झाल्यानंतर, उपलब्ध् होणारा निधी व बचत खात्यामध्ये दैनदिन खर्च वजा जाता उपलब्ध् होणारा निधी, याची विहित पध्दतीने संस्थानचे बचत खाते असलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने गुंतवणुक करण्यात आली आहे.

दि.३१ मार्च २०१७ अखेर आर्थिक वर्षात केलेल्या गुंतवणुकीचा अहवाल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | बँकेचे नाव | दि.३१ मार्च २०१७ अखेर मिळालेले व्याज | दि. ३१ मार्च २०१७ अखेर असलेली गुंतवणुक |
|---|---|---|---|
| १ | आंध्र बँक, शिर्डी | २५,६८,७६,४०९/- | १७४,०५,८२,००२/- |
| २ | बँक ऑफ बरोडा, नाशिक | १००,५९६,८१४/- | ८४,५०,००,०००/- |
| ३ | बँक ऑफ इंडिया, शिर्डी | ८,०४,५५,३६०/- | १,३९,९९,९९,९८६/- |
| ४ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १२,६९,४१,२२७/- | ९९,९९,९९९/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | कॅनरा बॅंक, शिर्डी | ४,६४,९९,३२८/- | ६७,९८,००,००१/- |
| ६ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | १४,४४,२५,०२६/- | १००,१६,०७,४१५/- |
| ७ | कॉर्पोरेशन बॅंक, शिर्डी | १,६३,११,४३१/- | ४७,०१,००,००१/- |
| ८ | देना बॅंक, शिर्डी | ६,५४,२७,१६६/- | २१४,४०,००,०००/- |
| ९ | इंडियन बॅंक, शिर्डी | ३,०१,४४,३८६/- | ७८,००,००,०००/- |
| १० | ओरिएंटल बॅंक ऑफ कॉमर्स, शिर्डी | ९८,७०,५९०/- | ६८,०१,००,००१/- |
| ११ | पंजाब नॅशनल बॅंक, शिर्डी | - | १४,०१,००,००१/- |
| १२ | स्टेट बॅंक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | ८,४९,२१,३३५/- | ९,९९,९९,९९९/- |
| १३ | सिंडीकेट बॅंक, शिर्डी | - | ९,४५,००,०००/- |
| १४ | युको बॅंक, शिर्डी | ५,४३,४०,४३९/- | १६४,००,००,०००/- |
| १५ | युनियन बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी | ७,३४,८४,८९१/- | ८१,००,००,०००/- |
| १६ | विजया बॅंक, शिर्डी | २१,०९,३५,१२८/- | ६२६,५३,००,००५/- |
| | **एकूण रक्कम** | **१३०,१२,२९,५३०/-** | **१८८०,१०,८९,४१०/-** |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये राष्ट्रीयकृत बॅंकाकडुन व्याजदर मागवुन उच्चतम दराने दि.३१ मार्च २०१७ अखेर रू.१८,८०,१०,८९,४१०/- मात्र ची गुंतवणुक असून आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये व्याजरुपाने मिळालेले उत्पन्न रू.१३०,१२,२९,५३०/- मात्र इतके आहे.

आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये केलेल्या गुंतवणुकीचा वार्षिक अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यास व आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये मुदतपूर्ती होणा-या व बचत खात्यात दैनदिन खर्च वजा जाता गुंतवणुकीसाठी उपलब्ध होणा-या रकमेची विहित पध्दतीने मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने राष्ट्रीयीकृत बॅंकांकडून वेळोवेळी तुलनात्मक व्याजदर मागवुन जास्तीत जास्त व्याजदराने गुंतवणुक करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली व आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये गुंतवणूक करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१० विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अ)** मा.त्रिसदस्य समिती दि.२७/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२५ व मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दि०४ मार्च, २०१६ चे आदेशानुसार संस्थानचे विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही रिक्त पदे सरळसेवेने भरणेकामी वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करुन दि.३०/०४/२०१६ अखेर अर्ज मागविणेत आलेले आहेत. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे –

| अ.नं. | पदनाम | दि.३०/०४/२०१६ अखेर आलेले अर्ज | मुदतीनंतर आलेले अर्ज | एकूण अर्ज |
|---|---|---|---|---|
| ०१ | विधी अधिकारी | २५ | ०१ | २६ |
| ०२ | कामगार अधिकारी | ४० | ०० | ४० |
| ०३ | क.कामगार अधिकारी | ४४ | ०२ | ४६ |

वरीलप्रमाणे आलेल्या अर्जांवर कार्यवाही करणेकामी, मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दि.०४ मार्च, २०१६ रोजीचा आदेश, शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२५ ऑक्टोबर, २०१६ रोजीचा अभिप्राय तसेच मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायधीश, अहमदनगर यांचेकडील दि.१० जानेवारी, २०१७ रोजीचे अभिप्राय इत्यादी सर्व बाबींवर संस्थान ॲडव्होकेट पॅनलवरील ॲड.नितीन भवर, औरंगाबाद यांनी दि.१५/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये दिलेल्या अभिप्रायानुसार संस्थानचे प्रशासकीय कामकाज पहाणेकामी शासनाने नव्याने नियुक्त केलेल्या मा.व्यवस्थापन समितीने संबंधीत विषयातील तज्ञांची एक निवड समिती स्थापन करुन भरतीची निवड प्रक्रिया अमलात आणून पुढील कार्यवाही करणेचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.१३९ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

यापुर्वी निर्णय क्र.४४ मध्ये समिती सदस्य तथा जेष्ठ कायदेतज्ञ मा.ॲड.मोहन जयकर यांचे अध्यक्षतेखाली गठीत करणेत आलेल्या उपसमितीने विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेची कार्यवाही पुर्ण करावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरून उपरोक्त अर्ज प्र.अधिक्षक, आस्थापना विभाग व प्रशासकीय अधिकारी, आस्थापना यांनी मा.ॲड.मोहन जयकर यांचेकडून दि११/०३/२०१७ रोजी पडताळणी करुन घेतले असून जाहीरातीनुसार पात्र-अपात्र निश्चिती करणेत आलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.नं. | पदनाम | पात्र उमेदवाराचे नाव |
|---|---|---|
| ०१ | विधी अधिकारी | १) श्री.नकुल सुरेश तांबे<br>२) श्रीमती वैशाली शंकर कांदळकर<br>३) श्री.बापुसाहेब तुकाराम वाघ<br>४) श्री.मजहरखान मेहमुदखान पठाण<br>५) श्री.विजय रंगनाथ धनवट<br>६) श्री.पंकज भाऊसाहेब लोंढे |
| ०२ | कामगार अधिकारी | सर्व अपात्र |
| ०३ | क.कामगार अधिकारी | सर्व अपात्र |

वरीलप्रमाणे विधी अधिकारी या पदासाठी ६ उमेदवार पात्र होत आहेत. कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी या पदासाठी सर्व उमेदवार अपात्र आहेत.

शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी संस्थानचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे. सदर आकृतीबंधात नव्याने पदभरतीबाबत खालीलप्रमाणे अटी-शर्ती नमुद केलेल्या आहेत.

शासन निर्णयातील अट-शर्त क्र.०३– सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

शासन निर्णयातील अट-शर्त क्र.१०– तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

उपरोक्त शासन निर्णयातील अटी-शर्ती विचारात घेता, विधी अधिकारी या पदासाठी जाहीरातीनुसार पात्र ६ उमेदवारांची १०० गुणांची लेखी परिक्षा व मुलाखत घेऊन मेरीटनुसार योग्यउमेदवाराची विधी अधिकारी या पदावर नेमणूक करता येईल. तसेच कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी या पदासाठी पुनःश्च वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील विधी अधिकारी या पदांसाठी सहा उमेदवार पात्र आहेत, त्यामुळे सदरहू पद भरणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली**

**तसेच, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी या पदांसाठी आलेल्या अर्जामधील एकही उमेदवार पात्र ठरलेला नाही, याकरीता ही पदे सरळसेवेने भरणेकामी सेवा प्रवेश नियमातील तरतूदींचा फेरआढावा घेण्यात येऊन, पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.११** **बांधकाम ठेकेदारांची अंतिम देयके अदा करणे.**

**प्रस्ताव–** खाली नमूद केलेली बांधकामे संस्थानमार्फत पूर्ण करणेत आलेली असून, ठेकेदार यांनी पूर्ण केलेल्या कामांचे बिले आर्किटेक्ट/ सल्लागार/ इकडील विभागामार्फत तपासणी करणेत येऊन, त्यांचे बिलांचा "ब" तक्ता मा. व्यवस्थापन समितीचे दि.09/03/2017 रोजीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करणेत आला होता. सदरहू सभेत निर्णय क्र.191अन्वये *".. ..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये चालू असलेली बांधकामे व पुर्ण झालेल्या कामांचे अंतीम बील अदा करणेचा प्रस्ताव तक्त्यांसह सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले."*

उपरोक्त निर्णयानुसार पूर्ण झालेल्या कामांचे अंतीम बीले अदा करणेबाबत प्रस्ताव तक्ता स्वरूपात खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

**१.** **<u>शिर्डी येथील स.नं. 171/12 मधील बसस्थानकाचे एक्स्टर्नल इलेक्ट्रीक व स्ट्रीट लाईट केबलकरीता आर.सी. पाईप टाकणे व चेंबर बांधकाम करणे.</u>**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.एस.जी.गायकवाड, राहाता |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 6,59,340/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.151, दि.28/05/2015 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 5,04,915/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 3,78,000/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 1,54,425/- (कमी) |
| निविदा टक्केवारी (+) (-) | 35% अधिक |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 23.42% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 2 महिने, दि.15/10/2015 अखेर |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 32,967/-. |
| ठेकेदार यांनी उपलब्ध झालेल्या जागेमध्ये आर.सी.सी. पाईप टाकणे व चेंबरचे बांधणेचे काम पूर्ण केलेले आहे. बसस्थानक इमारतीचे बांधकाम ठेकेदार यांचे मार्फत दरम्यानचे काळात परिसर विकास कामातील ट्रिमिक्स कॉक्रीट तसेच ड्रेनेज लाईनचे काम सुरु होते. सदर कामासाठी आणलेले मटेरीअल आर.सी.सी. पाईप लाईनचे काम करावयाचे ठिकाणी असल्यामुळे तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी भूखंडाचे पश्चिम बाजूकडील हद्द निश्चित न केल्यामुळे त्यालगतची आर.सी.सी लाईन टाकणेचे काम करणे. ठेकेदार यांना शक्य झाले नाही. दि.09/04/2016 रोजीचे पत्रान्वये विभाग नियंत्रक राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अहमदनगर विभाग यांनी पश्चिम बाजूकडील पूर्वीचे कम्पाऊंड भिंतीवर वीट बांधकामात कम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणेबाबत कळविले. त्यानुसार सदरचे काम ठेकेदार यांनी दि.10/05/2016 रोजी पूर्ण केलेले आहे. ठेकेदार यांनी सदर कामासाठी मूदतवाढ मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला असून त्याबाबत स्वतंत्र टिपणी सादर करणेत येत आहे. त्यामुळे विलंबापोटी होणारी दंडाची रक्कम रु.32,967/- मात्र सदरहू अंतिम बिलातून ठेकेदार यांचे डिपॉझिट खाती राखून ठेवता येईल. तरी ठेकेदार यांना अंतिम बिल अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**२. शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील पुर्वीचे स्वागत कक्ष जागेत शौचालय बांधकाम करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.एस.जी.गायकवाड, राहाता |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 9,70,192/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.77 (4), दि.16/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 8,47,018/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 7,34,961/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 1,23,174/- (कमी) |
| निविदा टक्केवारी (+) (-) | निविदा दरात |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 12.695% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, दि.21/06/2016 अखेर |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 48510/-. |
| ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण केले आहे. करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी 03 महिन्यांचा कालावधी (दि.12/06/2016 अखेर) होता. प्रत्यक्षात काम दि.21/07/2016 रोजी पूर्ण झालेले आहे. ठेकेदार यांनी सदर कामासाठी मूदतवाढ मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला असून त्याबाबत स्वतंत्र टिपणी सादर करणेत येत आहे. त्यामुळे सदरकामी झालेल्या विलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु.9,000/- ठेकेदार यांचे डिपॉझिट खाती राखून ठेवण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रक्कम रु.8,47,018/- मात्र मंजूर होऊन त्यापोटी देय्य उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**३. संस्थानचे जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळ्या जागेत शौचालय बांधकाम करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.एस.जी.गायकवाड, राहाता |

| | |
|---|---|
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 9,70,192/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.77 (5), दि.16/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 8,25,892/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 7,16,462/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 1,44,300/-(कमी) |
| निविदा टक्केवारी (+) (-) | निविदा दरात |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 14.887% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, दि.21/06/2016 अखेर |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 48510/-. |

ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण केले आहे. करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी 03 महिन्यांचा कालावधी (दि.12/06/2016 अखेर) होता. प्रत्यक्षात काम दि.21/07/2016 रोजी पूर्ण झालेले आहे. ठेकेदार यांनी सदर कामासाठी मूदतवाढ मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला असून त्याबाबत स्वतंत्र टिपणी सादर करणेत येत आहे. त्यामुळे सदरकामी झालेल्या विलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु.9,000/- ठेकेदार यांचे डिपॉझिट खाती राखून ठेवण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रक्कम रु.8,25,892/- मात्र मंजूर होऊन त्यापोटी देय्य उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**४. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (500 खोल्या) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पूर्व बाजुने मोकळया जागेत शौचालय बांधकाम करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 9,70,192/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.77 (6), दि.16/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 8,78,557/-. |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 7,55,953/-. |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 91,635/- (कमी) |
| निविदा टक्केवारी (+) (-) | निविदा दरात |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 9.445% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, दि.21/06/2016 अखेर |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 48510/-. |

ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण केले आहे. करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी 03 महिन्यांचा कालावधी (दि.12/06/2016 अखेर) होता. प्रत्यक्षात काम दि.21/07/2016 रोजी पूर्ण झालेले आहे. ठेकेदार यांनी सदर कामासाठी मूदतवाढ मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला असून त्याबाबत स्वतंत्र टिपणी सादर करणेत येत आहे. त्यामुळे सदरकामी झालेल्या विलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु.9,000/- ठेकेदार यांचे डिपॉझिट खाती राखून ठेवण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रक्कम रु.8,78,557/- मात्र मंजूर होऊन त्यापोटी देय्य उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**५. सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर साईभक्त व नागरिकांकरीता वाढिव शौचालयांचे बांधकाम करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री. निखिल अजित गुजराथी, कोपरगाव. |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 7,87,050/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.77 (14), दि.16/02/2016. |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 5,62,949/-. |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 3,97,800/-. |

| | |
|---|---|
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 2,24,101/- (कमी). |
| निविदा टक्केवारी (+) (-) | 1 % कमी. |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 28.47 % कमी. |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, दि.15/06/2016 अखेर |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 39,353/-. |
| ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण केले आहे. करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी 03 महिन्यांचा कालावधी (दि.15/06/2016 अखेर) होता. प्रत्यक्षात काम दि.02/07/2016 रोजी पूर्ण झालेले आहे. सदरकामी झालेल्या विलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु.5,100/- ठेकेदार यांचे देयकातून कपात करण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रक्कम रु.5,62,949/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**६. <u>मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. 87, 88 मध्ये साई प्रसादालयातील कर्मचा-याचे दुचाकी वाहनांकरीता पार्किंग शेड तयार करणेबाबत.</u>**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.एम.बी. शेख, अहमदनगर |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 8,88,083/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.03 (04), दि.02/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 7,65,374/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 6,87,523/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 1,22,709/- (कमी) |
| निविदा टक्केवारी (+) (-) | 9.53 % कमी |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 13.817% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 04 महिने, दि.14/10/2016 अखेर |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 44,404/- |
| ठेकेदार यांनी उपरोक्त काम विहीत मूदतीत पूर्ण केले आहे. तरी त्यांचे अंतिम बिल रक्कम रु.7,65,374/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**७. <u>श्री साईनाथ रुग्णालय इमारतीचे दक्षिण बाजुची कंपाऊंड भिंत बांधकाम करणे</u>**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.एम.बी. शेख, अहमदनगर |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 9,00,568/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.03, दि.02/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 3,73,596/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 2,80,000/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 5,26,972/- कमी |
| निविदा टक्केवारी (+) (-) | 8.66% कमी |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 58.51% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 04 महिने, दि.21/10/2016 महिने, दि.14/10/2016 अखेर |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 18,845/- |
| ठेकेदार यांनी दि.06/10/2016 रोजी काम पूर्ण केलेले आहे. सदरचे कामातील कामातील कंपाउंड बांधकामाची लांबी तसेच बांधकाम प्लस्टर चेनलिंग फेन्सिग याबाबीचे परिमाणात बचत झाल्याने कामाची रक्कम कमी झाली आहे. तरी ठेकेदार यांना अंतिम बिल रु3,73,596/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**८. श्री साईनाथ रुग्णालय इमारतीचे आतिल भागाचे रंगकाम करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.डी.बी. फोपसे, वैजापूर |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 28,13,781/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.77 (07), दि.16/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 27,92,379/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 24,75,380/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 21,402/- कमी |
| निविदा टक्केवारी (+) (-) | 7.21% कमी |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 0.76% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, दि.12/09/2016 |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 1,40,689/- |
| ठेकेदार यांनी दि.09/09/2016 रोजी काम पूर्ण केले आहे. तरी अंतिम बिल रु.27,92,379/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**९. साई आश्रमभक्तनिवास येथे ॲम्फीथिएटरच्या पूर्वबाजुकडील मोकळ्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | ए.एस. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 6,69,987/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.469, दि.10/11/2015 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 5,27,141/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 3,95,000/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 1,42,846/- कमी |
| निविदा टक्केवारी (+) (-) | 24.19% कमी |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 21.320% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 05 महिने, (दि.02/02/2016 ते दि.01/07/2016) |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 33,500/- |
| ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण केले आहे. करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी 05 महिन्यांचा कालावधी दि.01/07/2016 अखेर होता. प्रत्यक्षात काम दि.20/09/2016 रोजी पूर्ण झालेले आहे. सदरकामी झालेल्या विलंबानुसार होणारी दंडाचीरक्कम रु.33,500/- ठेकेदार यांचे देयकातून कपात करण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रक्कम रु.5,27,141/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**१०. संस्थानचे शैक्षणिक संकुल इमारतींचे आतिल बाजुने रंगकाम करणे**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.अतुल विठ्ठल चव्हाण, अहमदनगर |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 14,05,569/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.470, दि.10/11/2015 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 13,65,474/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 10,08,147/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 40,095/- कमी |
| निविदा टक्केवारी (+) (-) | 17.77% कमी |

| | |
|---|---|
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 2.85% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ०3 महिने दि.14/04/2016 ते दि.13/07/2016 |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 70,278/- |
| ठेकेदार श्री. अतुल विठ्ठल चव्हाण, अमदनगर यांनी दि.30/11/2016 अखेर सदरचे रंगकाम पूर्ण केले आहे. करीता विलंबाचे कालावधीत दि.14/07/2016 ते दि.30/11/2016 निविदा शर्तींनुसार ठेकेदार यांना एकूण 140 दिवसांसाठी रु.300/- प्रतिदिन दराने रक्कम रु.42,000/- ठेकेदारयांचे बिलांतूर कपात करण्यात आली आहे. तरी ठेकेदार यांना अंतिम बिल रु13,65,474/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**११. <u>प्रसाद लाडू विक्री कांऊटरसाठी चार बंदिस्तअॅल्युमिनीअम केबीन्स व कॉम्प्युटर टेबल तयार करणे.</u>**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.अतुल विठ्ठल चव्हाण, अहमदनगर |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 14,05,569/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.470, दि.10/11/2015 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 13,65,474/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 10,08,147/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 40,095/- कमी |
| निविदा टक्केवारी (+) (-) | 17.77% कमी |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 2.85% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ०3 महिने दि.14/04/2016 ते दि.13/07/2016 |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 70,278/- |
| ठेकेदार श्री. तान्हाजी रंगनाथ मोरे,शिर्डी यांनी दि. 16/01/2016 अखेर अॅल्युमिनीअम पार्टीशनमध्ये कॅबीन व कॉम्प्युटर टेबल तयार करणेचे काम पूर्ण केले आहे. सदरचे काम विलंबाने पूर्ण केले असल्यामुळे विलंबाचे कालावधीसाठी निविदा शर्तीनुसार ठेकेदार यांना एकूण 212 दिवसांसाठी रु.200/-प्रतिदिन दराने होणारी दंडाची रक्कम रु.42,400/- मात्र सदरहू अंतिम कपात करण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रु.4,15,962/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**१२. श्री साई प्रसादालयाचे पूर्वेकडील कंपाउड भिंतीची उंची वाढविणे बाबत**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | मे. जय डेव्हलपर्स, शिर्डी |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 8,45,399/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र. ०3 (03) दि. 02/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 7,03,849/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 5,70,960/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 1,41,550/- |
| निविदा टक्केवारी (+) (-) | 5.50% कमी |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 16.743 कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 05 महिने दि.13/11/2016 |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 42,270/- |
| ठेकेदार मे. जय डेव्हलपर्स, शिर्डी यांनी दि.13/01/2017 अखेर सदरचे काम मूदतीत पूर्ण केले आहे. तरी ठेकेदार यांना अंतीम बिल रु7,03,849/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**१३. श्री साईबाबा समाधी मंदिर परिसराचे महाव्दारावर सुरक्षा मार्चे उभारणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | मे. जय डेव्हलपर्स, शिर्डी |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 8,37,000/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र. 418 (02) दि. 14/07/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 8,37,000/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 279,000/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | ---- |
| निविदा टक्केवारी (+) (-) | आयटम रेट |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | ---- |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 04 महिने दि.30/01/2017 |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 41,850/- |
| ठेकेदार मे. जय डेव्हलपर्स, शिर्डी यांनी दि.13/01/2017 अखेर सदरचे काम मूदतीत पूर्ण केले आहे. तरी ठेकेदार यांना अंतीम बिल रु.8,37,000/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**१४. श्री साईनाथ रुग्णालयाचे इमातींना ॲल्युमिनीअम व स्लायडींग विंडो बदलणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | ॲल्युमिना कन्सेप्टस, नाशिक |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 16,66,400/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.584 (2) दि.28/05/2015 |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 16,59,223/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 10,50,666/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 7,177/- (कमी) |
| निविदा टक्केवारी (+) (-) | 20% कमी |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 0.43% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने दि.21/01/2017 अखेर |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 32,967/- |
| ठेकेदार मे ॲल्युमिन कन्सेप्टस, नाशिक यांनी मूदतीत काम पूर्ण केले असून झालेल्या कामाचे अंतिम बिल सादर केले आहे. तरी ठेकेदार यांना अंतिम बिल रु.16,59,223/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**१५. श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कुलमध्ये लॉनचे पुर्वेस पेव्हिंग ब्लॉक बसविणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | अभिषेक कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद. |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | 3,38,851/-. |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.733 (1), दि.09/10/2016. |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | 2,86,727/-. |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | 2,15,000/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | 52,124/- कमी |
| निविदा टक्केवारी (+) (-) | 22.51% कमी |
| कमी अथवा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | 15.38% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, (दि.01/03/2017 अखेर) |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | 16,950/- |

| |
|---|
| ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे व विहीत मुदतीत काम पूर्ण केले आहे. तरी ठेकेदार अभिषेक कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे अंतिम बिल रु2,86,727/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. |

प्रस्ताव: तरी उपरोक्तप्रमाणे पूर्ण झालेल्या कामांची अंतीम बिले अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या बांधकाम ठेकेदारांच्या अंतीम बीलाच्या रकमेचा समावेश दिसून येत नाही, यामुळे बांधकाम ठेकेदारांना अदा करावयाच्या अंतीम बीलांची रक्कम नमुद करणेत येऊन, सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२** **कनिष्ठ महाविद्यालयातील व्यासपीठ (फलाट) तयार करणेकामी प्लायवूड व रंगमटेरीयल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:** अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:** सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे अंतर्गत लेखा परिक्षक यांचे प्रतिनिधींनी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाची पहाणी केली असता कनिष्ठ महाविद्यालयाकडील प्रत्येक वर्गामध्ये शिक्षकांचे शेवटच्या बाकावरील विद्यार्थांपर्यंत लक्ष जावे यासाठी व्यासपीठ **(**फलाट**)** तयार करणेस सूचना केली आहे. त्यानुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचे दि.०३/०३/२०१७ रोजीचे पत्रानुसार इकडील विभागास फलाट तयार करणेस कळविले आहे. याकामी मेकॅनिकल विभागामार्फत १० फुट लांब व ४ फुट रुंद व ९ इंच उंच साईजची एम.एस. स्क्वेअर पाईपची फ्रेम बवून घ्यावी लागेल. सदरहू फ्रेम बनवणेसाठी रु.३९**,**०००/- मात्र खर्च अपेक्षित असल्याचे मेकॅलिकल विभागामार्फत कळविण्यात आले आहे. सदरहू फ्रेमवर इकडील विभागामार्फत १८ एम एम जाडीचे कमर्शिअल प्लायवूड बसवावे लागणार आहेत.

**प्रस्ताव:** उपरोक्त विषयांकीतकामी खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | मटेरीअलचा तपशिल | परिमाण/ एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | १८ एम एम कर्मशिलअल प्लायवूड साईज- ८'X ४' | २४ नग | २४००/- | ५७,६००/- |
| ०२ | ऑईल पेंट | ३० लिटर | २१०/- | ६,३००/- |
| ०३ | टरपेन ऑईल | १० लिटर | ८०/- | ८००/- |
| ०४ | वुड प्रायमर | २० लिटर | १५५/- | ३,१००/- |
| ०५ | एम.एस. स्वेअर पाईप साईज- ४०X४०X३एम एम | ७५० फुट | ५२/- | ३९,०००/- |
| | | | **एकूण रुपये** | **१,०६,८००/-** |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे सदरहुकामी येणारे रु.१**,**०६**,**८००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी व सदरचे कामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून मटेरीअल खरेदी करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयातील व्यासपीठ (फलाट) तयार करणेकामी आवश्यक असलेले प्लायवूड व रंगमटेरीयल विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेत येऊन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,०६,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३** **जुनी प्रसादालय इमारत साईभक्तांचे वापराकरीता उपलब्ध करुन देणेसाठी त्यामध्ये आवश्यक फेरबदल करणे व नुतनीकरण करणेबाबतचा निर्णय निरस्त होणेबाबत.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम, २००४ मधिल तरतुद:** अधिनियमाच्या कलम २१ पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :**

१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.१९१ खालीलप्रमाणे झाला आहे.

*“..यावर सविस्तर चर्चा होऊन, जुनी प्रसादालय इमारत साईभक्तांचे वापराकरीता उपलब्ध करुन देणेसाठी त्यामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक फेरबदल व नुतनीकरण करणेस तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.”*

२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.२४१खालीलप्रमाणे झाला आहे.

*“.. यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सोयीसाठी जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या जुन्या इमारती काढून त्या ठिकाणी नविन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणेस मान्यता देण्यात आली. याकामी आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांचेकडून नियोजित इमारतींचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. तसेच जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या इमारतींमध्ये साईभक्तांसाठी चालविण्यात येणारे विविध सेवा-सुविधांचे काऊंटर्स योग्य जागेची निश्चिती करणेत येऊन, इतरत्र स्थलांतरीत करण्यात यावे व या जुन्या इमारती पाडणेसाठी (Demotition) प्रथमत: स्वतंत्र निविदा मागवण्यिात याव्या, असे ठरले.”*

**प्रस्तावना:** मंदिर परिसराचे उत्तरेकडील भागातील संस्थानची जुनी प्रसादालय इमारत साईभक्तांनी फ्रि टाईम दर्शन कार्ड घेतलेनंतर ठरलेल्या वेळी दर्शन रांगेत प्रवेश करणेपुर्वी त्यांना प्रतिक्षा करता यावी याकरिता पहिल्या टप्प्यात जुने प्रसादालय इमारतीचे मुख्य हॉलचे नूतनीकरण करणेस तसेच त्यासाठी तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.१,००,१०,३८९/- मात्र अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.१९१ अन्वये वरीलप्रमाणे निर्णय झाला आहे. मात्र त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.२४१ अन्वये जून्या प्रसादालय इमारती काढून त्या ठिकाणी दर्शनरांग इमारत बांधकामास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१९१ निरस्त करणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव:** तरी जून्या प्रसादालय इमारती काढून त्या ठिकाणी दर्शनरांग इमारत बांधकामास मान्यता देण्यात आलेली असल्यामुळे विषयांकीत काम रद्द करून त्याबाबत झालेला निर्णय क्र.१९१ दि.०९/०३/२०१७ निरस्त करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.०१ व ०२ या जुन्या इमारती काढुन त्या ठिकाणी साईभक्तांचे सोयीसाठी दर्शनरांग इमारतीचे बांधकाम करणेस मान्यता मिळालेली असल्यामुळे यापुर्वी व्यवस्थापन समितीचे दि.०९.०३.२०१७ रोजीचे सभेमध्ये जुनी प्रसादालय इमारत साईभक्तांचे वापराकरीता उपलब्ध करुन देणेसाठी त्यामध्ये आवश्यक फेरबदल करणे व नुतनीकरण करणेबाबत संमत झालेला निर्णय क्र.१९१ निरस्त करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४** **संस्थान माहितीकेंद्र चेन्नई, सिकंदराबाद व बंगलोर या ठिकाणी संस्थान प्रकाशने (साहित्य) पाठविणेसाठी सवलतीचे दर मिळणेकामी वाहतूक कंपन्यांकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणे.**

**प्रस्ताव–** **अधिनियम:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत. कलम नं.१७ (२) 'ठ' मध्ये खालील प्रकारे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** मा.व्यवस्थापन समिती दि.१४.०६.२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.३२३

**प्रस्ताविक:-** संस्थानव्दारे माहिती व सुविधा केंद्र सिकंदराबाद, चेन्नई व बंगलोर येथे सुरु करण्यात आलेले आहेत. तेथे पुस्तके, फोटो, सी.डी. व डायरी-कॅलेंडर्स या संस्थान प्रकाशित प्रकाशनांची विक्री केली जाते. तसेच ऑनलाईन रुम बुकींग देणगी व आरती-दर्शन यांची सुविधा पुरवली जाते.

सन २०१६-२०१७ मध्ये संस्थान प्रकाशित पुस्तके शिर्डी कार्यालयाकडून घाटगे पा. ट्रान्सपोर्ट, शाखा. कोपरगांव या वाहतूक कंपनीचा दर मागील वर्षी दरपत्रके मागवून मान्य करण्यात आलेला होता. सदरचा तपशिल खालील प्रमाणे,

| अ.नं. | घाटगे पा. ट्रान्सपोर्ट कं. शाखा. कोपरगांव | मान्य झालेला दर (प्रती किलो प्रमाणे) |
|---|---|---|
| ०१ | सिकंदराबाद | **४.५०** |
| ०२ | चेन्नई | **५.५०** |
| ०३ | बंगलोर | **५.४५** |

उपरोक्त प्रमाणे मा. व्यवस्थापन समिती दि.१४.०६.२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.३२३ अन्वये मे. घाटगे पा.ट्रान्सपोर्ट लि., शाखा. कोपरगांव यांना सन-२०१६-२०१७ साठी एसएसएस/ वशी/ प्रकाशने /२५८७/२०१६ दि.२४.०८.२०१६ रोजी कार्यादेश पारित करण्यात आलेला होता. मागिल वर्षात रु.२३,१३०/- इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. माहे मार्च-२०१६ मध्ये ०३ माहितीकेंद्र येथे सर्व प्रकारची पुस्तके पाठविलेली होती, त्यामुळे सदर पुस्तके संपूर्ण वर्षभर उपलब्ध होती. त्यामुळे सन-२०१६ -२०१७ मध्ये खर्च तपशिल कमी दिसत आहे.

**विभागाची मागणी:-** सन २०१७-२०१८ साठी ०३ माहितीकेंद्र येथे संस्थान प्रकाशित साहीत्यांचा साठा संपत आलेला आहे. चालू वर्षभरात श्री साई समाधी शताब्दी वर्ष सुरुवात असल्याने पुस्तकांची मागणी वाढणार आहे. करिता साहित्य पाठविणेकामी विहित पध्दतीने दरपत्रके मागविणे आवश्यक आहे.

**संस्थानचे अधिनियम/ठराव यानुसार छान्नी, शासन निर्देश, तांत्रिक कायदेशीर व आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** संस्थानच्या विषयांकित कामासाठी खर्च होणार आहे. सदर साहित्य (पुस्तके,फोटो, सीडी, व डायरी-कॅलेंडर्स) भक्तांना उपलब्ध करुन झालेला खर्च वसूल होईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्त संस्थानच्या विषयांकीत कामासाठी सन २०१७-२०१८ साठीचे पुस्तके/ फोटो व इतर साहित्य ०३ माहितीकेंद्रावर येथे पाठविणे, कोपरगांव, सिन्नर व अहमदनगर येथील वाहतूक कंपन्यांचे (ट्रान्सपोर्ट) दरपत्रके मागणी करणेस, तसेच प्राप्त होणारे दरपत्रके उघडणेस, आणि निम्नतम दर देऊ केलेल्या दरधारकांस कार्यादेश पारित करणेस व येणा-या अंदाजे रु. १,२५,०००/- खर्चास मान्यता मिळणेकामी सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.२९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान माहितीकेंद्र चेन्नई, सिकंदराबाद व बंगलोर या ठिकाणी संस्थान प्रकाशने (साहित्य) पाठविणेसाठी सवलतीचे दर मिळणेकामी वाहतूक कंपन्यांकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१५** **श्री सत्यनारायण व भक्त अभिषेक पुजेची ऑनलाईन तिकीट बुकींग सुविधा सुरु करणे.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरत प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** संस्थानमार्फत दैनंदिन शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना श्रीसत्यनारायण पूजा करण्याची सुविधा श्रीशनि मंदिराचे मागील श्रीसाईसत्यव्रत पूजा दालनामध्ये व भक्त अभिषेक पूजा श्रीसाईसत्यव्रत पूजेच्या दालनाचेवरील हॉलमध्ये करण्याची सुविधा देण्यात येते. याकरीता संस्थानचे देणगी कार्यालयामध्ये एक दिवस अगोदर दुपारी २.०० वाजेनंतर प्रत्येक जोडप्यास श्रीसत्यनारायण पूजेकरीता रु.१००/- व भक्त अभिषेक पूजेकरीता रु.१०१/- पैसे भरुन तिकीट देण्यात येते. तसेच पूजेच्या वेळी दिलेल्या बॅचला भक्तांना फक्त आपले तिकीट दाखवुन पुजेला बसविण्यात येते. पूजेचे सर्व साहित्य संस्थानमार्फत पुरविण्यात येते . श्रीसत्यनारायण पूजा झालेनंतर पूजेला बसलेल्या व्यक्तीस एका तिकीटावर १ श्रीफळ व अंदाजे ५००ग्रॅम शिराप्रसाद देण्यात येतो. तसेच भक्त अभिषेक पूजेच्या नंतर भक्तांना एका तिकीटावर १ प्रसादलाडू पाकीट देण्यात येते.

**प्रस्ताव-** गुरुवार, दि.०९.०३.२०१७ रोजी मा.अध्यक्ष साहेब यांनी श्रीसत्यनारायण पूजा व अभिषेक पूजेच्या तिकीटांची बुकींग ऑनलाईन करणेत यावी अशा प्रकारच्या सुचना केल्या आहेत.

**विभागाचे मत/ अभिप्राय-** श्रीसत्यनारायण पूजेची व भक्त अभिषेक पूजेची तिकीटे सध्या संस्थानचे देणगी कार्यालयातुन घेण्याची सुविधा आहे. दररोज भक्त अभिषेक पूजेच्या व श्रीसत्यनारायण पूजेच्या ०२ बॅचेस सकाळी ७ ते ८ पहिली बॅच व सकाळी ९ ते १० दुसरी बॅच नियमीतपणे असतात. परंतु, साईभक्तांचे गर्दीच्या

कालावधीत भक्तांची मागणी पाहता देणगी कार्यालयामार्फत सत्यनारायण पूजेच्या बॅचमध्ये वाढ करुन ११ ते १२ यावेळेत तिसरी बॅच घेण्यात येते, या बॅचमध्ये बसणा-या साईभक्तांना श्रींचे आरती करता येत नाही. त्याचप्रमाणे आणखी गर्दी वाढल्यास प्रत्येक १तासाचे कालांतराने दुपारी १ ते २ चौथी, दुपारी ३ ते ४ पाचवी अशा बॅचेस देण्यात येतात. त्याचप्रमाणे प्रत्येक श्रावण महिन्यात दररोज सत्यनारायण पूजेच्या ६बॅचचे नियोजन करण्यात येते. अशावेळी मंदिर विभागाकडे दैनंदिन सत्यनारायणपूजेकरीता नेमलेले कर्मचारी यांची ड्युटी सकाळी ६ ते दुपारी २ अशी असते. त्यामुळे दुपारी २ नंतर होणा-या प्रत्येक बॅचकरीता इतर पॉईंटवरील कर्मचारी नेमुन उर्वरित बॅचेसच्या पूजा करण्यात येतात. तसेच गर्दीचे कालावधीत समाधी मंदिरामध्येही गर्दी असते अशा वेळी ड्युटीवरील पुजारी/ चोपदार/ मदतनीस यांनाही पुजेचे नियोजनाकरीता पाठवावे लागते. त्यामुळे समाधी मंदिरातील कर्मचारी संख्या अपुरी पडते. तसेच सध्या असलेल्या भक्त अभिषेक हॉलमध्ये आरतीकरीता भक्त बसविण्यात येतात. त्याचप्रमाणे भक्त अभिषेकाच्या पूजेकरीता बॅचेस भरत नाही. त्यामुळे दैनंदिन भक्त अभिषेकाच्या फक्त ०२ बॅचेस ठेवणेस मान्यता असावी.

मा.अध्यक्ष महोदय यांनी केलेल्या सुचनेनुसार श्रीसत्यनारायण व अभिषेक पूजेची तिकीटांची ऑनलाईन बुकींग करण्याची सुविधा देणेबाबत सुचना आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे नियोजन करणेस मान्यता असावी.

१) श्रीसत्यनारायण व भक्त अभिषेक पूजेची तिकीटे देणगी कार्यालयाप्रमाणे संस्थानचे संकेतस्थळावरुन ऑनलाईन पेमेंट करुन साईभक्तांना तिकीट खरेदीची सुविधा माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत सुरु करणेस मान्यता असावी.

२) श्रीसत्यनारायण पूजेमध्ये सहभाग घेणारे ग्रामस्थ हे प्रत्येक पौर्णिमा, महत्वाचे सण (स्थानिक उत्सव), श्रावणमास या दिवशी संख्या अधिक असते त्यामुळे श्रीसत्यनारायण पूजेची तिकीटे विक्री करतांना या गोष्टीचा विचार करता देणगी कार्यालयातुन ५०% तिकीट विक्री व्हावी व ऑनलाईन ५०% तिकीट विक्री व्हावी तसेच इतर वेळेस ऑनलाईन ८०% व देणगी कार्यालयातुन २०% आक्षीत ठेवावे, असे नम्र मत आहे

३) दररोज ऑनलाईन व देणगी काऊंटरवरुन श्रीसत्यनारायण पुजेच्या ०५ बॅचेसचे व भक्त अभिषेक पूजेची फक्त ०२ बॅचेसमध्ये तिकीट विक्रीची व्यवस्था करणेस मान्यता असावी.

४) ऑनलाईन तिकीट विक्रीमुळे अभिषेक व सत्यनारायण पूजा करणारे साईभक्तांचे प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मंदिर विभागामार्फत दररोज ०५ बॅचेसचे नियोजन करणेस व त्यासाठी लागणारे अतिरीक्त साहित्य खरेदी खर्चास तसेच दररोज लागणारे अतिरीक्त पुजारी व अकुशल (आऊट सोर्सिंग) कर्मचारी कामगार विभागामार्फत मंदिर विभागास मिळणेस मान्यता असावी.

५) श्रीसत्यनारायण पूजेनंतर साईभक्तांना प्रत्येक तिकीटावर ०१ श्रीफळ व अंदाजे ४५०-५००ग्रॅम शिराप्रसाद देण्यात येतो.

६) तसेच भक्त अभिषेक पूजेनंतर प्रत्येक साईभक्तास संस्थानचे ०३ लाडू असलेले ०१लाडू पाकीट देण्यात येते.

सबब उपरोक्तप्रमाणे नियोजन करुन दररोज श्रीसत्यनारायण पुजेचे ०५ बॅचमध्ये व भक्त अभिषेक पूजेचे ०२ बॅचेसमध्ये ऑनलाईन तिकीटे खरेदी करणेची सुविधा सुरु करणेकामी व त्यामध्ये पौर्णिमा, महत्वाचे सण (स्थानिक उत्सव), श्रावणमास या दिवशी संख्या श्रीसत्यनारायण पूजेची तिकीटे विक्री देणगी कार्यालयातुन ५०% व ऑनलाईन ५०% तिकीट विक्री व्हावी तसेच इतर दिवशी ऑनलाईन ८०% व देणगी कार्यालयातुन २०% आरक्षीत करणेस मान्यता असावी. तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री सत्यनारायण व भक्त अभिषेक पुजेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ऑनलाईन तिकीट बुकींग सुविधा सुरु करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **संस्थानचे सर्व निवासस्थाने व प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी Wi-Fi सुविधा उपलब्ध करुन देणेकामी M/s Swift Mail Communications Ltd., Noida यांनी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम 2004 मधील तरतुद:-** कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९.०९.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६७५.

**प्रास्ताविक:-** शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना त्यांचे मोबाईलव्दारे मोबाईलॲप वापरुन विविध सुविधांचा लाभ सुलभतेने घेता यावा यासाठी त्यांना इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देणेकामी शिरडी येथे विविध ठिकाणी Wi-fi सुविधा (Royalty Donation Basis) वर उपलब्ध करुन देणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९.०९.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६७५ नुसार संस्थानचे विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता घेण्यात आलेली होती. मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये दि.१५.११.२०१६ ते दि.२३.०२.२०१७ या कालावधीमध्ये याकामी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. उपरोक्त दि.२४.०२.२०१७ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये विविध निविदाधारक/पुरवठाधारक यांचेकडुन सदरकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांचे तांत्रिक निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दि.25.02.2017 रोजीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या होत्या. पात्र निविदाधारक/पुरवठाधारक यांचेकडून प्राप्त झालेल्या ई-निविदांचे व्यावसायिक निविदा उघडणेकामी माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि. 28/02/2017 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आलेली होती. त्यानुसार सदरच्या व्यावसायीक ई-निविदा दि. 28/02/2017 रोजी मा. खरेदी समितीचे समोर उघडणेत आलेल्या आलेल्या आहेत.

उघडण्यात आलेल्या व्यावसायीक ई-निविदांच्या तुलनात्मक तक्त्यानुसार प्रथम उच्चत्तम दरधारक M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी देऊ केलेली रक्कम (Royalty) हि सर्वाधिक असल्याने प्रक्रियेअंतर्गत सदर सुविधेसाठी त्यांना कार्यादेश देणे अपेक्षित होते. परंतू M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी त्यांचे दि.१० मार्च, २०१७ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी देऊ केलेली रक्कम ५ वर्षासाठीची प्रकल्प उभारणीचा खर्च असल्याचे कळविलेले आहे. परंतू निविदेमध्ये हि रक्कम प्रत्यक्षात त्यांचेकडून संस्थानला देय असलेली देणगी (Royalty) रक्कम असल्याचे नमुद केले आहे. ई-मेलमध्ये शेवटी त्यांनी सदरचा प्रकल्प उभारणेस निविदेतील अटी व शर्तीनुसार असमर्थता दर्शविलेली होती. सबब, दि. २३/०३/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे सर्व निविदाधारकांना दि. २७ मार्च, २०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सदर विषयावर चर्चा करण्याकरीता बोलविणेत आले होते. द्वितीय उच्चत्तम दरधारक M/S Ozone Networks Pvt. Ltd, Haryana यांना दि.२३ मार्च, २०१७ पाठविलेल्या ई-मेलला त्यांनी प्रतिसाद न दिल्याने कंपनीचे प्रतिनिधी श्री निखील पांडे यांना दुध्वनीद्वारे वारंवार संपर्क केला असता, त्यांनी कंपनीस सदरचे प्रकल्पामध्ये स्वारस्य नसल्याचे कळविलेले होते. तृतिय उच्चत्तम दरधारक M/S Reliance Jio Infocomn Ltd, यांनी त्यांचे निविदेमध्ये या सुविधेचा लाभ घेण्या-या प्रत्येक साईभक्तास फक्त २० MB Data मोफत देण्याचे नमुद केलेले आहे, परंतू मुळ निविदेमध्ये प्रत्येक साईभक्तास २५० MB Data प्रतिदिन देण्याचे नमुद केलेले आहे. तसेच प्रत्यक्ष चर्चेअंती याद्वारे संकलीत होणारी भक्तांची माहिती संस्थानला देण्यास स्पष्टपणे नकार दिलेला आहे. सबब निविदेतील अटी व शर्तीनुसार प्रकल्प उभारणीसाठी M/S Reliance Jio Infocomn Ltd, यांना कार्यादेश देता येणे शक्य नव्हते. सबब, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि. २३/०३/२०११ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये सदरकामी राबविण्यात आलेली ई-निविदा रद्द करण्यास मान्यता घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि. २७/०३/२०१७ रोजीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.——-अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

दि. २७ मार्च, २०१७ रोजी झालेल्या चर्चेदरम्यान M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी सदरकामी सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत विनंती केलेली होती. त्यानुसार त्यांनी दि. ०१/०४/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे सुधरीत प्रस्ताव संस्थानला सादर केलेला आहे. सदर प्रस्तावामध्ये त्यांनी पुढीलप्रमाणे सुविधा देऊ केलेल्या आहेत.

१. M/S Swift Mail Communications Ltd, Noida हे शिर्डी येथे संस्थान परिसरात विविध ८ ठिकाणी WiFi सुविधा उपलब्ध करुन देणेकरीता रु. १.२१ कोटी खर्च करुन आवश्यक यंत्रना ५ वर्षासाठी कार्यान्वीत करेल. सदरची ठिकाणे पुढीलप्रमाणे आहेत.

    १. साई प्रसादालय
    २. साई आश्रम
    ३. साईबाबा भक्तनिवासस्थान
    ४. साईप्रसाद निवासस्थान
    ५. द्वारावती व बगीचा
    ६. साई धर्मशाळा
    ७. साईबाबा रुग्णालय
    ८. साईनाथ रुग्णालय

२. साईबाबा संस्थान सदरकामी जागा व विज पुरवठा उपलब्ध करुन देईल.

३. साईबाबा संस्थानने याकामी निविदेमध्ये नमुद केलेली स्वामीत्व रकमेची अट शिथील करावी.

४. WiFi सुविधेअंतर्गत प्रत्येक युजरला (साईभक्त) प्रतिदिन 250 MB डेटा मोफत देण्यात येईल, त्यापुढील प्रत्येक 1 MB डेटासाठी रु. १०/- आकारण्यात येतील.

५. M/S Swift Mail Communications Ltd, Noida हे साईबाबा संस्थानला 20 MB ची स्वतंत्र लिंक ५ वर्ष वापरासाठी मोफत उपलब्ध करुन देतील.

६. या सुविधेचा लाभ घेतलेल्या सर्व साईभक्तांची माहिती संस्थानच्या मालकीची असेन.

७. साईबाबा संस्थान ने M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांना सदर सुविधेअंतर्गत लाभ घेणा-या साईभक्तांचे मोबाईलवर जाहीरात प्रसारीत करण्यास परवानगी द्यावी.

उपरोक्त प्रस्तावावर चर्चा करणेसाठी M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांचे प्रतिनीधींना दि.०४/०४/२०१७ रोजी बोलविण्यात आले होते. त्यानुसार M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांचे प्रतिनीधी श्री.राजेश्वर सिंग हे दि. ०४/०४/२०१७ रोजी शिर्डी येथे मा.अध्यक्ष सो. यांचेसमवेत चर्चेसाठी उपस्थित होते. सदर चर्चेदरम्यान मा.अध्यक्ष सो. यांनी M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांचे प्रस्तावामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा/बदल करण्याचे सुचित केले होते.

१. 250 MB डेटा वापर झालेनंतर पुढील प्रत्येक 1 MB डेटासाठी रु. १०/- ऐवजी रु. १/- मात्र आकारण्यात यावा.

२. M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी साईबाबा संस्थानला 20 MB ऐवजी 50 MB ची स्वतंत्र लिंक५ वर्ष वापरासाठी मोफत उपलब्ध करुन द्यावी.

३. संस्थानचे मागणीनुसार भविष्यात अतिरीक्त ठिकाणी Wi-Fi सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

४. M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी या अगोदर अशाप्रकारची सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या ५ संस्थांचे संपर्क नंबर व त्यांना दिलेली सुविधा समाधानकारक असल्याचा त्यांचा अभिप्राय संस्थानला सादर करावा.

M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी दि.०६.०४.२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे दि.०४.०४.२०१७ रोजी मा.अध्यक्ष सो. यांनी सुचविलेले सुधारणा/बदलांपैकी, संस्थानचे मागणीनुसार भविष्यात अतिरीक्त ठिकाणी Wi-Fi सुविधा उपलब्ध करुन देणे या व्यतिरीक्त सर्व मुद्यास सहमती दर्शविलेली आहे. तसेच त्यांनी ई-मेलमध्ये दि.०४.०४.२०१७ रोजी चर्चेदरम्यान मान्य केल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन येथे सदरची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे मान्य केलेले आहे.

M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार साईभक्तांना Wi-Fi सुविधा उपलब्ध करुन देणेकामी संस्थानला फक्त इमारतीचे टेरेसवर ५ फुट X ५ फुट जागा व 5 Amp विज जोडणी उपलब्ध करुन द्यावयाची आहे. अनुषंगिक साहित्याचा सर्व खर्च M/S Swift Mail Communications Ltd, Noida हे करणार आहेत. M/S Swift Mail Communications Ltd, Noida हे संस्थानला 50 MBPS ची इंटरनेटसाठीची लिंक ५ वर्षासाठी मोफत उपलब्ध करुन देणारआहेत. प्रकल्पाची उभारणी करणेस त्यांना साधारण ३ महिने कालावधी लागणार असल्याचे त्यांनी चर्चेदरम्यान नमुद केलेले आहे. सदरची सेवा ते ५ वर्ष चालु ठेवणार आहेत.

साईभक्तांना Wi-Fi सुविधा उपलब्ध करुन दिल्यास संस्थानमार्फत साईभक्तांसाठी उपलब्ध असलेल्या ऑनलाईन सोयी-सुविधांचा लाभ घेणे त्यांना अधिक सुकर होईल. तसेच भविष्यात प्रस्तावीत असलेली साई-व्हॅलेट हि सुविधा संस्थानमार्फत सुरु झालेनंतर साईभक्तांना संस्थानबरोबर खजगी दुकानांमध्येही कॅशलेस ट्रंझेक्शन करण्यास सुकर होईल. सदरबाबींमुळे साईभक्तांना रोख रक्कम बरोबर बाळगण्याची गरज राहणार नाही.

याकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदेस मिळालेला पुरवठाधारकांचा प्रतिसाद पाहेता, M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी सादर केलेला फेर-प्रस्ताव तांत्रिक व व्यावहारीकदृष्ट्या प्रथमदर्शनी सरस दिसुन येतो. सबब, M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी सादर केलेला फेर-प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी :** प्रास्ताविकेमध्ये नमुद केलेप्रमाणे शिर्डी येथे येणा-या साईभक्तांचे सोयीसाठी Wi-Fi सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी सादर केलेल्या फेर-

प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** शिर्डी येथे येणा-या साईभक्तांचे सोयीसाठी Wi-Fi सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी M/S Swift Mail Communications Ltd, Noida यांनी सादर केलेल्या फेर-प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे साईभक्तांचे सोयीसाठी संस्थानची सर्व निवासस्थाने व प्रसादालय परिसरात Wi-Fi सुविधा उपलब्ध करुन देणेकामी M/s Swift Mail Communications Ltd., Noida यांनी सादर केलेला प्रस्ताव स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७** **कार्यालयीन वापरासाठी 01 नग लॅपटॉप 01 नग आय पॅड व 02 नग कलर प्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रास्ताविक:** सद्यस्थितीत श्री साईबाबांचे समाधी शताब्दी वर्षासाठीचे विकास प्रकल्प तसेच इतर कामकाजासाठी अनेक वेळेस संस्थान तसेच मंत्रालय अशा विविध ठिकाणी बैठकीचे आयोजन करण्यात येत असते. सदर बैठकीमध्ये प्रकल्पाबाबतचे सादरीकरण संस्थान तसेच पुरवठाधारकांकडून करणेत येते. सदर सादरीकरणासाठी आयटी तसेच संबधीत विभागाकडे उपलब्ध असलेले लॅपटॉप हे ६ वर्षापुर्वी खरेदी केलेली असल्याने अनेक वेळेस सादरीकरणाच्यावेळी तांत्रिक अडचणी येतात, सबब सादरीकरण वेळेत होऊ शकत नाही. तसेच अनेक वेळेस वेगवेगळया कारणांसाठी काही कागदपत्रांचे व ईमेलचे प्रिंट कलरमध्ये काढणे आवश्यक असते, परंतु सद्यस्थितीत इकडील विभागाकडे अशाप्रकारचे प्रिंटर उपलब्ध नसल्याने अडचण निर्माण होते.
वेळोवेळी बैठकांमध्ये करावयाच्या सादरीकरणासाठी तसेच इतर कामकाजासाठी अद्यायावत तंत्रज्ञानाचा समावेश असलेले १ नग लॅपटॉप, १ नग आयपॅड व २ नग कलर लेसर प्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) उपलब्ध असल्यास, सदरचे कामकाज जलदगतीने होण्यास मदत होईल.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे १ नग लॅपटॉप, १ नग आय पॅड व २ नग कलर लेसर प्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) खालील नमुद तपशिलानुसार संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार खरेदी करता येईल , असे नम्र मत आहे.

| अ.नं. | तपशिल | दर | एकूण किंमत |
|---|---|---|---|
| 01 | **Laptop - No. 01**<br>HP Spectre 13, Model No. v 123 TU I, 7th Generation Intel Core i5 Process, Windows 10 pro, 8GB RAM, 256GB SDD, Intel HD Graphics 520, 13.3” (33.78cm) LED Backlit Full HD, (1080p) Display | 1,10,290 | 1,10,290/- + टॅक्स |
| 02 | **iPAD - No. 01**<br>Apple I-Pad Pro 12.9 Inch<br>Part Code: ML2N2HN/A<br>Apple iPadPro 12.9” Wifi + Cellular 128Gb : Colour ; Gold | 80,000 | 80,000/-+ टॅक्स |
| 03 | **Laser Jet wi-fi Printer - No. 02**<br>Laserjet pro CP1025, nw Color | 24,000 | 48,000/-+ टॅक्स |
| | एकुण रक्कम रुपये | | **2,38,290/-+ टॅक्स** |

**मागणी:** सद्यस्थितीत सुरु असलेल्या श्री साईबाबाचे समाधी शताब्दी वर्षाचे कामकाज तसेच इतरही कामकाजासाठी प्रस्ताविकेत नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे 01 नग लॅपटॉप, 01 नग आय पॅड व 02 नग कलर प्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. 2,38,290/-+ टॅक्स चे खर्चास मान्यता घेणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी हि विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** आर्थिक, प्रशासकीय व तांत्रिक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रस्ताविकेत नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे 01 नग लॅपटॉप, 01 नग आय पॅड व 02 नग कलर प्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. 2,38,290/-+ टॅक्स चे खर्चास मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.२९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यालयीन वापरासाठी ०१ नग लॅपटॉप, ०१नग आय पॅड व ०२ नग कलर प्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,३८,२९०/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **साईटेक प्रकल्पांतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेले संगणके व संगणकीय साहित्याचे OEM-AMC चे नुतनीकरण करणेकामीची निविदा प्रक्रिया रद्द करणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम 2004 मधील तरतुद:-** 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** 01. दि.07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र.799.
02. दि.16.08.2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र.529

**प्रास्ताविक:** मा.व्यवस्थापन समितीचे दि. 07/11/2009 रोजचे सभेतील निर्णय क्र. 799 अन्वये माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. प्रकल्प उभारणीसाठी करण्यात आलेल्या करारनाम्यातील मुद्दा क्रं. 3.02-08 नुसार प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व संगणके व संगणकीय साहित्यांची 60 महिने दुरुस्ती व देखभाल हि कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी पाहणे अपेक्षित आहे. त्यानुसार सदरचा कालावधी 31 जुलै 2016 रोजी संपुष्टात आलेला आहे.

आवक नं. 6293 दि. 08/07/2016 रोजीचे पत्रान्वये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी, प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या संगणके व संगणकीय साहित्यांची दुरुस्ती व देखभालीचा त्यांचा कालावधी 31-जुलै-2016 रोजी संपुष्टात येत असल्याने, संस्थानने याबाबत पर्यायी व्यवस्था करावी असे कळविलेले होते.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या संगणके व संगणकीय साहीत्यांचा आवाका पाहता इतक्या अल्पशा कालावधीमध्ये सदरकामी नविन निविदाधारक नेमणे अशक्य होते.

श्रीसाईभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली सुरळीत चालू राहाव्यात याकरिता संगणके व संगणकीय साहित्यांची OEM-AMC चे नुतनीकरण करणेकामी संस्थानचे विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. 16/08/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 529 अन्वये मान्यता घेण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन दि. 14/09/2016 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये ई-निविदा दि. 17/10/2016 ते दि. 27/10/2016 या कालावधीत प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेअंतर्गत पुढील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.न. | कंपनीचे नाव | दिनांक व आवक नंबर दिनांक |
|---|---|---|
| 1 | Skyline Computers, Pune | दि. 21/10/2016 आ.नं. 13514 |
| 2 | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik | दि. 25/10/2016 आ.नं. 13772 |
| 3 | R.D. Data Systems, Nashik | दि. 25/10/2016 आ.नं. 13773 |
| 4 | KJM Group System Solutions, Bhayander (E) | दि. 25/10/2016 आ.नं. 13774 |
| 5 | Computer Printer Garage, Navi Mumbai | दि. 25/10/2016 आ.नं. 13815 |
| 6 | Hi-Tech Solutions, Ahmednagar | दि. 25/10/2016 आ.नं. 13816 |

| | | |
|---|---|---|
| 7 | Minitek Systems (India) Pvt. Ltd., Nashik | दि. 25/10/2016 आ.नं. 13817 |
| 8 | Kommineni Infotech Pvt. Ltd., Hyderabad | दि. 25/10/2016 आ.नं. 13818 |

उपरोक्त प्राप्त पुरवठाधारकांच्या तांत्रिक ई-निविदा व बंद लिफाफे दि. 27/10/2016 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेपुढे उघडण्यात आलेल्या आहेत. ई-निविदेअंतर्गत वानीज्य निविदा उघडुन न्युन्नत्तम दरधारक निविदाधारकास कार्यादेश देणेकामी दि. 16/12/2016 रोजी अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभालीचा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कार्यकाल माहे एप्रिल 2017 अखेर संपष्टात येणार असल्याने सदरकामी नविन कंपनीची नेमणुक करणेकामी संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार ई-निविदा प्रक्रिया इकडील विभागामार्फत सुरु करणेत आलेली आहे. उपरोक्त नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभाल (साईटेक टप्पा-2) साठी नविन कंपनीची नेमणुक झालेनंतर सदर कंपनी साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत केलेल्या सर्व कार्यप्रणाली, संगणके व नेटवर्कचे व्यवस्थापन पाहणार आहे. OEM-AMC चे नुतनीकरण करणेकामी ई-निविदेअंतर्गत वाणिज्य ई-निविदा उघडुन न्युन्नत्तम दरधारकास कार्यादेश दिल्यास एकाच कामासाठी संस्थानला दोनदा खर्च होईल.

सबब, इकडील विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या OEM-AMC ची ई-निविदा प्रक्रिया थांबवुन, तसेच उपरोक्त नमुद केलेले पुरवठाधारकांचे टेंडर फि व ईएमडीचे डीडी त्यांना परत करता येतील, असे नम्र मत आहे.

**मागणी:-** साईटेक प्रकल्प टप्पा -2 साठी निविदा प्रक्रिया राबवुन नविन कंपनीची नेमणुक करणेची कार्यवाही संस्थानचे प्रचलीत पध्दतीनुसार चालु असल्याने या अगोदर मा. व्यवस्थापन समितीचे दि. 16/08/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 529 निर्देशान्वये इकडील विभागाकडुन चालु असलेली OEM-AMC निविदा प्रक्रिया रद्द होऊन पुरवठाधारकांचे टेंडर फि व ईएमडीचे डीडी त्यांना परत करणेसाठी मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यास मान्यता असावी, हि विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय:** साईटेक प्रकल्प टप्पा -2 साठी निविदा प्रक्रिया राबवुन नविन कंपनीची नेमणुक करणेची कार्यवाही संस्थानचे प्रचलीत पध्दतीनुसार चालु असल्याने या अगोदर मा. व्यवस्थापन समितीचे दि. 16/08/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.529 निर्देशान्वये इकडील विभागाकडुन चालु असलेली OEM-AMC निविदा प्रक्रिया रद्द होऊन पुरवठाधारकांचे टेंडर फि व ईएमडीचे डीडी त्यांना परत करणेसाठी मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, साईटेक प्रकल्प टप्पा- २ साठी निविदा प्रक्रिया राबवुन नविन कंपनीची नेमणुक करणेची कार्यवाही संस्थानचे प्रचलीत पध्दतीनुसार चालु असल्याने यापुर्वी व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५२९ अन्वये चालु असलेली OEM-AMC निविदा प्रक्रिया रद्द होऊन पुरवठाधारकांचे टेंडर फि व ईएमडीचे डीडी परत करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा संस्थानचे व्यायामशाळेकरीता नविन साहित्य खरेदी करणे व व्यायामशाळा अद्यावत करणे.**

**निर्णय क्र.२९६** सदरहू प्रस्ताव आयत्या वेळेच्या विषयांमध्ये सादर करण्यात येत असल्यामुळे याठिकाणी रद्द करणेत आला.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०** **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता नवीन संगणक संच, लॅपटॉप, टॅबलेट, एलसीडी प्रोजेक्टर व प्रिंटर्स खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव–** **सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम १७ (२ढ) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच,शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८/११/२०१५ च्या सभेतील निर्णय क्र.४३२ नुसार यामधील तांत्रिक बाबींवर माहिती तंत्रज्ञान विभागाचा अभिप्राय घेण्यात येऊन, सविस्तर फेरप्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

**प्रस्तावित:-** आपले श्री साईबाबा औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सध्या खालीलप्रमाणे ११ व्यवसायांच्या (ट्रेडच्या) २२ तुकडया कार्यरत आहेत. सदर ट्रेड हे केंद्र शासनाच्या कौशल्य विकास मंत्रालय अंतर्गत डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट ॲण्ड ट्रेनिंग (DGE&T)यांचे मान्यतेने व राज्य शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखाली चालविली जाते.

| अ.नं. | ट्रेड | प्रशिक्षण कालावधी | तुकडींची प्रशिक्षणार्थी क्षमता | | एकुण प्रशिक्षणार्थी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | | |
| ०१ | इलेक्ट्रीशियन | २ वर्षे | २१ | २१ | ४२ | |
| ०२ | फिटर | | २१ | २१ | ४२ | |
| ०३ | टर्नर | | १६ | १६ | ३२ | |
| ०४ | मोटर मेकॅनिक | | २१ | २१ | ४२ | |
| ०५ | मेकॅ.रेफ्रीजरेशन ॲण्ड एसी | | २६ | २६ | ५२ | |
| ०६ | मशिनिष्ट ग्राईंडर | | १६ | १६ | ३२ | |
| ०७ | टुल ॲण्ड डाय मेकर (जिग ॲण्ड फिक्चर) | | २१ | २१ | ४२ | |
| ०८ | इन्फॉरमेशन ॲण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टिम मेंटनन्स (ICTSM) | | २६ | २६ | ५२ | |
| | | | प्रथम पाळी | द्वितीय पाळी | | |
| ०९ | कॉम्पुटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रॅमर असिस्टंट (COPA) | | २६ | २६ | ५२ | ऑगस्ट- २०१६ एकुण प्रवेश ४१ |
| १० | वेल्डर | | २१ | २१ | ४२ | |
| ११ | ट्रॅक्टर मेकॅनिक | | २१ | २१ | ४२ | |
| | | एकुण | २३६ | २३६ | ४७२ | |

वरील ट्रेड व्यतिरीक्त संस्थेमध्ये महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या. (MKCL) यांचे MS-CIT हे संगणक अभ्यासक्रमाचे अभ्यासकेंद्र चालविले जाते. याकरीता देखील संगणक संचाची आवश्यकता आहे.

वरील ITI व्यवसायांमध्ये अ.क्र.८ व ९ हे व्यवसाय संगणकाशी थेट संबंधित अभ्यासक्रम आहेत.

वरील सर्व संगणक अभ्यासक्रमासाठी सध्या संस्थेकडे असलेल्या संगणक संचाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | संगणक तपशिल/मेक | संख्या | खरेदी/देणगी तारीख | सध्या स्थिती/ कार्यरत नादुरूस्त | | एकुण | शेरा /खरेदी किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | Wipro | ०१ | खरेदी २००४ | .... | ०१ | ०१ | ३२,१८९.०० |
| ०२ | L.G. | ०६ | देणगी २००५ | .... | ०६ | ०६ | १,०२,०००.०० |
| ०३ | Compaq | ०३ | देणगी २००६ | .... | ०३ | ०३ | १,०५,०००.०० |
| ०४ | Compaq | ०७ | देणगी २००७ | .... | ०७ | ०७ | १,४५,६००.०० |
| ०५ | H.C.L. | २३ | खरेदी २००७ | .... | २३ | २३ | ५,४३,२६१ .०० |
| ०६ | I.B.M.(Lenova) | ०१ | खरेदी २००७ | ०१ | .... | .... | २८,२०० |
| | **एकुण** | ४१ | | ०१ | ४० | ४० | ९,५६,२५०.०० |

वरीलप्रमाणे एकुण ४१ संगणकापैकी १५ संगणक सध्या कार्यरत असले तरी त्यांची क्षमता व स्पेसिफीकेशन सध्या नव्याने आलेल्या कार्यप्रणाली (Operating System) या सध्याच्या उपलब्ध जुन्या संगणकावर Match होत नाहीत किंवा Support करत नाहीत. त्यामुळे नव्याने समाविष्ट झालेले किंवा नविन

कार्यप्रणालीनंतरचे संगणक प्रशिक्षण आपण प्रशिक्षणर्थ्यांना देणे अशक्य होत आहे. तसेच सध्याच्या वरील संगणकांचे Standard life सहा वर्ष संपल्याने ते कालबाहयही झालेले आहेत.

ऑगस्ट २०१४ सत्रापासुन डी.जी.ई.टी., नवी दिल्ली यांनी संस्थेतील सर्व व्यवसायांसाठी एम्प्लॉयबीलीटी स्किल हा अनिवार्य विषय सुधारीत अभ्यासक्रमानुसार निश्चित केलेला आहे. त्यासाठी सर्व व्यवसायांच्या प्रशिक्षणार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणेकामी लेटेस्ट कॉन्फीग्रेशनचे २२ संगणक संचासह एक संगणक लॅबोरेटरी बनविणे अनिवार्य केलेले आहे. तसेच २०१४ च्या सुधारीत अभ्यासक्रमाणुसार कोपा ट्रेडसाठी १५ संगणक १ लॅपटॉप व २ टॅबलेट त्यांच्या संगणक लॅबसाठी समाविष्ट केले आहेत. तसेच शासकीय कामासाठी प्रशिक्षणार्थी/ पत्र व्यवहाराची माहिती नेणेकामी १ लॅपटॉप ऑफिसकरीता यांची माहिती व उपलब्ध साहित्याची एकत्रित स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | लॅब तपशिल | साहित्य | | | | | | | | निव्वळ आवश्यक साहित्य | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संगणक | | लॅपटॉप | | टॅब | | प्रिंटर | | संगणक | लॅपटॉप | टॅब | प्रिंटर |
| | | आवश्यक | उपलब्ध | आवश्यक | उपलब्ध | आवश्यक | उपलब्ध | आवश्यक | उपलब्ध | | | | |
| १ | एम्प्लायबीलीटी स्किल विषय व MS-CIT कक्ष एकत्रित | २७ | ०४ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | २७ | ०० | ०० | ०१ |
| २ | कॉम्पुटर ऑपरेटर अॅण्ड प्रोग्रामर असिस्टंट (COPA) ट्रेड | २३ | ०९ | ०१ | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | २३ | ०१ | ०० | ०२ |
| ३ | इन्फॉर्मेशन अॅण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टिम मेंटेनन्स (आयसीटीएसएम) | १५ | ०१ | ०१ | ०० | ०२ | ०० | ०४ | ०३ | १५ | ०१ | ०२ | ०४ |
| | एकुण | ६५ | १४ | ०२ | ०० | ०२ | ०० | ०७ | ०५ | ६५ | ०२ | ०२ | ०७ |

संस्थेतील सर्व व्यवसाय हे कौशल्यावर आधारीत प्रशिक्षण देण्याचे आहेत.त्यातील संकल्पना,कौशल्य, अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षणार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे दृष्टिने डीजीटल क्लासरुम संकल्पना अमंलात आणता येईल. त्यासाठी सर्व वर्ग खोल्यांमध्ये LCD प्रोजेक्टरची सुविधा करावी लागेल.

वरील सध्या सुधारीत अभ्यासक्रम मानकानुसार एकुण ५१ संगणक ३ लॅपटॉप व २ टॅबलेटची तसेच ४ प्रिंटर्सची आवश्यकता आहे. सध्या संस्थेत असलेले १५ संगणकास देखील दैनंदिन प्रात्यक्षिकासाठी कामासाठी वापरुन नादुरुस्त होणेची शक्यता नाकारता येत नाही.याकरीता ५१ संगणक ३ लॅपटॉप व २ टॅबलेटची तसेच ४ प्रिंटर्सची खरेदी करावी लागेल.दोन संगणक – परीक्षा व प्रवेश प्रक्रियेसाठी तपशिल व अंदाजे खर्च खालीलप्रमाणे यामध्ये लेटेस्ट तपशिल घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. मंजुरीअंती ई-टेंडर प्रक्रियेपुर्वी त्यामध्ये आवश्यकतेनुसार आवश्यक माहिती समाविष्ट करण्यात येईल.

| Sr.No. | Description | Qty. Req. | Appr. Rate | Appr.Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 01 | Make :- Lenova OR Dell Intel Core 13-processor (Dual Core,3MB Cache,3.40 GHz,w/ HD440 Graphics) Standard Power Supply, 4GB (1X2GB)1600MHz DDR3 (Non –ECC 500 GB, 3Sinch Serial ATA (7.200Rpm) Hard Drive No Optical Drive,Intel Core 13 Label 19" Square Monitor with LED Back Light<br>Intel Intergrated Graphics, USB Optical Mouse and Keyboard.<br>Window 8.1 Pro 64 bit with paper Licence.<br>3 Yr Next Business Day Onsite Service.19 Square | 56 Set | 36000/- | 20,16,000.00 |
| 02 | Laptop<br>Microsoft Window 10 Professional class | 03 Nos | 44000/- | 1,32,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 64-Bit desktop with system. Microsoft Window 7 Pro 64-Bit on.<br>Window 8.1 (with Window 7 loaded) will be acceptable with a free upgrade if Windows 10 is not yet available from Microsoft.<br>Intel Core 17-4712MQ (2.3GHz,6MB), Must support Virtualization.<br>8.0GB,1600MHz,with at least one (1) free slot for additional memory, expandable to 16.0GB.<br>Installed 512MB (non-shared memory)<br>15.4 Inch, WXGA.<br>1TB, 7200 RPM.<br>8X DVD +/-RW.<br>Four (4) USB v2.0 or v3.0 (**Minimum of one (1) of these ports must be USB v3.0).<br>One (1) HDMI v1.4 OR One (1) Display Port/Mini Display Port.<br>Integrated Gigabit Ethernet (10,100,1000), Wake on LAN.<br>1.0 Megapixels for Still Photos,9 Megapixies for Video Resolution, 30fps@720, Adobe, Flash compatible, Window 10/817 compatible,supports Skype for Business.<br>A/C adapter w/3' power cord.<br>Battery Life average 6 hrs.<br>3 Year,Next Business Day, On-Site. | | | |
| 03 | Tablet P.C.<br>10.1 Inch HD Multi-Touch Display.<br>NVIDIA Tegra 2 Dual Core Mobile Processor.<br>Android 3.0 Honeycomb.<br>NVIDIA GeForce GPU.<br>1GB DDR2 Memory.<br>32GB on board.<br>Micro SD memory card up to 32 GB.<br>802.11b/g/n Wireless(802.11n2.4GHz only)<br>Bluetooth 2.1+EDR.<br>Micro USB 2.0 Port,USB 2.0Pord,Micro HDMI Out<br>(support Dual Display)<br>5MP Rear Facing Camera with Auto Focus and single LED flash 2MP Front Facing Camera.<br>Sensor:G-Sensor,E-Compass,L-Sensor, Gyro-meter.<br>Rechargeble Lithium-ion polymer Battery.<br>Up to 8-hours battery life. | 02 Nos. | 15000/- | 30,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 04 | **LCD Projector:-** LCD projector (1024x768) having minimum 2800 Lumens brighness,aspect ratio-4, Resolution-1024x768,Contrast ratio-3000:1,with all necessary accessaries & having DLP technology, make Sony/ Epson/ Benq/ Dell/ LG/Toshiba/ Hitachi | 10 Nos. | 27000/- | 2,70,000.00 |
| 05 | PassbookPrinter make HP/ Canon/ Epson/ Samsung/Ricoh | 01 No. | 10000/- | 10,000.00 |
| 06 | USB Harddisk 1 TB Memory make Sony/ Samsung/Seggate | 03 Nos. | 3000/- | 9,000.00 |
| 07 | UPS 500 VA. Offline, Champion make | 56 Nos. | 500/- | 28,000.00 |
| | | | | **24,95,000.00** |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** वरील नमुद केलेले संगणक संच व साहित्या मध्ये अ.क्र.१ अन्वये खरेदीकामी ५६ संगणक संच नमुद करण्या त आले आहेत व १४ संगणके हे सुस्थितीत होते. परंतु संगणक व संगणकाचे साहित्य आयुष्यमान हे शासकिय परीपत्रकाप्रमाणे (मानक) सहा वर्ष असते. त्यानुसार आपणाकडे उपलब्ध असलेले संगणकाचे आयुष्य मान संपलेले आहे व सदरील १४ संगणक हे कधीही बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच आपणास अभ्यासक्रमिकेनुसार लेटेस्ट कॉन्फीग्रेशन संगणकाची आवश्यकता आहे. त्यामुळे ५६ + १४ = ७० संगणक खरेदी करावी लागणार आहे. त्यामुळे 14 संगणकाची रक्कम रु. ५,०४,०००/- ही एकुण रक्कमेमध्ये अधिक केली असता एकुण रक्क्म रु.२९,९९,000/- इतकी होईल. संगणक व संगणक साहित्य खरेदी करणेस अंदाजे रु. २९,९९,०००/- (रुपये एकोणतीस लाख नव्याण्णव हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदरील संगणक संच/साहित्य खरेदी विभागामार्फत विहीत प्रचलित पध्दतीने खरेदी करणेस सदर विषय मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेमध्ये सादर.

**निर्णय क्र.२९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षणार्थ्यांना सुधारीत अभ्यासक्रम मानकानुसार अद्ययावत संगणक प्रशिक्षण देणेकरीता प्रस्तवात नमुद केलेप्रमाणे नवीन संगणक संच, लॅपटॉप, टॅबलेट, एलसीडी प्रोजेक्टर, प्रिंटर्स खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रायार्य, आय.टी.आय.)

---

**विषय नं.२१** **साईप्रसाद इमारत नं.०२ मध्ये लाडू प्रसाद निर्मितीचे नवीन युनीट सुरु करणेसाठी मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये झालेला निर्णय निरस्त करणे.**

**प्रस्ताव–** **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ) -** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रास्ताविक-** श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद मिळावा या हेतूने उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार मंदिर दर्शन रांगेत साईभक्तांना श्रींचे दर्शनासाठी येणा-या दर्शनासाठी रांगेत उभे राहावे लागते व पुन्हा रांग लावुनच लाडु प्रसाद घ्यावा लागतो. यामध्ये भक्तांचा त्रास कमी व्हावा व त्यांना मोफत लाडु प्रसाद मिळावा याहेतुने दि.१५ ऑगस्ट २०१३ पासुन मोफत लाडु प्रसाद वाटप करणेस मान्यता देण्यात आली होती.

दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ होत गेल्याने भक्तांची लाडु प्रसाद मागणी वाढत गेली. तसेच एकाच ठिकाणी काऊंटर्स असल्याने व साईभक्तांस केवळ २ प्रसाद लाडु पाकीटे देण्यात येत असल्यामुळे साईभक्त पुन्हा-पुन्हा लाडु पाकीटे मिळविणेसाठी रांगेत उभे राहतात. त्यामुळे लांबच लांब रांगा लागतात व भक्तांची प्रंचड गर्दी होत असल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेत संदर्भ क्र.०१ अन्वये, "सध्या लाडूप्रसाद पाकिटे विक्रीसाठी एकाच ठिकाणी काऊंटर्स आहेत व एका साईभक्तांस फक्त २ लाडूप्रसाद पाकिटे देण्यात येतात. लाडु प्रसाद पाकीटे विक्री केंद्रावर साईभक्तांची प्रचंड प्रमाणात गर्दी होत असते. या ठिकाणी लाडु प्रसाद पाकीटे मिळणेसाठी भक्तांची गैरसोय होऊ नये, याकरीता संस्थानच्या इतर ठिकाणी लाडु प्रसाद विक्री केंद्रे (जसे-प्रसादालय व निवासस्थाने) सुरु करणेत यावीत व साईभक्त मागणी करतील

तेवढी लाडु प्रसाद पाकीटे त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत. त्याचबरोबर लाडु प्रसाद पाकीटांचा गैरवापर होऊ नये याकरीता दि.०१ जानेवारी २०१७ पासुन लाडु प्रसाद पाकीटाची किंमत रु.२५/- मात्र करणेत यावी, असे ठरले.

तसेच संदर्भ क्र.२ अन्वये, दि.२४ नोव्हेंबर २०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी संस्थानच्या विविध विभागांनी करावयाच्या कामकाजाबाबत पुढीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत. "लाडु विक्री केंद्रे वाढविणे, उदी वाटपाचे जागी लाडु विक्री सुरु करणे, प्रसादालयासह सर्व भक्तनिवास येथे लाडु विक्री केंद्रे सुरु करणे"

त्यासअनुसरुन दि.१६/०२/२०१७ रोजी सकाळी ११.०० वा. मा.कार्यकारी अधिकारी डॉ.संदिप आहेर साहेब व प्रशासकीय अधिकारी श्री गोंदकर साहेब यांनी साईप्रसाद इमारतीशेजारील लाडु विक्री काऊंटर व जुन्या प्रसादालयाचे लाडु किचन येथे रांऊड घेतला व भक्तांना पाहीजे तेवढी लाडु पाकीटे उपलब्ध करुन देणेसाठी प्रसादालय आणि संस्थानची निवासस्थाने इ. ठिकाणी लाडु विक्री केंद्रे वाढविणेसाठी तात्काळ कार्यवाही करणेबाबतच्या सुचना केल्या होत्या.

उपरोक्त प्रमाणे दिलेल्या सुचनांची कार्यवाही करणेकामी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे सध्या सुरु असलेल्या युनिटसाठी उपलब्ध असणारी जागा पुरेशी नसल्याने अपु-या जागेमध्ये भक्तांना पाहीजे तेवढी लाडुंचे उत्पादन वाढविणे शक्य होणार नव्हते. त्यासाठी साईप्रसाद नं.०२ इमारती शेजारील लाडु विक्री काऊंटरच्या हॉलमध्ये लाडु प्रसाद निर्मिती विभागाचे नविन युनिट सुरु करणेसाठी दि.०९/०३/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.१८१ अन्वये, "लाडु विक्री केंद्रे असलेल्या हॉलमध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन, या जागेत FDA कार्यालय व ISO लेखापरीक्षक यांचे नियमावलीनुसार लाडु प्रसाद निर्मितीचे नविन युनिट सुरु करणेस मान्यता देण्यात आली. तसेच या कामी समिती सदस्य डॉ.राजेंद्र सिंग यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे" असे ठरले होते.

परंतु आता दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.२४१ अन्वये, पुढीलप्रमाणे निर्णय संमत झाला आहे.

"साईभक्तांच्या सोयीसाठी जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.०१ व ०२ या जुन्या इमारती काढुन त्या ठिकाणी नविन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणेस मान्यता देण्यात आली. याकामी आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असो. नवी दिल्ली यांचेकडुन नियोजित इमारतींचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. तसेच जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.०१ व ०२ या इमारतींमध्ये साईभक्तांसाठी चालविण्यात येणारे विविध सेवां-सुविधांचे काऊंटर्स योग्य जागेची निश्चिती करणेत येऊन, इतरत्र स्थलांतरीत करणेत यावे व या जुन्या इमारती पाडणेसाठी प्रथमतः स्वंतत्र निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले".

उपरोक्तप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे निर्णयानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास सदरचे ठिकाणी नविन युनिट सुरु करणे योग्य ठरणार नाही. कारण सदरचे युनिट सुरु केल्यास व बांधकाम विभागाकडुन सदर इमारती काढण्याचे काम सुरु झाल्यास लाडू निर्मिती युनिटसाठी करण्यात येणारा खर्च वाया जाणार आहे.

**मागणी-** भक्तांना हवी तेवढी पाकीटे उपलब्ध करुन देणेसाठी साईप्रसाद नं.०२ इमारतीचे शेजारील लाडु विक्री केंद्रे असलेला हॉल व किचनची जागा नविन युनिटच्या वापरण्यासाठी घेतल्यास व बांधकाम विभागाकडुन इमारतीं काढण्याचे कामास प्रारंभ झाल्यास सदरचे ठिकाणी लाडु निर्मिती करणेसाठी जागा उपलब्ध राहणार नाही त्यामुळे दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.२४१ अन्वये, साईभक्तांच्या सोयीचे दृष्टीने दि.०९/०३/२०१७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेला निर्णय क्र.१८१ निरस्त (रद्द) केल्यास बांधकाम विभागास सदरची कार्यवाही करणे सोईचे होईल.

**अनुमान –** धोरणात्मक

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** उपरोक्तप्रमाणे लाडु प्रसाद पाकीटे उत्पादन वाढविणेकामी व भक्तांना हवी तेवढी पाकीटे उपलब्ध करुन देणेसाठी साईप्रसाद नं.०२ इमारतीचे शेजारील लाडु विक्री केंद्रे असलेला हॉल व किचनची जागा नविन युनिटच्या वापरण्यासाठी घेतल्यास व बांधकाम विभागाकडुन इमारतीं काढण्याचे कामास प्रारंभ झाल्यास सदरचे ठिकाणी लाडु निर्मिती करणेसाठी जागा उपलब्ध राहणार नाही आणि नविन युनिट सुरु करणेसाठी केलेला खर्च वाया जाईल.

त्यासअनुसरुन दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.२४१ अन्वये, साईभक्तांच्या सोयीसाठी दि.०९/०३/२०१७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेला निर्णय क्र.१८१ निरस्त (रद्द) केल्यास बांधकाम विभागास सदरची कार्यवाही करणे सोईचे होईल.

तरी उपरोक्त परिस्थितीचा सारासार विचार करता व दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील भक्तांच्या सोईच्या दृष्टीने निर्णयाचे महत्व पाहता, दि.०९/०३/२०१७ रोजीचे निर्णय क्र.१८१ निरस्त (रद्द) करणेसाठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२९८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.०१ व ०२ या जुन्या इमारती काढुन त्या ठिकाणी साईभक्तांचे सोयीसाठी दर्शनरांग इमारतीचे बांधकाम करणेस मान्यता मिळालेली असल्यामुळे यापुर्वी व्यवस्थापन समितीचे दि.०९.०३.२०१७ रोजीचे सभेमध्ये साईप्रसाद इमारत नं.०२ मध्ये लाडू प्रसाद निर्मितीचे नवीन युनीट सुरु करणेबाबत संमत झालेला निर्णय क्र.१८१ निरस्त करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.२२ नवीन कार्यालयीन वाहने खरेदी करणे.**

**प्रस्ताव–** **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील:-** कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योत्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

**प्रस्तावना:-** वाहन विभागाकडे सध्या खालील प्रमाणे १३ कार्यालयीन वाहने वापरात असुन त्यापैकी ०६ वाहने जाहीर लिलावाने विक्री करणे बाबतचा प्रस्ताव शासन मान्यते करीता सादर करण्यात आलेला आहे. जाहीर लिलावानंतर ०७ वाहने शिल्लक राहणार आहेत. त्यांची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | वाहनांचा प्रकार | सध्या असलेली वाहने | लिलावा करीता प्रस्तावित वाहने | लिलावानंतर शिल्लक राहणारी वाहने |
|---|---|---|---|---|
| ०१ | टाटा सुमो | १ | १ | - |
| ०२ | महिंद्रा लोगान | १ | १ | - |
| ०३ | टोयटो इनोव्हा | ४ | २ | २ |
| ०४ | महिंद्रा झायलो | १ | १ | - |
| ०५ | महिंद्रा XUV | १ | - | १ |
| ०६ | महिंद्रा बोलेरो | १ | - | १ |
| ०७ | महिंद्रा स्कॉर्पिओ | १ | - | १ |
| ०८ | महिंद्रा TUV | १ | - | १ |
| ०९ | स्विफ्ट डिझायर | १ | १ | - |
| १० | टाटा नॅनो | १ | १ | - |
| | **एकुण** | **१३** | **०६** | **०७** |

**विभागाचा अभिप्राय:-** उपरोक्त प्रमाणे जुन्या ०६ वाहनांचे जाहीर लिलावाने विक्री करणे करीता प्रस्ताव शासन मान्यतेस पाठविण्यात आलेला असुन त्यावर कार्यवाही चालु आहे. कार्यालयीन कामकाजात अडचणी येवु नये या करीता प्रस्तावित वाहनाचे लिलावाचे अगोदर तातडीने ०२ नवीन वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. लिलावानंतर शिल्लक राहणा-यां वाहनांची संख्या कार्यालयीन कामाकरीता अपुरी पडल्यास त्यानुसार आणखी वाहनांची आवश्यकता भासल्यास त्यावेळी नवीन वाहन खरेदीचा प्रस्ताव अलाहिदा सादर करता येईल.

संस्थान कार्यालयीन कामाकरीता कोणत्या कंपनीचे, कोणते मॉडेलचे खरेदी करावे हे निश्चित झालेस त्यानुसार खरेदी प्रक्रिया राबविता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांकः-भांखस-२०१४/ प्र.क्र.८२ भाग III/ उद्योग-४ दिनांक १/१२/२०१६ सुधारित नियमपुस्तिके मध्ये ३.२.३. मध्ये,"कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे, मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटार वाहन (कार) खरेदी रु. १ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निविदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी.

**मागणी:-** तरी संस्थान कार्यालयीन कामाकरीता कोणत्या कंपनीचे, कोणते मॉडेलचे खरेदी करावे हे निश्चित होणेस व त्यानुसार अधिकृत डिलरकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन मान्यता मिळाल्यानंतर प्रस्तावित ०६ वाहनांची जाहिर लिलावाद्वारे विक्री करावयाची असून, या वाहनांची विक्री केल्यानंतर कार्यालयीन कामासाठी वाहनांची संख्या अपुरी पडू नये, याकरीता Toyota कंपनीची नवीन ०२ डिझेल (Innova Crysta, 2.4zx MT व Corolla (Altis) 1.4 DGL) कार्यालयीन वाहने विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.२३** **दोन प्रवासी बसचा दि.०१.०६.२०१७ ते दि.३०.११.२०१७ या कालावधीतील आर.टी.ओ. टॅक्स भरणे.**

**प्रस्ताव–** **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४-** मधील कलम १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील" असे नमुद केलेले आहे.

**प्रास्ताविक:-** वाहन विभागाकडील प्रवासी बस क्र.एमएच-१७-टी-३३०१ व ३३०२ या दोन बसेसचा वापर साईआश्रम व भक्तनिवासस्थान येथे निवास करणा-या साईभक्तांना मंदीर परिसर व प्रसादालयात ने-आण करणे कामी होत आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणा-या रुगणांचे नातेवाईक यांना साई धर्मशाळा येथे रात्री घेवुन जाणे व सकाळी घेवुन येणे आणि साईनगर रेल्वेस्टेशनचे वेळापत्रकानुसार साईभक्तांना घेवुन येणे कामी होत आहे.

उपरोक्त दोन प्रवासी बसेसच्या टॅक्सची मुदत दि.३१/०५/२०१७ रोजी संपुष्टात येत असलेने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांचेकडून पुढील कालावधी करीता भरावयाचे टॅक्स बाबत माहिती घेतली असता, त्यांनी पुढील सहा महिणे म्हणजे दि.०१.०६.२०१७ ते दि.३०.११.२०१७ अखेर या कालावधी करीता AT फॉर्मवर खालील तपशिला प्रमाणे रक्कम भरणेचे कळविले आहे.

| **अ.नं.** | **बस क्रमांक** | **वाहन प्रकार** | **आसन क्षमता** | **रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७-टी-३३०१ | प्रवासी बस | ५४+१+१ सिटर | २९,७००.०० |
| ०२ | एमएच-१७-टी-३३०२ | प्रवासी बस | ५४+१+१ सिटर | २९,७००.०० |
| | | | **एकुण रक्कम(रु.)** | **५९,४००.००** |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** उपरोक्त तपशिला प्रमाणे दोनबसेस वाहनांचा दि.०१.०६.२०१७ ते दि.३०.११.२०१७ अखेर या सहा महिणे कालावधीचा टॅक्स उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे भरणे कामी रु.५९,४००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसाठ हजार चारशे मात्र) खर्च येणार आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल.

**मागणी:-** तरी संस्थानच्या दोन प्रवासी बसेसचा दि.०१.०६.२०१७ ते दि.३०.११.२०१७ या कालावधीची टॅक्स रक्कम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे भरणेस व या कामी येणा-या एकुण रक्कम रु.५९,४००/- (अक्षरी रक्कम रु. एकोणसाठ हजार चारशे मात्र) खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.३००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या दोन प्रवासी बसेसचा दि.०१.०६.२०१७ ते दि.३०.११.२०१७ या कालावधीतील टॅक्सची रक्कम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपूर यांचेकडे भरणेस व त्याकामी येणाऱ्या एकूण रु.५९,४००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.२४** **शिर्डी येथिल विमानतळावर येणाऱ्या सर्व एअरलाईन्सच्या बोर्डीग पासवर व्हि.आय.पी.दर्शनाचा पास उपलब्ध करुन देणेबाबत म.वि.वि.कं. यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्राबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा,

समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०.११.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ८२८.

**प्रस्ताविक –** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०.११.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ८२८ अन्वये, "या विमानतळावर येणा-या सर्व एअरलाईन्सच्या बोर्डींग पासवर व्ही.आय.पी.दर्शनाचा पास उपलब्ध करुन देण्यात यावा व पासची एकत्रित रक्कम एअरलाईन्स कंपनीकडून घेण्यात यावी." असा निर्णय झालेला असून याबाबतची पुढील कार्यवाही करणेबाबत बांधकाम विभागाने जनसंपर्क विभागास कळविले होते.

तथापि, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णयानुसार महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि., मुंबई यांना जान.एसएसएस/पीआरओ/४०८८/२०१६ दिनांक ०३.११.२०१६ व जा.नं.एसएसएस/ पीआरओ/५४९६/२०१७ दिनांक २५.०१.२०१७ अन्वये विमान प्रवासाने येणा-या साईभक्तांना दिल्या जाणा-या सशुल्क दर्शनपासची रक्कम त्यांच्या विमान तिकीटाच्या रकमेमध्येच समाविष्ट करणेबाबत आपला अभिप्राय इकडील कार्यालयास सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार म.वि.वि.कं. यांनी म.वि.वि. कं२०१/ तिकीट व्यवस्था/१६४१/२०१७ दिनांक २७.०२.२०१७ चे पत्राने, "उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शिर्डी विमानतळावर दररोज येणा-या प्रवाशांना दर्शन तिकीटाची रक्कम विमान तिकीटाच्या रकमेमध्ये समाविष्ट करणेबाबत व्यवस्थापन समितीने सुचविलेले प्रत्यक्ष रुपात शक्य होऊ शकणार नाही. शिर्डी विमानतळावर विविध विमान कंपन्या विमान सेवा सुरु करतील. त्यांच्याशी दर्शन तिकीटाची रक्कम संस्थानाला परत करण्यासंबंधी समन्वय साधणे शक्य होणार नाही. आपणास सुचविण्यात येते की, दर्शनाच्या तिकीटाचे वाटप संस्थानच्या विमानतळावरील कार्यालयातून झाल्यास, प्रवाशांना व संस्थानला सोईचे होईल. त्यादृष्टीकोनातून आपण संस्थानच्या विमानतळावरील कार्यालयामध्ये दर्शन तिकीट वाटपाची सोय उपलब्ध करून देण्यात यावी ही विनंती." असे कळविलेले आहे.

महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि., मुंबई यांनी त्यांचे उपरोक्त पत्राने संस्थानच्या विमानतळावरील कार्यालयातून दर्शनाचे तिकीट वाटप करणेबाबत विनंती केली आहे. तरी सदरचे पत्र मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयासाठी सादर करावे असे मत आहे.

**मागणी –** शिर्डी येथील विमानतळावर येणा-या सर्व एअरलाईन्सच्या बोर्डींग पासवर व्ही.आय.पी. दर्शनाचा पास उपलब्ध करुन देणेबाबत म.वि.वि.क. यांचे दिनांक २७.०२.२०१७ रोजीचे पत्र मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–** महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि., मुंबई यांनी दिनांक २७.०२.२०१७ रोजी दिलेले पत्रात दर्शनाच्या तिकीटाचे वाटप संस्थानच्या विमानतळावरील कार्यालयातून झाल्यास, प्रवाशांना व संस्थानला सोईचे होईल. त्यादृष्टीकोनातून आपण संस्थानच्या विमानतळावरील कार्यालयामध्ये दर्शन तिकीट वाटपाची सोय उपलब्ध करून देण्यात यावी असे कळविलेले आहे.

तरी महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि., मुंबई यांचे उपरोक्त पत्र मा.व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ सादर करुन मा.व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेसाठी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, शिर्डी विमानतळावर येणाऱ्या विमान कंपन्यांबरोबर दर्शनपासबाबतचा करार करणेत यावा. तसेच दर्शन पासेससाठी शिर्डी विमानतळावरील संस्थानचे जागेत बायोमेट्रीक सिस्टीमचे काऊंटर सुरु करणेत यावे.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.२५** **संस्थानचे विविध विभागातील जुने झालेले ए.सी. बायबॅक करुन नविन ए.सी. खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम 2004 मधील तरतूद** : (१) कलम १७ (झ)– सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. (२) कलम २1(क)– मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्तावना**: संस्थानचे विविध विभागामध्ये ए.सी. बसवून कार्यरत आहेत. या सर्व स्प्लिट ए.सी. चे मेन्टेनंन्स मेकॅनिकल विभागामार्फत करण्यात येत आहेत. त्यातील काही ए.सी. हे आठ ते दहा वर्षे जुने कालबाह्य झाले असल्याने त्यांची वारंवार दुरुस्ती करणेत आलेली असूनही, पुर्ण क्षमतेने कार्यरत राहत नाही.

**मागणी** : विविध विभागातील जुने ए.सी. बायबॅक करुन, त्यांचे बदली नविन ए.सी. खरेदी करावे लागणार आहे. जेणेकरुन संस्थानमधील विविध विभागातील ए.सी. सुस्थितीत कार्यरत राहतील. सध्या संस्थानमधील खालील विभागात जुने, कालबाह्य झालेले ए.सी आहेत:

| अ.नं. | ठिकाण | तपशील | डेड-स्टॉक नंबर | नग | मुळ किंमत | खरेदी दिनांक | घसारा किंमत (31 मार्च 2016 अखेर) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | लेखाशाखा (चेक/डी.डी) | व्होल्टास मेक स्प्लिट टाईप ए.सी. | MCN/0061 | 2 | 55,600/- | 17/10/05 | 2,740/- |
| 2. | साईनाथ रुग्णालय (एक्सरे विभाग) | व्होल्टास मेक स्प्लिट टाईप ए.सी. | MCH/0339 | 2 | 55,600/- | 01/11/05 | 2,740/- |
| 3. | जनसपंर्क विभाग (पास वितरण) | व्होल्टास मेक स्प्लिट टाईप ए.सी. | MCN/0062 | 1 | 27,800/- | 01/11/05 | 1,370/- |
| 4. | आय.टी. विभाग (सर्व्हर रुम-शांतीनिवास) | व्होल्टास मेक स्प्लिट टाईप ए.सी. | MCH/0369 | 2 | 55,600/- | 30/05/06 | 3,132/- |
| 5. | साईबाबा हॉस्पीटल – प्रयोगशाळा | व्होल्टास मेक स्प्लिट टाईप ए.सी. – 2 टन | MCH/0336 | 7 | 1,34,599/- | 17/10/06 | 9,588/- |
| 6. | साईबाबा हॉस्पीटल (डिलक्स रुम) | व्होल्टास मेक स्प्लिट टाईप ए.सी. | MCN/0067 | 9 | 2,79,000/- | 13/04/07 | 20,952/- |
| 7. | कापडकोठी | स्प्लिट टाईप ए.सी. | MCN/0074 | 1 | 29,462/- | 02/02/08 | 2,581/- |
| 8. | साईनाथ रुग्णालय (आय.सी.यु, विभाग) | व्होल्टास मेक स्प्लिट टाईप ए.सी. | MCH/0468 | 4 | 1,18,000/- | 08/10/09 | 18,376/- |
| 9. | साईबाबा हॉस्पीटल (सी.आर.यु-3 विभाग) | व्होल्टास मेक स्प्लिट टाईप ए.सी. | MCH/0492 | 5 | 1,42,250/- | 17/11/10 | 29,535/- |
| | | | **एकूण नग :** | **33** | **घसारा वजा जाता एकूण किंमत रुपये :** | | **91,014/-** |

उपरोक्तप्रमाणे ३३ नग जुने ए.सी. बायबॅक देवून नविन ३३ नग ए.सी. खरेदी करावे लागणार आहेत.

या व्यतिरीक्त दिनांक ०४/१२/२०११ रोजीचे मा. कार्यकारी अधिकारी कार्यालय आवक नंबर १६०६३ चे श्री साईनाथ हॉस्पीटलकडील मंजूर टिपणीन्वये रुग्णालयातील बालरोग कक्ष, आर्थो सर्जरी, ई.एन.टी., गायनिक, त्वचारोगतज्ञ, डेन्टल, होमीओपथी, आयुर्वेदीक, कॅल्युलटी, डायबेटीक केअर, फिजीशियन इत्यादी विभागांच्या दैनंदिन ओपीडी कार्यरत आहेत. या ओपीडीचा लाभ घेणा-या रुग्णांची दैनंदिन संख्या एक हजार ते अकराशेचे दरम्यान असते. सदर ओपीडीमध्ये हवा खेळती राहत नसल्यामुळे, कोंडट वातावरण तयार होते. परिणामी डॉक्टरचे कामशक्तीवर त्याचा परिणाम जाणवत आहे. या करीता ओपीडीचे ठिकाणी मेकॅनिकल विभागामार्फत ए.सी. बदलुन देणेबाबत हॉस्पीटल विभागाने कळविले आहे. सदरचे मान्यतेनुसार मागणी केलेल्या ठिकाणी बसविणेकामी ए.सी. इकडील विभागाकडे शिल्लक नसल्याने नविन ए.सी. खरेदी करावे लागतील.

नविन खरेदी करावयाच्या ए.सी. चा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

| अ.नं. | खरेदीचा तपशील | आवश्यक संख्या |
|---|---|---|
| १. | बायबॅक दयावयाचे ए.सी. बदली | ३३ |
| २. | श्री साईनाथ हॉस्पीटलमधील ओपीडीकरीता | १४ |
| ३. | स्पेअर | ३ |
| | **एकूण :** | ५० |

उपरोक्तप्रमाणे एकूण नविन ५० ए.सी. खरेदी करावे लागणार आहेत. या ए.सी. खरेदीकामी येणा-या खर्चाचा अंदाजाकरीता विविध पुरवठादार यांचेकून दरपत्रके मागविण्यात आली होती. तसेच इंटरनेटव्दारेही दराची माहिती घेतली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत :

| तपशील | नग | दर रुपये |
|---|---|---|
| Split Type Wall Mounted Air Conditioner Capacity – **2 Ton,** Three Star, Single Phase, Rotary Compressor, Copper Condenser, & Copper Piping With Outdoor Unit, Extra M.S. Stand with green gas-R410A | 1 | 48,000/- |

उपरोक्त दराप्रमाणे नविन ५० ए.सी. खरेदी करणेकामी रुपये २४,००,०००/- मात्रचा अंदाजे खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्चाची तरतूद सन २०१७-२०१८ या वर्षातील 'मशीनरी खरेदी खर्च' या शिर्षातील अंदाजपत्रकात करता येईल. तसेच या मशीनरी खरेदीची कार्यवाही ई निविदा प्रक्रियाद्वारे करता येईल.

**आवश्यक मान्यता** : प्रशासकीय

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय** : बांयबॅक करावयाचे ए.सी. चा वापर अधिक झालेने त्यांची वारंवार दुरूस्ती करावी लागते. त्यामुळे सदरचे ए.सी बायबॅक देवुन नवीन ए.सी खरेदी करणे आवश्यक आहे. संस्थान अधिनियम 2004 मधील कलम 17(4) मध्ये "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेले, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौलयवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज, समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही" असे नमूद आहे. मात्र उपरोक्तप्रमाणे बायबॅक करावयाच्या प्रत्येक ए.सी. ची घसारा किंमत ही रुपये ५०,०००/- पेक्षा कमी असल्याने, ए.सी. बायबॅक करणेकामी शासन मान्यतेची आवश्यकता नाही. तसेच साईनाथ रुग्णालयाचे ओपीडीमध्ये बसविणेकरीता ए.सी. इकडील विभागाकडे शिल्लक नसल्याने ते खरेदी करावे लागतील. बायबॅक करावयाचे ए.सी. चे बदली नविन ए.सी. तसेच साईनाथ रुग्णालयातील सर्व ओपीडीमध्ये बसविणेकामी नविन ए.सी. खरेदी करणे यासाठी महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करावी लागेल. सदरील ए.सी. खरेदी करणेकरीता नविन ए.सी.ची किंमत तसेच बायबॅक दयावयाचे ए.सी. ची किंमत अशा स्वतंत्र दोन BOQ अपलोड करुन ई-निविदा मागविण्यात येतील.

तरी जुने कालबाह्य झालेले ३३ नग ए.सी. बायबॅक करुन आवश्यक नविन ५० ए.सी. खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिद्ध करुन ई- निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये २४,००,०००/- (अक्षरी रुपये चोवीस लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, संस्थानचे विविध विभागातील जुने झालेले ३३ नग ए.सी. बायबॅक करुन नविन ५० नग ए.सी. खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६** **साईआश्रम भक्तनिवास येथिल लिफ्टचे ARD युनिटकरीता जुने बॅटरीज बायबॅक देऊन नविन बॅटरीज खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम 2004 मधील तरतूद**: *कलम 14*(2)(घ)– भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे

**प्रस्तावना**: साईभक्तांना अधिकाधिक सेवा सुविधा उपलब्ध करुन देणेकरीता साईआश्रम भक्तनिवास येथील इमारतीमध्ये भक्तांना तळमजल्यावरुन वरील मजल्यावर ये-जा करणेकरीता सन २०११ साली १३ (तेरा) लिफ्ट बसविणेत आलेल्या आहेत. सदर लिफ्टला वीज सप्लाय खंडीत झालेस, लिफ्ट बंद पडून आतील साईभक्त आत अडकू नये याकरीता प्रत्येक एका लिफ्टला ARD युनिट (Automatic Rescue Device) बसविणेत आलेले असून, त्यास आवश्यक सप्लाय चार बॅटरीजव्दारे दिलेला आहे. सध्या सदर बॅटरीज सततचे वापराने खराब होत असलेने, साईभकतांचे सुरक्षिततेकरीता, नविन बॅटरीज खरेदी करुन लिफ्टच्या ARD युनिट (Automatic Rescue Device) मध्ये बसविणे आवश्यक आहे.

**मागणी**: साईआश्रम भकतनिवास येथील १३ लिफ्टकरीता प्रत्येकी ४ बॅटरीज नुसार एकूण ५२ बॅटरीज खरेदी कराव्या लागणार आहे. बॅटरीज खरेदीकामी येणा-या खर्चाचे अंदाजकरीता परिसरातील बॅटरी पुरवठादार यांचेकडून जुनी बॅटरी बायबॅक देऊन, नविन बॅटरीज खरेदी दराचे कोटेशन मागविण्यात असता, त्यांनी खालील तपशीलाप्रमाणे खर्च कळविला आहे:

| अ.नं. | बॅटरीचा तपशील | बॅटरी पुरवठादारांचे नांव | बॅटरीची किंमत (बायबॅकसह) रुपये |
|---|---|---|---|
| १. | Amron Qanta 12V/18A | मे. साई बॅटरीज् ॲण्ड इनव्हर्टर्स् सेल्स सर्व्हीस, शिर्डी | १,९५०/- |
| २. | | **मे. साई तेज एन्टरप्राईजेस, शिर्डी** | **१,७६४/-** |
| ३. | | मे. महेद्रा बॅटरी ॲण्ड ॲटो पार्टस, साकुरी (राहाता) | २,०००/- |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास येथील लिफ्टचे ARD युनिटकरीता ५२ नग जुनी बॅटरी देऊन नविन बॅटरी खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये ९१,७२८/- (अक्षरी रुपये एक्यानों हजार, सातशे अठ्ठावीस) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे पुढील आर्थिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये '*मशीनरी दुरुस्ती व देखभाल खर्च*' या शिर्षाखाली मंजूर रकमेतून करता येईल. सदरील खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल.

**मान्यता:** प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट शेरा:** लिफ्टचे ARD युनिट सतत कार्यान्वित राहणेकरीता, युनिटमध्ये असणा-या बॅटरीज चार्ज असणे आवश्यक आहे. सध्या असलेल्या बॅटरीजचा वापर ६ वर्षे कालावधीपेक्षा अधिकचा झालेला असून, बहुतांशी बॅटरीज खराब झालेल्या आहेत. यासाठी जुन्या बॅटरीज बायबॅक करुन नविन बॅटरीज खरेदी करणे आवश्यक आहे. सदरील खरेदी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करता येईल.

तरी साईआश्रम भक्तनिवास येथील लिफ्टचे ARD युनिटकरीता नविन बॅटरी खरेदीकामी कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रुपये ९१,७२८/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथिल लिप्टच्या ARD युनिटची जुनी बॅटरी बायबॅक करुन नवीन बॅटरी खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९१,७२८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **श्री साईप्रसादालयातील डायनिंग टेबलचे नॉयलन बुश खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव–** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.** १४ (भाग ४) मध्ये १४ (२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजन घेणेकामी बैठकीकरीता एस.एस. मटेरियल मध्ये चार शिट असलेले ७५० नग डायनिंग टेबल सन २००८ मध्ये खरेदी करणेत आलेले आहेत. सदरचे टेबल साफ सफाई करीता ओढतेवेळी फरशीला स्कॅच पडू नये याकरीता टेबलच्या पायांना नॉयलॉन बुश बसविणेत आलेले होते.

**मागणी:-** सदरचे ७५० टेबलपैकी ६०० नग टेबलच्या पायांना असलेले नायलॉन बुश दैनदिन वापरामुळे खराब झालेले आहे. त्यामुळे फरशीला स्कॅच पडत आहेत. त्यामुळे बुश नसलेल्या टेबला बुश बसविणे आवश्यक आहे.

यापुर्वी साईभक्त श्री नाथा जी पठारे, हैद्राबाद हे स्वत: नॉयलॉन बुश उत्पादक असून त्यांनी १८४ नग बुश देणगी स्वरुपात दिलेले आहेत. देगणी पावती करतेवेळेस त्यांनी दिलेल्या दरानुसार आपणास आवश्यक बुश खरेदी करीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | बुशचा तपशिल | नग | दर | एकुण किमंत |
|---|---|---|---|---|
| १ | ५२ X ३९ बुश | १४०८ | ५५/- | ७७,४४०/- |
| २. | ५२ X ४३ बुश | १४०८ | ६०/- | ८४,४८०/- |
| एकुण रक्कम रुपये : | | | | १,६१,९२०/- |

उपरोक्त प्रमाणे श्री साईप्रसादालयातील डायनिंग टेबलचे नॉयलॉन बुश खरेदी कामी अंदाजे रक्कम रु. १,६१,९२०/- खर्च अपेक्षित असून, सदरील खर्च मेकॅनिकल विभागाकडील सन २०१६-१७ या वर्षाचे अंदाजपत्रकात मशिनरी दुरुस्ती व देखभाल कामी रक्कम रु. ७५,००,०००/- मंजूर असून त्यापैकी रक्कम रु.

११,२८,५२५/- मात्रचे शिल्लक रकमेतून विहीत पद्धतीने करता येईल. या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्त प्रमाणे श्री साईप्रसादालयातील डायनिंग टेंबल करीता नॉयलॉन बुश खरेदीकामी दरपत्रक मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. १,६१,९२०/- मात्रचे खर्चास मान्यतेकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील डायनिंग टेंबल करीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नॉयलॉन बुश विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,६१,९२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८** **साईबाबांचे २५ फुटी म्युरल साईआश्रम भक्तनिवास विभागात काही दिवसांसाठी ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम २००४:-** १७ (२) **(ठ)** श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**(ड)** श्री साईबाबांच्या भक्तंमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल.

**प्रस्तावना:-** साईभक्त श्री.एन.डी.वाकचौरे क्रियेशन आर्ट,पुणे यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रात नमुद केले आहे की, मी शिल्पकलेचे शिक्षण घेतले असून, गेल्या काही वर्षापासून साईबाबांच्या जिवनावर मुर्ती तयार करत असून सहा महिन्यात बाबांचे २५ फुटाचे म्युरल तयार केले आहे.

हे साईबाबांचे शिल्प रामनवमीच्या निमित्ताने दि.०४/०४/२०१७ पासून काही दिवसांसाठी साईबाबांच्या मंदिर परिसरात ठेवण्यास परवानगी द्यावी अशी विनंती केली आहे.

**प्रस्ताव:-** सदर साईभक्त श्री.एन.डी.वाकचौरे क्रियेशन आर्ट,पुणे यांनी खरोखर मोठ्या श्रध्देने साईबाबांचे जिवनावर मुर्ती तयार केली आहे. त्यांनी सदर मुर्ती श्रीरामनवमी उत्सव निमित्ताने मंदिर परिसरात काही दिवसांसाठी ठेवण्यात यावी अशी विनंती केली आहे. परंतू उत्सव कालावधी असल्याने मंदिर परिसरात साईभक्तांची दर्शनासाठी गर्दी वाढत असल्याने, तसेच मंदिर परिसरात मुर्ती ठेवणेस जागा उपलब्ध नसल्याने, सदर शिल्पकार यांनी साईबाबांचे तयार केलेले भव्य म्युरल येणा-या भक्तांसाठी आकर्षन ठरु शकते म्हणून सदर साईबाबांचे २५ फुटी म्युरल साईआश्रम भक्तनिवास विभागात काही दिवसांसाठी ठेवता येईल. असे नम्र मत आहे.

साईआश्रम भक्तनिवास विभाग सुरु झाल्यापासून अध्यापर्यंत अशा प्रकारे कोणत्याही साईभक्तांनी मागणी केलेली नाही. तरी दि.०६/०४/२०१७ रोजी सदर शिल्पकार साईभक्त श्री.एन.डी.वाकचौरे यांना दुरध्वनी केला असता त्यांनी साईबाबांचे २५ फुटी फायबरचे म्युरल तयार झाले असून, त्यासाठी २५ फुट wall Background असलेली जागा मिळावी अशी विनंती केली आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** साईभक्त श्री.एन.डी.वाकचौरे, क्रियेशन आर्ट,पुणे यांचे निर्मीत श्री साईबाबांचे २५ फुटी म्युरल साईआश्रम भक्तनिवास विभागातील H किंवा I या इमारतीचे दर्शनी भागाजवळ ठेवल्यास साईभक्तांना साईबाबांचे भव्य मुर्तीचे दर्शन होईल व सदर मुर्तीचे कलेचे प्रदर्शन होईल.

साईआश्रम भक्तनिवास विभाग सुरु झाल्यापासून अशा प्रकारे कोणत्याही साईभक्तांनी प्रदर्शनासाठी जागेची मागणी केलेली नाही.

१) साईबाबांची मुर्ती साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये ठेवणेस,
२) सदर साईभक्तांनी त्यांचे वाहनातून आणलेली साईंची मुर्ती उतरविणेसाठी वाहन विभागामार्फत क्रेन मिळणेस,
३) सदर भव्य साईबाबांचे मुर्तीचे संरक्षणासाठी संरक्षण विभागामार्फत तीनही शिफ्टमध्ये सुरक्षागार्ड मिळणेस,
४) सदर मुर्ती ठेवणेकामी काही सेवा आकार घेणेचे ठरल्यास तो घेणेस,

उपरोक्त प्रस्तावीत ०१ ते ०४ बाबीं प्रमाणे संबंधीत साईभक्त श्री.एन.डी.वाकचौरे यांनी केलेल्या विनंतीनुसार काही दिवसांसाठी साईआश्रम भक्तनिवास विभागात श्री साईबाबांची २५ फुट म्युरल मुर्ती ठेवणेकामी तसेच त्यासाठी काही सेवा आकार घ्यावा किंवा नाही याबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.२९ श्री साई प्रसादालयातून ज्या संस्थांना मोफत/ सशुल्क प्रसादभोजन पुरविणे येते त्या संस्थांची वार्षिक पहाणी अहवालाबाबत.**

**प्रस्ताव–** संस्थानचे श्री साई प्रसादालयामार्फत ज्या संस्थाना मोफत /सशुल्क प्रसादभोजन पुरविणेत येते त्या संस्थांची वार्षिक पहाणी करणेत यावी व प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार प्रसादभोजन पुरविणेत यावे. अशा सुचना मा.विश्वस्तांनी व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ चे सभेतील निर्णय क्रं.५८१ अन्वये मांडलेल्या आहेत.

संदर्भिय अ.नं. २ चे मंजुर टिपणी अन्वये दि.१८/०१ /२०१७ व २२/०३/२०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्री साई प्रसादालयामार्फत शिर्डी परिसरातील अंध, अंपग, मुकबधीर, अनाथ, धार्मिक व वारकरी शिक्षण संस्था,शाळा व वृध्दाश्रमातील वृध्द व्यक्तींना मोफत व सवलतीचे दरात प्रसादभोजन पुरविणेत येते अशा संस्थाची श्री साई प्रसादालय प्रशासकीय अधिकारी, श्री उत्तमराव गोंदकर, अधिक्षक,श्री विष्णू थोरात वरिष्ठ लिपीक,श्री बापूसाहेब शिंदे कंत्राटी लिपीक श्री भाऊसाहेब थोरात व श्री चंद्रभान बावके प्रसादालय यांचेमार्फत प्रत्यक्ष पहाणी करणेत आलेली आहेत त्याबाबतचा पहाणी अहवाल खालील प्रमाणे

| अ.नं. | संस्थेचे /शाळेचे नाव | मंजुर संख्या | भोजन सुविधेचा प्रकार | पहाणी अहवाल | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ह.भ.प.काशिनाथ महाराज सेवाभावी टस्ट्र निमगांव संचलित श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था, निमगाव-शिर्डी, नगर मनमाड रोड | ४२ | मोफत | १) ट्रस्टला कुठल्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही असे त्यांनी सांगितले<br>२) ट्रस्टमार्फत परिसरातील धार्मिक शिक्षणाची आवड असलेल्या मुलांना सकाळी व सायंकाळी भजन, किर्तन, पखवाज व पेटी वाजविणेचे शिक्षण देण्यात येते<br>३) ज्ञानेश्वर मंदीराचे मागे ४ ते ५ खोल्या आहेत त्या खोल्यामध्ये विदयार्थ्याची निवास व्यवस्था केली जाते<br>४) निवासी विदयार्थ्याना ट्रस्टमार्फत गणवेश, गादी ,चादर, बेडशीट पुरविणेत येतात.<br>५) काही विदयार्थी त्रयंबकेश्वर येथे पायी दिंडीत गेलेले असल्यामुळे सध्या २० व्यक्तीचे प्रसादभोजन घेऊन जात आहे. | मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशान्वये पूर्वीपासून मोफत प्रसाद भोजन चालू असून ही सेवा पुढेही चालू ठेवणे आवश्यक वाटते. |
| ०२ | आधार शिक्षण व ग्रामीण विकास मंडळ नांदूर दुमाला ता.संगमनेर संचलित श्री साई सेवा मतीमंद मुला –मुलीची शाळा, शिर्डी साकुरी शिव, शिरडी. | ६० | मोफत | १) संस्थेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही असे त्यांनी सांगितले आहे.<br>२) ट्रस्टची २९ गुंठे जागा आहे.<br>३) २९ गुंठे जागापैकी सुमारे ३ ते ४ गुंठयामध्ये विटा माती पवाशेड आहे. त्यामध्ये मंतीमंद मुलाची निवास व शिक्षणाची व्यवस्था केली जाते<br>४) टॉयलेट बाथरूमची व्यवस्था केलेली आहे.<br>५) संस्था प्रतिकुल परिस्थीमध्ये मतीमंद मुला मुलीना स्वतःच्या | मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशान्वये पूर्वीपासून मोफत प्रसाद भोजन चालू असून ही सेवा पुढेही चालू ठेवणे आवश्यक वाटते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पायावर उभे राहून जीवन जगण्यासाठी प्रयत्न करते .<br>६) सध्या आमचेकडे ६० मंतीमद विदयार्थी आहेत त्यात वाढ होण्याची शक्यता असल्यामुळे वाढीव भोजन मिळण्याची विनंती केलेली आहे. | |
| ०३ | द्वारकामाई सेवा ट्रस्ट, वृध्दाश्रम, कनकुरी रोड, शिरडी. | ७० | मोफत | १) ट्रस्टला कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही असे त्यांनी सागितले आहे.<br>२) ट्रस्टमार्फत चालविणेत येणा-या वृध्दश्रमात निराधार वयोवृध्द व्यक्तीना प्रवेश देण्यात येतो.<br>३) ट्रस्टने वयोवृध्द व्यक्तीचे निवास व इतर सोयीसाठी ३६ गुंठे जागेत इमारत बांधलेली आहे.<br>४) इमारतीसमोर वृध्द व्यक्तीच्या विरंगुळयाकरीता गॉर्डन बनविले आहे.<br>५) सदर वृध्द व्यक्तीसाठी कपडे, चादर, गादी, बेडशिट, अल्पोपहार व एक वेळ जेवणाचा खर्च ट्रस्ट करते. | मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशान्वये पूर्वीपासून मोफत प्रसाद भोजन चालू असून ही सेवा पुढेही चालू ठेवणे आवश्यक वाटते. |
| | | | | १) सध्या १२० वयोवृध्द असून वयोवृध्द असल्यामुळे त्यांचा आहार अल्प आहे त्यामुळे त्याच्यासाठी ७० व्यक्तीचे एक वेळ भोजनासाठी पुरेसे आहे असे त्यांनी सांगितले | |
| ०४ | पद्मश्रीडॉ.वि.ए.विखे पाटील विद्यालय, बाभळेश्वर (अंध व कर्णबधीर विद्यालय) | १०० सकाळी ५० सायं काळ | मोफत | १) ट्रस्टला कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही असे त्यांनी सांगितले<br>२) अंध व कर्णबधिर विदयार्थ्यांना ५ वी ते १२ पर्यंत शालेय शिक्षण देण्यात येते<br>३) संस्थेच्या मालकी हक्काची इमारत आहे.<br>४) संस्थेमध्ये अंध व कर्णबधिर विदयार्थी संख्या १४६ आहे.<br>५) सध्या प्रसादालयाकडून चालू असलेले भोजन सकाळी १०० व सध्याकाळी ५० असे पुरेशे आहे असे त्यांनी सांगितले | मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशान्वये पूर्वीपासून मोफत प्रसाद भोजन चालू असून ही सेवा पुढेही चालू ठेवणे आवश्यक वाटते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०५ | संत विचारधार वारकरी शिक्षण संस्था,भोजडे,ता.कोपरगाव | ५० | मोफत | १) ट्रस्टला कुठल्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही असे त्यांनी सांगितले.<br>२) संस्थेच्या मालकीची ६ गुंठे बखळ जागा आहे.<br>३) संस्थेच्या दीड गुंठा जागेत पत्राशेड इमारत बांधलेली आहे.<br>४) ट्रस्टमार्फत धर्मिक शिक्षणाची आवड असलेल्या मुलांना सांयकाळी भजन, किर्तन , पख्वाज, पेटी वादन शिक्षण देण्यत येते<br>५) धर्मिक शिक्षणासाठी प्रती मुलाकडून रु.५०००/- स्वरुपात देणगी घेण्यात येते त्यांचा उपयोग पखवाज, पेटी दुरुस्तीसाठी केला जातो असे त्यांनी सांगितले<br>६) सध्य परिसरातील मुलांना धर्मिक आवड असलेल्या ४५ मुलाना शिक्षण देण्यात येते. | मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशान्वये पूर्वीपासून मोफत प्रसाद भोजन चालू असून ही सेवा पुढेही चालू ठेवणे आवश्यक वाटते . |
| ०६ | माऊली मेडीकल रिसर्च फाउडेशन ,गणेशनगर वाकडी माऊली मतिमंद मुलांची निवासी कार्यशाळा वाकडी. | २० | मोफत | १) माऊली मतिमंद मुलांची निवासी कार्यशाळा गणेशनगर वाकडी यांनी दि.१३/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये पाणी नसल्यामुळे शाळा बंद ठेवण्यात आलेली आहे. तेव्हांपासून त्यांनी जेवण नेणे बंद केलेले आहे. | शाळा बंद असल्याने जेवण घेऊन जाणे बंद आहे. |
| ०७ | सबका मालिक एक प्रतिष्ठाण संचलित अनाथालय, शिरडी. | ३२ | मोफत | १) अदयापर्यंत शासकीय अनुदान मिळत नाही<br>२) सर्व समाजातील अनाथ बालकांना आश्रय देऊन त्यांचे शिक्षण व पालन पोषण ट्रस्टमार्फत केले जाते<br>३) अनाथ बालकांना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण देण्यात येते<br>४) सध्या अनाथ मुलांची संख्या ६२ आहे परंतु मुले लहान असल्यामुळे त्यांचा आहार कमी असल्यामुळे ३२ लोकांचे दोन वेळ भोजन त्यांना पुरेसे आहे असे त्यांनी सांगितले. | मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशान्वये पूर्वीपासून मोफत प्रसाद भोजन चालू असून ही सेवा पुढेही चालू ठेवणे आवश्यक वाटते. |
| ०८ | श्री साईश्रध्दा ग्रामीण मुक बधीर विद्यालय ,पिपळवाडी रोड,शिरडी. | ११६ | रु.२२५/- या सवलतीचे दरात | १) शासकीय अनुदान मिळते<br>२) ट्रस्टमार्फत मुकबधिर व कर्णबधिर विदयार्थ्यांना शिक्षण देण्यात येते<br>३) ट्रस्टने विदयार्थ्याचे शिक्षणासाठी शाळा व निवासाकरीता इमारत वांधलेली आहे.<br>४) ट्रस्टमार्फत विदयार्थ्यांना एक वेळ नाष्टा, गणवेष, गादी, चादर, | मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशान्वये पूर्वीपासून सवलतीचे दरामध्ये प्रसादभोजन चालू असून ही सेवा पुढेही चालू ठेवणे आवश्यक वाटते . |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बेडशीट वैदयकीय सेवा पुरविणेत येते<br>५) सध्या संस्थानकडून ११६ विदयार्थ्यांना रु.२२५/- या सवलतीचे दराने दोन वेळचे भोजन पुरविणेत येत आहे. | |

उपरोक्तप्रमाणे शिर्डी परिसरातील अ.नं.१ ते ८ आश्रम शाळांची समक्ष पहाणी करणेत आलेली असून अ. नं.६ ही संस्था पाणी अभावी बंद ठेवण्यात आलेली आहेत .

तरी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्री साई प्रसादालयामार्फत शिर्डी परिसरातील अंध ,अंपग, मुकबधीर, अनाथ, धार्मिक व वारकरी शिक्षण संस्था ,शाळा व वृध्दाश्रमातील वृध्द व्यक्तींना मोफत व सवलतीचे दरात प्रसादभोजन पुरविणेत येते अशा संस्थाची पहाणी अहवाल मा.व्यवस्थापन समितीसामोर अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.३०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- साईप्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.३०** **श्री साईप्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम करुन घेणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून ई-निवीदा मागविणे.**

**प्रस्ताव–** अधिनियम २००४ मधील तरतुद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ (७)**

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम हे उक्ते आऊटसोर्सिंग पध्दतीने तयार करुन घेण्यात येत आहेत. त्यानूसार प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ (७) नूसार, जा.एसएसएस/ वशी/११३९/२०१६ दि.०९/०६/२०१६ अन्वये, मे.स्पीक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.१६ जून-२०१६ ते १५ जुन-२०१७ या कालावधीकरीता दरमहा मजूरी रक्कम रु.१४,४९,९९९/- (अक्षरी रक्कम रु.चौदा लाख एकोणपन्नास हजार नऊशे नौव्यान्व मात्र) सर्व करांसह याप्रमाणे कामाचे कंत्राट(कार्यादेश) देण्यात आलेला आहेत. या कामाची मुदत दि.१५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम करुन घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार असून त्याकामी ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

करीता सदचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आलेला होता. सदरहु विषयावर सविस्तर चर्चा होवून, " श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामीची अंदाजपत्रकीय रक्कम खूपच जास्त आहे. याकरीता सदरहू रक्कम तपासून विवरणासह प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरलेले आहे."

याबाबत इकडील विभागाचे हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोल कामाचा अंदाजपत्रकीय खर्चाबाबत विवरणासह अंदाजे माहीती खालीलप्रमाणे.

| अं.नं. | सन २०१७-२०१८ करीता अंदाजे दरमहा खर्चाचा तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अकुशल कामगार संख्या<br>**१)** प्रतिदीनी साफसफाईकामी अंदाजे १३० कर्मचारी लागतात.<br>१३० X ३६५ X किमान वेतन दर रु.२९४.४७ पै. = १,३९,७२,६०१/- ÷ १२<br>मा.व्य.स.दि.०७/०८/१६ रोजीचे सभेतील विषय क्रं.१८ वरील निर्णय क्रं.४६३ नूसार :-<br>२) सध्या ५० अकुशल वाढपी कर्मचारी हाऊसकीपींग ठेकेदारामार्फत लावणेत येतात.<br>५० X ३६५ X किमान वेतन दर रु.२९४.४७ पै. = ५३,७४,०७८/- ÷ १२ | ११,६४,३८३/-<br><br><br><br>४,४७,८४०/- |
| | कुशल कामगार (सुपरवायझर) संख्या<br>०८ X ३६५ X किमान वेतन दर रु.३२५.२४ पै. = ९,४९,७००/- ÷ १२ | ७९,१४२/- |

| | | |
|---|---|---|
| | मॅनेजर संख्या- ०२ X अंदाजे रु. १५,०००/- प्र.महिना **(**वर्षाकाठी रु.३,६०,०००/-**)** | ३०,०००/- |
| | प्राव्हीडंड फंड**(**एकूण रक्कम रु.२,०६,५६,३७९/-**)*** १३.३६ टक्के ÷ १२ | २,२९,९७४/- |
| | सानूग्रह अनुदान रु. **(**एकूण रक्कम रु.२,०६,५६,३७९/-**)** X ८.३३ टक्के **÷** १२ | १,४३,३९०/- |
| | प्रशासकीय खर्च (सर्व्हीस टॅक्स)<br>सध्याचे दरमहा दिलेले काम प्रती महीना रु.१४,४९,९९९/- X १५% (**सर्व्हीस टॅक्स १४% + इतर टॅक्सेस १**%) | २,१७,४९९/- |
| | **एकूण दरमहा अंदाजे प्रशासकीय खर्च =** | **२३,१२,२२८/-** |
| २ | स्वच्छतेसाठी लागणारे साहीत्य<br>A. मशिनरी भाडे विमा अंदाजे रु. - २०,०००/-<br>B. झाडू**,** कुंचे**,** खराटे इत्यादी रू. - १५,०००/-<br>C. R-1, R-2, R-3, व इतर केमिकल्स रु. - १५,०००/-<br>D. ब्रश**,** वायफर**,** व्हॅक्युम पंप**,** चोकप पंप रू. - १५,०००/-<br>E. कर्मचारी गणवेश**,** बुट**,** कॅप**,** गमबुट इ. रू. - १५,०००/- | ८०,०००/- |
| | **कॉन्ट्रॅक्टर नफासह प्रति महिना अंदाजे खर्च रुपये =** | **२३,९२,२२८/-** |

**(अक्षरी रक्कम रुपये तेवीस लाख ब्यान्नव हजार दोनशे अठ्ठावीस मात्र )**

दि.१६ जून-२०१६ ते १५ जुन-२०१७ या कालावधीकरीता प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्च्छता व पेस्टकंट्रोलचे काम दरमहाचे वरीलप्रमाणे एकत्रित खर्चासह रक्कम रु.१४,४९,९९९/- मध्ये देण्यात आलेले आहे. त्यानूसार वार्षिक रक्कम रु.१४,४९,९९९/-X१२ महिनृे = रु.१,७३,९९,९८८/- इतकी होते. तसेच संस्थान लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून वेळोवेळी मागणी करुन देखील प्रसादालयास ५० कंत्राटी कर्मचारी मिळत नसल्याकारणाने हाऊसकीपींग ई-निविदेतील अटी/शर्तीनूसार व मा.व्य.स.दि.०७/०८/१६ रोजीचे सभेतील विषय क्रं.१८ वरील निर्णय क्रं.४६३ नूसार श्री साई प्रसादालय हाऊसकिपींग ठेकेदार यांचेमार्फत दररोज ५० वाढपी कर्मचारी **(**वेगळा मोबदला देवून**)** कामावर लावणेत येवून भक्तांना प्रसादभोजन सेवा पुरविणेत येत आहे. त्याचा तपशिल सोबत परिशिष्ट अ म्हणून सोबत सादर केलेला आहे.

त्यानूसार पुढील कालावधीसाठी ई-निविदा मागविणे झाल्यास**,** प्रसादालय हाऊसकिपींग **,**स्वच्छता व पेस्टकंट्रोल तसेच वाढपी कर्मचारी पुरविणेबाबत ई-निविदा मागवाव्या लागतील. सन २०१६-२०१७ करीता हाऊसकिपींग कामासाठी रक्कम रु.१,७३**,**९९**,**९८८/- तसेच आऊटसोर्सचे ५० वाढपी कर्मचा-यांचे बिलाची रक्कम रु.५९**,**६२**,**९९५/- असा एकत्रित रक्कम रु.२,३३,६२,९८३/- अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी तेहतीस लाख बासष्ट हजार नऊशे त्र्याऐंशी मात्र इतका खर्च झालेला असून त्यात अंदाजे २५ ते २६ टक्के वाढ धरता सन २०१७-२०१८ करीता रक्कम रु.२,९२,०३,७२९/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरची रक्कम ही ई-निविदा प्रक्रियेत कमी-जास्त देखील होवू शकते, असे मत आहे.

**मागणी:-** प्रास्तविक नूसार दिनांक १६/०६/२०१७ ते १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम तसेच दररोज ५० वाढपी कर्मचारी हे आऊटसोर्सींग पध्दतीने घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून, ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान:- आर्थिक**

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:-** श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे कामाची मुदत दिनांक १५/०६/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम तसेच दररोज ५० वाढपी कर्मचारी आऊटसोर्सींग पध्दतीने पुरविणेकामी दि.१६/०६/२०१७ ते दिनांक १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.२**,**९२**,**०३**,**७२९/- अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी ब्यान्नव लाख तीन हजार सातशे एकोणतीस मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

तरी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम तसेच हाऊसकिपींग ठेकेदारामार्फत दररोज ५० वाढपी कर्मचारी आऊटसोर्सींग पध्दतीने कामावर घेणेकामी दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे मजुरी रक्कम रु.२,९२,०३**,**७२९/- अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी ब्यान्नव लाख तीन हजार सातशे एकोणतीस मात्र**)** मात्रचे खर्चास मंजूरी मिळणेकामी व मान्यतेतर

जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ऑनलाईन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ फेरसादर.

**निर्णय क्र.३०७** **यावर सविस्तर चचा्र होऊन, दिनांक १६/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणे तसेच हाऊसकिपींग ठेकेदारामार्फत दररोज ५० वाढपी कर्मचारी आऊटसोर्सीग पध्दतीने कामावर घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,९२,०३,७२९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- साईप्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.३१** **मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये साईभक्तांचे इच्छेनुसार व प्रती ताटास येणाऱ्या उत्पादन शुल्कानुसार एका दिवसाचा एकत्रित आकार घेऊन, देणगीची रक्कम स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम** 2004 **मधील तरतुद-** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 14(2-घनुसार ( भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे तसेच21(1-घ( नुसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**मा व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.**:- मा.व्यवस्थापन समिती दि.05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.161

**प्रस्ताविक-** मा.व्यवस्थापन समिती दि.31/03/2007 चे सभेतील निर्णय क्रं.249(4) नुसार साईभक्तांचे इच्छेनुसार स्वतचे अथवा नातेवाईकांचे वाढदिवस.,किंवा पुर्वजांच्या स्मृती प्रित्यर्थ अथवा अन्य कारणास्तव एका दिवसाचा एकत्रित आकार भरुन प्रसादालयामध्ये भोजन घेणा-या भक्तांना मोफत प्रसादभोजन देणेकामी योजना सुरु केलेली आहे .

संदर्भिय अं.नं.१ मा.व्यवस्थापन समिती दि.05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.161 नुसार खालील मुद्यांना मान्यता देण्यात आलेली आहे.

1) श्री रामनवमी, श्री गुरुपोर्णिमा, श्री पुण्यतिथी उत्सव कालावधीमध्ये साईभक्तांचा देणगी देण्याचा आग्रह असल्यामुळे एक किंवा अनेक भक्तांकडून एक दिवसासाठी अंदाजेरु.8,00,000/- किंवा त्यापेक्षा जास्त मोफत भोजन योजनेअंतर्गत देणगी स्विकारणेस मान्यता मिळालेली आहे.

2) उत्सवाव्यतिरिक्त वर्षातील कालावधीतील एक दिवसासाठी एक किंवा अनेक भक्तांकडून किमान रु.50,000/-अंदाजे रु.4,00,000/- मोफत भोजन योजनेअंतर्गत देणगी स्विकारणेस मान्यता देण्यात आलेली आहे. सुधारीत मोफत प्रसादभोजन योजनेची साईभक्तांना माहीती मिळावी म्हणून संस्थानचे विविध ठिकाणी फलक लावणेस व वेबसाईटवर प्रसिध्द करणेस मान्यता मिळालेली असून अशा स्वरुपाचे बोर्ड संस्थान परिसरात लावणेत आलेले आहेत.

3) उत्सव कालावधीत साईभक्तांना मोफत भोजन योजनेअंतर्गत मोफत भोजन देणेकामी देणगी अपुरी पडल्यास अथवा देणगी जमा नसल्यास साईभक्तांची प्रसादभोजन व्यवस्था संस्थान मार्फत मोफत करणेस मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८२० नूसार दि.०१ जानेवारी २०१७ पासून भक्तांना श्री साई प्रसादालयात जनरल हॉलमध्ये मोफत भोजन देण्यात येत आहेत.सदर प्रसादभोजन बनविणेकामी किराणा माल, भाजीपाला, गॅस, कर्मचारी पगार व इतर अनुषंगीक खर्चासह प्रति ताटास अंदाजे रु.२५/- इतका उत्पादन खर्च येत आहे. परंतू प्रौढास रु.१०/- व लहान मुलास रु.५/- इतका नाममात्र दर घेवून प्रसादभोजन देण्यात येते. तसेच मोफत प्रसादभोजन योजनेत देणगी जमा केल्यानंतर त्या रकमेमधून रु.१०/- व रु.५/- ने आकारणी करणेत येवून वजावट करणेत येते. (उदा. एखाद्या भक्ताने मोफत प्रसादभोजन योजनेत रु.५०,०००/- देणगी जमा केली तर रु.५०,०००/- ÷ रु.१०/- = ५००० भक्तांना मोफत प्रसादभोजन देण्यात येते.) व उर्वरीत रक्कम (ताटाचा खर्च अंदाजे रु.२४/- ते २५/- ) वजावट करुन संस्थान मार्फत चारिटी दिली जात होती.

मा.व्य.समिती दि.०४/०४/२०१७ रोजीचे अंदाजपत्रकीय सभेमध्ये मा.अध्यक्ष साहेब यांनी मोफत प्रसादभोजन योजनेची माहीती घेतली व मोफत भोजन योजनेअंतर्गत देणगी घेतांना किमान रु50,000/- चे पुढे किंवा संपुर्ण एका दिवसासाठी रु.४,००,०००/- ऐवजी किमान रु.१०,००,०००/- (अक्षरी रु.दहा लाख मात्र), उत्सव कालावधीत रु.८,००,०००/- ऐवजी रु.१५,००,०००/- (अक्षरी रु.पंधरा लाख मात्र) रक्कम घेण्यात यावी व सदरची रक्कम वजावट करतांना उत्पादन शुल्क (रु.२५/-) प्रमाणे वजावट करणेत यावी. (उदा. एखाद्या भक्ताने

मोफत प्रसादभोजन योजनेत रु.५०,०००/- देणगी जमा केली तर रु.५०,०००/- ÷ रु.२५/- = २००० भक्तांना प्रसादभोजन देण्यात यावे.) असे निर्देश दिलेले आहे. तसेच प्रसादालय विभाग, मंदीर विभाग, संरक्षण विभाग व जनसंपर्क विभाग यांनी सदर योजनेकामी साईभक्तांना प्रोत्सोहीत करण्यात यावे असे सुचविले आहे.

**मागणी**:- प्रसादभोजन तयार करणेकामी अंदाजे रु.२५/- इतका खर्च येत असल्याने, मोफत भोजन योजनअंतर्गत देणगी स्विकारतांना किमान रु.50,000/- चे पुढे किंवा संपुर्ण एका दिवसासाठी किमान रु.१०,००,०००/- (अक्षरी रु.दहा लाख मात्र), उत्सव कालावधीत रु.१५,००,०००/- (अक्षरी रु.पंधरा लाख मात्र) इतकी रक्कम घेण्यात यावी व सदरची रक्कम वजावट करतांना उत्पादन शुल्क रु.२५/- प्रमाणे वजावट करणेत यावी. (उदा. एखाद्या भक्ताने मोफत प्रसादभोजन योजनेत रु.५०,०००/- देणगी जमा केली तर रु.५०,०००/- ÷ रु.२५/- = २००० भक्तांना प्रसादभोजन देता येईल ) व **त्यानूसार खालीलप्रमाणे फलेक्स बोर्ड तयार करुन संस्थान परिसरात, दर्शन रांगेत तसेच संस्थानचे वेबसाईटवर प्रसिध्द करता येइूल.**

**साईभक्तांसाठी नम्र आवाहन**

**मोफत प्रसादभोजन योजना**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, चे मार्फत सर्व साईभक्तांचे सहर्ष स्वागत.

साईभक्त स्वत: अथवा नातेवाईकांचा वाढदिवस किंवा पुर्वजांच्या स्मृती प्रित्यर्थ अथवा अन्य कारणास्तव संस्थान विश्वस्तव्यवस्थेने ठरविलेली रक्कम जमा केल्यास श्री साईबाबांना नैवेद्य अर्पण करुन साईभक्तांना प्रसादालयात मोफत प्रसाद भोजन देण्याची व्यवस्था करणेत येत आहे. मोफत प्रसादभोजनची कुपन्स साईभक्तांना प्रसादालयात वाटप करणेत येतील.

मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत **प्रति दिवसासाठी** खालीलप्रमाणे देणगी स्विकारण्यात येईल.

**श्री रामनवमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव, श्री पुण्यतिथी) दसरा (उत्सव कालावधी- रु.15,00,000/-**
**वर्षातील इतर कालावधीसाठी -रु.10,00,000/-**

सदर देणगी एकाच भक्ताकडून अथवा त्यापेक्षा अधिक साईभक्त मिळून एकत्रितपणे स्विकारली जाईल. दानशूर देणगीदार भक्तांची नांवे प्रसादभोजनाचे दिवशी प्रसादालयामध्ये बोर्डवर प्रसिध्द करण्यात येतील. ज्या दानशूर साईभक्तांना मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये सहभागी होण्याची इच्छा असेल अशा साईभक्तांनी संस्थानचे श्री साई प्रसादालय कार्यालयामध्ये संपर्क साधावा ही विनंती तसेच याकामी आपले इच्छेप्रमाणे देणगी देणे असल्यास तीही स्विकारली जाईल.

**APPEAL TO SAI DEVOTEES**

**Free Prasad Bhojan Scheme**

**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi warmly welcome's to all Sai Devotees.**

The Management committee has decided to give Prasad Bhojan free of cost to all Sai Devotees by accepting donations in the memory of their family Members/relatives or Birthday or any specific reason. On that day Naivedya will be offered to Lord Shri Sai and Free Prasad Bhojan coupons will be distributed to the devotees in the Prasadalaya.
Following are the details of donation for **One day** Free Prasad Bhojan scheme.

**Period Amount Rs.**

**1) For the Festival of Shri Ramnavmi,Shri Gurupornima, and Shri Punyatithi (Dassera) - Rs.15,00,000/-**

**2) For the other days, throughout the year.**
**- Rs.10,00,000/-**

Donor can donate individually or in the group.

On the Naivedya day, donor(s) name will be displayed at Prasadalaya's notice board. Desirous Sai devotees for free Prasad Bhojan Yojana Scheme are requested to contact Shri Sai Prasadalaya Office.

**EXECUTIVE OFFICER**

Contact No.:- (02423) 259051, 259052, 259053

**SHREE SAIBABA SANSTHAN TRUST,SHIRDI**

**विभागाचा अभिप्रायस्वष्ट मत/** :- मागणीत नमदू केलेप्रमाणे मोफत प्रसादभोजन योजनअंतर्गत देणगी स्विकारतांना एका भक्ताकडून अथवा अनेक भक्तांकडून किमान रु.50,000/- चे पुढे किंवा संपुर्ण एका दिवसासाठी किमान रु.१०,००,०००/- (अक्षरी रु.दहा लाख मात्र) व उत्सव कालावधीत रु.१५,००,०००/- (अक्षरी रु.पंधरा लाख मात्र) इतकी रक्कम स्विकारणेस तसेच देणगी स्विकारलेनंतर सदरची रक्कम वजावट होतांना प्रति ताटास येणारा उत्पादन शुल्क अंदाजे रु.२५/- प्रमाणे आय.टी.विभागामार्फत साफ्टवेअरमध्ये बदल करुन वजावट होणेस मान्यता मिळणेकामी तसेच वरीलप्रमाणे फ्लेक्स बोर्ड तयार करुन संस्थान परिसरात, दर्शन रांगेत तसेच संस्थानचे वेबसाईटवर प्रसिध्द करणेस सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये साईभक्तांचे इच्छेनुसार व प्रती ताटास येणाऱ्या उत्पादन शुल्कानुसार एका दिवसाचा एकत्रित आकार घेऊन, देणगीची रक्कम स्विकारणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये साईभक्तांकडून उत्सव कालावधीकरीता रु.१५,००,०००/- मात्र, गुरुवार, शनिवार, रविवार या दिवसांसाठी रु.१०,००,०००/- मात्र व इतर दिवशी रु.५,००,०००/- मात्र रक्कम आकारणेत यावी.**

**तसेच याची माहिती साईभक्तांना मिळणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फलक तयार करुन ते संस्थान परिसरात/ दर्शन रांगेमध्ये/ इतर गर्दीच्या ठिकाणी लावणेत यावे व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- साईप्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.३२** **संस्थानमधील निरुपयोगी भंगार साहित्याची विक्री/विल्हेवाट लावणेकामी मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम २००४ मधील तरतूदः-** महाराष्ट्र अधिनियम २००४ मधील कलम १७ (४) व कलम १४(२) (ग) नुसार संस्थानमधील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्याची विक्री करणे.

**मा.व्यवस्थापन समितीचे ठराव व निर्णय-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०२.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७९ नुसार कार्यवाही करणे.

**मा.महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग मान्यता-** संदर्भीय १ चे पत्राने विधी व न्याय विभागाकडील संस्थानमधील दैनंदिन वापरामुळे जमा होणा-या निरूपयोगी साहित्याची वार्षिक उच्चत्तम दराने विक्री करणेसाठी मान्यता घेतलेली आहे.

**प्रस्तावीकः-** संस्थानचे इतर विभागाकडील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी सादिल स्वरूपाचे भंगार साहित्याची अभिलेख कक्ष विभागामार्फत वार्षिक उच्चत्तम दराने विक्री करणेत येत आहे. संदर्भीय ०३ चे आदेशाने मागील सन-२०१६-१७ या आर्थिक वर्षातील दैनंदिन वापराने जमा झालेल्या भंगार साहित्याची विक्री करावयाची मुदत दि.३१.०३.२०१७ रोजी संपुष्टात येत आहे.

त्यानुसार दि.०३.०१.२०१७ रोजी इकडील कार्यालयाचे आर्थिक वर्ष सन-२०१७-१८ मध्ये भंगार साहित्याचे विक्रीकामी ई-निविदा मागविणेसाठी प्रस्तावीत मसूदयास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा विषय दि.१४.०१.२०१७ रोजी सभाकामकाज विभागाकडे पाठविला होता. जि.प./महानगरपालीका निवडणूक आचारसंहितेमुळे व्यवस्थापन मंडळाची सभा न झाल्यामुळे सदरचा विषय दि.२५.०२.२०१७ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्र.७९ नुसार मंजूर झालेला आहे. त्यामुळे यात सुमारे दोन महिन्याचा कालावधी गेल्याने वेळेत प्रक्रीया पुर्ण करता आली नाही.

या विभागाकडून ई-टेंडर जाहीरात व वर्तमानपत्रातील जाहीरात प्रसिध्दीकामी दि.०६.०३.२०१७ चे मंजूर टिपणीनुसार जनसंपर्क कार्यालयाकडे पाठविणेत आलेली आहे ई-निविदा प्रक्रीयेतून दर निश्चिती होणेस कालावधी लागणार आहे. त्यामुळे सर्व विभागाकडे दैनंदिन वापराने जमा होणा-या साहित्यामुळे (उदा.कॅन्टीन विभागाकडील रिकाम्या दुधाच्या पिशव्या, तेलकट / खराब पुठ्ठा, निर्माल्य तेल, साईप्रसादालय विभागाकडील रिकामे तेला-तूपाचे डबे, बारदान गोण्या, औषधाचे रिकामे प्लॅास्टिक ड्रम व इतर नित्याने जमा होणा-या निरूपयोगी साहित्याचे साठवणूकीमुळे दुर्गंधी सुटणे , त्यापासून सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे साहित्य साठविणेकामी सध्या संस्थानकडे बंदीस्त जागाही उपलब्ध नाही.

सध्याचे मार्केटमधील दर व मागील वर्षातील मंजूर दर यांची तुलना करता दरामधील वाढ कमी-अधिक प्रमाणात झालेली दिसते आहे. भंगार साहित्य हे ज्या त्या विभागाकडे जमा असते. मागील सन-२०१६-१७ वर्षीचे मंजूर दराने असे भंगार साहित्य विक्री करतांना प्रत्यक्ष मोजदाद झालेनंतरच त्या साहित्यातून संस्थानला किती रक्कम जमा होणार, हे निश्चित होते. सन-२०१५-१६ व २०१६-१७ या आर्थिक वर्षातील मंजूर दराचा आढावा

घेतला असता दैनंदिन ज्या वस्तू मोठया प्रमाणात विक्रीसाठी जमा होतात ( तेलातूपाचे चांगले डबे, तेलातूपाचे खराब डबे, गंजललेे/ फुटलेले चांगले डबे तसेच खराब डबे, मूर्तीवर वाहीलेले निर्माल्य तेल, खोक्याचा चांगला पुठ्ठा, खराब पुठ्ठा, रंगीत रद्दी वगैरे) त्यांची एकूण विक्री सरासरी इतर भंगार वस्तूंच्या तुलनेने सन-२०१५-१६ च्या दरापेक्षा सन-२०१६-१७ चे दर जास्त असलेचे आढळून आले आहे. सबब यामध्ये संस्थानचे आर्थिक नुकसान होत नाही.

उन्हाळयाचे सुटीमुळे साईभक्तांची गर्दी वाढण्याची शक्यता असलेने सुरक्षिततेच्या दृष्टीने अशा साहित्याची वेळीच विल्हेवाट लावणे क्रमप्राप्त आहे.

**यासंदर्भात संबंधीत व्यापा-यांना मागील वर्षात देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये सन-२०१७-१८ वर्षाचे दर प्राप्त होईपावेतो, आहे त्याच मंजूर दराने भंगार साहित्यविक्री करता येईल.**

**मागणीः-**

अ) भंगार साहित्य विक्रीची मुदत दि.३१.०३.२०१७ रोजी पुर्ण होत असलेने तसेच चालू आर्थिक वर्ष सन-२०१७-१८ साठी Online ई-निविदा मागविणेसाठी मा.व्यवस्थापन समिती दि.२५.०२.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७९ चे मान्यतेनुसार पुढील प्रक्रीयेत वार्षिक उच्चत्तम दर मान्य होणेस अजून अंदाजे दीड ते दोन महिन्याचा कालावधी जाण्याची शक्यता असलेने भंगार साहित्य साठवून न ठेवता प्रस्तावीक केलेप्रमाणे संस्थान कामाचा खोळंबा होवू नये, याकरीता मागील सन-२०१६-१७ वर्षात मंजूर झालेले भंगार साहित्य, चालू वर्षातील (सन-२०१७-१८ वर्षातील) उच्चत्तम दर प्राप्त होईपावेतो व्यापा-यांना आहे त्याच मंजूर दराने उचलणेबाबत पत्राने कळविता येईल, तसेच संस्थानचे सर्व विभागांना त्याबाबतचा आदेश पारीत करता येईल, त्यास मान्यता असावी.

ब) जर संबंधीत व्यापा-याने त्याचे साहित्य मागील मंजूर दराने उचलणेस असमर्थता दर्शविल्यास मागील वर्षातील ०५ व्यापा-यांपैकी दुसरा कुणी व्यापारी उत्सुक असल्यास त्यांचेकडून लेखी प्रतिज्ञापत्र घेवून त्या व्यापा-यास आहे त्याच मंजूर दराने व त्याच अटी-शर्तीस अधिन राहून विक्री करणेस परवानगी देता येईल, त्यास मान्यता असावी.

**अभिप्राय/मतः-** करिता मागील मंजूर दरधारकांना दुरध्वनी करून सन-२०१६-१७ मधील त्यांना मंजूर असलेले साहित्य आहे त्याच दराने खरेदी कामी विचारणा करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे त्यांचे लेखी संमतीपत्र घेता येईल.

सबब सन-२०१७-१८ मधील ई-निविदेतील निरूपयोगी भंगार साहित्य विक्रीचे नवीन दर प्राप्त होईपावेतो संदर्भ क्र.३ चे आदेशाप्रमाणे आहे त्याच दराने, भंगार साहित्य विक्री करणेकामी मुदतवाढ मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या विविध विभागामध्ये जमा होणारे निरुपयोगी, भंगार साहित्य विक्री करणेकामीची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन, नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत सन-२०१६-१७ मधील मागील मंजूर दराने, आहे त्याच अटी/ शर्तीवर सदरहू निरूपयोगी, भंगार साहित्य विक्री करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष)

---

**विषय नं.३३** **श्री साईप्रसादालयासाठी डिश वॉशर व भांडी धुणेकरीता २५% लिक्वीडसोप खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव–** साईप्रसादालय विभागाकरीता भांडे धुण्यासाठी लिक्वीडसोपची वार्षिक खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.५,४०,०००/- (अक्षरी रु. पाच लाख चाळीस हजार) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.२८.१२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६३७ नुसार मान्यता मिळालेली होती.

सदरचे लिक्वीड सोपसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन लिक्वीड सोप खरेदीकामी अनुक्रमे जा.नं.एसएसएसएस/ वशी-खरेदी/३२६८/३२६९/२०१६ दि.२४.०९.२०१६ अन्वये एकूण रक्कम रु.२,९१,३७५/- मात्रचे रकमेचे पुरवठा आदेश दोन पुरवठाधारकांना देण्यात आलेले होते.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | मागणी | सर्व कर समावेशक दर | एकूण रुपये | २५ % मागणी | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | मे. स्टारवींन परफेक्ट मॅन्यु कंपनी, मुंबई | ७,५०० लिटर | ३४.८५ | २,६१,३७५/- | १,८७५ लिटर | ६५,३४४/- |
| २. | मे. ब्ल्यु ओशन क्लिनींग सोल्युशन्स, मुंबई | ३,००० लिटर | १०.०० | ३०,०००/- | ७५० लिटर | ७,५००/- |

उपरोक्त दोन्ही पुरवठाधारकांनी पुरवठा आदेशाप्रमाणे लिक्वीडसोपचा पुरवठा पुर्ण केलेला आहे.

साईप्रसादालय विभागाने दि.०२.०३.२०१७ रोजीचे टिपणीने लिक्वीडसोपची मागणी केलेली होती. याकामी संबंधित पुरवठाधारकाशी झालेले करारनाम्यात अट क्रं.९ प्रसंगी निविदा कालावधीत व तदनंतरही पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो वर नमुद केलेल्या सोपपेक्षा २५% इतका जादा सोप मंजूर दरानेच पुरविणे पार्टी नं.02 यांचेवर बंधनकारक राहील, अशी तरतूद आहे.

वरील अटी-शर्तीनुसार लिक्वीडसोप (मॅन्युयल वापराचे) खरेदीसाठी मे. स्टारवींन परफेक्ट मॅन्यु कंपनी, मुंबई यांना १८७५ लिटर मंजूर दर प्रती लिटर रु.३४.८५ पैसे दराने खरेदीकामी येणारे रक्कम रु.६५,३४४/- मात्रचे खर्चास व लिक्वीडसोप (डिशवॉश मशिन वापराचे) खरेदीसाठी मे.ब्ल्यु ओशन क्लिनींग सोल्युशन्स, मुंबई ७५० लिटर मंजूर दर प्रती लिटर रु.१०/- दराने खरेदीकामी येणारे रक्कम रु.७,५००/- असे मिळून एकूण रक्कम रु.७२,८४४/- (रु.बहात्तर हजार आठशे चव्वेचाळीस) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी हा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.३१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३४** **खाते चौकशी अधिकारी श्री.जे.एल.देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांचे मानधनाबाबत.**

**प्रस्ताव–** <u>**अधिनियम २००४ तरतुद–**</u> कलम २ खंड (झ) विनियम याचा अर्थ समितीने या अधिनियमान्वये समितीने केलेले विनियम असा आहे. कलम १५ पोटकलम २ समितीने इतर अधिकारी व कर्मचारी हे विनियमाद्वारे ठरविण्यात येतील अशा सेवेच्या अटी व शर्तीवर नेमण्यात येतील.

<u>**सेवाविनियमातील तरतुद–**</u> शिस्त आणि अपिल विनियम २०१३ मधील विनियम ८ उपविनियम (१) शक्यतो विनियमात किंवा विनियम ९ मध्ये नमुद केलेल्या पद्धतीने चौकशी केल्याशिवाय मोठ्या दंडात्मक कारवाया लादण्याचे आदेश पारित केले जाणार नाहीत.

विनियम ८ उपविनियम (२) जेव्हा संस्थानच्या कर्मचा-याविरुद्धच्या दुराचरण किवा गैरवर्तन या आरोपासंबंधीच्या सत्याची चौकशी करण्यास कारणे आहेत असे शिस्तभंग प्राधिका-याचे मत असेल तर ते स्वतः या संबंधी चौकशी करतील किवा त्या संबंधिच्या सत्याबद्दल चौकशी करण्यासाठी या विनियमाखाली चौकशी प्राधिका-याची नियुक्ती करता येईल.

स्पष्टीकरण – जेव्हा सदर विनियमाखाली शिस्तभंग प्राधिकारी स्वतः चौकशी करतील तेव्हा चौकशी प्राधिका-याचा सदर विनियमात केलेला उल्लेख, जर संदर्भासाठी इतर कोणत्याही गोष्टीची आवश्यकता नसेल तर, म्हणजे शिस्तभंग प्राधिका-याचा उल्लेख असे समजले जाईल.

<u>**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.-**</u>

१) दि. ०५/०५/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं. ०६ निर्णय क्र. १४८
२) दि. २८/०५/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं. ०७ निर्णय क्र. १५६
३) दि. २४/०६/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं. ०५ निर्णय क्र. १९२
४) दि. १६/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं. १० निर्णय क्र. ५१९
५) दि. ३०/११/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं. ०९ निर्णय क्र. ८५२- प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मा. श्री.जे.एल. देशपांडे साहेब सेवानिवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधीश, पुणे यांचे विनंती पत्राचा विचार करता, त्यांना डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांच्या खाते चौकशीचे कामकाज पुर्ण करणेसाठी यापुढे जास्तीत जास्त १० बैठकांसाठी पुर्वीचेच अटी / शर्ती व मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.

तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील निलंबीत डॉक्टर्स/ इतर स्टाफ यांची यादी सर्व मा. सदस्यांना देण्यात यावी अशा सुचना दिल्या.

<u>**प्रास्ताविक–**</u> डॉ. हरिष हुकूमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा हे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ह्रदयरोगतज्ञ या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी कॅथलॅबमध्ये पेशंटसाठी वापरण्यात येणारे स्टेंट, बलुन व इतर साहित्यांचा वापर करणेकरीता बेकायदेशिररित्या विविध कंपन्यांकडून पैसे घेतलेले आहेत. तसेच रुग्णांच्या प्रोसिजर्स व औषधोपचारामध्ये अनियमितता, निष्काळजीपणा केलेला आहे. या अशा व इतर अनेक तक्रारी आल्याने त्यांची प्राथमिक चौकशी करुन त्यात ते दोघेही सकृतदर्शनी दोषी आढळून आल्याने त्यांना दि. ०८/११/२०१४ पासून तात्पुरते सेवा निलंबीत करुन त्यांची खाते चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला. डॉ.

बजाज व डॉ. वर्मा यांचे खाते चौकशी कामी खाते चौकशी अधिकारी नेमणेबाबत दि. ०५/०५/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. १४८ नुसार समितीने असा निर्णय घेतला आहे की, चौकशी अधिकारी यांना खातेनिहाय चौकशीच्या प्रत्येक तारखेस रु. ५,०००/- मात्र प्रवासभत्ता व आहार भत्ता तसेच इतर खर्च म्हणून देण्यात यावेत. चौकशी अधिकारी यांना सदरहू चौकशी लवकरात लवकर पूर्ण करावी अशी विनंती करण्यात यावी व मानधनापोटी प्रत्येक तारखेस जास्तीत जास्त रू. ७५००/- मात्र देण्यात यावेत. परंतु पुढे असेही ठरले की त्यांना मानधन रु. ७,५००/- प्रमाणे रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही. २० तारखांपेक्षा जास्त तारखा चौकशी कामी पडल्यास त्यांना प्रवासभत्ता व आहार भत्ता व इतर खर्चापोटी रु. ५,०००/- मात्र देता येईल. मा.त्रिसदस्य समितीने पुढे असेही ठरवले की,चौकशी अधिकारी म्हणून निवृत्त सरकारी अधिकारी किवा निवृत्त जिल्हा न्यायाधीशांची नेमणूक करावी व त्यांचेकडे प्रथम उपरोक्तप्रमाणे मानधन व खर्च देण्यास संस्थान तयार आहे, असे सांगून ते चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक आहेत काय, अशी विचारणा करावी व इच्छूक असल्यास संबंधितांकडून तसे लेखी पत्र देण्यात यावे असे ठरले.

त्यानंतर चौकशी अधिकारी यांना वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ ह्यदयरोगतज्ञ यांची सहाय्यक म्हणून नेमणूकीबाबत प्रस्ताव दि. २८/०५/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर निर्णय क्र. १५६ नुसार डॉ. हरिष हुकूमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट यांचे खाते चौकशीकामी निवृत्त प्रधान जिल्हा न्यायाधीश श्री.जे. एल. देशपांडे, पुणे यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेकामी पत्र देऊन त्यांना विचारणा करण्यात यावी.

श्री.जे.एल.देशपांडे यांचे दि ०५/०६/२०१५ रोजीचे संमतीपत्र व मानधन मागणीबाबतचा प्रस्ताव दि. २४/०६/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर निर्णय क्र. १५६ नुसार मा. श्री. जे.एल.देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांनी केलेली विनंती मान्य करण्यात येऊन, सदरहूकामी त्यांना तात्काळ आदेश देण्यात यावा. तसेच त्यांनी मागणी केलेला आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक/ स्टेशनरी याबाबी पुरविणे व सदरहू चौकशी कामी येणा-या रु. ५०,०००/- मात्र वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.

श्री.जे.एल.देशपांडे यांनी मानधनाचे संदर्भात २० तारखा अथवा जास्तीत जास्त रु. २,००,०००/- ही मर्यादा रद्द करणेबाबत दि. १२/०६/२०१६ रोजीचे अर्जावर दि. १६/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. ५१९ प्रमाणे खाते चौकशी अधिकारी श्री. जे.एल.देशपांडे, पुणे यांचे मानधनाबाबतच्या प्रस्तावास तत्कालीन त्रिसदस्य समितीचे अध्यक्ष व सदस्य याची चक्रीय पद्धतीने मान्यता घेण्यात आली. त्यांची नोंद घेत असताना समितीने असे ठरवले की, श्री. जे.एल. देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांना डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे चौकशी कामी पुढील जास्तीत-जास्त १० बैठकीमध्येच चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल सादर करावा, अशी विनंती करणेत यावी असे ठरले. त्यानुसार त्यांना दि. ०८/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेले आहे. ६० बैठकांचे रु. ६,६५,०००/- मानधन व प्रवासभत्ता अदा करण्यात आलेला असुन आतापर्यंत चौकशीकामी ७१ तारखा झालेल्या आहेत.

<u>**मागणी–**</u> श्री.जे.एल.देशपांडे यांनी दि १९/०२/२०१७ रोजीचे अर्जान्वये दि. ०८/०२/२०१७ रोजीचे पत्रास अनुसरुन, वैद्यकीय अधिका-यांचे चौकशीचे काम अंतिम टप्प्यात असुन डॉ.वर्मा यांचा जबाब नोंदविणेचे काम झाले आहे. तर डॉ. बजाज यांचा जबाब नोंदविणेचे काम चालु असुन संस्थानचे वकीलांकडून उलटतपास ५ बैठकांमध्ये देखील पुर्ण झाला नाही. तो लवकर संपेल अशी अपेक्षा आहे. त्यानंतर दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकून प्रकरण आदेशकामी नेमण्यात येईल. दरम्यान आमचे विनंतीप्रमाणे दि. ३०.११.२०१६ रोजीचे मा.कार्यकारणीचे ठरावाप्रमाणे जास्तीचे १० बैठकांचे मानधन व प्रवासभत्ता अनुदान मंजूर करण्यात आले होते. परंतु ती मर्यादा बैठक क्र. ६३ दि. २२.१०.२०१७ रोजी संपली आहे. वर नमुद केलेप्रमाणे डॉ. बजाज ह्यांचा जबाब नोंदविणे व युक्तीवाद ऐकणेकामी बैठका होतील तसेच चौकशीचे कामकाजात दाखल कागदपत्रांची संख्या बरीच जास्त असुन कागदपत्रांचे ०६ गठ्ठे झाले आहेत. तोंडी पुरावा कागदपत्रे बरीच आहेत. ते कागदपत्र तपासणे, जुळणी करुन वाचन करणे व अहवाल टंकलिखीत करणे ह्याकामी देखील शिर्डी येथे येणे आवश्यक आहे. वरील परिस्थितीत १० वाढीव बैठकांनंतर पुढील १० बैठकांचे मानधन व आदेश दाखल करेपर्यंत प्रवासभत्ता अनुदान वाढवून मिळावे. वरील बाब शक्य नसेल तर नंतर वाढीव बैठकांनंतर चौकशी अहवाल दाखल करेपर्यंत अनुदान चालु ठेवावे. ह्यापुढे मानधनाकरिता वाढीव मागणी आमचेकडून होणार नाही. तथापि, प्रवासभत्ता अनुदान अहवाल सादर करेपर्यंत चालु ठेवण्यात यावा.

**संस्थान अधिनियम/ ठरावानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** पुढील १० चौकशी तारखांकरिता फक्त प्रवासभत्ता दिल्यास आर्थिक अनुमान रु. ५०,०००/-.

**विभागाचा अभिप्राय स्पष्ट मत-** श्री.जे.एल. देशपांडे सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांना चौकशी अधिकारी म्हणून प्रति चौकशी करीता मानधन रु. ७,५००/- व प्रवास खर्च व इतर खर्च रु. ५,०००/- असे एकूण रु. १२,५००/- देण्यात येत आहे. दि. ३०/११/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ८५२ नुसार १० बैठकींची मुदत संपलेली आहे. तरी त्यानंतर होणा-या बैठकीला मानधन न देता फक्त प्रवास व इतर खर्च रु. ५०००/- देता येईल, असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे खाते चौकशी अधिकारी श्री.जे.एल.देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे यांना यापुढे होणाऱ्या प्रत्येक बैठकीसाठी प्रवास व इतर खर्च यासाठी रु.५०००/- मात्र रक्कम देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३५** **संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या जादा वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणे.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा.व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक-** खालील संस्थान कर्मचा-यांची रु.२०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | श्री.दिपक सुर्यकांत लोखंडे<br>विभाग-लेखाशाखा हॉस्पिटल<br>हुद्दा- लिपीक टंकलेखक | आई | Diabetes & Blood Presure | डॉ.जाधवर | साईबाबा हॉस्पिटल | ३११४.०० | ३११४.०० | |
| | | | | | **एकूण** | **३११४.००** | **३११४.००** | |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| २ | श्री.सुभाष मल्हारी बंदावणे<br>विभाग-ध्वनिक्षेपण<br>हुद्दा- पर्यवेक्षक | मुलगा | Renal Transplant | डॉ.देसाई/ जाधवर | रुबी हॉल क्लिनिक,पुणे | ४२४५२.०० | ४२४५२.०० | अ.नं.२ ते ०५ करीता सदरचे उपचार हे संस्थानच्या रुग्णालयात होत नसलेमुळे संस्थानच्या मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पाठविणेत आले आहे. |
| ३ | श्री.बाबासाहेब काशिनाथ थेटे<br>विभाग-द्वारावती<br>हुद्दा – मदतनीस | स्वतः | Ca | डॉ.देवरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | ७०३९१.०० | ५५४८१.०० | |
| ४ | श्री.अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग-आय.टी.आय.<br>हुद्दा – शिक्षक | स्वतः | (CRF) | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल,नाशिक | २०२७८३.०० | १८८३०५.०० | |
| ५ | श्री.कुलभैया शेषराव राधाकृष्ण<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-लॅब टेक्नीशियन | वडिल | Ca | डॉ.जाधवर | क्युरी मानवता कॅन्सर सेंटर,नाशिक | ४६९४५.०० | ४२६२५.०० | |
| | | | | | **एकुण** | **३६२५७१.००** | **३२८८६३.००** | |
| | **अ + ब एकूण** | | | | | **३६५६८५.००** | **३३१९७७.००** | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.३३१९७७/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन काही औषधे औषध भांडार विभागात उपलब्ध नव्हती तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले.तसेच सदर ठिकाणी फोनद्वारे चौकशी करुन उपचार घेतलेले खात्री करुन घेतली व सदर पडताळणी करुन घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३१२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.३६ **श्री. ताराचंद नाना शेजवळ यांचे वैद्यकिय बीलाचा परतावा मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** श्री.ताराचंद नाना शेजवळ, हुद्दा- वाहन चालक, विभाग- वाहन विभाग यांनी त्यांचे दि.०८/०२/२०१७ रोजीचे विनंती अर्जान्वये त्यांचा मुलगा चि. सुरज याचे उपचाराचे बील परतावा मिळणेकामी सादर केलेले आहे. चि. सुरज यास fissure in ano needs laser Surgery (fissurectomy) त्रास असल्यामुळे त्यांनी श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतले होते. परंतू fissure in ano needs laser Surgery (fissurectomy) या मुळव्याधीचे उपचार संस्थानचे दोन्ही रुग्णालयात होत नव्हते तेव्हा त्यांनी संस्थान मान्य यादीतील रुबी हॉल क्लीनीक, पुणे चौकशी केली असता त्यांना रुबी हॉल क्लीनीक, पुणे येथील उपचारासाठी रक्कम रु.६०,०००/- इतक्या रक्कमेचे कोटेशन दिलेले होते. रुबी हॉल क्लीनीक, पुणे येथे सदर आजारावर उपचार करणारे डॉ. प्रदीप तुपेरे यांचे अहमदनगर येथे नवोदय सर्जिकल ॲण्ड बर्न क्लिनिक प्रा. लि. अहमदनगर हे खाजगी रुग्णालय आहे. त्यामुळे चि.सुरज यास नवोदय सर्जिकल ॲण्ड बर्न क्लिनिक प्रा. लि. अहमदनगर येथे उपचाराकरीता नेले होते.

नवोदय सर्जिकल ॲण्ड बर्न क्लिनिक क्लिनिक प्रा. लि. अहमदनगर येथील उपचाराचा खर्च रुबी हॉल क्लीनीक, पुणे यांचे खर्चापेक्षा कमी असल्यमे त्यांनी नवोदय सर्जिकल ॲण्ड बर्न क्लिनिक प्रा. लि. अहमदनगर येथे उपचार घेतलेले आहे. तेथील उपचाराकरीता त्यांना रक्कम रु.१८७९२/- इतका खर्च आलेला आहे. तेथे उपचाराकरीता जाणेकामी त्यांना इकडील पत्र क्र.२८६/२०१७ दि.२४/०१/२०१७ अन्वये डॉ. बोराडे यांनी रेफर केलेले होते तसेच सदरील प्रस्ताव मा.वैदयकिय संचालक, साईबाबा हॉस्पिटल यांनी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत यावा अशी सुचना दिलेली आहे.

संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून त्यांनी उपचार घेतलेले रुग्णालय हे खाजगी रुग्णालय असुन ते संस्थानचे मान्य यादीत नाही. परंतू रुबी हॉल क्लीनीक, पुणे हे रुग्णालय संस्थानचे मान्य यादीत आहे परंतू तेथील खर्चापेक्षा नवोदय सर्जिकल ॲण्ड बर्न क्लिनिक प्रा. लि. अहमदनगर येथील खर्च कमी आलेला आहे.

श्री.ताराचंद नाना शेजवळ यांनी वैदयकिय उपचारापोटी रक्कम रु.१८७९२/- इतक्या रक्कमेचे बीले सादर केलेले आहे. सदर रक्कम रु.१८७९२/- पैकी ८० % रक्कम खाट भाडे वजा जाता दयावयाचे झाल्यास रक्कम रु.१४४६७/- देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर योग्य तो निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३१३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे श्री.ताराचंद नाना शेजवळ, वाहन चालक, वाहन विभाग यांनी सादर केलेल्या वैद्यकिय बीलाची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, त्यांना एक विशेष बाब म्हणून त्यांचे मुलाचे उपचारासाठी आलेल्या वैद्यकिय बीलापैकी ८० % रक्कम रु.१४,४६७/- मात्र अदा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेश खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव–** श्री साईबाबा व श्री साईनाथ दोन्ही रुग्णालयातील कर्मचा-यांना प्रशासन शाखा वशी-५/२४५५/२०१६ दिनांक २८/०९/२०१६ चे परिपत्रकानुसार अधिक्षक,लिपीक-टंकलेखक व मदतनीस वगळुन इतर कायम कर्मचाऱ्यांचे गणवेशासाठी स्वतंत्र प्रस्ताव तयार करुन मा.व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्तावास मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करावी असे आदेश आहेत.

त्यामुळे सहा.अधिसेविका कार्यालय श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी डि.पी.नं.१३०७ दि.१५/०६/२०१६ अन्वये गणवेशाची व डि.पी.नं.१३३१ दि.१०/०१/२०१७ अन्वये स्वेटरची मागणी केली आहे व सहा.अधिसेविका श्री साईनाथ रुग्णालय यांनी डि.पी.नं.५३० दि.१८/०६/२०१६ अन्वये गणवेशाची व डि.पी.नं.१५६० दि.१३/०१/२०१७ अन्वये स्वेटरची मागणी केली आहे.

यापुर्वी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांचे गणवेशाकरीता रेमंड कंपनीचे कापड खरेदीकामी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१८/१०/२०१३ नि.क्र.८१३ अन्वये रु.१३,७२,०३९/- व शिलाईकामी रु.४,३१,४४०/-अश्याप्रकारे एकुण रु.१८,०३,४७९/-चे खर्चास मान्यता घेतली होती.

त्याकरीता मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेतली व त्यानुसार कापड खरेदीकरीता मे.राजेंद्र क्लॉथ,राहुरी यांना इ.पत्र क्र.२९४८ दि.२७/११/२०१४ अन्वये रु.६,१०,९६१.४०/-इतक्या रकमेचा पुरवठा आदेश देण्यात आला होता तसेच सदर गणवेश शिलाईकरीता मे.साईसागर गारमेंट,नाशिक यांना इ.पत्र क्र.३३९ दि.०५/०५/२०१५ अन्वये रु.७६,८९०/-इतक्या रकमेचा पुरवठा आदेश देण्यात आला होता व गणवेश प्राप्त झाल्यानंतर सर्व कर्मचा-यांना सन २०१६मध्ये प्रत्येकी २ सेट गणवेश देण्यात आलेले आहेत.

सर्व कर्मचा-यांना २ सेट गणवेश देवुन खालीलप्रमाणे कापड शिल्लक आहे.

| अ.नं. | तपशील | रंग | शिल्लक साठा |
|---|---|---|---|
| १ | ॲप्रनचे कापड | सफेद | ८७७.०० मीटर |
| २ | सलवार/कुडता | गुलाबी | १९३.०० मीटर |

उपरोक्तप्रमाणे रुग्णालयाच्या आस्थापनेवर असणा-या सर्व मेडीकल,पॅरामेडीकल,टेक्निशियन,व इतर सर्व कर्मचा-यांना गणवेश देणे गरजेचे आहे. पुर्वीचे गणवेश कापड खरेदीकरीता लागलेला खर्च रु.६,१०,९६१/- व शिलाईकरीता लागलेला खर्च रु.७६,८९०/-व साडी खरेदीकरीता लागलेला खर्च रु.३५,८८०/- असा एकुण रु.७,२३,७३१/- इतका खर्च आलेला आहे.

सदर गणवेश खरेदीकरीता अंदाजे येणा-या खर्चाकरीता खालीलप्रमाणे एकुण तीन पुरवठाधारकांचे कोटेशन मागविण्यात आले होते त्यांचे अंदाजे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | तपशील | मे.बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे रु./पै. | एकूण खर्च | मे.फॅशन कलेक्शन, नाशिक रु./पै. | एकूण खर्च | मे.आर.के. कलेक्शन, नाशिक रु./पै. | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फुल ॲप्रन (सर्व डॉक्टर्स) १६६ नग (सफेद) | ३३०.०० | ५४७८०.०० | ३६०.०० | ९७६०.०० | ४००.०० | ६६४००/- |
| २ | हाफ ॲप्रन(सर्व टेक्नीशियन ब्रदर, सिस्टर) ४९२ नग (सफेद) | २९०.०० | १४२६८०/- | ३१०.०० | १५२५२०/- | ३००.०० | १४७६००/- |
| ३ | शर्ट/पॅन्ट (मॅनेजर) १२ नग (स्काय ब्ल्यु/ नेव्ही ब्ल्यु) | ७५०.०० | ९०००.०० | ११६५.०० | १३९८०.०० | १५००.०० | १८०००/- |
| ४ | शर्ट/पॅन्ट (मॅनेजर) २४ नग (स्काय ब्ल्यु/ नेव्ही ब्ल्यु) | ७५०.०० | १८०००.०० | ११६५.०० | २७९६०.०० | १५००.०० | ३६०००/- |
| ५ | शर्ट/पॅन्ट (ब्रदर) ७० नग (सफेद) | ७५०.०० | ५२५००.०० | ११६५.०० | ८१५५०.०० | १५००.०० | १०५०००/- |
| ६ | साडी/पेटीकोट/ ब्लाऊज पीस (इन्चार्ज, फार्मासिस्ट, रिसेप्शनिस्ट) २८ नग (बदामी/ मरुन) | ५००.०० | १४०००.०० | ७००.०० | १९६००.०० | १२००.०० | ३३६००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | सलवार/कुडता(सर्व सिस्टर) ३२० नग (बदामी) | ६००.०० | १९२०००/- | ७००.०० | २२४०००/- | ८००.०० | २५६०००/- |
| ८ | स्वेटर ( ब्रदर,सिस्टर) १९० नग (नेव्ही ब्ल्यु) | ४५०.०० | ८५५००/- | ६३०.०० | ११९७००/- | ७००.०० | १३३०००/- |
| | | | ५६८४६०/- | | ६९९०७०/- | | ७९५६००/- |

| अ.नं. | तीनही पुरवठाधारकांच्या अंदाजे खर्चाच्या रक्कमा | एकुण रु. | एकुण सरासरी खर्च |
|---|---|---|---|
| १ | ५६८४६०+६९९०७०+७९५६०० | २०६३१३० | २०६३१३०÷३=६४१३७७.०० |
| | | एकुण खर्च | - २०% = ५५०१६८.०० |

उपरोक्त पुरवठाधारकांचे प्राप्त कोटेशननुसार सरासरी खर्च काढला असता एकुण रक्कम रु.५,५०,१६८/- (अक्षरी रु.पाच लाख पन्नास हजार एकशे अडुसष्ट मात्र) खर्च अपेक्षीत आहे. लिनन विभागात सफेद कापडाचा साठा ८७७ मी.शिल्लक असल्यामुळे सदर कापडाचे हाफ ॲप्रन शिवुन घेता येतील त्यामुळे ॲप्रन खरेदीकरीता येणारा सरासरी खर्च रु.१,१८,०८०/-(अक्षरी रु.एक लाख अठरा हजार ऐंशी मात्र) वजा जाता एकुण रक्कम रु.४,३२,०८८/- (अक्षरी रु.चार लाख बत्तीस हजार अठयाऐंशी मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. रुग्णालयातील कर्मचा-यांना गणवेश परिधान करणे गरजेचे असल्याने सुरवातीला कापड खरेदी करणे व नंतर कापडाचे गणवेश शिवण्याकरीता पुन्हा ई-निविदा मागविणे याकरीता जास्त कालावधी लागतो त्यामुळे सदर गणवेश ज्या पुरवठाधारकांना गणवेशाचे कापड खरेदीचा पुरवठा आदेश दिला जाईल त्यांच्येकडुन गणवेश शिवुन घ्यावे असे मत आहे.

लिनन विभागात सफेद कापडाचा ८७७ मी.साठा शिल्लक असल्यामुळे सदर कापडाचे परीचारक, परीचारीका, सर्व तंत्रज्ञ यांचेकरीता लागणारे हाफ ॲप्रन शिवुन घेता येतील त्याकरीता पुरवठाधारकांकडुन शिलाईचे कोटेशन मागवुन फक्त ॲप्रन शिवुन घेता येतील असे मत आहे. एक नग ॲप्रन करीता अंदाजे दिड मीटर कापड लागु शकते त्यामुळे एकुण ८७७ मी.कापडामध्ये ५८५ नग शिवुन घेता येतील.

एका ॲप्रनकरीता अंदाजे शिलाई रु.८५/- शिलाई गृहीत धरली असता एकुण ५८५ ॲप्रनला अंदाजे रु. ४९,७२५/- खर्च अपेक्षीत आहे.

**विभागाचा अभिप्राय- अ)** लिनन विभागात सफेद कापडाचा ८७७ मी. साठा शिल्लक असल्यामुळे सदर कापडाचे ५८५ ॲप्रन शिवुन घेण्यास व त्याकामी येणा-या अंदाजे रु.४९७२५/- चे खर्चास व कोटेशन मागविण्यास मान्यता असावी.

**ब)** गणवेशाचे कापड खरेदी करीता शासनाचे दिनांक १/१२/२०१६ चे शासन नियमावलीनुसार गणवेशासाठी लागणारे कापडाची खरेदी मे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग यांचेसाठी राखीव ठेवण्यात आली असुन सदर कापड त्यांचेकडुन खरेदी करावे किंवा सदर कापड त्यांचेकडे उपलब्ध नसल्यास तात्काळ ई-निविदा मागविण्यास व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४,३२,०८८/-चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे, लिनन विभागात शिल्लक असलेल्या कापडाचे ॲप्रन शिवून घेणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेत यावे, असे ठरले.**

**तसेच रुग्णालयांमधील कर्मचारी गणवेशासाठी मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग यांचेकडून कापड खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३८** **जनरल ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्सचे दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव–** श्री साईनाथ रूग्णालयाकरीता सन 1999 या वर्षी मे.कार्ल स्टोअर्ज, जर्मनी याकंपनीचे भारतातील तेव्हांचे अधिकृत विक्रेते मे. चिमको इंटरनॅशनल, मुंबई यांचेकडून झेनॉन नोवा लाईटसोर्स एकुण रू. 1,05,435.26/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आला आहे. सदर लाईटसोर्स नियमीत वापरात असुन सध्या लाईटसोर्सची दुरूस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरूस्तीकरीता आवश्यक असणारे स्पेअरपार्ट पुरवठाधारक कंपनीकडुन बदलुन घेतले जातात.

सध्या जनरल ओ.टी. विभागातील लाईटसोर्स व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्र दि. 27/03/2017 अन्वये कळविले आहे. त्यानुसार सदर लाईटसोर्सची तपासणी केली असता सदरबल्ब खराब

झाले असल्यामुळे बदलणेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर लाईटसोर्स जनरल ओ.टी. विभागात नियमीत वापरात असल्याने दुरूस्त करणे आवश्यक आहे.

**मागणी:-** लाईटसोर्सचे पुरवठाधारक मे.कार्लस्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली, यांचेकडे बल्बकरीता विचारणा केली असता कंपनीने त्यांचे पत्र क्र. 27980, दि.29/03/2017 अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr.No. | Art. no | Description | Qty | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | 20131520 | Xenon Nova Light Source 175 W | 01 | 46,000.00 |
| | | | + CST @ 5 % | 2,300.00 |
| | | | Labour Amount | 1375.00 |
| | | | Service Tax On Labour @ 15% | 206.00 |
| | | | **Total Amount (Incl.all taxes) in Rs.** | **49,881.00** |

वरीलप्रमाणे लाईटसोर्स करीता बल्ब खरेदी करणेकामी सर्व करांसहीत एकुण रू. 49,881/- (अक्षरी रू. एकोणपन्नास हजार आठशे ऐक्याऐंशी मात्र) इतका इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरील संस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल. सदर दुरूस्ती करीता रु.25000/- पेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळे मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदर लाईटसोर्स जनरल ओ.टी. विभागात नियमीत वापरात असल्याने तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. तसेच जनरलऑपरेशन विभागात दररोज विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया होत असतात. त्यामुळे लाईटसोर्सचा बल्ब बदलणे आवश्यक आहे. सदर बल्ब Monopoly Item नसुन अशा प्रकारचा बल्ब विविध पुरवठाधारक कंपन्याकडुन कोटेशन मागणी करुन निम्नतम दराने खरेदी करणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी जनरल ओ.टी. विभागातील लाईटसोर्सचा बल्ब विविध पुरवठाधारक कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून निम्नतम दराने खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रू. 49,881/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, जनरल ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्सचा बल्ब खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४९,८८१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३९** **सन 2015-16 या वार्षिक खरेदीमधील M/s Sarv Healthcare Pvt. Ltd., Mumbai यांचे पुरवठयाबाबत.**

**प्रस्ताव–** श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीओलॉजी विभागाकरीता सन २०१५-१६ या वर्षाकरीता लागणारे Consignment Basis वरील साहित्य खरेदीकामी दि.०३/०८/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.३१८ मान्यता मिळालेली होती, त्यानुसार दि.२८/०७/२०१५ रोजी पुरवठा धारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेले होते. त्यामध्ये M/s. Sarv Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांना India Medtronic या कंपनीच्या व्हाल्वकरीता इकडील पत्र क्र.१२३४ दि.२८/०७/२०१५ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला होता.

पुरवठा आदेशातील Clause No.15 नुसार त्यांचा निविदा कालावधी ०१ वर्षाचाच होता, परंतु तरीदेखील ते अदयापपर्यंत आपणास नियमित पुरवठा करत होते. परंतु दि.१५/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये M/s. India Medtronic यांनी त्यांचे Authorisation काढून घेतल्यामुळे ते आपणास सध्या पुरवठा करु शकत नाही. परंतु M/s. India Medtronic हे त्याच मंजुर दराने M/s. Associated Therapeutic Care Pvt. Ltd., Pune यांचेमार्फत पुरवठा करण्यास तयार असून तसे Authorisation Letter पाठविणार आहेत.

कार्डीयाक शस्त्रक्रियेसाठी व्हाल्व अत्यावश्यक असल्यामुळे तसेच सन २०१७-१८ या वार्षिक खरेदीमधील Consignment Basis वरील साहित्य खरेदीकामीच्या ई-निविदेची कार्यवाही चालु असून सदरहू साहित्य उपलब्ध होण्यास अजुन २-३ महिन्यांचा कालावधी लागेल, त्यामुळे सदरहू व्हाल्व, M/s. Associated Therapeutic Care Pvt. Ltd., Pune यांचेकडून मंजुर दराने खरेदी करता येईल यामध्ये जास्तीचा खर्च येणार नाही.

तरी M/s. Sarv Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांना दिलेला व्हाल्वचा पुरवठा आदेश रद्द करुन सदरहू व्हाल्व M/s. Associated Therapeutic Care Pvt. Ltd., Pune यांचेकडून आवश्यकतेनुसार मंजुर दराने खरेदी करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ या वार्षिक खरेदीमधील व्हाल्व खरेदीकामी M/s. Sarv Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांना दिलेला पुरवठा आदेश रद्द करणेत येऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सदरहू व्हाल्व M/s. Associated Therapeutic Care Pvt. Ltd., Pune यांचेकडून आवश्यकतेनुसार मंजूरदराने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४०** **श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-2 12 या विभागाकरीता Channel ECG Machine खरेदी करणे.**

**प्रस्ताव–** **अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा रुग्णालयातील CRU - 2 या विभागाने मागणी पत्रकान्वये ०१ नग ECG Machine ची मागणी केलेली आहे.

सदर विभागामध्ये सध्या असलेले ECG Machine हे M/s. Schiller Health Care, India या कंपनीचे सन २०११ मध्ये रक्कम रु.७३१२५ इतक्या रक्कमेत खरेदी केलेले होते. सदर मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.१३०१५/- इतकी असून मशिनवर आजपर्यंत दुरूस्ती व देखभालीवर रु.६१८७/- इतका खर्च झालेला आहे. त्यांचेकडे असलेले मशिन व्यवस्थित काम देत असून CRU - 2 या विभागात मागील वर्षात ६९७ रुग्णांचे ECG करण्यात आलेले आहेत.

त्यामुळे CRU - 2 या विभागाला आणखी एक मशिनची Stand by म्हणून आवश्यकता आहे. कारण सध्या राजीव गांधी जीवनदायी योजनमुळे रुग्णालयात रुग्णांच्या संख्येत फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे CRU - 2 या विभागाने ०१ नविन ECG Machine ची मागणी केलेली आहे.

उपरोक्त विभागासाठी ०१ नग ECG Machine खरेदीकामी अंदाजे खर्चाकरीता दूरध्वनीद्वारे M/s. Atthrava Health Tech India Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानूसार M/s. Atthrava Health Tech India Pvt. Ltd., Mumbai यांनी दि.१५/११/२०१६ चे पत्रान्वये दर कळविलेले असून त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. No. | Supplier Name | Qty. | Estimate cost ( per unit) | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | ECG Machine -12 Lead | १ | १५७४६२.०० | १५७४६२.०० |
| | | **Total Amt in Rs.** | | **१५७४६२.००** |

उपरोक्त ०१ नग ECG Machine खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी रक्कम रू.१,५७,४६२/- (अक्षरी रू. एक लाख सत्तावन्न हजार चारशे बासष्ठ मात्र ) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईबाबा रुग्णालयातील CRU- 2 या विभागाने दि.२०/०८/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.०७/०६/२०१६) मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदर विभागामध्ये सध्या असलेले ECG Machine हे M/s. Schiller Health Care, India या कंपनीचे सन २०११ मध्ये रक्कम रु.७३१२५ इतक्या रक्कमेत खरेदी केलेले होते. सदर मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.१३०१५/- इतकी असून मशिनवर आजपर्यंत दुरूस्ती व देखभालीवर रु.६१८७/- इतका खर्च झालेला आहे. त्यांचेकडे असलेले मशिन व्यवस्थित काम देत असून CRU-2 या विभागात मागील वर्षात ६९७ रुग्णांचे ECG करण्यात आलेले आहेत. त्यामुळे CRU - 2 या विभागाला आणखी एक मशिनची Stand by म्हणून आवश्यकता आहे. कारण सध्या राजीव गांधी जीवनदायी योजनमुळे रुग्णालयात रुग्णांच्या संख्येत फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे त्यांना नवीन मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील CRU- 2 या विभागाकरीता ०१ नग ECG Machine विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रू.१,५७,४६२/- (अक्षरी रू. एक लाख सत्तावन्न हजार चारशे बासष्ठ मात्र) चे खर्चास असावी.

**निर्णय क्र.३१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CRU- 2 या विभागाकरीता आवश्यक असलेले ०१ नग ECG Machine विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५७,४६२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४१** **श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाकरीता Urine Analyser Machine खरेदी करणे.**

**प्रस्ताव–** श्री साईनाथ हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा या विभागाने मागणी पत्रकान्वये Urine Analyser Machine ची मागणी केलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात Urine Analyser Machine चा उपयोग १) लघवीतील विविध घटक तपासणी करणेकरिता, २) Urine मधील Protein ची तपासणीकरिता, ३) Urine मधील Ketone, Sugar, Blood, Billurubin Crystal Cast इत्यादी तपासण्याकरिता, ४) Urine ची PH तपासणीकरिता, ५) Urine ची Specific gravity तपासणीसाठी तसेच आम्लता व इतर घटकांची तपासणी करण्यासाठी होतो. त्यांचेकडे असलेले Urine Analyser Machine हे सन २०१० मध्ये देणगी घेतलेले आहे. त्यांना आणखी एक Urine Analyser Machine ची Stand by म्हणून आवश्यकता आहे. त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाने मागणी केलेली आहे.

दि.१६/०२/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत सदर Urine Analyser Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेव व याकामी येणा-या रक्कम रू.३०००००/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली होती. त्यानुसार इकडील पत्र क्र.८५७ दि. २३/०७/२०१६ अन्वये एकूण ८ अधिकृत विक्रेते /पुरवठा धारक यांचेकडून दि१०/०८/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. परंतु कोटेशन विहीत वेळेत प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र.१३०६ दि.२१/०९/२०१६ अन्वये एकूण १३ अधिकृत विक्रेते/पुरवठा धारक यांचेकडून दि०३/१०/२०१६ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन ०३ कोटेशन प्राप्त झालेले आहे.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे : -

| Sr. no. | Name of Supplier | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Labline Stock Centre, Mumbai | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२८/०९/२०१६ |
| 2 | M/s. R. R. Diagnositcs, Dhule | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२८/०९/२०१६ |
| 3 | M/s. Lab-Hosp Instruments & Equipment Mfg Co., Mumnai | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२८/०९/२०१६ |

अ.न. १ व ३ या पुरवठाधारकांना कोटेशन पत्र पाठविले नसताना देखील त्यांनी कोटेशन पाठविले आहे. तुलनात्मक तक्ता तयार करण्याच्या दृष्टीने फायदा होऊ शकतो. त्यामुळे दोन्ही कोटेशन विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

तरी वरील प्रमाणे प्राप्त ०३ सिलबंद कोटेशन दि.२८/१२/२०१६ रोजीचे मा. उपसमिती सभेत समक्ष उघडण्यात आले असून त्यांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Description | Labline Stock Centre, Mumbai | R. R. Diagnositcs, Dhule | Lab-Hosp Instruments & Equipment Mfg Co., Mumnai |
|---|---|---|---|
| | Make - Seimens Model - Clinitek | Make - Seimens Model - Clinitek | Make - Seimens Model - Clinitek |
| **Urine Analyzer** | Advantus Urin Analyzer | Advantus Urin Analyzer | Advantus Urin Analyzer |
| Warranty- 3 Years | 2 Year | 3 Year | 3 Year |
| AMC/CMC Cost- AMC should be max. 1% of basic cost including Taxes. CMC should be between 3% of basic cost including Taxes. It should be fixed for next 5 years. | AMC Cost @1% will be Rs.9750/- + S.T. (To be made directly with Seimens after warranty Period) CMC Cost @3% will be Rs.29250/- + S.T. (To be made directly with Seimens after warranty Period) | AMC Cost @1% will be Rs.8600/- + S.T. (To be made directly with Seimens after warranty Period) CMC Cost @3% will be Rs.25800/- + S.T. (To be made directly with Seimens after warranty Period) | AMC Cost @1% will be Rs.9650/- + S.T. (To be made directly with Seimens after warranty Period) CMC Cost @3% will be Rs.28950/- + S.T. (To be made directly with Seimens after warranty Period) |
| Cost of Consumables to be fixed for warranty period. | All Reagents to be purchased only through us for 7 years. | Instrument life can be considered as 7 Years | |
| **Rate Per in Rs.** | 1106625.00 | 976100.00 | 1095275.00 |
| **Total Amt** | 3178000.00 | | |
| **Avg Rate Per** | 1059333.33 | | |
| **Rate per** | 847466.67 | | |

उपरोक्त तुलनात्मक दरांच्या तक्त्यामध्ये सदर Urine Analyser Machine करीता प्राप्त सर्व कोटेशन घारकांचे दर हे रक्कम रु.३०००००/- पेक्षा जास्त आहेत व सदर Urine Analyser Machine खरेदीकामी फक्त रक्कम रू.३०००००/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली आहे. प्राप्त दर हे रक्कम रु.३,००,०००/- पेक्षा जास्त असल्यास ते ई – निविदाद्वारे खरेदी करावे लागतील.

तरी बंद पाकिटामधून प्राप्त झालेले कोटेशन प्रक्रिया हि रद्द होऊन ई - निविदा प्रक्रिया राबविण्यास व याकामी येणा-या एकूण रक्कम रु.८,५०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४२** **श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता नविन Needle Burner खरेदी करणे.**

**प्रस्ताव–** श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वार्ड व विभागाने मागणीपत्रकान्वये Needle burner ची मागणी केलेलीआहे.सदर विभांगामध्ये Needle चा वापर झाल्यानंतर इतर पेशंटला त्याचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून Needle जाळल्या जातात त्यासाठी Needle burner चा वापर होतो.सदर विभागातील Needle burner वापरून खराब झालेले आहे, त्यामुळे विविध वार्ड / विभागाने मागणीपत्रकान्वये Needle burner ची मागणी केली आहे त्याचा तक्ता खालीलप्रमाणे:-

| Sr.No. | Ward/Dept. Name | Qty. | Received date |
|---|---|---|---|
| 1 | Casualty | 2 | 11/11/2016 |
| 2 | Cardiac ward | 1 | 11/11/2016 |
| 3 | Medicine ward | 1 | 11/11/2016 |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | CVTS Ward | 1 | 11/11/2016 |
| 5 | CRU II | 1 | 11/11/2016 |
| 6 | CVTS OT I/II/Cath lab | 3 | 11/11/2016 |
| 7 | G.O.T. | 1 | 11/11/2016 |
| 8 | ICCU/GICU | 1 | 11/11/2016 |
| 9 | CRU I | 1 | 12/11/2016 |
| 10 | Neuro O.T. | 1 | 11/11/2016 |
| 11 | Male Surgery ward | 2 | 11/11/2016 |
| 12 | SPR/Delux | 1 | 11/11/2016 |
| | Total | 16 | |

उपरोक्त विभागांसाठी Needle burner खरेदीकामी अंदाजे रक्कमेसाठी काही पुरवठाधारकांना मेल करण्यात आले होते. त्यांनी दिलेल्या अंदाजे रक्कमेचा तक्ता खालीलप्रमाणे **:-**

| **Sr. No.** | **Supplier Name** | **Qty.** | **Estimate cost (per unit)** | **Total Amt.** | **warranty** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Hospitech system, Kopargaon | 16 | 2750.00 | 44,000.00 | 1Year |
| | | | **Less 20%** | **35200.00** | |

उपरोक्त १६ नग Needle burner खरेदीकामी अंदाजे रक्कम रू.३५,२००.००(अक्षरी रू. पस्तीस हजार दोनशे मात्र) इतकी येते.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३– रु.५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी **DGS & D** कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात्त आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वार्ड व विभागाने मागणी पत्रकान्वये Needle burner ची मागणी केलेली आहे. सदर विभांगामध्ये Needle चा वापर झाल्यानंतर इतर पेशंटला त्याचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून Needle जाळल्या जातात. त्यासाठी Needle burner चा वापर होतो परंतु सदर विभागातील Needle burner हे वापरून खराब झालेले आहे, त्यामुळे त्यांना नवीन Needle burner विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वार्ड व विभागाकरीता एकूण १६ Needle burner खरेदी करणेकामी विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू. ३५,२००.०० (अक्षरी रू. पस्तीस हजार दोनशे मात्र) चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वार्ड व विभागाकरीता आवश्यक असलेले १६ Needle burner विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३५,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४३** **श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty या विभागाकरीता Surgical Operation Table खरेदी करणे.**

**प्रस्ताव–** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Casualty या विभागाने दि.२३/१२/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये ०२ नग Surgical Operation Table ची मागणी केलेली आहे.

अपघात झालेले रुग्ण व अत्यवस्थ रुग्ण प्रथम Casualty विभागामध्ये दाखल होत असतात. तेंव्हा तातडीच्या प्रसंगी करावयाच्या Minor शस्त्रक्रिया करणेसाठी Operation Table ची आवश्यकता असते. सध्या त्यांचेकडे असलेला Operation Table हा सन २००५ मध्ये खरेदी केलेला होता, सदर टेबल जुना झाल्यामुळे सध्या व्यवस्थित काम देत नाहीत, तसेच रुग्णांची संख्या सतत वाढतच आहे, त्यामुळे त्यांनी नविन ०२ नग Surgical Operation Table ची मागणी केलेली आहे. नविन Surgical Operation Table खरेदीकामी अंदाजे खर्चाकरीता M/s. Warden Surgical Co.Pvt.Ltd., Mumbai यांचेकडून ई-मेल व्दारे दरपत्रक मागविण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांनी दि.०१/०३/२०१७ रोजीचे ई-मेल अन्वये खालीलप्रमाणे दरपत्रक दिलेले आहे-

| S.No. | Name of Item | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt.in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Surgical Operation Table | 02 | 156403.00 | 312806.00 |
| | | | **Total -** | **312806.00** |

वरीलप्रमाणे दरानुसार उपरोक्त ०२ नग Surgical Operation Table खरेदीकामी रु.३,१२,८०६/- (अक्षरी रक्कम रु.तीन लाख बारा हजार आठशे सहा मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>मागणी</u>–** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Casualty या विभागाने दि.२३/१२/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१०/०१/२०१७) मागणी केलेली आहे. त्यांचेकडे असलेला टेबल फार जुना झाल्यामुळे त्यांनी नविन टेबलची मागणी केलेली आहे.

**<u>संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-</u>**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-</u>** अपघात झालेले रुग्ण व अत्यवस्थ रुग्ण प्रथम Casualty विभागामध्ये दाखल होत असतात. तेंव्हा तातडीच्या प्रसंगी करावयाच्या Minor शस्त्रक्रिया करणेसाठी सध्या त्यांचेकडे असलेला Operation Table जुना झाल्यामुळे व्यवस्थित काम देत नसल्यामुळे त्यांचे मागणीनुसार त्यांना ०२ नग Surgical Operation Table खरेदी करुन देण्यास हरकत नाही.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Casualty या विभागाकरीता ०२ नग Surgical Operation Table विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.३,१२,८०६/- (अक्षरी रक्कम रु.तीन लाख बारा हजार आठशे सहा मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Casualty या विभागाकरीता आवश्यक असलेले ०२ नग Surgical Operation Table विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,१२,८०६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४४** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्सचे सन 2017-2018 या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणे.**

**प्रस्ताव–** **अधिनियम 2004 मधील तरतुद:** 1) पृ. क्र. 355, समितीच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये 14(2) ख
2) पृ. क्र. 356, समितीची कर्तव्ये व अधिकार 17 (2) झ
3) पृ. क्र. 359, विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग 21 (1) (क), 21 (2) (ग)

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ( दि 31/03/2016 पर्यंत ) एकुण रु. 39,57,09858.80/- इतक्या रकमेचे 14,319 मेडीकल इक्विपमेंटस् व मशिनरी,उपकरणे, इक्वीपमेंटस तसेच फर्निचर खरेदी करणेत आले असुन सन 2006 पासून नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सन 2016-17 यावर्षा करीता 258 नग मशिन्सचे संबंधीत 22 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण रु. 68,87,211/- इतक्या रकमेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते .

तसेच, श्री साईनाथ रूग्णालयात ( दि 31/03/2016 पर्यंत ) एकुण रु. 12,34,92,219.80/- इतक्या रकमेचे 13233 मेडीकल इक्विपमेंटस् व मशिनरी, उपकरणे खरेदी करणेत आले असुन ( सन 1999 पासून) नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी सन 2016-17 यावर्षा करीता 43 नग मशिन्सचे संबंधीत 11 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण रु. 8,85,149/- इतक्या रकमेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते .

सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दूरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत. त्यामुळे विवीध कंपन्यासोबत केलेले सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे सन 2017-18 ( दि 01/04/2017 ते दि 31/03/2018) या एक वर्षाच्या कालावधी करीता नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसेच ज्या मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपले आहे अशा मशिन्सचे नव्याने AMC/ CMC करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मशिन्सचे स्पेअर पार्टस हे Monopoly या प्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिनचे AMC/CMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे. सदर मशीन्स करीता जर On call Basis नुसार कंपन्यांकडून सर्व्हिस घेण्यात आली आणि आवश्यकतेनुसार स्पेअर पार्टस व कन्झ्युमेबल्स बदलण्यात आले तर येणारा खर्च वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रक्कमेपेक्षा अधिक असेल.

**मागणी:** सन 2017-18 यावर्षा करीता श्री साईबाबा हॉस्पिटल येथील सोबतच्या तक्त्यामध्ये (परीशिष्ट 'अ') दिलेल्या 274 नग मशिन्सचे संबंधीत 23 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. त्या करीता अंदाजे रू.87,51,518/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच श्री साईनाथ रूग्णालयाचे सोबतच्या तक्त्यामध्ये (परीशिष्ट 'ब') दिलेल्या एकुण 48 नग मशिन्सचे संबंधीत 12 कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. त्या करीता अंदाजे रू.11,84,371/- इतका खर्च अपेक्षित आहे.

काही कंपन्यांनी मागील वर्षीप्रमाणेच दर दिलेले असुन काही कंपन्यांनी दरामध्ये वाढ केली आहे मागील वर्षी काही कंपन्यांनी सर्व्हीस टॅक्स मध्ये जरी वाढ झाली होती तरी अतिरिक्त सर्व्हीस टॅक्सची मागणी केलेली नव्हती. तसेच दोन्ही रुग्णालयातील वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता असलेल्या मशिन्सची संख्या मागील वर्षापेक्षा वाढलेली असल्यामुळे अंदाजे खर्चाचे रकमेत देखील वाढ दिसून येत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरीलसंस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल.

वार्षिक सर्व्हिस कॉट्रॅक्टबाबत मा.व्य. समितीच्या दि. 20/05/2007 च्या सभेतील विषय क्र.33 निर्णय क्र.386 अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे. "दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दूरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन्स सध्या व्यवस्थित काम देत आहेत. त्यामुळे विवीध कंपन्यासोबत केलेले सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे सन 2017-18 ( दि 01/04/2017 ते दि 31/03/2018) या एक

वर्षाच्या कालावधी करीता नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसेच ज्या मशिन्सचे वॉरंटी कालावधी संपले आहे अशा मशिन्सचे नव्याने AMC/CMC करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मशिन्सचे स्पेअर पार्टस हे Monopoly या प्रकारचे असल्यामुळे बाजारात उपलब्ध होत नाही म्हणुन सदरच्या मशिनचे AMC/CMC त्याच कंपन्यांकडे करणे आवश्यक आहे. सदर मशीन्स करीता जर On call Basis नुसार कंपन्यांकडून सर्व्हिस घेण्यात आली आणि आवश्यकतेनुसार स्पेअर पार्टस व कन्झ्युमेबल्स बदलण्यात आले तर येणारा खर्च वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रक्कमेपेक्षा अधिक असेल.

वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत माव्यवस्थापन समिती सभेसमोर कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वरीलप्रमाणे एकुण 274 नग मशीन्सचे आणि श्री साईनाथ रूग्णालयाचे एकुण 48 नग मशिन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील २७४ नग व श्री साईनाथ रूग्णालयामधील ४८ नग मशिन्सचे सन २०१७-१८ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणेकामी संबंधीत कंपन्याच्या प्रतिनिधींशी रुग्णालय उपसमिती सभेसमोर चर्चा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दि.२५.०४.२०१७ रोजीचे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३२२** दिनांक २५.०४.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१** **संस्थान कर्मचाऱ्यांना गणवेश देणेकरीता गणवेशाचा प्रकार, कापड व रंग निश्चित होणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७४ अन्वये "संस्थानमधील कायम कर्मचा-यांना गणवेश देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू गणवेशाचा प्रकार, कापड व रंग निश्चित करणेसाठी स्थानिक उपसमितीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा" असे ठरले आहे.

त्यानुसार गणवेश खरेदीकामी कर्मचा-यांची करावयाची वर्गवारी खालीलप्रमाणे

**अ) वर्ग-०४ स्त्री कर्मचारी विभागवार तपशिल खालीलप्रमाणे (सहावार साडी ब्लाऊजपीससह)**

| अ.क्र. | विभाग | स्त्री कर्मचारी संख्या | साडी संख्या (प्रत्येकी ०२ प्रमाणे) | परकर (प्रत्येकी ०२ प्रमाणे) | प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | कन्या विद्या मंदिर | ०१ | ०२ | ०२ | प्रिंटेड ०६ मीटर साडी – ब्लाऊजपीससह वेट लेस, ६० ग्रॅम, (रिद्धी सारीज, केटी शिफॉन)<br><br>परकर – कॉटन |
| ०२. | बगीचा विभाग | ०७ | १४ | १४ | |
| ०३. | आरोग्य विभाग | ११ | २२ | २२ | |
| ०४. | मंदिर विभाग | ०१ | ०२ | ०२ | |
| ०५. | श्री साईप्रसादालय विभाग | ४४ | ८८ | ८८ | |
| ०६. | कॅन्टीन विभाग | ०२ | ०४ | ०४ | |
| ०७. | इंग्लिश मिडीयम स्कुल | ०४ | ०८ | ०८ | |
| ०८. | श्री साईनाथ रुग्णालय | ३० | ६० | ६० | |
| **१)** | **एकुण** | **१००** | **२००** | **२००** | |
| ०९. | श्री साईबाबा हॉस्पिटल | ०२ | ०४ | ०४ | सफेद ०६ मीटर साडी – ब्लाऊजपीससह, निळे काठ, वेट लेस, ६० ग्रॅम, (रिद्धी सारीज, केटी शिफॉन)<br>परकर – कॉटन |
| १०. | संरक्षण विभाग | १० | २० | २० | खाकी ०६ मीटर साडी – ब्लाऊजपीससह, काळे काठ, |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | वेट लेस, ६० ग्रॅम, (रिद्धी सारीज, केटी शिफॉन) परकर – कॉटन |
| **२)** | **एकुण** | **१२** | **२४** | **२४** | |
| **१ + २ = एकुण** | | **११२** | **२२४** | **२२४** | |

**ब) वर्ग-०४ स्त्री कर्मचारी विभागवार तपशिल खालीलप्रमाणे (नऊवार साडी ब्लाऊजपीससह)**

| अ.क्र. | विभाग | स्त्री कर्मचारी संख्या | साडी संख्या (प्रत्येकी ०२ प्रमाणे) | प्रकार |
|---|---|---|---|---|
| ०१. | बगीचा विभाग | ०४ | ०८ | प्रिटेंड ०९ मीटर साडी – मॅचिंग ब्लाऊजपीससह (डबलघोडा, शोभावत प्रिंट) |
| ०२. | आरोग्य विभाग | ०२ | ०४ | |
| ०३. | श्री साईप्रसादालय विभाग | १७ | ३४ | |
| ०४. | कॅन्टीन विभाग | ०१ | ०२ | |
| **१)** | **एकुण** | **२४** | **४८** | |
| ०५. | श्री साईनाथ रुग्णालय | ०५ | १० | सफेद ०९ मीटर साडी, निळे काठ – मॅचिंग ब्लाऊजपीससह (डबलघोडा, शोभावत) |
| ०६. | श्री साईबाबा हॉस्पिटल | ०१ | ०२ | |
| **२)** | **एकुण** | **०६** | **१२** | |
| **१ + २ = एकुण** | | **३०** | **६०** | |

**क) वर्ग -०३ (लिपीक – टंकलेखक) स्त्री कर्मचारी तपशिल खालीलप्रमाणे (सहावार)**

| अ.क्र. | विभाग | स्त्री कर्मचारी संख्या | साडी संख्या (प्रत्येकी ०२ प्रमाणे) | परकर (प्रत्येकी ०२ प्रमाणे) | प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | कन्या विद्या मंदिर | ०१ | ०२ | ०२ | प्रिटेंड ०६ मीटर साडी – ब्लाऊजपीससह, वेट लेस, ६० ग्रॅम, (रिद्धी सारीज, केटी शिफॉन) परकर – कॉटन |
| ०२. | कॅन्टीन विभाग | ०२ | ०४ | ०४ | |
| ०३. | आय.टी.आय.विभाग | ०१ | ०२ | ०२ | |
| ०४. | श्री साईनाथ रुग्णालय | ०२ | ०४ | ०४ | |
| ०५. | श्री साईबाबा हॉस्पिटल | ०२ | ०४ | ०४ | |
| | **एकुण** | **०८** | **१६** | **१६** | |

**ड) वर्ग - ०४ पुरुष कर्मचारी गणवेश खरेदी तपशिल खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | तपशिल | कर्मचारी संख्या | शर्टींग कापड (शर्टसाठी) मीटरमध्ये (प्रत्येकी ०२ नग प्रमाणे) | सुटींग कापड (पॅन्टसाठी) मीटरमध्ये प्रत्येकी ०२ नग प्रमाणे) | प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मदतनीस/शिपाई | ७४३ | ३३५० | १७९० | रेमंन्ड, सियाराम, एस.कुमार, मफतलाल, हाफ शर्ट व फुल पॅन्ट |
| ०२. | सफाई कर्मचारी | १३५ | ६१० | ३३० | |
| ०३. | पहारेकरी/मदतनीस | १२६ | ५७० | ३१० | खाकी गणवेश |
| ०४. | वॉर्डबॉय/मदतनीस | ७२ | ३३० | १८० | सफेद गणवेश |
| **एकुण** | | **१०७६** | **४८६०** | **२६१०** | |

**इ) वर्ग - ०३ पुरुष कर्मचारी गणवेश खरेदी तपशिल खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | तपशिल | कर्मचारी संख्या | शर्टींग कापड (शर्टसाठी) मीटरमध्ये | सुटींग कापड (पॅन्टसाठी) मीटरमध्ये | प्रकार |
|---|---|---|---|---|---|

| | | | (प्रत्येकी ०२ नग प्रमाणे) | प्रत्येकी ०२ नग प्रमाणे) | |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | वरिष्ठ लिपीक | ०९ | ४२ | २३ | रेमंन्ड, सियाराम, एस.कुमार, मफतलाल, हाफ शर्ट व फुल पॅन्ट |
| ०२. | लिपीक टंकलेखक | १८५ | ८४० | ४५० | |
| ०३. | सुरक्षा निरिक्षक | ०२ | १० | ५ | खाकी गणवेश |
| | **एकुण** | **१९६** | **८९२** | **४७८** | |

**ई) वर्ग - ०२ पुरुष कर्मचारी गणवेश खरेदी तपशिल खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | तपशिल | कर्मचारी संख्या | शर्टींग कापड (शर्टसाठी) मीटरमध्ये (प्रत्येकी ०२ नग प्रमाणे) | सुटींग कापड (पॅन्टसाठी) मीटरमध्ये (प्रत्येकी ०२ नग प्रमाणे) | प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | उप कार्यकारी अभियंता (विद्युत) | ०१ | ५ | २.५० | सफारी गणवेश रेमंन्ड, सियाराम, एस.कुमार, मफतलाल, |
| ०२. | पर्यवेक्षक (विद्युत+पाणीपुरवठा,ध्वनीक्षेपण) | ०८ | ४० | २० | |
| ०३. | उप कार्यकारी अभियंता (बांधकाम) | ०१ | ५ | २.५० | |
| ०४. | मॅकेनिक सहाय्यक अभियंता | ०१ | ५ | २.५० | |
| ०५. | कनिष्ठ अभियंता + उप अभियंता | ०६ | ३० | १५ | |
| ०६. | सहाय्यक अभियंता (वाहन विभाग) | ०१ | ५ | २.५० | |
| ०७. | जनसंपर्क अधिकारी | ०१ | ५ | २.५० | |
| ०८. | कृषी अधिकारी | ०१ | ५ | २.५० | |
| ०९. | प्र.अधिक्षक | २८ | १२५ | ७५ | |
| १०. | प्र.लेखाधिकारी | ०१ | ५ | २.५० | |
| ११. | वरिष्ठ लेखापाल | ०२ | १० | ५ | |
| १२. | तांत्रिक सहाय्यक | ०३ | १५ | ७.५० | |
| १२. | साईलीला सहाय्यक संपादक | ०१ | ५ | २.५० | |
| **एकुण** | | **५५** | **२६०** | **१४२.५०** | |

**उ) वर्ग - ०१ पुरुष कर्मचारी गणवेश खरेदी तपशिल खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | तपशिल | कर्मचारी संख्या | शर्टींग कापड (शर्टसाठी) (प्रत्येकी ०२ नग प्रमाणे) | सुटींग कापड (पॅन्टसाठी) प्रत्येकी ०२ नग प्रमाणे) | प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | प्रशासकीय अधिकारी | ०४ | २० | १० | सफारी गणवेश रेमंन्ड, सियाराम, एस.कुमार, मफतलाल, |

उपरोक्त तक्ता **"अ"** ते **"उ"** मध्ये नमुद केलेप्रमाणे विविध विभागांच्या विविध पदावर कार्यरत असणा-या स्थायी कर्मचा-यांना नमुद केलेप्रमाणे कापड खरेदी करुन गणवेश शिलाई करता येईल अथवा कापड खरेदी गणवेश शिलाईसह निविदा प्रसिद्ध करता येतील.

**(०१)** मात्र त्यासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७४ नुसार सदर गणवेशाचा/ साड्यांचे प्रकार, कापड व रंग निश्चित करण्यासाठी स्थानिक उपसमितीचे सभेत मागील गणवेश खरेदीकामी निविदा दाखल केलेल्या निविदाधारकांना साड्यांचे व कापडाचे नमुने घेऊन बोलविता येईल. स्थानिक उपसमितीचे सभेत कापडाचा व साड्यांचा प्रकार, रंग निश्चित करुन, खरेदी विभागामार्फत पुढील कार्यवाही करता येईल, असे नम्र मत आहे.

**(०२)** तसेच देणगीदार साईभक्त श्री.साईदत्त/ बसवाराजप्पा/ बाल सुब्रामनी, मुंबई यांनी सियाराम कंपनीचे शर्टसाठी स्काय ब्ल्यु कलरचे ७२५ मीटर व पॅन्टसाठी डार्क ब्ल्यु कलरचे ४५० मीटर कापड देणगी स्वरुपात देणगी पावती क्र.४०२६४ दि.२४.०२.२०१६ अन्वये संस्थानला दिलेले आहे. सदर कापडामधून मॅकेनिकल, ध्वनीक्षेपण व टेलिफोन, बगीचा, विद्युत, सी.सी.टी.व्ही.कंट्रोल सेल, पाणीपुरवठा, फायर अॅण्ड सेफ्टी व माहिती तंत्रज्ञान विभगातील तांत्रिक कर्मचारी यांना माव्यवस्थापन समितीचे दि.०९.११.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.६८९ (२) नुसार गणवेश शिवण्यात आलेले आहेत. सदर कर्मचा-यांमधून १५ कर्मचारी यांचे गणवेश कापडाअभावी शिवणे बाकी आहे. त्यामुळे सदर १५ कर्मचारी यांचेकरिता शर्टसाठी सियाराम कंपनीचे स्काय ब्ल्यु कलरचे ३५ मीटर व पॅन्टसाठी डार्क ब्ल्यु कलरचे १८ मीटर कापड खरेदी करावे लागेल, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त परिच्छेद (१) मध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान कर्मचारी यांचेकरिता खरेदी करावयाचे गणवेशासाठी कापड व साडयांचा प्रकार, रंग निश्चित करणेस व (२) मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**या विषयांवरील चर्चेच्या वेळी नाशिक येथील कापडाचे अधिकृत वितरक मे.एम.बी.ट्रेडींग कंपनीचे मालक श्री.रामेश्वर जाजू हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी दाखविलेले कापडांचे नमुने उपसमिती सदस्यांनी बघीतले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचाऱ्यांना गणवेश देणेकरीता खालीलप्रमाणे कापडाचे रंग निश्चित करणेत आले.**

**(ड) वर्ग-०४ (पुरुष कर्मचारी)**

| | | | |
|---|---|---|---|
| **१. मदतनीस/शिपाई** | **-** | **सफारी गणवेश** | **Reymond Bonaza 80** |
| **२. सफाई कर्मचारी** | **-** | **सफारी गणवेश** | **Nissan Sutting 217** |
| **३. वॉर्डबॉय** | **-** | **सफारी गणवेश** | **Reymond Bonaza 53** |
| **४. पहारेकरी** | **-** | **रेग्युलर खाकी** | **Reymond Bonaza 174** |
| ५. प्रस्तावात नमुद केलेले १५ तांत्रिक कर्मचारी- | | पॅन्ट शर्ट | शर्ट- स्कॉय ब्ल्यु<br>पॅन्ट- डार्क ब्लयु |

**(इ) वर्ग -०३ (पुरुष कर्मचारी)**

| | | | |
|---|---|---|---|
| **१. वरिष्ठ लिपीक व लिपीक टंकलेखक** | **-** | **पॅन्ट शर्ट** | **शर्ट- कॅरालॉन 81014**<br>**पॅन्ट- Reymond Bonaza 80** |
| **२. सुरक्षा निरीक्षक** | **-** | **रेग्युलर खाकी** | **Reymond Bonaza 174** |

| | | | |
|---|---|---|---|
| **(ई) वर्ग-०२ कर्मचारी** | **-** | **सफारी** | **Reymond Sappire 154** |

**तसेच प्रस्तावातील अ,ब,क महिला कर्मचाऱ्यांकरीता सहावार व नऊवार साडयांचे रंग व नमुना मा.सौ.योगिता शेळके पाटील, सदस्या व डॉ.मैथिली पितांबरे, वैद्यकीय अधिक्षीका यांनी निश्चीत करावेत, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**सदरहू इतिवृत्तास पुष्टी देत असताना, उपरोक्त उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली परंतु त्यामध्ये उल्लेखीत केलेले ब्रॅण्ड आणि कोड फक्त कापडाच्या रंगाच्या संदर्भासाठी गृहीत धरणेत यावेत. तसेच महिला कर्मचाऱ्यांसाठीच्या साडयांचे कापड व रंग निश्चित झाल्यानंतर संस्थान कर्मचाऱ्यांचे गणवेशासाठी शिलाईसह कापड खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

०२ **संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी निम्नतम सर्व्हीस चार्जेस पुरवठाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल,कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी मे.मॉडर्न व्ही आर सिक्युरीटी फोर्स लि.पुणे व मे. जय भवानी एंटरप्रायजेस,पुणे यांची दि.०१.०३.२०१५ ते दि.२८.०२.२०१८ या कालावधीसाठी नियुक्ती करणेत आलेली होती.तथापि त्यांचे काम समाधानकारक नसल्याने, तसेच त्यांचेकडून वेळोवेळी करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झालेला असल्याने त्याबाबत

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र.५१८ अन्वये श्री साईबाबा संस्थानला कंत्राटी पध्दतीने कुशल, अकुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस,पुणे व मॉडर्न व्ही आर सिक्युरीटी फोर्स इं.प्रा.लि.पुणे यांचेवरील वाढत्या तक्रारी तसेच प्रस्तावामधील विभागाचा अभिप्राय विचारात घेता, सदरहू ठेकेदार हे वेळोवेळी करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग करतात व ते सदरहू कंत्राट चालविण्यास असमर्थ असल्याचे दिसून येत आहेत.याकरीता मे. जय भवानी एंटरप्रायजेस,पुणे व मे.मॉडर्न व्ही आर सिक्युरीटी फोर्स पुणे यांना करारनाम्यातील अटी/ शर्तीचा भंग केल्यामळे कायदेशिर नोटीस देण्यात येऊन, दोन्हीही ठेकेदारांना टर्मीनेट करण्यात यावे व संस्थानला कंत्राटी पध्दतीने कुशल, अकुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकरीता नवीन ई निविदा प्रकिया राबविणेत यावी. तसेच यापुढे संस्थानला कंत्राटी पध्दतीने कुशल, अकुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेचे कॉन्ट्रक्ट एक वर्षापेक्षा जास्त काळ देण्यात येवू नये असा निर्णय पारीत झालेला आहे.

**प्रस्तावना-** संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत काम करीत असलेल्या कंत्राटी अकुशल,कुशल व सुरक्षा कंत्राटी कामगारांना मुंबई शॉप ॲन्डकमर्शियल ॲस्टॅब्लीशमेंटचे झोन नं.०१ व झोन नं.०३ प्रमाणे लागु असलेले किमान वेतन दर व शासणाचे निर्णयाप्रमाणे वेळोवेळी स्पेशल अलौन्स दर देणेत येत आहे. सदर दरामध्ये दि.०१.०४.२०१७ पासून ४०% अतिरिक्त वेतनवाढ देणे बाबत मा.व्यवसथापन समिती सभा दि.२५.०२.२०१७ चे सभेमध्ये निर्णय क्र.१४१ झालेला आहे.

सन २०१६-२०१७ करीता संस्थानला अकुशल,कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नोंदणीकृत ,लायसेन्सधारक व अनुभवी ठेकेदारांकडून ई निविदा मागविणेकामी वर्तमान पत्रातून व संस्थानचे संकेतस्थळावरुन जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदेसंबधी कागदपत्रे डाउनलोडींगसाठी दि.२०.१२.२०१६ पासून उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. तसेच तांत्रिक निविदेचे (टेक्नीकल बीड)ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.०९.०१.२०१७ रोजी सांयकाळ ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. तसेच स्कॅन करुन जोडलेली तांत्रीक निविदेसोबतची टेक्नीकल बीड लिफाफा नं.०१ मध्ये शिर्डी किंवा मुंबई कार्यालयात दि.११.०१.२०१७ रोजी सांय. ०५.०० वा.पर्यंत सादर करणेची अंतीम मुदत ठेवण्यात आलेली होती,व तांत्रिक निविदा उघडेची मुदत दि.१६.०१.२०१७ रोजी ठेवण्यात आलेली होती. परंतु दरम्यानचे काळात आचारसंहिता लागू झालेने दिलेल्या दिनांकास तांत्रीक निविदा उघटता आलेल्या नाहीत.

तदनंतर मुदती अखेर शिर्डी कार्यालय व मुंबई कार्यालयाकडे अकुशल,कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी एकूण -१९ तांत्रीक निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त झालेल्या तांत्रीक (टेक्नीकल बीड) निविदा दि.१७.०२.२०१७ रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून, निविदेत नमूद मागणी केलेल्या कागदपत्रांनुसार छाननी करुन, निविदेतील अटी व शर्ती (किमान ३ वर्षे कामाचा अनुभव,वाषिक उलाढाल १३.५० कोटीपेक्षा जास्त व कर्मचारी संख्या १३०० पेक्षा जास्त) या अटी पुर्ण करणा-या निविदाधारकास गुणदान देण्यात आलेले आहे. तसेच कॅगचे टेंडर डाक्युमेटचे आधारे निविदांचा पात्र/अपात्र तक्ता तयार करण्यात आलेला होता.

अशा लेबर व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणे निविदाधारकांचा पात्र /अपात्र बाबतचा तांत्रीक निविदे संदर्भात तपशिलवार तक्ता दि.०३.०४.२०१७ रोजी खरेदी समिती सभेसमोर सादर करण्यात आलेला होता. अकुशल,कुशल कर्मचारी पुरविणेकामी एकूण १९ पैकी ०९ निविदाधारक व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी एकूण १९ पैकी -०९ निविदाधारक पात्र ठरलेले आहे. अशा पात्र निविदाधारकांचे व्यावसायीक (कमर्शियल बीड) दि.०३.०४.२०१७ रोजीचे खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आलेले असून,अकुशल,कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी निविदाधारकांनी दिलेल्या सर्व्हीस चार्जेस दरांचा तपशिल खालील प्रमाणे देणेत आलेला आहे.

**अ) अकुशल,कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणारे पात्र निविदाधारक संख्या – ०९**

| अ.न. | निविदाधारकाचे नांव /गांव | सर्व्हीस चार्जेस दर (टक्केवारी) | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे. एन. पी. एस. फॅसिलिटी, मुंबई | ०१.९८००० | |
| ०२ | मे.ओरियन सिक्युरिटी सोलुशन प्रा. लि.,मुंबई | ०२.७१००० | |
| ०३ | मे.ओम सिक्युरिटी ॲण्ड क्लिनिंग सर्व्हीसेस, मुंबई | ०२.९२००० | |
| ०४ | मे. एम.पी.एंटरप्रायजेस, पुणे | **०.०००0१** | **L-1** |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | मे. स्पीक एन स्पॅन सर्व्हीसेस , मुंबई | ०.०८००० | |
| ०६ | मे. श्री कृपा सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे | १०.००००० | |
| ०७ | मे. बी.व्ही.जी इंडिया प्रा. लि.पुणे | **०.००००१** | **L-1** |
| ०८ | मे. औरंगाबाद मल्टी सर्व्हीसेस, औरंगाबाद | ०१.९९००० | |
| ०९ | मे. श्रीराम एंन्टरप्रायजेस , मुंबई | ०२.४०००० | |

उपरोक्त प्रमाणे अ.नं.०४ मे. एम.पी.एंटरप्रायजेस, पुणे व अ.नं.०७ मे. बी.व्ही.जी इंडिया प्रा. लि.पुणे यांचे सर्व्हीस चार्जेसचे दर निम्नतम **L-1** आलेले आहेत.

**ब) सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणारेपात्र निविदाधारक संख्या – ०९**

| **अ.न.** | **निविदाधारकाचे नांव/गांव** | **सर्व्हीस चार्जेस दर (टक्केवारी)** | **शेरा** |
|---|---|---|---|
| ०१ | मे. एन. पी. एस. फॅसिलिटी, मुंबई | ०१.९८००० | |
| ०२ | मे.ओरियन सिक्युरिटी सोलुशन प्रा. लि.,मुंबई | ०१.००००० | |
| ०३ | मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस ॲन्ड सिस्टीम्स .लि., पुणे | ०.००००१ | **L-1** |
| ०४ | मे.बक्शी सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हीसेस प्रा.लि. मुंबई | ०.०८००० | |
| ०५ | मे. युनीक्यु डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि. पुणे | ०२.५००० | |
| ०६ | मे. श्री कृपा सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे | १०.००००० | |
| ०७ | मे. सुपर प्रोटेक्शन सर्व्हीसेस प्रा. लि. मुंबई | ०३.००००० | |
| ०८ | मे.सेंन्ट्रल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस लि., मुंबई | ०.००००१ | **L-1** |
| ०९ | मे. शुभम एच.पी. सिक्युरिटी फोर्स इंडिया प्रा.लि. मुंबई | ०.००१०० | |

उपरोक्त प्रमाणे अ.नं.०३ मे रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस ॲन्ड सिस्टीम्स प्रा.लि., पुणे व अ.नं.०८ मे. सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲन्ड सिक्युरीटी,मुंबई यांचे सर्व्हीस चार्जेसचे दर निम्नतम **L-1** आलेले आहेत.

**विभागाची मागणी/ स्पष्ट अभिप्राय:** यापुर्वी दि.०१.०४.२०११ ते दि.३१.०३.२०१३ व पुढे नविन ठेकेदारांची नेमणूक होईपर्यंत दि.२८.०२.२०१५ अखेर संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल ,कुशल कंत्राटी कामगार पुरविणेकामी ०१ व सुरक्षा कंत्राटी पुरविणेकामी ०४ ठेकेदारांची नेमणूक करणेत आलेली होती. त्यानंतर दि.०१.०३.२०१५ पासून ०२ ठेकेदारांची नेमणूक करणेत आलेली आहे.

सध्या संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेचे कंत्राट मे. मॉडर्न व्ही आर सिक्युरीटी फोर्स, पुणे व मे.जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे यांना ०.०००१% या प्रमाणे सर्व्हीस चार्जेस नुसार देण्यात आलेले आहे.

आता उपरोक्त नमूद सर्व्हीस चार्जेस दरांचा तुलनात्मक विचार करता अकुशल,कुशल कर्मचारी पुरविणेकामी २ निविदाधारकांचे ०१) मे. एम.पी.एंटरप्रायजेस, पुणे २) मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांचे दर L-1 आलेले आहेत. तसेच सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी ०२ निविदाधारकांचे ०१) मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस ॲन्ड सिस्टीम्स प्रा.लि., पुणे, ०२)मे.सेंन्ट्रल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी, मुंबई यांचे दर L-1 आलेले आहेत.

तरी संस्थानला अकुशल,कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी दोन ठेकेदारांची नेमणूक करावयाची किंवा उपरोक्त प्रमाणे अकुशल व कुशल कंत्राटी कामगार पुरविणेकामी L-1 आलेल्या दोन ठेकेदारांची व तसेच सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी L-1 आलेल्या दोन ठेकेदारांची नेमणूक करावयाची किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**संस्थानला अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणारे तसेच सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणारे निम्नतम दरधारक स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणारे पात्र निविदाधारकांपैकी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील मे. एम.पी.एंटरप्रायजेस, पुणे, व मे. बी.व्ही.जी इंडिया प्रा. लि.पुणे यांचे निम्नतम दर समान असल्याने सदर दोनही निविदाधारकांनासमान विभागुन कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेकामी कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणारे पात्र निविदाधारकांपैकी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस अॅन्ड सिस्टीम्स लि., पुणे व मे.सेंन्ट्रल इनव्हेस्टीगेशन अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस लि., मुंबई यांचे निम्नतम समान दर आहेत. त्यांनाही समान विभागुन कार्यादेश देण्यात यावा, असे कार्यकारी अधिकारी यांनी मत मांडले.**

**परंतु चर्चेअंती मे.सेंन्ट्रल इनव्हेस्टीगेशन अॅण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस लि., मुंबई यांना संस्थानचे सुरक्षा कामाचा अनुभव नाही व मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस अॅन्ड सिस्टीम्स लि., पुणे यांनी यापुर्वी संस्थानमध्ये सुरक्षा रक्षक पुरविण्याचे काम केलेले आहे. तसेच त्यांचे काम समाधानकारक आहे व ऑक्टोंबर, २०१७ पासून समाधी शताब्दी महोत्सव सुरु होत असल्याने मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस अॅन्ड सिस्टीम्स लि., पुणे यांना सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**तसेच सदरहू इतिवृत्तास पुष्टी देत असताना, या ठेकेदारांमार्फत कंत्राटी कुशल, अकुशल व सुरक्षा कर्मचाऱ्यांना, निविदेमध्ये नमूद केलेप्रमाणे वेतन दर, कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शुरन्स (अंशदान), कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या रकमेवर ८.३३% याप्रमाणे सानुग्रह अनुदान रक्कम, वेतनदराचे रकमेवर ०.०००০१ याप्रमाणे सर्व्हीस चार्ज रक्कम, महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी जाहिर होणारे किमान वेतनदर, प्रॉव्हीडंड फंड अंतर्गत प्रॉव्हीडंड फंड अंशदान दर व सर्व्हीस टॅक्स दर यामध्ये शासनाकडून वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार सुधारित दर लागू करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

०३ **श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने फुलांची सजावट करणेबाबतचा तुलनात्मक तक्ता.**

अधिनियम2004मधील तरतूद - 21 (1) ख मधील रुढीनुसार व प्रथेनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे.

प्रस्तावीक- श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने फुलांची सजावट करणेकामी दि.22/12/2016 रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.955 अन्वये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 (विजयादशमी) अखेर या कालावधीत प्रत्येक गुरुवारी समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी दर्शनी भागात फुलांची सजावट करणेकामी फुलसजावट करणाऱ्या कारागीरांकडुन विहीत पध्दतीने निवीदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु देणगी दार साईभक्तांनी आरक्षित केलेले गुरुवार त्यामधुन वगळणेत यावे असे ठरले आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 (विजयादशमी) अखेर या कालावधीत येणाऱ्या प्रत्येक गुरुवारी फुलांची सजावट करणेकामी दि14/07/2016 रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्रं.443 नुसार रु.25,00,000/- मात्र अपेक्षीत खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

**मागणी-** त्यानुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने फुलांची सजावट करणेकामी संस्थानचे संकेत स्थळावर व वर्तमानपत्रात निवीदा सुचना प्रसिध्द करुन दि.25/02/2017 अखेर ई निवीदा मागविण्यात आलेल्या होत्या. परंतु सदर कालावधीत एकच निवीदा प्राप्त झालेली असल्याने दि.27/02/2017 रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये, दि.07/03/2017 पर्यंत मुदतवाढ घेण्यात आलेली होती. सदर मुदतीत एकुण 03 ई निवीदा प्राप्त झालेल्या आहे. प्राप्त झालेल्या निवीदांचे तांत्रिक लिफाफे दि20/03/2017 रोजीच्या खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेले आहे. तसेच पात्र तांत्रीक निवीदाधारकांचे कमर्शियल बिड दि03/04/2017 रोजीच्या मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेली असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | टेंडरधारकाचे नाव | एकुण दर (प्रति गुरुवार) |
|---|---|---|
| 01 | श्री साई फ्लॉवर डेकोरेटर्स, पुणे | 83,765/- |
| 02 | द्वारकामाई फ्लॉवर डेकोरेशन, शिर्डी | 60,000/- |
| 03 | भोसले फ्लॉवर डेकोरेटर्स, पिंपळगाव माळवी अ.नगर | 1,34,000/- |

विभागाचा अभिप्राय- तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने फुलांची सजावट करणेकामी अ.नं. 2 द्वारकामाई फ्लॉवर डेकोरेशन, शिर्डी यांचे एकुण दर (प्रति गुरुवार) रु.60,000/- (साठ हजार) मात्र सर्वात न्युनत्तम प्राप्त झालेला असल्याने त्यांना कार्यादेश देणेस व त्यांचेकडुन श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने फुलांची सजावट करुन घेणेस मान्यता मिळावी ही विनंती

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने फुलांची सजावट करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यांमधील निम्नतम दरधारक द्वारकामाई फ्लॉवर डेकोरेशन, शिर्डी यांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये दर गुरुवारी फुलांची सजावट साईभक्तांचे देणगीमधुन करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

०४ **कनकुरी नवीन साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नवीन पाईपलाईन व ड्रिप नळया टाकणेबाबतचा तुलनात्मक तक्ता.**

अधिनियम2004मधील तरतूद व्यवस्थापन समितीचा-

17 (2) (झ) मधील सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करणे अशी तरतुद आहे.

प्रस्तावीक- दि.25/02/2017 रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.126 अन्वये, कनकुरी येथील नविन साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईपलाईन व ड्रिप नळया टाकणेसाठी विविध ठिबक सिंचन कंपनी/ एजन्सी यांचेकडुन विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या रु. 1,30,000/- (एक लाख तीस हजार) मात्र खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच संस्थान तलाव लॅण्ड स्केपींगद्वारे सुशोभीत करणेत यावे असे ठरलेले आहे.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- सदरचा विषय हा आर्थीक स्वरुपाचा आहे.

मागणी- त्यानुसार कनकुरी नविन साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईपलाईन व ड्रिप नळया टाकणेसाठी परिसरातील विविध ठिबक सिंचन कंपनी/ एजन्सी यांचेकडुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. प्राप्त झालेली दरपत्रके दि.11/04/2017 रोजीच्या मा. खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | पार्टीचे नाव | एकुण दर |
|---|---|---|
| 01 | सह्याद्री ॲग्रो इंडस्ट्रीज, अहमदनगर | रु. 1,24,714/- |
| 02 | सुलभ इरिगेशन, राहुरी | रु. 1,17,134/- |
| 03 | माऊली एन्टरप्रायजेस, श्रीरामपुर | रु. 1,26,650/- |
| 04 | अरविंद सेल्स एजन्सी, साकुरी | रु. 1,00,806/- |

विभागाचा अभिप्राय- तरी कनकुरी नविन साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईपलाईन व ड्रिप नळया टाकणेसाठी उघडण्यात आलेल्या दरपत्रका मध्ये अ.नं. 04 चे अरविंद सेल्स एजन्सी, साकुरी यांचे रु. 1,00,806/- (एक लाख आठशे सहा) मात्र सर्वात न्युनत्तम दर प्राप्त झालेला आहे. त्यामुळे अरविंद सेल्स एजन्सी, साकुरी यांना उप समिती समोर चर्चेसाठी उपस्थित राहणेबाबत कळविता येईल. व त्यानंतर त्यांना कार्यादेश देऊन त्यांचेकडुन कनकुरी नविन साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नविन पाईपलाईन व ड्रिप नळया टाकणेचे काम करुन घेणेस मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी नवीन साठवण तलावाच्या भराव्यावरील झाडांना पाणी देणेकामी नवीन पाईपलाईन व ड्रिप नळया टाकणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यांमधील निम्नतम दरधारक अरविंद सेल्स एजन्सी, साकुरी यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

०५ **शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीच्या तळमजला व पहिला मजला येथील दर्शनलाईन हॉलमध्ये बसविणेकरीता सिलींग फॅन, एक्झॉट फॅन, स्वीच बोर्ड तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदीकामी उघडण्यात आलेल्या ऑनलाईन ई-निविदामधील निम्नतम दर असलेल्या निविदाधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०-११-२०१६ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.३१ निर्णय क्र.८७४ अन्वये शांतीनिवास तसेच भक्तनिवास इमारतीच्या दर्शन लाईन हॉलकरीता सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड, एल.ई.डी.लॅम्प व एल.ई.डी.टयुब फिटींग तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे अधिकृत वेबसाईटवर जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये १५,४०,३५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी दि.२४-०२-२०१७ रोजी दै.पुढारी, अहमदनगर, दैनिक पुण्यनगरी, नाशिक व दि.२५-०२-२०१७ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई तसेच दैनिक संध्यानंद, पुणे या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.२५-०२-२०१७ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती व ३३ ठेकेदारांना ई-मेल व्दारे दि.२२-०२-२०१७ व दि.२७-०२-२०१७ रोजी जाहिरात पाठविण्यात आली होती. त्यापैकी ०४ ठेकेदारांनी प्रतिसाद दिलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.२१-०२-२०१७ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.२७-०२-२०१७ रोजी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. १०-०३-२०१७ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. परंतु दि.१०-०३-२०१७ रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळाला प्रॉब्लेम आल्याने त्यांनी दि.११-०३-२०१७ पर्यंत एक दिवसांची मुदतवाढ दिली होती. ऑनलाईन निविदेसोबत तांत्रिक लिफाफामध्ये सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांच्या स्कॅन कॉपी जोडण्यास व दि.१५-०३-२०१७ रोजी सायं.०५.०० या अखेर किंवा त्यापुर्वी (रविवार खेरीज) निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेले तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या मुळप्रती शिर्डी कार्यालयात सादर करणेकामी ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये कळविण्यात आले होते.

शांतीनिवास तसेच भक्तनिवास इमारतीच्या दर्शन लाईन हॉलकरीता सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड, एल.ई.डी.लॅम्प व एल.ई.डी.टयुब फिटींग तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदी करणेकामी दि.११-०३-२०१७ रोजी ई-टेंडर सिस्टीमध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये चार ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले आहे. तसेच शिर्डी कार्यालयात ०४ नग निविदेच्या हार्ड कॉपी प्राप्त झालेल्या आहेत. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक (Technical Bid) कागदपत्रांच्या शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदेच्या ०४ हार्ड कॉपी (बंद पाकिट) व ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या चार तांत्रिक निविदा दि.०३-०४-२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत निविदाधारकांसमक्ष समक्ष उघडून निविदाधाराकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी करण्यात आलेली आहे तसेच निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी केल्यानंतरसर्व निविदाधारक क्वालिफाय झालेले आहे.

शांतीनिवास तसेच भक्तनिवास इमारतीच्या तळमजला तसेच पहिला मजला येथील दर्शनलाईन हॉलमध्ये बसविणेकरीता सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदीकामी दि. ०३-०४-२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या पात्र तांत्रिक ई-निविदाधारकांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तांत्रिक ई-निविदेत पात्र झालेल्या निविदाधारकाचे नांव. | शेरा |
|---|---|---|
| ०१) | मे.एक्सेल ट्रेडींग कंपनी, मुंबई | पात्र. |
| ०२) | मे.ब्रीज ट्रेडर्स, लातूर | पात्र. |
| ०३) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | पात्र. |
| ०४) | मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स्, राहुरी | पात्र. |

उपरोक्तप्रमाणे शांतीनिवास तसेच भक्तनिवास इमारतीच्या दर्शन लाईन हॉलकरीता सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड, एल.ई.डी.लॅम्प व एल.ई.डी.टयुब फिटींग तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदी करणेकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या ०४ ऑनलाईन ई-निविदा (कमर्शियल बीड) त्याच दिवशी मा.खरेदी समितीचे सभेसमोर, उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

| Sl. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | EXCEL TRADING COMPANY | Arihant Electricals | GURU ENGINEERING AND CONTRACTORS | Brij Traders |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| 1.00 | Supply of regular / standard model Ceiling fan of 1200 mm. sweep complete erected in position as per specification no. FG- (High Speed) | 250.00 | Nos. | 1548.00 | 1200.00 | 2160.00 | 1655.00 |
| 2.00 | Supply of fresh air cum Exhaust fan of light duty 50 V A.C. 50 cycles 300mm. 1400 RPM rust proof body & blades, wire mesh, duly erected in an approved manner and marking Sr. No. and date of erection | 20.00 | Nos. | 2880.00 | 1170.00 | 2090.00 | 1920.00 |
| 3.00 | Supply of Exhaust fan heavy duty 230 V A.C. 50 cycles 450 mm. 1400 RPM complete erected in position as per specification no. FG-FN/EXF | 20.00 | Nos. | 4806.00 | 4450.00 | 6119.00 | 4200.00 |
| 4.00 | Supply of triple pole and neutral distribution board (TPNDB) with door surface/ flush mounted SPMCB of 24 ways, on iron frame / wooden board. (Horizontal type) as per specification No. SW-SWR/ MCBDB | 25.00 | Nos. | 3600.00 | 3500.00 | 6493.00 | 3210.00 |
| 5.00 | Supply of RCCB + MCB, electro magnetic type with 30/100/300mA sensitivity and having capacity of 63A 4 Pole 3 phase as per specification No. SWRCCB/RCCB | 25.00 | Nos. | 4752.00 | 1600.00 | 4999.00 | 3070.00 |
| 6.00 | Supply of SPMCB 6A to 32A, B- series (for lighting) in provided distribution board as per specification No. SW-SWR/MCB | 600.00 | Nos. | 171.00 | 168.00 | 199.00 | 130.00 |
| 7.00 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 16/18 module complete duly erected in an approved manner. | 20.00 | Nos. | 306.00 | 269.00 | 433.00 | 285.00 |
| 8.00 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 12 module | 60.00 | Nos. | 279.00 | 213.00 | 399.00 | 260.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | complete duly erected in an approved manner. | | | | | | |
| 9.00 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 08 module complete duly erected in an approved manner. | 20.00 | Nos. | 225.00 | 172.00 | 269.00 | 155.00 |
| 10.00 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 06 module complete duly erected in an approved manner. | 10.00 | Nos. | 171.00 | 135.00 | 239.00 | 115.00 |
| 11.00 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 04 module complete duly erected in an approved manner. | 60.00 | Nos. | 126.00 | 128.00 | 166.00 | 115.00 |
| 12.00 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 03 module complete duly erected in an approved manner. | 100.00 | Nos. | 108.00 | 85.00 | 133.00 | 105.00 |
| 13.00 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 02 module complete duly erected in an approved manner. | 10.00 | Nos. | 108.00 | 65.00 | 133.00 | 88.00 |
| 14.00 | Supply of modular type switch 16 / 20 A with indicator, ISI mark, approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 150.00 | Nos. | 108.00 | 85.00 | 149.00 | 103.00 |
| 15.00 | Supply of modular type 3 pin 6A multi socket safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 100.00 | Nos. | 81.00 | 66.00 | 109.00 | 110.00 |
| 16.00 | Supply of modular type 3 pin 6 / 16A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 150.00 | Nos. | 135.00 | 110.00 | 199.00 | 125.00 |
| 17.00 | Supply of modular type switch 6A / 10A ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 475.00 | Nos. | 40.50 | 30.00 | 99.00 | 32.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 18.00 | Supply of modular type electronic step regulator for fan two module ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 250.00 | Nos. | 306.00 | 222.00 | 433.00 | 290.00 |
| 19.00 | Supply of modular type blanking plate one module ISI mark approved make duly erected on provided plate & box. | 250.00 | Nos. | 18.00 | 14.00 | 29.00 | 18.00 |
| 20.00 | Supply of modular type blanking plate two module ISI mark approved make duly erected on provided plate & box. | 225.00 | Nos. | 0.00 | 24.00 | 49.00 | 28.00 |
| 21.00 | Supply of Bulkhead fitting suitable for LED Lamp upto 11 w fixed on wall as per specification no. FG-IDF/BHF (Instead of 18/20 watt tubelight fitting) | 100.00 | Nos. | 567.00 | 500.00 | 639.00 | 370.00 |
| 22.00 | Supply of LED Lamp 5 to 8 watt 230 V Intergral type (Instead of 18/20 watt tubelight fitting) | 100.00 | Nos. | 342.00 | 95.00 | 330.00 | 280.00 |
| 23.00 | Supply of PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32 mm with accessories on wall/ceiling as per specification. | 2000.00 | MTR | 45.00 | 21.00 | 60.00 | 22.53 |
| 24.00 | Supply of approved make, 1 x 20 watt LED Tube fitting with tubebar suitable to fixed at ceiling or wall. (Instead of 40 watt tubelight fitting) | 250.00 | Nos. | 486.00 | 300.00 | 1300.00 | 520.00 |

उपरोक्तप्रमाणे शांतीनिवास तसेच भक्तनिवास इमारतीच्या दर्शन लाईन हॉलकरीता सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड, एल.ई.डी.लॅम्प व एल.ई.डी.टयुब फिटींग तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदी करणेकामी दि.०३-०४-२०१७ रोजी झालेल्या मा.खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या कमर्शियल बीड मधील तक्त्यानुसार व अ.क्र.२० Supply of modular type blanking plate two module ISI mark approved make duly erected on provided plate & box. खरेदीकामी मे.एक्सेल ट्रेडींग कंपनी, मुंबई यांनी दर भरलेले नाहीत. त्यामुळे सेकंड लोएस्ट मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स्, राहुरी यांचे दर गृहीत धरण्यात आले आहेत. तरी उपरोक्तप्रमाणे शांतीनिवास तसेच भक्तनिवास इमारतीच्या दर्शन लाईन हॉलकरीता सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड, एल.ई.डी.लॅम्प व एल.ई.डी.टयुब फिटींग तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदी करणेकामी तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखित केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन संबधितांना पुरवठा आदेश देणेकामी मान्यता मिळावी, ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीच्या तळमजला व पहिला मजला येथील दर्शनलाईन हॉलमध्ये बसविणेकरीता सिलींग फॅन, एक्झॉट फॅन, स्वीच बोर्ड तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखित केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन संबधितांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०६ **स्टॅण्ड फॅन, सिलींग फॅन, टेबल फॅन व इंडस्ट्रीयल फॅन खरेदी करणेकामी Tender ID 2016_SAI_155123_1 चे संदर्भात mahatenders.gov.in यांचे वेबसाईटला निर्माण झालेल्या तांत्रिक दोषामुळे ऑनलाईन काढण्यात आलेल्या तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.क्र.१.०१ चे १५० नग सिलींग फॅनचे दर दिसत नसलेचे तसेच प्रिंट न झालेमुळे परंतु नंतर NIC च्या प्राप्त झालेल्या ई-मेलनुसार वेबसाईटवरुन डाऊनलोड केलेल्या प्रत्येक पार्टीजच्या स्वतंत्र दरपत्रकावरुन प्राप्त झालेल्या तक्त्यानुसार निम्नतम पुरवठाधारकांस कार्यादेश देणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मा.स्थानिक उपसमितीचे सभेमध्ये स्टॅण्ड फॅन, सिलींग फॅन, टेबल फॅन व इंडस्ट्रीयल फॅन खरेदी करणेकामी टेंडर आयडी. 2016_SAI_155123_1 चे ऑनलाईन प्राप्त ०३ दरपत्रक उघडण्यात आले होते व त्यावेळी ऑनलाईन काढण्यात आलेल्या तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.क्र.१.०१ चे १५० नग सिलींग फॅनचे स्पेशिफिकेशन व रेट mahatendrs.gov.in यांचे वेबसाईटला आलेल्या तांत्रिक दोषामुळे तुलनात्मक तक्त्यामध्ये दिसू शकले नव्हते तसेच प्रिंट ही होऊ शकले नव्हते. त्यामुळे वेबसाईटवरुन डाऊनलोड करणेत आलेल्या तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.क्र.१.०१ चे १५० नग सिलींग फॅन हा आयटेम वगळता अ.क्र.१.०२ पासून १.१० इतकेच आयटेमची प्रिंट ई.डी.पी. विभागामार्फत प्राप्त झाली होती.

सभाकामकाज विभागाकडून जा.नं.एसएसएसटी / वशी-०४ / ४३४६ / २०१७ दि.१४-०३-२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या मा.व्यवस्थापन समितीची दि.२५-०२-२०१७ चे सभेतील विषय क्र.०२ निर्णय क्र.०२ (२९) नुसार स्टॅण्ड फॅन, सिलींग फॅन, टेबल फॅन व इंडस्ट्रीयल फॅन खरेदी करणेकामी (०१). मे.मार्क इंडस्ट्रीज, मुंबई यांनी ई-निविदेतील अ.क्र.१.०२ ते १.०६ व १.१० करीता दिलेले न्युनतम दर व (०२). मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक यांनी ई-निविदेतील अ.क्र.१.०७ ते १.०९ करीता दिलेले न्युनतम दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेकामी मान्यता मिळालेली आहे.

परंतू यामध्ये अ.क्र.१.०१ चे स्पेशिफिकेशन व रेट आले नसल्याने याबाबत विद्युत विभागामार्फत जा.नं.एसएसएसटी/ विद्युत/ २३७/ २०१७ दि.२२-०३-२०१७ अन्वये ई.टेंडरींगचे काम पाहणारे श्री साईबाबा हॉस्पिटल ई.डी.पी.विभाग यांना पत्र पाठवून कळविणेत आले होते.

त्यानुसार मा.वैद्यकीय संचालक यांचेमार्फत ई.डी.पी.विभागाने जा.क्र.एसएसएस / एसएसबीएच / ई.डी.पी./ ३९/ २०१७ दि. २८-०३-२०१७ अन्वये पत्र पाठवून कळविले आहे की, सदरच्या तुलनात्मक तक्त्याच्या तांत्रिक अडचणीबाबत ई.डी.पी.विभागाने श्री.विनोद कोते (नोडल ऑफिसर) यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी दि.२१-०३-२०१७ रोजी mahatendrs.gov.in या संकेतस्थळावर ई-मेलव्दारे संपर्क करुन 2016_SAI_155123_1 चे ऑनलाईन उघडण्यात आलेले ०३ ई-निविदेचे दरपत्रकाचे तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.क्र.१.०१ चे स्पेशिफिकेशन व त्याचे रेट न आलेबाबत कळविले आहे. त्यानुसार दि.२१-०३-२०१७ रोजी mahatenders.gov.in यांचेकडून ई-मेल प्राप्त झालेला आहे. सदरचे ई-मेलमध्ये खालील मुद्दे नमुद केलेले आहे.

०१). संस्थानमार्फत mahatenders.gov.in च्या संकेतस्थळावर BOQ लोड करतांना Row (लाईन) क्र.१२ व १३ वापरणेत आले होते. परंतू सिस्टिममध्ये सदरच्या Row (लाईन) या आटोमॅटीक कंपॅरिझन साठी वापरले जात नाही.

०२). आयटम क्र.१.०१ करिता संस्थानमार्फत १२ नंबरची Row (लाईन) वापरलेचे निर्देशनास येत आहे.

०३). तुलनात्मक तक्ता जनरेट होतांना सिस्टिममध्ये Row (लाईन) क्र.१ व १२ चे कॅलक्युलेशन करीता व्यवस्था अंतर्भूत नव्हती.

०४). आता तुलनात्मक तक्त्याकरीता संस्थानमार्फत प्रत्येक निविदा धारकांचे वैयक्तिक व स्वतंत्र दरपत्रक ग्राह्य धरणेत यावे व यावर संस्थानने अंतिम निर्णय घ्यावा.

त्यानुसार ई.डी.पी.विभागाने मा.वैद्यकीय संचालक यांचे स्वाक्षरीने ०३ पात्र निविदाधारकांचे स्वतंत्र दरपत्रके डाऊनलोड करुन त्याआधारे अ.क्र.०१.०१ ते अ.क्र.१.१० चे नविन तुलनात्मक तक्ता तयार करुन पाठविलेला आहे. अ.क्र.१.०१ चे १५० नग सिलींग फॅनचे दर स्वतंत्र दरपत्रकानुसार पडताळा करुन निम्नतम निविदाधारकाचे दर ग्राह्य धरुन सदरचे निविदेबाबतची पुढील कार्यवाही पुर्ण करता येईल, असे कळविले आहे. प्रत्येक पार्टीच्या दरपत्रकाच्या तक्त्यावर ई.डी.पी.इन्चार्ज व नोडल ऑफीसर यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

स्टॅण्ड फॅन, सिलींग फॅन, टेबल फॅन व इंडस्ट्रीयल फॅन खरेदी करणेकामी दि.२८-१२-२०१६ रोजी टेंडर आयडी. 2016_SAI_155123_1 चे mahatenders.gov.in यांचे तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन काढण्यात आलेल्या तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.क्र.१.०१ चे १५० नग सिलींग फॅनचे दराबाबत दि.२१-०३-२०१७ रोजी mahatenders.gov.in यांचेकडून ईमेल प्राप्त झालेनंतर ई.डी.पी.विभागाने ०३ पात्र निविदाधारकांचे स्वतंत्र दरपत्रके डाऊनलोड करुन त्याआधारे अ.क्र.१.०१ ते अ.क्र.१.१० चे नविन तुलनात्मक तक्ता तयार करुन पाठविला आहे. त्यामध्ये आयटम अ.क्र.१.०१ चे दिलेल्या मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे. तक्त्यातील १.०२ ते अ.क्र.१.१० चे दरात कोणताही फरक नाही.

| Sl.No. | Description of Work / Item (s) | No.of Qty. | MARK INDUSTRIES | Arihant Electricals | Guru Engineering and Contractors |
|---|---|---|---|---|---|
| 1.01 | Supplying regular/ standard model Ceiling Fan of 1200 mm. sweep complete erected in position as per specification no.FG- (HIGH SPEED) | 150 Nos. | 1678 | **1640** | 2000 |

उपरोक्त तक्त्यामध्ये अ.क्र.१.०१ चे १५० नग सिलिंग फॅनचे दर मे.अरिहंत इलेक्ट्रिकल्स, राहुरी यांचे कमी येतात. तरी मे. अरिहंत इलेक्ट्रिकल्स, राहुरी यांचे निम्नतम दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

मा.व्यवस्थापन समितीची दि.२५-०२-२०१७ चे सभेतील विषय क्र.०२ निर्णय क्र.०२ (२९) नुसार आयटम क्र.१.०२ ते १.१० चे न्युनतम दर दिलेल्या निविदाधारकांना कार्यादेश देण्याची मान्यता कायम ठेवून आयटम अ.क्र.१.०१ मध्ये १५० नग सिलिंग फॅनसाठी mahatenders.gov.in यांचेकडून प्राप्त झालेल्या ई-मेल नुसार वेबसाईटवर प्रत्येक पार्टीजच्या डाऊनलोड केलेल्या स्वतंत्र दरपत्रकावरुन नविन तयार केलेल्या उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार गडद व अधोरेखीत केलेले मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स, राहुरी यांचे निम्नतम दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेकामी मान्यता मिळावी, ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सिलींग फॅन खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स, राहुरी यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०७ **साईआश्रममधील प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसवून वायरींग करणेकामी Tender ID 2016_SAI_155152_1 चे संदर्भात mahatenders.gov.in यांचे वेबसाईटला निर्माण झालेल्या तांत्रिक दोषामुळे ऑनलाईन काढण्यात आलेल्या तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.क्र.१.०१ चे दर दिसत नसलेचे तसेच प्रिंट न झालेमुळे परंतु नंतर NIC च्या प्राप्त झालेल्या ई-मेलनुसार वेबसाईटवरुन डाऊनलोड केलेल्या प्रत्येक पार्टीजच्या स्वतंत्र दरपत्रकावरुन प्राप्त झालेल्या तक्त्यानुसार अ.क्र.१.०१ चे दर गृहीत धरुन निम्नतम पुरवठाधारकांसकार्यादेश देणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मा.स्थानिक उपसमितीचे सभेमध्ये साईआश्रममधील प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसवून वायरींग करणेकामी टेंडर आयडी. 2016_SAI_155152_1 चे ऑनलाईन प्राप्त ०३ दरपत्रक उघडण्यात आले होते व त्यावेळी ऑनलाईन काढण्यात आलेल्या तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.क्र.१.०१ चे स्पेशिफिकेशन व रेट mahatendrs.gov.in यांचे वेबसाईटला आलेल्या तांत्रिक दोषामुळे तुलनात्मक तक्त्यामध्ये दिसू शकले नव्हते तसेच प्रिंट ही होऊ शकले नव्हते. त्यामुळे वेबसाईटवरुन डाऊनलोड करणेत आलेल्या तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.क्र.१.०१ चे या आयटम वगळता अ.क्र.१.०२ पासून १.०७ इतकेच आयटेमची प्रिंट ई.डी.पी.विभागामार्फत प्राप्त झाली होती.

सभाकामकाज विभागाकडून जा.नं.एसएसएसटी/ वशी-०४/ ४३४६/ २०१७ दि.१४-०३-२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२५-०२-२०१७ चे सभेतील विषय क्र.०२ निर्णय क्र.०२ (२८) नुसार साईआश्रम मधील प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसवून वायरींग करणेकामी मे.श्री व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे यांचे ई-निविदेतील दिलेले निम्नतम दर रु. ७,४०,९३९.९२ मात्र मान्य करण्यात आलेले आहेत.

परंतू यामध्ये अ.क्र.१.०१ चे स्पेशिफिकेशन व रेट आले नसल्याने याबाबत विद्युत विभागामार्फत जा.नं.एसएसएसटी/ विद्युत/ २३७/ २०१७ दि.२२-०३-२०१७ अन्वये ई.टेंडरींगचे काम पाहणारे श्री साईबाबा हॉस्पिटल ई.डी.पी.विभाग यांना पत्र पाठवून कळविणेत आले होते.

त्यानुसार मा.वैद्यकीय संचालक यांचेमार्फत ई.डी.पी.विभागाने जा.क्र.एसएसएस/ एसएसबीएच/ ई.डी.पी. / ३९ / २०१७ दि. २८-०३-२०१७ अन्वये पत्र पाठवून कळविले आहे की, सदरच्या तुलनात्मक तक्त्याच्या तांत्रिक अडचणीबाबत ई.डी.पी.विभागाने श्री.विनोद कोते (नोडल ऑफिसर) यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी दि.२१-०३-२०१७ रोजी mahatendrs.gov.in या संकेतस्थळावर ई-मेलव्दारे संपर्क करुन 2016_SAI_155152_1 चे ऑनलाईन उघडण्यात आलेले ०३ ई-निविदेचे दरपत्रकाचे तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.क्र.१.०१ चे स्पेशिफिकेशन व त्याचे रेट न आलेबाबत कळविले आहे. त्यानुसार दि.२१-०३-२०१७ रोजी mahatenders.gov.in यांचेकडून ई-मेल प्राप्त झालेला आहे. सदरचे ई-मेलमध्ये खालील मुद्दे नमुद केलेले आहे.

०१). संस्थानमार्फत mahatenders.gov.in च्या संकेस्थळावर BOQ लोड करतांना Row (लाईन) क्र.१२ व १३ वापरणेत आले होते. परंतू सिस्टिममध्ये सदरच्या Row (लाईन) या आटोमॅटीक कंपॅरिझन साठी वापरले जात नाही.

०२). आयटेम क्र.१.०१ करिता संस्थानमार्फत १२ नंबरची Row (लाईन) वापरलेले निर्देशनास येत आहे.

०३). तुलनात्मक तक्ता जनरेट होतांना सिस्टिममध्ये Row (लाईन) क्र.१ व १२ चे कॅलक्युलेशन करीता व्यवस्था अंतर्भूत नव्हती.

०४). आता तुलनात्मक तक्त्याकरीता संस्थानमार्फत प्रत्येक निविदा धारकांचे वैयक्तिक व स्वतंत्र दरपत्रक ग्राह्य धरणेत यावे व यावर संस्थानने अंतिम निर्णय घ्यावा.

त्यानुसार ई.डी.पी.विभागाने मा.वैद्यकीय संचालक यांचे स्वाक्षरीने ०३ पात्र निविदाधारकांचे स्वतंत्र दरपत्रके डाऊनलोड करुन त्याआधारे अ.क्र.०१.०१ ते अ.क्र.१.०७ चे नविन तुलनात्मक तक्ता तयार करुन पाठविलेला आहे. अ.क्र.१.०१ ते १.०७ चे दर स्वतंत्र दरपत्रकानुसार पडताळा करुन निम्नतम निविदाधारकाचे दर ग्राह्य धरुन सदरचे निविदेबाबतची पुढील कार्यवाही पुर्ण करता येईल, असे कळविले आहे. प्रत्येक पार्टीच्या दरपत्रकाच्या तक्त्यावर ई.डी.पी.इन्चार्ज व नोडल ऑफीसर यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

साईआश्रम मधील प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसवून वायरींग करणेकामी दि.२८-१२-२०१६ रोजी Tender ID 2016_SAI_155152_1 चे mahatenders.gov.in यांचे तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन काढण्यात आलेल्या तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.क्र.१.०१ चे दराबाबत दि.२१-०३-२०१७ रोजी mahatenders.gov.in यांचेकडून ई-मेल प्राप्त झालेनंतर ई.डी.पी.विभागाने ०३ पात्र निविदाधारकांचे स्वतंत्र दरपत्रके डाऊनलोड करुन त्याआधारे अ.क्र.१.०१ ते अ.क्र.१.०७ चे दराचा नविन तुलनात्मक तक्ता तयार करुन पाठविला आहे.

सभाकामकाज विभागाकडून जा.नं.एसएसएसटी / वशी-०४ / ४३४६ / २०१७ दि.१४-०३-२०१७ अन्वये अन्वये मा.व्यवस्थापन समितीची दि.२५-०२-२०१७ चे सभेतील विषय क्र.०२ निर्णय क्र.०२ (२८) नुसार निविदाधारकांचा पुर्वीचा अ.क्र.१.०२ ते अ.क्र.१.०७ चे एकत्रित मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | ई-निविदाधारकाचे नांव | ई-निविदेतील पुर्वीचे एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१) | मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स्, राहुरी | ९,०२,५२०.०० |
| ०२) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | १०,१६,६४०.०० |
| ०३) | मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे | **७,४०,९३९.९२** |

mahatenders.gov.in यांचेकडून प्राप्त ई-मेल नुसार दि.२८-०३-२०१८ रोजी ई.डी.पी.विभागाने ०३ पात्र निविदाधारकांचे स्वतंत्र दरपत्रके डाऊनलोड करुन त्याआधारे तयार कलेल्या आयटम अक्र.१.०१ ते अ.क्र.१.०७ चे नविन एकत्रित मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | ई-निविदाधारकाचे नांव | ई-निविदेतील ई.डी.पी.विभागाने ०३ पात्र निविदाधारकांचे स्वतंत्र दरपत्रके डाऊनलोड करुन त्याआधारे तयार केलेल्या नविन तक्त्याव्दारे एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१) | मे.अरिहंत इलेक्ट्रीकल्स्, राहुरी | ९,८३,१६०.०० |
| ०२) | मे.गुरु इंजिनिअरींग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | ११,७७,९२०.०० |
| ०३) | मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे | **८,८१,४८३.९२** |

मा.व्यवस्थापन समितीच्या पुर्वीच्या निर्णयामध्ये मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे यांचे दर कमी असल्याने त्यांना कार्यादेश देण्यात यावा असा निर्णय झालेला आहे. या ठरावात त्यांची एकत्रित रक्कम रु.७,४०,९३९.९२ इतकी होती. ई.डी.पी.विभागामार्फत प्राप्त झालेल्या नविन तक्त्यानुसार मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे यांचेच दर कमी येत असून आयटेम क्र.१.०१ वाढल्याने रक्कमेत वाढ झालेली आहे. नवीन सुधारीत रक्कम रु. ८,८१,४८३.९२ इतकी होत आहे.

उपरोक्त दोन्ही तक्त्यानुसार साईआश्रममधील प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसविणे व त्यासाठीचे वायरींग काम करुन घेणेकामी मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे यांचेच एकत्रित दर कमी येतात. तरी ई.निविदेतील ई.डी.पी.विभागाने ०३ पात्र निविदाधारकांचे स्वतंत्र दरपत्रके डाऊनलोड करुन त्याआधारे तयार केलेल्या नविन तक्त्यानुसार मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे यांचे एकत्रित रु. ८,८१,४८३.९२ मात्र निम्नतम नविन दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देणे तसेच सभाकामकाज विभागाकडून जा.नं.एसएसएसटी/ वशी-०४/ ४३४६/ २०१७ दि.१४-०३-२०१७ अन्वये अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५-०२-२०१७ चे सभेतील विषय क्र.०२ निर्णय क्र.०२ (२८) चे ठरावास सुधारित मान्यता मिळणेस विनंती.

साईआश्रममधील प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसविणे व त्यासाठीचे वायरींग काम करुन घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीच्या पुर्वीच्या निर्णयामध्ये मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे यांचे दर कमी असल्याने त्यांना कार्यादेश देण्यात यावा असा निर्णय झालेला आहे. या ठरावात त्यांची एकत्रित रक्कम रु. ७,४०,९३९.९२ इतकी होती. mahatenders.gov.in यांचेकडून प्राप्त झालेल्या ई-मेल नुसार वेबसाईटवर प्रत्येक पार्टीजच्या डाऊनलोड केलेल्या स्वतंत्र दरपत्रकावरुन नविन तयार केलेल्या तुलनात्मक तक्त्याप्रमाणे मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे यांचेच दर कमी येत असून आयटेम क्र.१.०१ वाढल्याने रक्कमेत वाढ झालेली आहे. नवीन सुधारित रक्कम रु. ८,८१,४८३.९२ इतकी होत आहे. या सुधारित रक्कमेसह मे.श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन प्रालि., पुणे यांना कार्यादेश देणेकामी मान्यता मिळावी, ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रममधील प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसवून वायरींग करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्याधील निम्नतम दरधारक श्री.व्यंकटेश्वरा टर्न कि प्रोजेक्ट सोल्युशन प्रा.लि., पुणे यांचे रु. ८,८१,४८३.९२ निम्नतम दर स्विकारणेत येऊन यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०८ **आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता संस्थानचे पुर्व लेखापरिक्षण कामकाजासाठी न्युनतम तीन दरधारक लेखापरिक्षकांशी दरांबाबत चर्चा करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

**प्रस्तावना:-** मा.व्य.स. निर्णय क्र.५०.दि.२५.०२.२०१७ अन्वये **"सन २०१७-१८** या आर्थिक वर्षाचे पुर्व लेखापरिक्षक कामकाजासाठी लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करणेकामी प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली."

**प्रस्ताव:-** मा.व्य.समिती सभा निर्णयास अनूसरून संस्थानचे पुर्व लेखापरिक्षण कामकाजाकरीता, पुर्व लेखापरिक्षकाची (Pre Auditor) नेमणुक करणेकामी दि.०४/०३/२०१७ ते दि.११/०३/२०१७ याकालावधीत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर माहिति प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये नामांकित (साधारणतः रु.४०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/ कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनुभव असलेल्या) अंतर्गत लेखापरिक्षण संस्थांना बंद पाकिटामध्ये लेखापरिक्षण संस्थेची माहिती व दुस-या बंद पाकिटामध्ये अपेक्षीत फी सह अर्ज करण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. त्यास अनुसरुनः-

**१.** दि.११.०३.२०१७ या मुदतीत खालील प्रमाणे एकुण १४ सिलबंद पाकिटे संस्थानचे कार्यालयात प्राप्त झालेली आहेत.

| **अ.क्र.** | **लेखापरिक्षण संस्थेचे नाव** | **आवक क्र.** | **दिनांक** |
|---|---|---|---|
| १ | उल्हास बोरसे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, नासिक | २४३६३ | १०.०३.२०१७ |
| २ | जयेश देसले ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, नासिक | २४३६४ | १०.०३.२०१७ |
| ३ | एन.सी.मित्तल ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, फरीदाबाद | २४४४५ | १०.०३.२०१७ |
| ४ | मे.एस.एस.ए.ए.एम.ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, राहूरी | २४४८३/ | ११.०३.२०१७ |
| ५ | एस.जी.पी.आर.एस. ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस,चिंचवड | २४५१४ | ११.०३.२०१७ |
| ६ | गांगजी ॲन्ड बुलबुले चार्टर्ड अकौटंटस, सोलापुर | २४५१५ | ११.०३.२०१७ |
| ७ | सतीश बर्वे ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, मुंबई | २४५१६ | ११.०३.२०१७ |
| ८ | मे.यु.ए.दुधेडिया ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, पुणे | २४५१८ | ११.०३.२०१७ |
| ९ | पी.पी.मुथा ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, | २४५१९ | ११.०३.२०१७ |
| १० | टी.आर.चढ्ढा ॲन्ड कं.एल.एल.पी.चार्टर्ड अकौटंटस, पुणे | २४५२० | ११.०३.२०१७ |
| ११ | के.के.एस.एस.ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस,पुणे | २४५२१ | ११.०३.२०१७ |
| १२ | जी.बी.राठी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, पुणे | २४५२३ | ११.०३.२०१७ |
| १३ | निशिकांत देशपांडे ॲन्डकं.चार्टर्ड अकौटंटस,भुसावळ | २४५२४ | ११.०३.२०१७ |
| १४ | रोहित पारख ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, शिर्डी | २४५२६ | ११.०३.२०१७ |

पुर्व लेखापरिक्षण कामकाजासाठी मुदतीत आलेले १४ सिलबंद लिफाफे दि.२०.०३.२०१७ रोजीचे स्थानिक खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात येऊन, त्यामधील पात्र- अपात्र लेखापरिक्षक तसेच त्यांच्या फी चा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता सादर करीत आहे.

| **अ.क्र.** | **लेखापरिक्षण संस्थेचे नाव** | अपेक्षित वार्षिक लेखापरिक्षण फी सेवाकरासह | | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|---|
| | | संस्थान कामकाजासाठी रुपये | रुग्णालये कामकाजासाठी रुपये | |
| १ | उल्हास बोरसे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, नासिक | **१,००,०००/-** | **१,००,०००/-** | पात्र |
| २ | जयेश देसले ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, नासिक | **१,००,०००/-** | **१,००,०००/-** | पात्र |
| ३ | एन.सी.मित्तल ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, फरीदाबाद | २,४०,०००/- | २,४०,०००/- | पात्र |
| ४ | मे.एस.एस.ए.ए.एम.ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, राहूरी | २,५०,०००/- | २,५०,०००/- | पात्र |
| ५ | एस.जी.पी.आर.एस. ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस, चिंचवड | २,२५,०००/- | २,२५,०००/- | पात्र |
| ६ | गांगजी ॲन्ड बुलबुले चार्टर्ड अकौटंटस, सोलापुर | ११,००,०००/- | २,००,०००/- | पात्र |
| ७ | सतीश बर्वे ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, मुंबई | ४,५०,०००/- | ४,५०,०००/- | पात्र |
| ८ | मे.यु.ए.दुधेडिया ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, पुणे | ८,६२,५००/- | ८,६२,५००/- | पात्र |
| ९ | पी.पी.मुथा ॲन्ड असो. चार्टर्ड अकौटंटस, | ३,५७,६५०/- | ३,५७,६५०/- | पात्र |
| १० | टी.आर.चढ्ढा ॲन्ड कं.एल.एल.पी.चार्टर्ड अकौटंटस, पुणे | १२,१४,४००/- | १२,१४,४००/- | पात्र |
| ११ | के.के.एस.एस.ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस,पुणे | **१,००,०००/-** | **१,००,०००/-** | पात्र |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | जी.बी.राठी अ‍ॅन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, पुणे | २,२८,८५०/- | १,१३,८५०/- | पात्र |
| १३ | निशिकांत देशपांडे अ‍ॅन्डकं.चार्टर्ड अकौटंटस,भुसावळ | ५,१८,६५०/- | ३,४५,०००/- | पात्र |
| १४ | रोहित पारख अ‍ॅन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस, शिर्डी | - | - | अपात्र |

विभागाचे स्पष्ट मत व अभिप्रायः- उपरोक्त तक्यातील अ.नं.१,२ व ११ या तीन लेखापरिक्षकांचे न्युनतम दर सारखेच असून, त्या तीघांना मा.उपसमितीच सभेपुढे चर्चेसाठी बोलविणेबाबत मा खरेदी समितीच्या सभेमध्ये चर्चा झालेली आहे.

त्या अनुषंगाने गडद अधोरेखीत पात्र तीन लेखापरिक्षकांना चर्चेसाठी मा.उपसमिती सभेपुढे बोलविण्यास व सदरचा विषय मा.उपसमितीसमोर सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता संस्थानचे पुर्व लेखापरिक्षण कामकाजासाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील अ.नं.१,२ व ११ या तीन लेखापरिक्षकांचे न्युनतम दर समान असल्याने या तीनही दरधारकांना आजचे उपसमिती सभेपुढे चर्चेसाठी बोलविणेत आले होते. पैकी अ.नं.२ जयेश देसले अ‍ॅन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, नासिक हे स्वत: हजर नव्हते, त्यांचे प्रतिनिधीनां समिती सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत समाधानकारक उत्तर देता आले नाही. चर्चेअंती अ.नं.१ उल्हास बोरसे अ‍ॅन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस,नाशिक व अ.नं. ११ के.के.एस.एस.अ‍ॅन्ड असो.चार्टर्ड अकौटंटस,पुणे यांना आर्थिक वर्ष २०१७-१८ करीता संस्थानचे पुर्व लेखापरिक्षण कामाचा कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**०९ फायर विभागाकरीता फायर सल्लागार (कन्सल्टंट) नेमणूक करणेकामी न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

कायदयातील तरतुदी- अधिनियम २००४ मधील तरतुद- १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील,असे नमूद आहे.

संदर्भ क्र.०१ महाराष्ट्र शासन उदयोग, उर्जा व कामगार विभागाचे खरेदी पुस्तीका पा.नं.६६ मधील ४.४.३.१ मधील पा.नं. ६७ वर नमुद केलेप्रमाणे कामाची पुर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर , खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) ३ निविदा पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल. अशा प्रसंगी किंमतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल.

सुसाध्य कारणे –

१. संस्थानचे सर्व परिसरातील ६४ इमारतींचे झालेले दोन फायर ऑडीट मधील त्रुटीची पुर्तता करुन शिर्डी नगरपंचायतचे फायर विभागामार्फत राज्य शासनास प्रस्ताव सादर करावयाचा आहे. त्याकामी सल्लागार नेमणुक कार्यवाही गेल्या ०२ वर्षापासुन प्रलंबीत आहे.

२. शताब्दी महोत्सवा दरम्यान शिर्डीमध्ये वर्षभर साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण जास्त असणार आहे. त्यामुळे संस्थान परिसरात NBC- 2005 नुसार संस्थानचे सर्व इमारतींना आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.

**पार्श्वभुमी–** फायर अ‍ॅण्ड सेफ्टी विभागाचे स्वतंत्र कामकाज संरक्षण विभागाचे अतंर्गत चालु आहे संस्थानचे ६४ इमारतीचे फायर ऑडीट लाईफ लाईन फायर सर्व्हीसेस , वारी व सी.आय.एस.एफ. मुंबई यांचेमार्फत यापुर्वी झालेले आहे. संस्थानचे सर्व इमारतींना नॅशनल बिल्डींग कोड २००५ नुसार आग प्रतिबंधक उपाययोजना (स्थायी अग्निशमन यंत्रणा) प्रस्थापित करणेबाबत शिर्डी नगरपंचायतीचे पत्रे संस्थानला प्राप्त झालेले आहे. त्यानुसार शासन मान्यता प्राप्त अभिकरणाची नियुक्तीबाबत कार्यवाही चालु आहे.

**प्रस्ताविक -:** दि.११.०४.२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेमध्ये नांमांकित कपणीचे सल्लागारांचे प्राप्त ०३ पैकी पात्र ०२ निवीदांपैकी १. ग्राफीक इंफ्रास्ट्रकचर, औरंगाबाद २. रिलायन्स फायर , मुंबई यांचे कमर्शिअल बिड उघडणेत आलेले आहेत त्यांचा तुलनात्मक तक्ता खालिल प्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील नमुद केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | ग्राफिक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद | **.५० टक्के** | संस्थानचे एकूण ६४ इमारतींना स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणी कामी येणा-या |
| ०२ | रिलायंन्स फायर प्रोटेक्शन सिस्टीम,मुंबई | **२.९५ टक्के** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | एकूण खर्चावर होणा-या टक्केवारी प्रमाणे. |

सुस्पष्ट अभिप्राय– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी मंदिर व परिसराचे ऑडीटमधील त्रुटींचे निवारण करुन सर्व इमारतींना स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापित करणेसाठी पात्र तांत्रिक निवीदांपैकी १. ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर, औरंगाबाद. २.रिलायन्स फायर,मुंबई यांचे कमर्शियल निविदा दि११.०४.२०१७ चे खरेदी समिती समोर उघडणेत आलेल्या आहेत. त्यापैकी अ.नं. ०१ ग्राफीक इंफ्रास्टक्चर,औरंगाबाद यांनी न्युनतम दर दिलेले आहेत त्यांना येणा-या उप समितीचे सभेमध्ये अंतिम वाटाघाटी साठी बोलाविणे आवश्यक आहे.

मागणी- दि.११.०४.२०१७ रोजी उघडण्यात आलेल्या कमर्शियल बिडमध्ये पात्र ०२ निवीदांपैकी १. ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर, औरंगाबाद यांनी न्युनतम दर दिलेले आहेत त्यांना संस्थानचे अटी शर्ती नुसार पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे.

करीता...,

अ. ग्राफीक इंफ्रास्टक्चर,औरंगाबाद यांनी न्युनतम दर दिलेले आहेत त्यांना मा.उपसमितीचे अगामी सभेस अंतिम वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेस, अंतिम वाटाघाटीनुसार पुरवठा आदेश देणेस व करारनामा करुन घेणेस मान्यता असावी.

ब. पात्र अ.नं. ०१ ग्राफिक इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.औरंगाबाद यांना पुरवठा आदेश दिलेनंतर त्यांनी काही अपरिहार्य कारणाने काम स्थगीत केलेस त्यांचे ऐवजी अ.नं.०२ रिलायंन्स फायर प्रोटेक्शन सिस्टीम, मुंबई यांचेकडून त्यांनी दिलेल्या दराप्रमाणे रिक्त काम पुर्ण करुन घेणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त पात्र ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर, औरंगाबाद यांचे न्युनतम दरास अनुसरुन त्यांना दयावयाचे नियुक्तीबाबत विषय मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर विभागाकरीता फायर सल्लागार (कन्सल्टंट) नेमणूक करणेकामी महाराष्ट्र शासनाचे अग्निशमन सेवा संचालनालय, सांताक्रुज, मुंबई या कार्यालयाकडून फायर सल्लागार मिळणेकामी पत्रव्यवहार करणेत यावा. त्यांचेकडून फायर सल्लागार उपलब्ध न झाल्यास उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक ग्राफीक इंफ्रास्ट्रक्चर, औरंगाबाद यांची फायर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभाग)

---

**१० श्रींचे उत्सव कालावधीत शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी वाहतुक शाखा यांना एक भाडोत्री क्रेन उपलब्ध करुन देणेसाठी वार्षिक दर निश्चित करुन निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

महाराष्ट्र शासन-२००४ अधिनियमची तरतुदः- कलम १७ (१) मध्ये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थचालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील, असे नमुद केलेले आहे.

प्रास्ताविकः - दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत श्री रामवनमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव, श्री पुण्यतिथी उत्सव तसेच नाताळसण व नववर्षारंभ निमित्ताने शिर्डी महोत्सव साजरा करण्यात येतो. या उत्सव कालावधीत शिर्डी शहरात श्री साईबाबांचे दर्शनास राज्यातुन परराज्यातुन देशातुन, विदेशातुन भाविक येत असल्याने वाहनांची व भाविकांची प्रचंड गर्दी होते नगर-मनमाड राज्य महामार्ग हा श्री साईबाबा समाधी मंदीरा जवळुन जात असलेने रोडवर वाहने उभी केली जातात, त्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होते. सदर वाहनतुकीचे नियमनाकरीता शिर्डी पोलीस स्टेशन वाहतुक शाखा, यांना एक क्रेन व एक टेम्पो दररोज उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या उत्सव कालावधीत यांचे मागणीनुसार यांना एक संस्थानचा क्रेन व एक भाडोत्री खाजगी क्रेन उपलब्ध करुन देण्यात येतो.

विभागाचा अभिप्रायः- वाहन विभागाकडील दि.०१/०२/२०१७ रोजीचे मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार, श्रींचे उत्सव कालावधीत एक भाडोत्री क्रेन उपलब्ध करुन लावणे कामी परिसरातील क्रेन सर्व्हिस पुरवठादारांकडून वार्षिक दर निश्चित करणे करीता दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली होती. सदर मान्यतेनुसार इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/५८१३/२०१७ दि.०७/०२/२०१७ रोजीचे पत्राने परिसरातील ०८ क्रेन सर्व्हिस पुरवठादारांकडून वार्षिक दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यापैकी एकुण ०४ दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

सदर दरपत्रके दि.०३/०४/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेली असुन दरपत्रकात देवु केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | क्रेन सर्व्हिस पुरवठादारांची नांवे | दरपत्रकात प्रति दिन (१२ तास) करीता दिलेले दर (रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | साई सिध्दी क्रेन सर्व्हिस, शिर्डी | १,९००/- | **L1** |
| ०२ | ओम गुरुदेव क्रेन सर्व्हिस, कोपरगांव | ३,०००/- | L2 |
| ०३ | भगवान क्रेन सर्व्हिस, राहुरी | ३,६००/- | L4 |
| ०४ | त्रिमुर्ती क्रेन सर्व्हिस, राहुरी | ३,५००/- | L3 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यांचा विचार करता, खरेदी समितीने अ०.नं.१ चे साई सिध्दी क्रेन सर्व्हिस, शिर्डी यांनी प्रति दिन (१२ तास) करीता दरपत्रकात देवु केलेले निम्नतम दर रु.१९००/- स्विकारण्यात येऊन त्यांना एक वर्षकरीता भाडोत्री क्रेन आवश्यकतेनुसार लावणे कामी कार्यादेश देणेची शिफारस केलेली आहे.

मागणी- तरी श्रींचे उत्सव / गर्दीचे कालावधीत शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी वाहतुक शाखा यांचे मागणीनुसार एक भाडोत्री क्रेन उपलब्ध करुन देणेसाठी साई सिध्दी क्रेन सर्व्हिस, शिर्डी यांनी प्रति दिन (१२ तास) करीता दरपत्रकात देवु केलेले निम्नतम दर रु.१९००/- स्विकारण्यात येऊन त्यांना एक वर्षकरीता भाडोत्री क्रेन आवश्यकतेनुसार लावणे कामी मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणेसाठी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उत्सव कालावधीत व गर्दीचे कालावधीत वाहतुकीचे नियमनाकरीता शिर्डी पोलीस स्टेशन वाहतुक शाखा यांना एक भाडोत्री क्रेन उपलब्ध करुन देणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक साई सिध्दी क्रेन सर्व्हिस, शिर्डी यांना एक वर्षाकरीता भाडोत्री क्रेन आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देणेकामी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**११ संस्थानचे २४ वाहनांकरीता स्पिड गव्हर्नर बसविणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणकामी उपसमितीची मान्यता मिळणेबाबत.**

महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुदः-

१) कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व व कामाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगंणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." असे नमुद केलेले आहे.

२) कलम २१ (१) (ज)मध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याहीकायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करण्यात येईल, नमुद केलेले आहे.

प्रास्ताविकः- केंद्र शासनाचे सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि.०१.१२.२०१६ रोजीची अधिसूचनामध्ये,"*राज्य सरकार द्वारा केन्द्रीय मोटार यान नियम १९८९ के नियम ११८ के उपनियम (२) के अधीन अधिसूचित परिवहन वाहनों को गति नियंत्रक (गति प्रतिबंधक युक्तियॉ या गति प्रतिबंधक कार्य) से सज्जित करने की आवश्यकता से ३१ जनवरी, २०१७ की अवधि तक छुट प्रदान करती है*" असे नमुद केलेले आहे. त्यानुसार, महाराष्ट्र शासनाचे परिवहन विभागाने दि.०१/०२/२०१७ पासुन थ्रीव्हिलर, ॲम्ब्युलन्स, फायर फायटर वगळता सर्व वाहनांना वेग-नियंत्रक अनिवार्य केलेले आहे.

विभागाचा अभिप्रायः- वाहन विभागातील दि.११.०३.२०१७ रोजीचे मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार, संस्थाचनचे प्रवासी बस-११, मालवाहतुक (चार-चाकी) वाहने-१३ अशा एकुण २४ वाहनांकरीता वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हेनर) बसविणे आवश्यमक असलेने परिसरातील परिवहन मान्यता प्राप्त एजन्सीं यांचेकडुन दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यतेनुसार इकडील जा.नं.एसएसएस/वशी/वाहन/६३१३२०१७ दि.१५.०३.२०१७ रोजीचे पत्राने परिसरातील ०५ वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हएनर) मान्याता प्राप्त एजन्सीं यांचेकडुन दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यापैकी ०५ दरपत्रके प्राप्त झालेली सदर दरपत्रके दि.०३.०४.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यारत आलेली असुन दरपत्रकात देवु केलेल्या दरांचा तुलनात्मएक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | पुरवठादाराचे नांव | कंपनी | दरपत्रकात दिलेले दर प्रति नग (रु) | नुतनीकरण फी (रु.) प्रती वाहन | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रणित एजन्सी, राहुरी | रोज मरता | ७,४००/- सर्व करासंहीत | १,३९०/- | L-1 पात्र |
| २. | सहारा मोटर्स, संगमनेर | जी.आर.एल.<br>मायक्रो ऑटोटेक | ७,०००/- + व्हॅट<br>७,०००/- + व्हॅट | १,२००/- ते १,५००/-<br>१,२००/- ते १,५००/- | अपात्र ट्रेड सर्टीफिकेट नाही. |
| ३. | श्री साई सर्व्हिस सेंटर, साकुरी | --- | ८,०००/- सर्व करासंहीत | २,०००/- | L-2 |
| ४. | श्री साई सर्व्हिस सेंटर, साकुरी | रोजमरता | ९,५००/- सर्व करासंहीत | २,०००/- | L-3 |
| ५. | सनराईज आटोमोटीव्ह, अ.नगर | --- | १०,५००/- सर्व करासंहीत | २,४००/- | L-4 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यांचा विचार करता खरेदी समितीने अ.न.०१ चे प्रणित एजन्सी, राहुरी यांनी त्यांचे दरपत्रकात देवु केलेले नवीन गर्व्हनर करीता निम्नतम दर रु.७,४००/- सर्व करांसहीत तसेच पुढील वर्षा करीता गर्व्हनर नुतनीकरण फी प्रति वाहन रु.१,३९०/-मात्र सर्व करांसहीत दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देणेची शिफारस केलेली आहे.

मागणीः- तरी संस्थानचे २४ वाहनांचा वेग नियंक्र्क बसविणे कामी प्रणित एजन्सी, राहुरी यांचे दरपत्रकात देवु केलेले निम्नतम दर रु. ७,४००/-प्रति वाहन व पुढील वर्षा करीता प्रती वाहन गर्व्हनर नुतनीकरण फी रु.१,३९०/-सर्व करांसहीत मात्र स्विकारण्यात येऊन त्यांचेकडुन संस्थान वाहनांचे २४ वाहनांचा वेग नियंक्र्क बसविणे व पुढील वर्षाकरीता वेग नियंत्रक परवाना नुतनीकरण फी बाबतचा कार्यादेश देणे कामी मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणेसाठी सदरचा प्रस्ताव स्थानिक उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे २४ वाहनांकरीता स्पिड गव्हर्नर बसविणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक प्रणित एजन्सी, राहुरी यांनी देऊ केलेले दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**१२ संस्थान वाहनांकरीता आवश्यकतेनुसार बॅटऱ्या खरेदी करणेकामी, निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम-२००४ मधील तरतुदः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिडी अधिनियम, २००४ मधील कलम १७ (१)मध्ये भक्तगणाना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच कलम २१ (१) (ग) मध्ये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही भक्तांना धार्मीक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे ,अशी तरतुद आहे.

प्रास्ताविकः- वाहन विभागातील दि.११.०३.२०१७ रोजीचे मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार, संस्थान वाहनांकरीता पुढील एक वर्षा करीता आवश्यकतेनुसार बॅटरी पुरविणे कामी वार्षीक दर निश्चित करणेसाठी परिसरातील एक्साईड, एस.एफ. सोनीक, ॲमरॉन,प्रस्ट्रोलाईन, पॅनासोनिक व टाटा या नामांकित कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून जुनी बॅटरी परत (By Back) घेवुन तीची किंमत वजा करुन नवीन बॅटरी देणे बाबत दरपत्रके मागविणे बाबतचे प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.

विभागाचा अभिप्रायः- सदर मान्यतेनुसार इकडील जा.नं.एसएसएस/वशी/वाहन/६४०४/२०१७ दि.१२१.०३.२०१७ रोजीचे पत्राने परिसरातील ०६ बॅटरी पुरवठादार यांचेकडुन दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यापैकी ०४ दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. सदर दरपत्रके दि.०३.०४.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेली असुन दरपत्रकात देवु केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बॅटरी प्रकार | वर्धमान टायर्स, श्रीरामपुर | | | साई अॅटो बॅटरी सर्व्हिस,शिर्डी | | | साईनाथ बॅटरीज अॅण्ड अॅटो इलेक्ट्रीकल्स, इनव्हेटर सेल्स अॅण्ड सर्व्हिस शिर्डी | | | साईनाथ बॅटरीज अॅण्ड अॅटो इलेक्ट्रीकल्स, इनव्हेटर सेल्स अॅण्ड सर्व्हिस शिर्डी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नवीन बॅटरी | जुनी बॅटरी | जुनी बॅटरीची किंमत वजा करुन रक्कम | नवीन बॅटरी | जुनी बॅटरी | बाय बॅकसह रक्कम रु. | नवीन बॅटरी | जुनी बॅटरी | बाय बॅकसह रक्कम रु. | नवीन बॅटरी | जुनी बॅटरी | बाय बॅकसह रक्कम रु. |
| | बॅटरी कंपनी | अॅमरॉन | | | | एस.एफ.सोनीक | | अॅमरॉन | | | एस.एफ.सोनीक | | |
| 01 | 150 AH | 11,161/- | 2400/- | 8761/- | | -- | **8263/- L1** | 11423/- | दर नमद | | 11753/- -/- | | |
| 02 | 130/120 AH | 9073/- | 2200/- | **6873/- L1** | | | 7320/- L2 | 9641/- | -- | | 10495/- -/- | | |
| 03 | 88 AH | 5710/- | 1400/- | 4310/- L2 | | | **4171/- L1** | 6032/- | -- | | 6866/- | | |
| 04 | 80 AH | 5424/- | 1200/- | 4224/- L2 | | | **4158 L1** | 6166/- | -- | | 6461/- | | |
| 05 | 75/ 65AH | 6435/- | 1000/- | 5435/- L2 | | | **3951 L1** | 5732/- | -- | | 6132/- | | |
| 06 | Din 65 AH | 5577/- | 800/- | 4777/- L2 | | | **4253 L1** | 6361/- | -- | | 6533/- | | |
| 07 | 55 AH | 3082/- | 500/- | 2582/- L2 | | | **4185 L1** | 5650/- | -- | | 6401/- | | |
| 08 | 40 / 35 AH | 3082/- | 500/- | 2582/- L2 | | | **2562 L1** | 3908/- | -- | | 4372/- | | |
| 09 | 2.5 LC | 800/- | 50/- | 750/- | | | **584 L1** | 824/- | -- | | 825/- | | |
| 10 | 7 L.B. | -- | -- | -- | | | **928 L1** | 1362/ | -- | | 1958/- | | |
| 11 | SQT-4 | 950/- | 50/- | 900/- L2 | | | **708 L1** | 927/- | -- | | 1167/- | | |
| 12 | SQT-5 | 1200/- | 100/- | 1100/- L2 | | | **858 L1** | 1138/- | -- | | 1164/- | | |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यांचा विचार करता खरेदी समितीने अ.न.०२ करीता वर्धमान टायर्स, श्रीरामपुर यांचे अॅमरॉन कंपनीचे 130/120 बॅटरी साईज करीता सर्व करांसहीत दरपत्रकात देवु केलेले दर जुनी बॅटरी परत (By back) घेऊन तीची किंमत वजा करुन नवीन बॅटरी करीता निम्नतम दर स्विकारणेस तसेच अ.न. ०१ व ०३ ते १२ करीता साई ऑटो बॅटरी सर्व्हिस शिर्डी यांचे एस.एफ.सोनीक कंपनीचे संस्थान वाहनाचे उर्वरित बॅटरी करीता त्यांचे दरपत्रकात देवु केलेले ठळक अक्षरातील निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देणेची शिफारस केलेली आहे.

**मागणी:-** तरी संस्थान वाहनाचे कार्यालयीन रुग्णवाहीका सर्व बसेस व मालवाहतुक वाहने करीता वार्षीक दर निश्चित करणेसाठी संस्थान वाहनाचे जुनी बॅटरी परत ( By back ) घेऊन तीची किंमत वजा करुन नवीन बॅटरी तुलनात्मक तक्त्यातील ठळक अक्षरात नमुद केलेल्या तपशिलानुसार निम्नतम दरपत्रधारकांस कार्यादेश देणे कामी मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणेसाठी सदरचा प्रस्ताव स्थानिक उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वाहनांकरीता आवश्यकतेनुसार बॅटऱ्या खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेल्या निम्नतम दरधारकास कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

१३ **श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा D2H डिश, टिव्ही चॅनेल, वेबसाईट व मोबाईल वरील सुविधा उपलब्ध करुन देणेकामी विविध पुरवठाधारकांकडून तृतीय वेळेस मागविण्यात आलेल्या निविदांचे वाणिज्य ई-निविदामधील पात्र निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीकामी बोलाविणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद :** कलम १७ (१) नुसार.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :** 1) मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 08/10/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 331.

**प्रास्ताविक :** साईभक्तांचे सेवेसाठी श्रींचे ऑनलाईन दर्शन व आरती ऑनलाईन प्रक्षेपीत करणेसाठी Tata Communications Ltd., Mumbai व Associated broadcasting Co. Pvt. Ltd., (TV-9) यांना अनुक्रमे D2H (डिश) व टिव्ही चॅनेलसाठी कार्यादेश देण्यात आलेले होते. त्यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणे यांची सदर सुविधेकामीची मुदत अनुक्रमे दि. 13/11/2016 व दि. 31/08/2016 रोजी संपुष्टात आलेली आहे. सदर सुविधेस साईभक्तांचा प्रतिसाद पाहता निविदा प्रक्रिया राबवुन नविन पुरवठाधारकांची नेमणुक करेपर्यंत Tata Communications Ltd., Mumbai व Associated broadcasting Co. Pvt. Ltd., (TV-9) यांना मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 19/09/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 674 व मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 30/11/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 864 चे निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
सद्यस्थितीत Tata Communications Ltd., Mumbai व Associated broadcasting Co. Pvt. Ltd., (TV-9) यांचेकडुन सदर सुविधेकामी पुढीलप्रमाणे रक्कम (रॉयल्टी) देणगी स्वरुपात घेण्यात येते.

| अ. नं. | कंपनीचे नाव | तपशिल | मासिक रॉयल्टी देणगी रक्कम रुपये | वार्षिक रॉयल्टी देणगी रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 01 | Tata Communications Ltd., Mumbai | D2H (डिश) | 15,83,333/- | 1,90,00,000/- |
| 02 | Associated broadcasting Co. Pvt. Ltd., (TV-9) | टिव्ही चॅनेल | 02,10,833/- | 25,30,000/- |

श्रींचे ऑनलाईन दर्शन D2H (डिश), टिव्ही चॅनेल, वेबसाईट व मोबाईलवर प्रक्षेपीत करणेसाठी प्रचलित पध्दतीनुसार प्रथम व व्दितीय ई-निविदा प्रक्रियेस प्रतिसाद न मिळाल्याने, तृतीय वेळेस ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदरच्या कालावधीत पुरेशा ई-निविदा प्राप्त न झाल्याने अनुक्रमे 14 दिवस, 17 दिसस व 11 दिवस असे तिन वेळेस सदरचे ई-निवेदेस मुदतवाढ देण्यात आलेली होती.
तृतीय वेळेस प्रसिध्द करण्यात आलेल्या ई-निविदेअंतर्गत तृतीय वेळेस मुदतवाढ देऊन प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | पुरवठाधारक | दिनांक व आवक नबंर |
|---|---|---|
| **DTH Platforms** | | |
| 1 | Shemaroo Entertainment Ltd, Mumbai | 03/01/2017 No. 19518 |
| 2 | Tata Communications Limited, Mumbai | 20/01/2017 No. 20821 |
| **TV Channel** | | |
| 1 | Tata Communications Limited, Mumbai | 20/01/2017 No. 20818 |
| 2 | Associated Broadcasting co.Pvt. Ltd, Hyderabad | 13/01/2017 No. 20255 |
| **Mobile & Internet** | | |
| 1 | Shemaroo Entertainment Ltd, Mumbai | 03/01/2017 No. 19519 |
| 2 | Tata Communications Limited, Mumbai | 20/01/2017 No. 20820 |
| 3 | SwiftMail Communications Ltd, Noida | 23/02/2017 No. 23255 |

सदरच्या निविदांचे तांत्रिक निविदा उपरोक्त संदर्भ क्रं. 03 चे मंजुर टिपणी अन्वये दि. 20/03/2017 रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या असुन, सर्व निविदा पात्र झालेल्या असुन सदरच्या पात्र निविदांचे वाणिज्यीक निविदा दि. 03/04/2017 रोजी उघडण्यात आलेल्या असुन त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**DTH Platforms**

| | (Exclusive) | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Shemaroo Entertainment Ltd, Mumbai | 5,00,000/- | 6,00,000/- | 7,00,000/- | 18,00,000/- |
| 2. | Tata Communications | 1,85,50,000/- | 1,88,50,000/- | 1,92,50,000/- | **5,66,50,000/-** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Limited, Mumbai | | | | |
| | **(Non Exclusive)** | **1st Year** | **2nd Year** | **3rd Year** | **Total** |
| 1. | Shemaroo Entertainment Ltd, Mumbai | 3,00,000/- | 4,00,000/- | 5,00,000/- | 12,00,000/- |
| 2. | Tata Communications Limited, Mumbai | 25,00,000/- | 28,00,000/- | 32,00,000/- | 85,00,000/- |
| | | | | **Total** | **97,00,000/-** |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता DTH Platforms साठी Tata Communications Limited, Mumbai यांनी देऊ केलेली रक्कम अनुक्रमे 1,85,50,000/-, 1,88,50,000/- व 1,92,50,000/- एकुण 5,66,50,000/- हि उच्चत्तम आहे. परंतु सद्यस्थितीत Tata Communications Limited, Mumbai यांचेकडुन सदर सुविधेपोटी संस्थानला वार्षिक 1,90,00,000/- इतकी रक्कम प्राप्त होत आहे. सबब Tata Communications Limited, Mumbai यांना मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर वाटा-घाटीसाठी बोलवुन ते देत असलेल्या रक्कमेबाबत चर्चा करता येईल.

**TV Channel**

| **(Exclusive)** | | **1st Year** | **2nd Year** | **3rd Year** | **Total** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Tata Communications Limited, Mumbai | 15,00,000/- | 16,00,000/- | 17,00,000/- | 48,00,000/- |
| 2. | Associated Broadcasting co.Pvt. Ltd, Hyderabad | NQ | NQ | NQ | - |
| **(Non Exclusive)** | | **1st Year** | **2nd Year** | **3rd Year** | **Total** |
| 1. | Tata Communications Limited, Mumbai | 3,00,000/- | 4,00,000/- | 5,00,000/- | 12,00,000/- |
| 2. | Associated Broadcasting co.Pvt. Ltd, Hyderabad | 25,30,000/- | 25,30,000/- | 25,30,000/- | 75,90,000/- |
| | | | | **Total** | **87,90,000/-** |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता TV Channel साठी Non Exclusive साठीचे दर हे Exclusive साठीच्या दरापेक्षा जास्त असल्याने उपरोक्त दोन्ही पुरवठाधारकांना चर्चा व वाटा-घाटीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर वाटा-घाटीसाठी बोलवुन त्यांनी देऊ केलेल्या रक्कमेबाबत चर्चा करता येईल. तसेच भविष्यात संस्थानकडे TV Channel साठी सदर सुविधेची इतर पुरवठाधारकांनी मागणी केल्यास त्याबाबत विचार करता येणे शक्य होईल.

**Mobile & Internet**

| **(Exclusive)** | | **1st Year** | **2nd Year** | **3rd Year** | **Total** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Shemaroo Entertainment Ltd, Mumbai | 5,00,000/- | 6,00,000/- | 7,00,000/- | 18,00,000/- |
| 2. | Tata Communications Limited, Mumbai | 18,00,000/- | 20,00,000/- | 22,00,000/- | **60,00,000/-** |
| 3 | SwiftMail Communications Ltd, Noida | 14,95,000/- | 7,75,000/- | 8,50,000/- | 31,20,000/- |
| **(Non Exclusive)** | | **1st Year** | **2nd Year** | **3rd Year** | **Total** |
| 1. | Shemaroo Entertainment Ltd, Mumbai | 4,00,000/- | 5,00,000/- | 6,00,000/- | 15,00,000/- |
| 2. | Tata Communications Limited, Mumbai | 5,00,000/- | 5,00,000/- | 5,00,000/- | 15,00,000/- |
| 3 | SwiftMail Communications Ltd, Noida | 14,95,000/- | 7,75,000/- | 8,50,000/- | 31,20,000/- |
| | | | | **Total** | 61,20,000/- |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता Mobile & Internet करीता Non Exclusive साठीची रक्कम हि Exclusiv साठीच्या रक्कमेपेक्षा अधिक असल्याने उपरोक्त तीनही पुरवठाधारकांना चर्चा व वाटा-घाटीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर वाटा-घाटीसाठी बोलवुन त्यांनी देऊ केलेल्या रक्कमेबाबत चर्चा करता येईल

**मागणी:** प्रास्ताविकेमध्ये नमुद केलेप्रमाणे श्रींचे ऑनलाईन दर्शन ("लाईव्ह दर्शन") सुविधा D2H (डिश), टिव्ही चॅनेल व वेबसाईट व मोबाईलवर पुरविणेकामी उघडण्यात आलेल्या वाणिज्यीक निविदांबाबत निर्णय घेणेकामी पुरवठाधारकांना चर्चा व वाटा-घाटीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर बोलविणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान : तांत्रिक, व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत: श्रींचे ऑनलाईन दर्शन ("लाईव्ह दर्शन") सुविधा D2H (डिश), टिव्ही चॅनेल व वेबसाईट व मोबाईलवर पुरविणेकामी उघडण्यात आलेल्या वाणिज्यीक निविदांबाबत निर्णय घेणेकामी पुरवठाधारकांना चर्चा व वाटा-घाटीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर बालविणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर सविनय सादर.

**श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा D2H डिश, टिव्ही चॅनेल, वेबसाईट व मोबाईल वरील सुविधा उपलब्ध करुन देणेकामी प्राप्त निविदांधारकांपैकी अधिकत्तम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेसोबत दरांबाबत चर्चा केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा D2H डिश, टिव्ही चॅनेल, वेबसाईट व मोबाईल वरील सुविधा उपलब्ध करुन देणेकामी चर्चेअंती खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.**

**१.DTH साठी टाटा कम्युनिकेशन यांनी देऊ केलेले Exclusive दर**

| **Platform** | 1st Year | 2nd Year | 3rd Year | **Total** |
|---|---|---|---|---|
| **DTH** | 19600000 | 19700000 | 19800000 | 59100000 |
| **Total :** | | | | **5,91,00,000** |

**२.इंटरनेट व मोबाईल प्लॅटफॉर्मसाठी टाटा कम्युनिकेशन यांनी देऊ केलेले Exclusive दर**

| **Platform** | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| **Mobile & Internet** | 1900000 | 2100000 | 2300000 | 6300000 |

**३. T.V. चॅनलसाठी Tata Sky व Associated Broadcasting Company Pvt. Ltd. यांनी देऊ केलेले Non-Exclusive दर**

| **Company** | 1st Year | 2nd Year | 3rd Year | **Total** |
|---|---|---|---|---|
| **Tata Sky** | 3,00,000 | 4,00,000 | 5,00,000 | 12,00,000 |
| **Associated Broadcasting Company Pvt. Ltd.** | 25,30,000 | 25,30,000 | 25,30,000 | 75,90,000 |
| **Total :** | | | | **87,90,000** |

**उपरोक्तप्रमाणे अधिकतम दरधारक DTH व Mobile & Internet साठी टाटा कम्युनिकेशन यांनी देऊ केलेल Exclusive दर व T.V. चॅनलसाठी Tata Sky व Associated Broadcasting Company Pvt. Ltd. यांनी देऊ केलेले Non-Exclusive चे दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच इतर चॅनलने Non-Exclusive ची मागणी केल्यास Non-Exclusive चॅनल वाढविणेचे अधिकार संस्थानला राहतील, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**१४ ३० नग संगणक खरेदीसाठी ई-निविदेअंतर्गत उघडणेत आलेल्या वाणिज्य ई-निविदामधील निम्नतम दरधारकास चर्चा वाटाघाटीकामी बोलाविणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०४.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३५

प्रास्ताविक:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.१२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९२६ नुसार अद्यावत ३० नग संगणके खरेदी करणेसाठी संस्थानचे विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्देशानुसार माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.०७ फेब्रुवारी, २०१७ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदा मागविणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर दि.१४.०२.२०१७ ते दि.२५.०२.२०१७ पर्यंत, जाहिरात प्रसिद्ध करणेत आलेली होती. सदर कालावधीमध्ये आवक विभागामार्फत प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.०४ मार्च, २०१७ रोजीचे मंजुर टिपणीने दि.२०/०३/२०१७ रोजीचे खरेदी समिती समोर उघडण्यात आलेल्या असुन, त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Bidders Name | Shop Act. | Vat Reg. | PAN | ITR. (14-15) & (15-16) | Authorization | BS (14-15) & (15-16) | Tender Fee Rs. 500/- | EMD Rs. 10,000/- | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Laps N Comps, Mumbai | Yes | Yes | AETPV1794B | Yes | Yes | Yes | SBI 876041 | SBI 876040 | पात्र |
| 02 | Minitek Systems (India) Pvt.Ltd., Nashik | Yes | Yes | AACCM3355R | Yes | Yes | Yes | Dena 303307 | Dena 303306 | पात्र |
| 03 | Emergency Electronic Sycurity (I) Pvt.Ltd., Mumbai | Yes | Yes | AAAE5377M | Yes | Yes | Yes | ICICI 019431 | ICICI 019430 | पात्र |
| 04 | Shargee (Everything in Computers & Securities), Mumbai | Yes | Yes | AAEPS3066N | Yes | Yes | Yes | - | - | अपात्र |
| 05 | Direct IT Solution | Yes | Yes | AAKFD3975H | Yes | Yes | Yes | HDFC 022418 | HDFC 022419 | पात्र |
| 06 | Micronics Systems & Services, Nashik | Yes | Yes | AADFM9190N | Yes | Yes | Yes | BOI 025975 | BOI 026057 | पात्र |
| 07 | R.D.Data Systems, Nashik | Yes | Yes | AANPD2191E | Yes | Yes | Yes | - | - | अपात्र |
| 08 | Cybernet.it Private Limited, Pune | Yes | Yes | AABCC5138P | Yes | Yes | Yes | Kotak 345719 | Kotak 345718 | पात्र |
| 09 | Mccann Info Solution | - | - | - | - | - | - | - | - | अपात्र |
| 10 | Sai Info Services | - | - | - | - | - | - | - | - | अपात्र |

उपरोक्त पात्र निविदाधारकांच्या वाणिज्य ई-निविदा खरेदी समितीचे दि.०३/०४/२०१७ रोजी उघडण्यात आलेल्या असुन त्यांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.N | Name of Bidder | Specification (Item) | | | | Total Amt. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | All in one (AIO) Desktop with Intel Quad Core/Pentium Processor On board integrated Graphics, 10/100 LAN, 4 GB DDR3, Hard disk 500GB, No optical drive, 18.5” Monitor, USB optical mouse and keyboard, Windows 10 Pro, 03 Years onsite next business day Warranty (BRAND Dell/hp/Lenovo/asus) Commercial Desktop **Qty. 15** | | All in one (AIO) Desktop with Intel Core i3 Processor On board integrated Graphics, 10/100 LAN, 4 GB DDR3, Hard disk 500GB, No optical drive, 18.5” Monitor, USB optical mouse and keyboard, Windows 10 Pro, 03 Years onsite next business day Warranty (BRAND Hp /Dell/Lenovo) Commercial Desktop **Qty. 15** | | |
| | | Rate | Tot. Amt. | Rate | Tot. Amt. | |
| 01 | Minitek Systems (India) Pvt.Ltd., Nashik | 42034 | 630510 | 45310 | 679650 | 1310160 |
| 02 | Cybernet.it Private Limited, Pune | 50550 | 758250 | 42700 | 640500 | 1398750 |
| 03 | Micronics Systems & Services, Nashik | 45690 | 685350 | 47830 | 717450 | 1402800 |
| 04 | Emergency Electronic Security (I) Pvt.Ltd., Mumbai | 50880 | 763200 | 56165 | 842475 | 1605675 |
| 05 | Laps N Comps, Mumbai | **41750** | **626250** | **35500** | **532500** | **1158750** |
| 06 | Direct IT Solution | 47950 | 719250 | 50200 | 753000 | 1472250 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याप्रमाणे Laps N Comps, Mumbai यांचे दोन्ही प्रकारच्या संगणकासाठीचे दर (रु. ४१,७५०/- व रु. ३५,५००/- एकुण रक्कम रु. ११,५८,७५०/-) हे न्युन्नत्तम असल्याने त्यांना चर्चा व वाटा-घाटीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर बोलविता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:-** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे ३० नग संगणके खरेदी करणेसाठी उघडणेत आलेल्या वाणिज्यक ई-निविदेतील न्युन्नत्तम दरधारक Laps N Comps, Mumbai यांना चर्चा व वाटा-घाटी साठी मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर बोलविणेचे मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** ३० नग संगणके खरेदी करणेसाठी उघडणेत आलेल्या वाणिज्यक ई-निविदेतील न्युन्नत्तम दरधारक Laps N Comps, Mumbai यांना चर्चा व वाटा-घाटीसाठी मा.

व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर बोलविणेचे मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उपसमितीचे सभेसमोर सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, ३० नग संगणक खरेदीसाठी प्राप्त झालेल्या दरांमधील निम्नतम दरधारक Laps N Comps, Mumbai हे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. त्यामुळे सदरहु दरपत्रकातील त्यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

१५ **एलसीडी प्रोजेक्टर व लॅपटॉप खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदेतील वाणिज्यीक तुलनात्मक तक्त्यास अनुसरुन निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद–** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५६, १७(१) संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती वृयवस्था करणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** दि.२८/०५/२०१५ रोजीचे मा. उपसमितीचे सभेतील विषय क्र.०२, निर्णय क्र. १५१.

**प्रास्ताविक -** मा. व्यवस्थापन समिती व मा. स्थानिक उपसमितीची सभचेवेळी प्रोजेक्शन करणेसाठी प्रोजेक्टर लावणे, संस्थानचे विविध कार्यक्रम, उत्सव, शैक्षणिक संकुलाकडील कार्यक्रमाकरीता प्रोजेक्टरची आवश्यकता असते. सध्या विभागाकडे एकच प्रोजेक्टर असल्याने ०१ नग एलसीडी प्रोजेक्टर व ०१ नग लॅपटॉप खरेदीकामी येणारे अंदाजे रक्कम रु.८,९५,०००/- मात्रचे खर्चास दि.२८/०५/२०१५ रोजीचे मा. उपसमितीचे सभेतील विषय क्र.०२, निर्णय क्र. १५१ नुसार मान्यता घेण्यात आलेली जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. दि.१७/१२/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये तिस-या वेळेस प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवीदा प्रक्रीयेत तीन निवीदाधारकांनी प्रतिसाद दिलेला आहे. सदर ई-निवींदांचे प्राप्त झालेले तांत्रिक (Technical Bid) लिफाफे दि.२०/०३/२०१७ रोजी खरेदीचे समितीपुढे उघडण्यात आलेले असुन त्यांचे वाणिज्य विषयक (Commercial Bid) लिफाफे दि.०३/०४/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेले आहेत. त्याबाबतचा तांत्रिक व वाणिज्य विषयक तपशील खालीलप्रमाणे –

अ) **तांत्रिक (Technical Bid) पात्रतेबाबत गोषवारा –**

| **अ.नं.** | **निवीदाधारकाचे नाव व पत्ता** | **पात्र / अपात्र** |
|---|---|---|
| **१.** | मे. ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक्स सेक्युरीटी प्रा.लि., बांद्रा, मंबई | पात्र |
| **२.** | मे. टेक्नोसेल्स मल्टीमेडीया टेक्नॉलॉजिस प्रा. लि., औरगाबाद | पात्र |
| **३.** | मे. साईराम डिजिटल कलर लॅब, राहुरी | पात्र |

**ब) वाणिज्यक (Commercial Bid) तुलनात्मक तक्ता –**

| **अ.नं.** | **निवीदाधारकाचे नाव व पत्ता** | **ई-निवीदेतील प्राप्त दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| **१.** | मे. ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक्स सेक्युरीटी प्रा.लि., बांद्रा, मंबई | ३,३०,६६६/- | उच्चतम दर आहेत |
| **२.** | मे. टेक्नोसेल्स मल्टीमेडीया टेक्नॉलॉजिस प्रा. लि., औरगाबाद | २,२४,७३०/- | (प्राप्त ई-निवीदेत फक्त एलसीडी प्रोजेक्टरचे दर दिलेले आहेत. लॅपटॉपचे दर दिलेले नाहीत.) |
| **३.** | **मे. साईराम डिजिटल कलर लॅब, राहुरी** | **२,८८,५६२/-** | **निम्नतम दर आहेत** |

तरी, उपरोक्त वाणिज्यक तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. ३ मधील मे. साईराम डिजिटल कलर लॅब, राहुरी यांचा दर रक्कम रु. **२,८८,५६२/-** मात्र निम्नतम असल्याने सदरचे ०१ नग एलसीडी प्रोजेक्टर व ०१ नग लॅपटॉप खरेदी करणेकरीता मे. साईराम डिजिटल कलर लॅब, राहुरी यांना पुरवठा आदेश देणेच्या शिफारसीकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सविनय सादर आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान -** तांत्रिक व आर्थिक.

**मागणी-** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे सदरचे ०१ नग एलसीडी प्रोजेक्टर व ०१ नग लॅपटॉप खरेदी करणेकरीता ई-निवीदांचे प्राप्त वाणिज्यक तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. ३ मधील मे. साईराम डिजिटल कलर लॅब, राहुरी यांचे दर निम्नतम असल्याने सदरचे ०१ नग एलसीडी प्रोजेक्टर व ०१ नग लॅपटॉप खरेदी करणेकरीता मे. साईराम डिजिटल कलर लॅब, राहुरी यांना पुरवठा आदेश देणेच्या शिफारसीकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, एलसीडी प्रोजेक्टर व लॅपटॉप खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक मे. साईराम डिजिटल कलर लॅब, राहुरी यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल प्रमुख)

---

**१६ शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर पुढील कार्यवाही करणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८०० अन्वये शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदेची जाहीरात अपलोड करण्यात आली होती. त्याचप्रमाणे मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नगर येथील वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करणेत आलेली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊन लोंडीगसाठी दिनांक १५/०२/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्यामुळ प्रती दिनांक २७/०२/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ईनिविदा व जाहिरातमध्ये कळविण्यात आले होते.

उपरोक्त मुदतीत खालील पुरवठादारांच्या तांत्रिक ईनिविदांच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये प्राप्त झालेल्या आहेत :

| **अ.नं.** | **ई-निविदाधारकांचे नांव** |
|---|---|
| 1. | M/s. Jain Irrigation Systems Ltd., Jalgaon |
| 2. | M/s. Bunt Solar India Pvt. Ltd., Bangalore |
| 3. | M/s. Skylark Thermal Energy System, Pune |

वरील प्राप्त 3 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक २२/०३/२०१७ रोजी मा. प्रशासकिय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहे. त्यातील VAT, TIN, PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या कामाची यादी पुरवठा आदेशासह, कंपनी रजिस्टेशन सर्टिफिकेटस, टेडर फी व ई.एम.डी. रकमेचा डि.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट व सर्व्हे रिपोर्ट इत्यादी बाबी चेक केलेल्या असून, त्यात वरील तीनही तांत्रिक निविदा पात्र झाल्या आहेत. या पात्र झालेल्या ३ निविदाधारकांच्या ई-निविदांचे आर्थिक (Financial Bid) बीड दिनांक ०३/०४/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडणेत आल्या असून, त्यात पुढीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहेत :

| Sr. No. | Description | M/s. Skylark Thermal Energy Systems, Pune | **M/s. Jain Irrigation Systems Ltd., Jalgaon** | Bund Solar India Pvt. Ltd., Bangalore |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply, Installation, Testing & Commissioning of Solar Water Heating System Capacity 14000 Ltrs. at Shirdi Bus Stand Bhaktniwas | 47,27,380/- | **26,25,430/-** | 29,78,740/- |

उपरोक्त आर्थिक (Financial Bid) बीडमधील दरानुसार शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकामी मे. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि., जळगांव यांचे दर रुपये २६,२५,४३०/- मात्र निम्नतम आहेत. या दरानुसार त्यांचेकडून सोलर सिस्टीम बसविता येईल.

तरी शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकरीता प्राप्त व पात्र झालेल्या ई-निविदांपैकी निम्नतम दरधारक मे. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि., जळगांव यांना नियोजित स्थळी सोलर सिस्टीम बसविणेकामी कार्यारंभ आदेश देणेसाठी मा. व्यवस्थापन समितीस शिफारस करणेकरीता प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकामी मे. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि., जळगांव यांचे रु.२६,२५,४३०/- निम्नतम दर प्राप्त झालेले असून त्यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचे बरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी रु.२६,००,०००/- अंतीम दर देऊ केलेले आहेत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकामी मे. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि., जळगांव यांचे रु.२६,००,०००/- अंतिम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**परंतु सदरहू इतिवृत्तास पुष्टी देत असताना, शिर्डी बसस्थानक इमारतीचा अद्ययावत ग्रंथालय अथवा इतर विषयासाठी वापर करावा, असे ठरले. सबब सदरहू विषय तुर्त स्थगित ठेवणेत आला.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**१७ संस्थान परिसरात तयार करणेत येत असलेल्या शौचालयासाठी पाणी पुरवठा जोडून देणेसाठी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेकामी प्राप्त फेर दरपत्रकांबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतूद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (त्र) | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे. |

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०६/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.३४१ पुढीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे. **"**..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात तयार करणेत येत असलेल्या शौचालयासाठी पाणी पुरवठा जोडून देणेसाठी प्रस्तावात नमुद केलेले आवश्यक प्लंबींग मटेरियल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,२८,७७०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**"**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.८४४ (१०) पुढीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात तयार करण्यात येत असलेल्या शौचालयांस पाणी पुरवठा जोडून देणेकामी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व

अधोरखीत केलेले प्रति फुट/ नग निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

**प्रस्तावना:-** संस्थान परिसरात तयार करणेत येत असलेल्या शौचालयासाठी पाणी पुरवठा जोडून देणेसाठी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु.२,२८,७७०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.२,२८,७७०/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३४१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरहू साहित्य खरेदी करणेसाठी ०४ दरपत्रके प्राप्त झालेली होती. सदरची दरपत्रके मा.व्यवस्थापन उपसमितीचे दि.०७/११/२०१६ रोजीचे सभेत उघडणेत आली.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत याकामी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरखीत केलेले प्रति फुट/ नग निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

संस्थान परिसरात तयार करण्यात येत असलेल्या शौचालयांस पाणी पुरवठा जोडून देणेकामी भक्ती मार्केटिंग, साकुरी (राहाता) यांचेकडुन रु.१,१२,२५२/- मात्र रकमेचे प्लंबींग साहित्य खरेदी करणेसाठी जा.नं./ एसएसएसटी/पाणी पुरवठा/५४२३/२०१६, दि.२१/०१/२०१६ अन्वये व अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु. यांचेकडुन रु६६,३८४/- मात्र रकमेचे प्लंबीग साहित्य खरेदी करणेसाठी प्लंबींग साहित्य खरेदी करणेसाठी जा.नं./ एसएसएसटी/ पाणी पुरवठा/५४२२/२०१६, दि.२१/०१/२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

यापैकी अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु. यांनी कार्यादेशातील नमुद केलेल्या एकुण रु.६६,३८४/- मात्र रकमेचे मटेरियलचा पुरवठा केलेला आहे. परंतू भक्ती मार्केटिंग, साकुरी (राहाता) यांनी दि.२८/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये कार्यादेशातील नमुद मटेरियलचे दरात वाढ झालेने मटेरियलचा पुरवठा करणेस असमर्थतता दर्शविलेली. तसेच इतर कोटेशनधारकांकडे मंजुर दराने मटेरियल पुरविणेस विचारणा केली असता त्यांनीही १.१/२" सी क्लास जी.आय.पाईपचे दरात मार्केटमध्ये वाढ झालेने मटेरियल पुरविणेस असमर्थतता दर्शविलेली.

उपरोक्त कामासाठी १४०० फुट १.१/२" सी क्लास जी.आय.पाईपची आवश्यकता असून, मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०६/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.३४१ अन्वये १.१/२" सी क्लास जी.आय.पाईप खरेदी करणेसाठी अंदाजे रु.१,२६,०००/- मात्र रक्कम मंजुर करण्यात आलेली आहे. याकामी १.१/२" सी क्लास जी.आय.पाईप खरेदी करणेसाठी फेर कोटेशन मागवून खरेदी करणेस इकडील विभागाकडील दि.०६ मार्च, २०१७ रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आली. याकामी खालीलप्रमाणे ०४ दरपत्रके प्राप्त झालेली होती.

| अ.नं. | नांव | प्रशासनशाखा आवक नं. / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | साईश्रध्दा ठिबक सिंचन, लोणी, ता.राहाता. | २५१९८, दि.२१/०३/२०१७. |
| ०२ | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु. | २५१९९, दि.२१/०३/२०१७. |
| ०३ | न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) | २५२००, दि.२१/०३/२०१७. |
| ०४ | अभय मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) | २५२०१, दि.२१/०३/२०१७. |

**प्रस्ताव:-** सदरहू कामी प्राप्त ०४ दरपत्रके (कोटेशन) दिनांक ०३/०४/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेत उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ. नं. | साहित्याचा तपशिल | परिमाण / एकक | साईश्रध्दा ठिबक सिंचन, लोणी (राहाता) ०१ | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु. ०२ | **न्युपिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) ०३** | अभय मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) ०४ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | जी.आय.पाईप- १.१/२" झेनिथ/ जिंदाल कंपनी | १४०० फुट | १०४.७५ प्र.फुट (जिंदाल कंपनी) | ९५.५० प्र.फुट (स्वस्तिक कंपनी) | **८६.०० प्र.फुट (जिंदाल कंपनी)** | ८७.०० प्र.फुट (जिंदाल कंपनी) |
| | | **एकुण रक्कम-** | १,४६,६५०.०० | १,३३,७००.०० | **१,२०,४००.००** | १,२१,८००.०० |

वरील तक्त्यात नमुद केलेनुसार, कोटेशनधारक नं.०२ अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी यांनी मागणी केलेले कंपनीचे मटेरियलचे दर नमुद केलेले नसलेने त्यांचे कोटेशन विचारात घेतलेले नाही. उर्वरीत कोटेशनधारकांपैकी कोटेशनधारक नं.०३ न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) यांचे एकत्रित रु.१,२०,४००/- मात्र निम्नतम दर आहेत.

तरी संस्थान परिसरात तयार करणेत येत असलेल्या शौचालयासाठी पाणी पुरवठा जोडून देणेसाठी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेसाठी योग्य तो निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमिती सभेत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात तयार करणेत येत असलेल्या शौचालयासाठी पाणी पुरवठा जोडून देणेकामी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेकरीता उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) यांचे एकत्रित रु.१,२०,४००/- मात्र दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**१८ द्वारावती भक्तनिवास इमारत कारंजाकरीता आवश्यक इलेक्ट्रिक मोटार व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतूद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.७९१ पुढीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारतीसमोरील कारंजाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेली इले.मोटार तसेच इतर साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. "

**प्रस्तावना:-** व्दारावती भक्तनिवास इमारत कारंजाकरीता आवश्यक इले.मोटार व इतर साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु.५५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.५५,०००/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात आलेले होते.

**प्रस्ताव:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७९१ नुसार याकामी दरपत्रके (कोटेशन) मागविणेस दि.१३/१२/२०१६ रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. याकामी खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली होती.

| अ.नं. | नांव | प्रशासनशाखा आवक नं. / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | अभय मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) | २४३१३, दि.०९/०३/२०१७. |
| ०२ | मे. काले एजन्सीज, सहजानंदनगर. | २४३१४, दि.०९/०३/२०१७. |
| ०३ | न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) | २४३१५, दि.०९/०३/२०१७. |
| ०४ | श्री साई ॲग्रो एजन्सी, लोणी बु. | २४३१६, दि.०९/०३/२०१७. |
| ०५ | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु. | २४३१७, दि.०९/०३/२०१७. |

**प्रस्ताव:-** सदरहू कामी प्राप्त ०५ दरपत्रके (कोटेशन) दिनांक ०३/०४/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेत उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अं. नं. | साहित्याचा तपशिल | अभय मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) 01 | न्यु काले एजन्सीज, सहजानंदनगर (कोपरगांव) 02 | **न्युपिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) 03** | श्री साई ॲग्रो एजन्सी, लोणी बु. (राहाता) 04 | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु. 05 |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | 10 एच.पी. पाणबुडी इलेक्ट्रिक मोटार, 15 मि. हेड 4"X4" कनेक्शन कंपनी-टेक्स्मो/ॲक्वॉटेक्स | ३४,८००.०० प्र.नग (ॲक्वॉटेक्स) | ३६,६००.०० प्र.नग (ॲक्वॉटेक्स) | **३४,५००.०० प्र.नग (ॲक्वॉटेक्स)** | ४०,२००.०० प्र.नग (टेक्स्मो) | ३५,६८५.०० प्र.नग (ॲक्वॉटेक्स) |
| ०२ | स्टार डेल्टा स्टार्टर ML-2 (Fully Automatic) कंपनी-LTLK | १९,०००.०० प्र.नग (LTLK) | १८,७६३.०० प्र.नग (LTLK) | **१८,६००.०० प्र.नग (LTLK)** | १८,६००.०० प्र.नग (LTLK) | १८,९४५.०० प्र.नग (LTLK) |
| | **एकुण रक्कम-** | ५३,८००.०० | ५५,३६३.०० | **५३,१००.००** | ५८,८००.०० | ५४,६३०.०० |

वरील तक्त्यात नमुद केलेनुसार, तुलनात्मक दृष्टया कोटेशनधारक नं.०३ न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) यांचे एकत्रित रु.५३,१००/- मात्र निम्नतम दर आहेत.

तरी व्दारावती भक्तनिवास इमारत कारंजाकरीता आवश्यक इले.मोटार व इतर साहित्य खरेदी करणेकरीता योग्य तो निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमिती सभेत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारत कारंजाकरीता आवश्यक इलेक्ट्रिक मोटार व इतर साहित्य खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) यांचे एकत्रित रु.५३,१००/-दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**१९ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात न होणाऱ्या तपासण्या Outsourcing पध्दतीने करणेकामी कार्यादेश देणेबाबत.**

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागांमध्ये दैनंदिन रुग्णांच्या रक्त व लघवीच्या तपासण्या केल्या जातात, परंतु सर्वच प्रकारच्या तपासण्या काही तांत्रिक कारणास्तव होऊ शकत नाही, त्यामुळे रुग्णांना ब-याच वेळा बाहेर जाऊन लॅबमध्ये तपासण्या करुन घ्याव्या लागतात. त्यामुळे दोन्ही रुग्णालयांमध्ये न होणा-या तपासण्याकामी Outsourcing पध्दतीने NABL मान्यता प्राप्त लॅबधारकांचे दर व त्यांची सर्व माहिती मागविण्याचा प्रस्ताव दि.१६/०२/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.१८० अन्वये विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून दर मागविणेस मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार उपरोक्तकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०३/१०/२०१६ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि ब-याचशा निविदाधारकांनी Online ई-निविदा भरताना BOQ मध्ये दर भरल्यानंतर एकुण रक्कमेमध्ये बदल होत आहे, त्यामुळे निविदा भरताना अडचणी येत आहेत, असे दुरध्वनीवरुन कळविलेले होते. तसेच श्री.एस. व्ही. गमे, प्रशासकीय अधिकारी यांची Digital Signature खराब झालेली आहे असे हॉस्पिटलचे ई.डी.पी.विभागामार्फत सांगण्यात आलेले होते, त्यामुळे सदरचे खरेदीकामी काढण्यात आलेली ई-निविदा रद्द करुन कोटेशन मागविण्याच्या प्रस्तावास दि.३०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.८०५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र.२५३१ दि.०४/०२/२०१७ रोजीचे पत्रान्वये एकुण १२ कोटेशनधारकांकडून दि२५/०२/२०१७ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन चार सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier | Received Date |
|---|---|---|
| 1 | Dr.Patel Metropolis Healthcare Pvt.Ltd., Nashik | 25/02/2017 |
| 2 | Dr.Ravi Patwadkar, Dr.Hedgewar Rugnalaya, Auranagabd | 21/02/2017 |
| 3 | Krsnaa Diagnostics Private Limited, Pune | 25/02/2017 |
| 4 | Thyrocare, Sainath Laboratory Service, Kopargaon | 25/02/2017 |

वरील प्राप्त कोटेशनपैकी अ.नं.४ यांना कोटेशन मागणीपत्र नसताना त्यांनी स्वतःहून कोटेशन दिलेले असून तुलनात्मक दर मिळणेचे दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकेल त्यामुळे ते विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त ०४ सिलबंद कोटेशन दि.०३/०४/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे कोटेशनधारकांचे समक्ष उघडण्यात आलेले असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असून त्यामध्ये ५० तपासण्यापैकी ४४ तपासण्याकरीता Krsnaa Diagnostics Private Limited, Pune यांचे दर हे निम्नत्तम येत आहेत, तर २ तपासण्याकामी Dr.Patel Metropolis Healthcare Pvt.Ltd., Nashik यांचे दर हे निम्नत्तम येत आहेत व १ तपासणीकामी Thyrocare, Sainath Laboratory Service, Kopargaon यांचे दर हे निम्नत्तम येत आहेत, तर तीन तपासण्याकामी पुरेसे दर प्राप्त झालेले नाहीत.

तथापि प्राप्त दरानुसार व रुग्णालयाचे सोईचे दृष्टीने एकाच लॅबकडून तपासण्या करुन घेणे योग्य राहील असे नम्र मत आहे.

तरी Krsnaa Diagnostics Private Limited, Pune यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना कार्यादेश देण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात न होणाऱ्या तपासण्या Outsourcing पध्दतीने करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक Krsnaa Diagnostics Limited,Pune यांचे दर स्विकारणेत यावे, तसेच प्रस्तावात नमुद केलेल्या इतर तीन तपासण्यांसाठी आलेल्या निम्नतम दरात तपासण्यांची कामे त्यांचेकडून करुन घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा रुग्णालय)

---

२० **श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी कार्यादेश देणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेकामीचा प्रस्ताव दि.२०/११/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.१००६ अन्वये प्रस्तावितकामी संस्थान वकीलमार्फत अर्ज करण्यात येऊन मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले त्यानुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील ॲप्लीकेशन नं.३५०१/२०१५ दि.२२/०६/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र.१९ दि.०६/०४/२०१५ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेस मंजुरी मिळणेकामीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला होता. त्यास अनुसरुन मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, यांनी त्यांचेकडील पत्र क्र.सासंवि-१०१५/८२३/प्र.क्र.१४८/का.१६ दि.१५/०२/२०१५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

वरील मान्यतेनुसार दि.१६/०९/२०१५ ते ०६/१०/२०१५ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया करण्याचे प्रस्तावास मान्यता घेण्यात आली होती. परंतु अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस यांचे विशेष लेखपरिक्षण करणेसाठी मे.शिंदे चव्हाण गांधी अॅन्ड कं.चार्टर्ड अकौटंट, लातुर यांना नेमण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि.२६/०५/२०१६ रोजी लेखापरिक्षण अहवाल संस्थानकडे सादर केलेला असून त्यावर दि.१४/०७/२०१६ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेकामी ठेवण्यात आला होता, त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.४२३ अन्वये मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस लि., चेन्नई (फार्मसी डिव्हीजन) यांना सदर अहवालाची एक प्रत देऊन त्याबाबतचा अनुपालन (त्रुटी-पुर्तता) अहवाल मागविणेत यावा व त्यांचेकडून सदरहू रक्कम वसुल करुन घेण्यात यावी. तसेच मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस लि., चेन्नई (फार्मसी डिव्हीजन) यांचा काळया यादीत समावेश करण्यात येऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय येथे औषध दुकान चालविणेकामी तातडीने ई-प्रक्रिया राबविणेत यावी असे ठरले.

त्यास अनुसरुन औषध भांडार विभागाकडील दि.०९/०८/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये औषध दुकान चालविणेस देणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता घेण्यात आलेली आहे.

तथापि श्री साईबाबा संस्थानने श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात रिटेल मेडीकल स्टोअर चालविण्यासंदर्भात येणा-या अडचणीबाबतचा प्रस्ताव दि.३०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.८७५ अन्वये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार दि.२९/१२/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देण्यास मान्यता घेऊन निविदा विक्रीची मुदत दि.१३/०२/२०१७ ते दि.०३/०३/२०१७ अशी ठेवण्यात आलेली आहे, तर निविदाधारकांचे शंका निरसन करणेकामी दि१५/०२/२०१७ रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदरचे प्री-बीड मिटींगमध्ये निविदाधारकांना आलेल्या शंकाचे निरसन करुन दि.२४/०२/२०१७ रोजी Online E-Tender मध्ये Ammendment करण्यात आलेली आहे. प्री-बीड मिटींग व Tender Ammendment च्या कालावधीस ९ दिवस लागल्यामुळे On-line E-Tender सादर करता आले नसल्यामुळे निविदाधारकांनी मुख्य औषध भांडार विभागात फोन करुन मुदतवाढ देणेबाबत विनंती केली होती. निविदाधारकांना निविदा भरण्याचा कालावधी कमी प्रमाणात मिळाल्यामुळे सदरहू ई-निविदेस दि.०२/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये एक आठवडयाची म्हणजे दि.१०/०३/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

त्यास अनुसरुन श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये औषध दुकान भाडेतत्वावर देणेकामी प्रत्येकी १० ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. परंतु श्री साईनाथ रुग्णालयामध्ये औषध दुकान भाडेतत्वावर देणेकामी प्रत्यक्षात ०९ तांत्रिक Hardcopy प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

०१) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये औषध दुकान भाडेतत्वावर देणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदा -

| Sr.No. | Name of Tenderer | Recevied Date |
|---|---|---|
| 1 | Ajaykumar Sampatrao Mohite, Ahmednagar | 10/03/2017 |
| 2 | Apollo Hospitals Enterprise Limited, Chennai | 07/03/2017 |
| 3 | Chandrama Medical, Nashik | 06/03/2017 |
| 4 | Kishor J. Nagargoje, Ahmednagar | 10/03/2017 |
| 5 | Lokmanya Hospital Medical Stores, Pune | 06/03/2017 |
| 6 | Mitrasen Medicare, Mumbai | 08/03/2017 |
| 7 | Nucleus Medisurge Pvt.Ltd., Pune | 10/03/2017 |
| 8 | Sai Aadhar Medical, Pohegaon | 03/03/2017 |
| 9 | Shaunak Infrastructure, Nashik | 06/03/2017 |
| 10 | Wellness Forever Medicare Pvt.Ltd., Mumbai | 07/03/2017 |

०२) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये औषध दुकान भाडेतत्वावर देणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदा -

| Sr.No. | Name of Tenderer | Recevied Date |
|---|---|---|
| 1 | Ajaykumar Sampatrao Mohite, Ahmednagar | 10/03/2017 |

| | | |
|---|---|---|
| 2 | Apollo Hospitals Enterprise Limited, Chennai | 07/03/2017 |
| 3 | Kishor J. Nagargoje, Ahmednagar | 10/03/2017 |
| 4 | Lokmanya Hospital Medical Stores, Pune | 06/03/2017 |
| 5 | Nucleus Medisurge Pvt.Ltd., Pune | 10/03/2017 |
| 6 | Rohini Uday Deshmukh, Shirdi | 06/03/2017 |
| 7 | Sai Aadhar Medical, Pohegaon | 03/03/2017 |
| 8 | Shaunak Infrastructure, Nashik | 06/03/2017 |
| 9 | Wellness Forever Medicare Pvt.Ltd., Mumbai | 07/03/2017 |

उपरोक्तकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.११/०४/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे संबंधित निविदाधारकांचे समक्ष उघडून त्याच वेळेस प्राप्त निविदाधारकांचे निविदांचा तांत्रिक बाबींचा तक्ता तयार येऊन तो वित्त विभागामार्फत तपासुन घेण्यात आला आहे व त्यातील पात्र निविदाधारकांच्या ऑनलाईन ई-निविदा त्याच दिवशी उघडण्यात आल्या असून त्यांनी देऊ केलेल्या दरमहा भाडयाचा तपशिल खालीलप्रमाणे-

०१) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये औषध दुकान भाडेतत्वावर चालविणेस देणेकामी निविदाधारकांनी देऊ केलेली दरमहा भाडयाची रक्कम -

| Sr.No. | Name of Tenderer | Monthly Rent in Rs. |
|---|---|---|
| 1 | Kishor J. Nagargoje, Ahmednagar | 315777.00 |
| 2 | Lokmanya Hospital Medical Stores, Pune | 360000.00 |
| 3 | Wellness Forever Medicare Pvt.Ltd., Mumbai | 777777.00 |
| **4** | **Mitrasen Medicare, Mumbai** | **989898.98** |

०२) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये औषध दुकान भाडेतत्वावर चालविणेस देणेकामी निविदाधारकांनी देऊ केलेली दरमहा भाडयाची रक्कम -

| Sr.No. | Name of Tenderer | Monthly Rent in Rs. |
|---|---|---|
| 1 | Lokmanya Hospital Medical Stores, Pune | 72000.00 |
| 2 | Rohini Uday Deshmukh, Shirdi | 111111.00 |
| 3 | Kishor J. Nagargoje, Ahmednagar | 117651.00 |
| **4** | **Wellness Forever Medicare Pvt.Ltd., Mumbai** | **333333.00** |

वरीलप्रमाणे प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात –

(१) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये औषध दुकान भाडेतत्वावर चालविणेस देणेकामी पात्र चार निविदाधारकांपैकी M/s.Mitrasen Medicare, Mumbai यांनी देऊ केलेले दरमहा भाडे रक्कम रु.९,८९,८९८.९८ हे अधिकत्तम येत आहेत व

(२) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये औषध दुकान भाडेतत्वावर चालविणेस देणेकामी पात्र चार निविदाधारकांपैकी M/s.Wellness Forever Medicare Pvt.Ltd., Mumbai यांनी देऊ केलेले दरमहा भाडे रक्कम रु.३,३३,३३३/- हे अधिकत्तम येत आहेत.

वरीलप्रमाणे अधिकत्तम दरमहा भाडे देऊ केलेल्या दोन्हीही निविदाधारकांशी चर्चा विनिमय करुन त्यांना कार्यादेश देण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी प्राप्त झालेल्या दोन्हीही उच्चत्तम दरधारकांना चर्चेसाठी उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते. परंतु एकही निविदाधारक चर्चेसाठी उपस्थित नव्हते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये औषध दुकान भाडेतत्वावर चालविणेस देणेकामी M/s.Mitrasen Medicare, Mumbai यांनी देऊ केलेले दरमहा भाडे रक्कम रु.९,८९,८९८.९८ तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये औषध दुकान भाडेतत्वावर चालविणेस देणेकामी M/s.Wellness Forever Medicare Pvt.Ltd., Mumbai यांनी देऊ केलेले दरमहा भाडे रक्कम**

**रु.३,३३,३३३/-हे दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२१ **शिर्डी बसस्थानक इमारतीतील संस्थानचे वापराकरीता असलेल्या भक्तनिवासमध्ये ठेवणेसाठी MS (CRCA) बेडस् खरेदी करणेसाठी उघडणेत आलेल्या ई-निविदांवर (Commercial Bid) निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाचे कलम – १७ (१) अन्वये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा - अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे,भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये "भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे," अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय**: मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.६३९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आलेला आहे.

*"... यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेबरोबर झालेल्या करारनाम्यानुसार शिर्डी बस स्थानकावरील संस्थान निवासस्थानांची संस्थानचे नावावर नोंदणी करण्याचे काम अंतीम टप्प्यात आहे. याकरीता सदरहू ठिकाणी लागणारे साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई – निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.*

*तसेच सदरहू बस स्थानकावरील संस्थान निवासस्थानाचे नामांकरण करणेसाठी स्थानिक विश्वस्तांची पुढील सभेमध्ये नाव सुचित करावे,अशा सूचना करणेत आल्या "*

**प्रस्तावना:-** दि.१३/०३/२०१६ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी बसस्थानक येथील नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीतील खोल्या व हॉल्सची पाहणी केली असता सदरहू खोल्या व हॉल्स या साईभक्तांना निवासासाठी देणेकामी लागणारे आवश्यक साहित्य खरेदी करणेबाबत सूचना दिल्या आहेत.

बसस्थानक इमारतीमध्ये संस्थानचे वापरासाठी तळमजल्यावर ०१ गाळा असून पहिल्या व दुस-या मजल्यावर प्रत्येकी ०५ मोठे व ०३ लहान हॉल्स असून ०७ अॅटॅच्ड खोल्या आहेत. असे एकूण १० मोठे हॉल्स, ०६ लहान हॉल्स व १४ अॅटॅच्ड खोल्या असून सदरहू ठिकाणी २३४ नग बेडसची आवश्यकता असल्याचे साईप्रसाद निवासस्थान विभाग यांनी कळविले आहे.

**प्रस्ताव:-** शिर्डी बस स्थानक इमारतीचे पहिल्या व दुस-या मजल्यावर संस्थान वापराकरीता असलेल्या भक्तनिवास व्यवस्थेकरीता खालील तपशिलाप्रमाणे बेडस् खरेदी करणेसाठी वर नमूद व्यवस्थापन समिती निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली आहे.

| अ.नं. | तपशिल | नग |
|---|---|---|
| 01 | Supplying and Installing M.S. (CRCA) Framed Single Beds. Size 6'-00" x 2'-6" | 234 |

वर नमूद केलेप्रमाणे बेडस् खरेदीसाठी इकडील दि.१४/०१/२०१७ रोजीचे टिपणीवरील मान्यते अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन ई - निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यास अनुसरुन खालील ०३ निविदाधारकांनी निविदा अपलोड केल्या होत्या त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापूर | २४१६४ | ०७/०३/२०१७ |
| ०२ | सागर फॅब्रीकेशन अॅण्ड स्प्रे पेटींग वर्क्स, शाहूनगर बीड | २४२६३ | ०८/०३/२०१७ |
| ०३ | रत्ना इंजिनिअर्स, भोसरी, पुणे | २४२६२ | ०८/०३/२०१७ |

उपरोक्त प्राप्त ई – निविदांचे तांत्रिक माहीतीचे लिफाफे दि२०/०३/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले आहेत. उघडणेत आलेल्या ई – निविदांचे टेक्नीकल बीड मधील कागदपत्रांची छाननी केली असून, त्यानुसार पात्रतेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| ०१ | साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापूर | पात्र |
| ०२ | सागर फॅब्रीकेशन ॲण्ड स्प्रे पेटींग वर्क्स, शाहूनगर बीड | पात्र |
| ०३ | रत्ना इंजिनिअर्स, भोसरी, पुणे | पात्र |

उपरोक्त पात्र ई – निविदाधारकांचे वाणिज्यीक (Commercial Bid) लिफाफा दि.११/०४/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेला आहे. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे. साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापूर | ८,८९,२००.०० | प्रथम निम्नतम |
| ०२ | सागर फॅब्रीकेशन ॲण्ड स्प्रे पेटींग वर्कूस, शाहूनगर, बीड | ९,२४,३००.०० | द्वितिय निम्नतम |
| ०३ | रत्ना इंजिनिअर्स, भोसरी, पुणे | १०,७५,९३२.०० | तृतिय निम्नतम |

तरी वरीलपैकी में. साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापूर यांचे निम्नतम दर (रु.८,८९,२००/-) स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेकरीता मा. व्यस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरील विषय मा.उपसमितीचे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानक इमारतीतील संस्थानचे वापराकरीता पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील प्रत्येकी ५ मोठे हॉल पैकी २ हॉल मध्ये लायब्ररी सुरु करणे, उर्वरीत हॉलमधील काही हॉलमध्ये भक्तांसाठी लॉकर सिस्टीम व काही हॉल दोन्ही रुग्णालयातील रुग्णांचे नातेवाईकांना रात्री थांबण्यासाठी वापरण्याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितिसमोर सादर करणेत यावा. तसेच ६ लहाण हॉल व १४ अॅटच खोल्यांकरीता निम्नतम दराने आवश्यकतेनुसार बेड खरेदी करावे, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**परंतु सदरहू इतिवृत्तास पुष्टी देत असताना, शिर्डी बसस्थानक इमारतीचा अद्ययावत ग्रंथालय अथवा इतर विषयासाठी वापर करावा, असे ठरले. सबब सदरहू विषय तुर्त स्थगित ठेवणेत आला.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२२ **मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानचे रंगकाम करणेसाठी रंग मटेरिअल खरेदीबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) चा खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतूद आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) चा खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.२१८ खालीलप्रमाणे समंत करण्यात आला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.संकीर्ण.२०१४/ प्र.क्र.३२/ का.१६, दि.०८ मार्च, २०१७ रोजीचे आदेशान्वये श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती झालेली असून, श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से. यांनी आज दि.०९/०३/२०१७ रोजी संस्थानचा कार्यभार स्विकारलेला आहे. आजचे सभेत व्यवस्थापन समितीने त्यांचे स्वागत केले. तसेच कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानाची रंगकाम दुरुस्ती व इतर आवश्यक कामे करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-** संस्थानचे सर्व्हे नं.१०७, १०८ पैकी मधील जागेत मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासाकरीता सन १९९९ मध्ये निवासस्थानाचे बांधकाम करणेत आलेले आहे. सदरचे निवासस्थान परिसराची पाहणी करणेत आली असता, सदर निवासस्थानचे रंगकाम करणे आवश्यक आहे. मा. कार्यकारी अधिकारी यांना निवासस्थान लवकरात लवकर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याकामी तातडीने कोटेशन मागविण्यात येवून ते मा.प्रशासकिय अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी व मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने उघडणेत आले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सदर निवासस्थानचे रंगकाम करणेसाठी येणारे अंदाजे रु.८३,०००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस दि.१०/०३/२०१७

रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार सदरहू रंग मटेरिअल खरेदीकामी इकडील जा.नं.६३३९/२०१७, दि.१०/०३/२०१७ रोजीचे कोटेशन मागणी पत्राने कोटेशन मागविणेत आले असून, प्राप्त कोटेशन उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | मटेरिअलचा तपशिल | परिमाण / एकक | पुरवठाधारकाचे नांव | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | साई पेंटस्, राहाता | | रुपम जनरल स्टोअर्स, साकुरी | | अलंकार कॉर्पोरेशन, राहाता | | विजया पेंट, शिर्डी | | संदिप पेंटस्, कोपरगांव | |
| | | | दर रु. | रक्कम रु. | दर रु. | रक्कम रु. | दर रु. | रक्कम रु. | दर रु. | रक्कम रु. | दर रु. | रक्कम रु. |
| १ | Asian Royal Luster (Water Base) (20 Liter x 6 Bucket). | 6 Bucket | ७५००/- | ४५,०००/- | **७,२००/-** | **४३,२००/-** | ७,४५०/- | ४४,७००/- | ७,७००/- | ४६,२००/- | ७,६१०/- | ४५,६६०/- |
| २ | Asian Water Base Primer (20 Liter x 4 Bucket). | 4 Bucket | २६००/- | १०,४००/- | **१,८५०/-** | **७,४००/-** | १,९००/- | ७,६००/- | १,९५०/- | ७,८००/- | १,९००/- | ७,६००/- |
| ३ | Asian Apex Ultima. (20 Liter x 5 Bucket). | 5 Bucket | ५८९०/- | २९,४५०/- | **५,८८०/-** | **२९,४००/-** | ६,१००/- | ३०,५००/- | ६,५५०/- | ३२,७५०/- | ६,३००/- | ३१,५००/- |
| | | **एकुण रूपये.** | | ८४,८५०/- | | **८०,०००/-** | | ८२,८००/- | | ८६,७५०/- | | ८४,७६०/- |
| | | **शेरा:** | | | | **निम्नतम** | | | | | | |

**प्रस्ताव:** वरीलप्रमाणे प्राप्त झालेले दरामध्ये रुपम जनरल स्टोअर्स, साकुरी यांनी देऊ केलेले दर निम्नतम स्वरुपाचे आहेत, करीता सदरहू रंग मटेरिअल त्यांचेकडून खरेदी करणेस व त्यांना पुरवठा आदेश देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानचे रंगकाम करणेसाठी रंग मटेरिअल खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक रुपम जनरल स्टोअर्स,साकुरी यांचे दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२३ **मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थानचे संरक्षक भिंतीवर बांबूचीताटी तयार करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधिल तरतूद –** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) चा खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.२१८ खालीलप्रमाणे समंत करण्यात आला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.संकीर्ण२०१४/ प्र.क्र.३२/ का.१६, दि.०८ मार्च, २०१७ रोजीचे आदेशान्वये श्रीमती रुबल प्रखेर-अग्रवाल, भा.प्र.से यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती झालेली असून,श्रीमती रुबल प्रखेर-अग्रवाल, भा.प्र.से. यांनी आज दि.०९.०३.२०१७ रोजी संस्थानचा कार्यभार स्विकारलेला आहे. आजचे सभेत व्यवस्थापन समितीने त्यांचे स्वागत केले. तसेच कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानाची रंगकाम दुरुस्ती व इतर आवश्यक कामे करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना-** संस्थानचे सर्व्हे नं.१०७, १०८ पैकी मधील जागेत मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासाकरीता सन १९९९ मध्ये निवासास्थानाचे बांधकाम करणेत आलेले आहे. सदरचे निवासस्थान परिसराची

पाहणी करणेत आली असता, सदर ठिकाणी असलेल्या संरक्षक भिंतीच्या बाजूने परिसर विकास, बगीचा इत्यादी कामे झालेली असल्याने, सदर भिंतीची उंची कमी झालेली आहे संरक्षणाचे दृष्टीने सध्याचे कम्पांउंड भिंतीवर ३ फुट उंचीचे बांबूची ताटी तयार करुन भिंतीची उंची वाढवून घेता येईल

संरक्षक भिंतीवर बांबूची ३ फुट उंचीची ताटी तयार करुन बसविणेकामी आवश्यक असणारे बांबू खरेदीकामी व मजूरी दराने बांबूची ताटी करणेसाठी अंदाजे रु.३१,६००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस दि.१२/०३/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार बांबू खरेदीकामी व मजूरी दराचे ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेत येऊन, प्राप्त कोटेशन उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**(अ) बांबू खरेदी कोटेशनचा तुलनात्मक तपशिल.**

| अनं. | तपशिल | परिमाण एकक/ | पुरवठादारांचे नांव | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गणेश ट्रेडर्स, कोल्हार | | वडतेले बांबू स्टॉल, साकुरी | | श्री स्वामी समर्थ बांबू स्टॉल, राहाता | |
| | | | दर रु. | रक्कम रु. | दर रु. | रक्कम रु. | दर रु. | रक्कम रु. |
| ०१. | १२' उंचीचे व २" व्यासाचे बांबू | ४७५ नग | ३७/- प्र.नग | १७,५७५/- | ३५/- | १६,६२५/- | ३८/- | १८,०५०/- |
| | | | **एकुण रूपये** | १७,५७५/- | | १६,६२५/- | | १८,०५०/- |
| | | | **शेरा-** | | | **निम्नतम** | | |

**(ब) मजूरी दराने बांबूची ताटी तयार करणे कोटेशनचा तुलनात्मक तपशिल.**

| अनं. | तपशिल | परिमाण/ एकक | ठेकेदाराचे नांव | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | श्री.उत्तम लक्ष्मण खैरे, राहाता | | श्री. गणेश लक्ष्मण पवार, साकुरी | | श्री. अशोक जगन वडतेले, राहाता | |
| | | | दर रु. | रक्कम रु. | दर रु. | रक्कम रु. | दर रु. | रक्कम रु. |
| ०१. | मजूरी दराने ३' उंचीची व ३००' लांबीचे बांबूची ताटी तयार करणे . | ९०० चौ. फुट | २४.४४४ प्र. चौ. फुट | २२,०००/- | १३.८८८ | १२,५००/- | १७.२२२ | १५,५००/- |
| | | | **एकुण रूपये** | २२,०००/- | | १२,५००/- | | १५,५००/- |
| | | | **शेरा-** | | | **निम्नतम** | | |

**प्रस्ताव :** वरीलप्रमाणे प्राप्त झालेले दरामध्ये बांबू खरेदीकामी वडतेले बांबू स्टॉल, साकुरी व मजूरी दराने बांबूची ताटी तयार करुन घेणेसाठी श्री. गणेश लक्ष्मण पवार, साकुरी यांनी देऊ केलेले दर निम्नतम स्वरुपाचे आहेत, करीता निम्नतम दराचे पुरवठा/ठेकेदार यांचेकडून बांबू खरेदी करुन, मजूरी दराने सदरहू काम करुन घेणेबाबतचे प्रस्तावावर निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थानचे संरक्षक भिंतीवर बांबूची ताटी तयार करणे साठी बांबू खरेदीकामी वडतेले बांबू स्टॉल, साकुरी व मजूरी दराने बांबूची ताटी तयार करुन घेणेसाठी श्री. गणेश लक्ष्मण पवार, साकुरी यांनी देऊ केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२४ **मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानाचे टेरेसवर रुम तयार करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधिल तरतूदः-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) चा खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करणे, अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.२१८ खालीलप्रमाणे समंत करण्यात आला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.संकीर्ण२०१४/ प्र.क्र.३२/ का.१६, दि.०८ मार्च, २०१७ रोजीचे आदेशान्वये श्रीमती रुबल प्रखेर-अग्रवाल, भा.प्र.से यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती झालेली असून, श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से. यांनी आज दि.०९.०३.२०१७ रोजी संस्थानचा कार्यभार स्विकारलेला आहे. आजचे सभेत व्यवस्थापन समितीने त्यांचे स्वागत केले. तसेच कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानाची रंगकाम दुरुस्ती व इतर आवश्यक कामे करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-** संस्थानचे सर्व्हे नं. १०७, १०८ पैकी मधील जागेत मा. कार्यकारी अधिकारी यांचे निवासाकरीता सन-१९९९ मध्ये निवासास्थानाचे बांधकाम करणेत आलेले आहे. सदरचे निवासस्थान परिसराची पाहणी करणेत आली असता, सदर निवासस्थानचे टेरेसवर रूम तयार करणेकरीता पत्र्याची बंदिस्त रुम तयार करण्याचे निर्देश मा. कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत. सदर निर्देशनुसार सदरहू कामी येणारे अंदाजे रु.२,८९,८५०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस दि.२३/०३/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देणेस आली आहे. त्यानुसार सदरहू कामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेत आले असून, प्राप्त कोटेशन दि.११/०४/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

क्षेत्रफळ **: १७'-०" X २२'-०" =** ३७४ चौ.फुट

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | रक्कम (रु.) | **शेरा** |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. सिध्देश्वर तुकाराम मुरकुटे, शिर्डी. | रु.३,०८,५५०/- | --- |
| ०२ | जय डेव्हलपर्स, शिर्डी. | रु.३,१७,९००/- | --- |
| ०३ | दुर्गा ट्रेडींग कॉर्पोरेशन, औरंगाबाद. | रु.२,३९,३६०/- | निम्नतम |
| ०४ | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता. | रु.२,६७,४१०/- | --- |

**प्रस्ताव:-** वरीलप्रमाणे प्राप्त झालेले दरांमध्ये दुर्गा ट्रेडींग कॉर्पोरेशन, औरंगाबाद यांनी देऊ केलेले दर निम्नतम स्वरुपाचे आहेत, करीता सदरहू बंदिस्त रुम तयार करणेचे काम त्यांचेकडून करुन घेणेस व त्यांना कार्यादेश देणेस निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानाचे टेरेसवर रुम तयार करणेसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक दुर्गा ट्रेडींग कॉर्पोरेशन, औरंगाबाद यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२५ **मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानाचे पोर्चसमोर पी.व्ही.सी. पत्र्याचे शेड तयार करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) चा खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करणे, अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.२१८ खालीलप्रमाणे समंत करण्यात आला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.संकीर्ण.२०१४/ प्र.क्र.३२/ का.१६, दि.०८ मार्च, २०१७ रोजीचे आदेशान्वये श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती झालेली असून, श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से. यांनी आज दि.०९/०३/२०१७ रोजी संस्थानचा कार्यभार स्विकारलेला आहे. आजचे सभेत व्यवस्थापन समितीने त्यांचे स्वागत केले. तसेच कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानाची रंगकाम दुरुस्ती व इतर आवश्यक कामे करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावना:-** संस्थानचे सर्व्हे नं.१०७, १०८ पैकी मधील जागेत मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासाकरीता सन १९९९ मध्ये निवासास्थानाचे बांधकाम करणेत आलेले आहे. सदरचे निवासस्थान परिसराची

पाहणी करणेत आली असता, सदर निवासस्थानचे पोर्चसमोर पी.व्ही.सी. पत्र्याचे शेड तयार करण्याचे निर्देश मा. कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत.

सदर निवासस्थानाचे पोर्चसमोर पी.व्ही.सी. पत्र्याचे शेड तयार करणेसाठी येणारे अंदाजे रु.१,९९,६५०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस दि.२३/०३/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार सदरहू पी.व्ही.सी. पत्र्याचे शेड तयार करणेकामी अशाप्रकारचे काम करणा-या ठेकेदार यांचेकडून इकडील दि२४/०३/२०१७ रोजीचे कोटेशन मागणी पत्राने कोटेशन मागविणेत आले असून, प्राप्त कोटेशन दि.११/०४/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे अधिकारी यांचे समक्ष सभेत उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

क्षेत्रफळ **:** १४**’**-६**” X** २५**’**-०**” =** ३६३ चौ.फुट

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | रक्कम (रु.) | **शेरा** |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. सिध्देश्वर तुकाराम मुरकुटे**,** शिर्डी. | रु.१**,**७९**,**६८५/- | **---** |
| ०२ | जय डेव्हलपर्स**,** शिर्डी. | रु.१**,**९०**,**५७५/- | **---** |
| ०३ | दुर्गा ट्रेडींग कॉर्पोरेशन**,** औरंगाबाद. | रु.१**,**७६**,**०५५/- | निम्नतम |
| ०४ | श्री. एस. जी. गायकवाड**,** राहाता. | रु.२**,**९०**,**४००/- | **---** |

**प्रस्ताव:-** वरीलप्रमाणे प्राप्त झालेले दरांमध्ये दुर्गा ट्रेडींग कॉर्पोरेशन**,** औरंगाबाद यांनी देऊ केलेले दर निम्नतम स्वरुपाचे आहेत, करीता सदरहू पोर्चसमोर पी.व्ही.सी. पत्र्याचे शेड तयार करणेचे काम त्यांचेकडून करुन घेणेस व त्यांना कार्यादेश देणेस निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानाचे पोर्चसमोर पी.व्ही.सी. पत्र्याचे शेड तयार करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक दुर्गा ट्रेडींग कॉर्पोरेशन,औरंगाबाद यांचे दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२६ **मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानातील किचन ओटयाला किचन ट्रॉलीज बसविणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) चा खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.२१८ खालीलप्रमाणे समंत करण्यात आला आहे.

*“यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.संकीर्ण.२०१४/ प्र.क्र.३२/का.१६, दि.०८ मार्च, २०१७ रोजीचे आदेशान्वये श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती झालेली असून, श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से. यांनी आज दि.०९/०३/२०१७ रोजी संस्थानचा कार्यभार स्विकारलेला आहे. आजचे सभेत व्यवस्थापन समितीने त्यांचे स्वागत केले. तसेच कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानाची रंगकाम दुरुस्ती व इतर आवश्यक कामे करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.”*

**प्रस्तावना:-** संस्थानचे सर्व्हे नं.१०७, १०८ पैकी मधील जागेत मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासाकरीता सन १९९९ मध्ये निवासास्थानाचे बांधकाम करणेत आलेले आहे. सदरचे निवासस्थान परिसराची पाहणी करणेत आली असता, सदर निवासस्थानमधील किचन ओट्याला किचन ट्रॉलीज नसल्याने, सदरच्या ट्रॉलीज बसविणे आवश्यक आहे.

सदर निवासस्थानमधील किचन ओट्याला किचन ट्रॉलीज बसविणेसाठी येणारे अंदाजे रु.६०,०००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस दि.१०/०३/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार सदरहू किचन ट्रॉलीज बसविणेकामी अशाप्रकारचे काम करणा-या ठेकेदार / पुरवठादार यांचेकडून इकडील जा.नं.६३४१/२०१७, दि.११/०३/२०१७ रोजीचे कोटेशन मागणी पत्राने कोटेशन मागविणेत आले असून, प्राप्त कोटेशन दि.१६/०३/२०१७ रोजीचे उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Description | Qty. / Unit | Name of Contractors | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Shri Kal Bhiravnath Kitchen Trolleys, Kopargaon. | Gharkul Kitchen Trolleys, Nashik. | Ravindra Rubber Products and Fabrication, Shrirampur. | United Steel Furniture, Sakuri. |
| | | | Consolidated Amount | Consolidated Amount | Consolidated Amount | Consolidated Amount |
| 01. | Kitchen Trolley with SS Structure frame etc. completed. | 12.00 Rft | 48,000/- | 54,201/- | 82,432/- | 56,000/- |
| Add 12.5% VAT: | | | 6,000/- | -- | -- | 7,000/- |
| Total Amount Rs.: | | | 54,000/- | 54,201/- | 82,432/- | 63,000/- |
| **Remarks:** | | | **Lowest** | | | |

**प्रस्ताव:-** वरीलप्रमाणे प्राप्त झालेले दरामध्ये Shri Kal Bhiravnath Kitchen Trolleys, Kopargaon यांनी देऊ केलेले दर निम्नतम स्वरुपाचे आहेत, करीता सदरहू किचन ट्रॉलीज बसवून घेणेचे काम त्यांचेकडून करुन घेणेस व याकामी त्यांना पुरवठा आदेश देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थानातील किचन ओटयाला किचन ट्रॉलीज बसविणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक श्री कालभैरवनाथ किचन ट्रॉलीज, कोपरगाव यांचे दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२७ **श्रींचे समाधी मंदिरास बुटी वाडा या नावाचा पितळी अक्षरांचा मराठी व इंग्रजी भाषेतील नामफलक लावणेकामी उघडणेत आलेल्या कोटेशनवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्त व्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत खालील प्रमाणे निर्णय क्र.८३० संमत झालेला आहे.

*"... यावर सविस्तर चर्चा होऊन, कै. श्रीमंत गोपालराव मुकूंदराव बुटी, नागपूर यांनी हा वाडा स्वखर्चाने सन १९१७-१८ मध्ये बांधलेला असून तो संस्थानकडे वर्ग केलेला आहे. त्यामुळे सदरहू वाडयास प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे पाटी लावण्यात यावी, असे ठरले."*

**प्रस्तावना:-** श्रींचे समाधी मंदिर हे मुख्य मंदिर आहे. मंदिराच्या या इमारतीचे बांधकाम नागपूरचे निस्सीम साईभक्त श्री. गोपाळराव तथा बापुसाहेब बुटी यांनी साईबाबांचे आर्शिवादाने दि३० डिसेंबर १९१५ रोजी सुरु केले आणि सन १९१८ मध्ये पूर्ण केले. ही वास्तु "बुटी वाडा" या नावानेही ओळखली जाते. या ठिकाणी श्री साईबाबांची पवित्र समाधी व मुर्ती आहे. श्री साईंच्या महासमाधीनंतर सुरु असणारे नित्यक्रम पुजा – अर्चा, आरत्या, धार्मिक उत्सव आदि या ठिकाणी नित्यनेमाणे केली जाते. समाधीचे दर्शन घेण्यासाठी प्रतिदिनी सरासरी सुमारे ५० हजार भक्त येतात. तसेच उन्हाळी सुट्टी, गुरुवार व रविवार यांना जोडून येणा-या सरकारी सुट्टया या काळात दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची संख्या सुमारे तीन ते पाच लाखांपर्यंत जाते.

साईभक्तांना श्रींचे समाधी मंदिर "बुटी वाडा" या नावाने देखिल ओळखले जाते. याची माहिती व्हावी या उद्देशाने श्रींचे समाधी मंदिरास उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने ग्रेनाईटवर गोल्डन अक्षरात "बुटी वाडा" या नावाची पाटी लावणेत आली होती. त्यानंतर दि.०९/०३/२०१७ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी समाधी मंदिरास लावलेल्या बोर्डस् प्रमाणे पितळी अक्षरांमध्ये बोर्ड तयार करुन लावणेबाबत सूचना दिली आहे. त्यानुसार इकडील विभागाचे जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/६४५३/२०१७ दि.२४/०३/२०१७ रोजीचे कोटेशन पत्राने विषयांकीत

कामाचे एकूण १२ पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन/दरपत्रक मागविणेत आले होते. त्यापैकी खालीलप्रमाणे ०४ कोटेशन प्राप्त झाले आहेत.

| **अ.नं** | **पुरवठा धारकाचे नांव** | **आवक क्र./ दिनांक** |
|---|---|---|
| ०१ | देवी आर्टस साईन, कात्रज, पुणे | २५९५१/२९-०३-२०१७ |
| ०२ | गोल्डन आर्टस, पुणे | ०६००/०७-०४-२०१७ |
| ०३ | सिध्दी क्रिएशन, रविवार पेठ, पुणे | ००३५/३१-०३-२०१७ |
| ०४ | स्कायलाईन एन्टरप्रायजेस, पुणे | ०६२९/०७-०४-२०१७ |

उपरोक्त सिलबंद कोटेशन दि.११/०४/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **कामाचा तपशिल** | **देवी आर्टस साईन, कात्रज, पुणे** | **गोल्डन आर्टस, पुणे** | **सिध्दी क्रिएशन, रविवार पेठ, पुणे** | **स्कायलाईन एन्टरप्रायजेस, पुणे** |
|---|---|---|---|---|---|
| १ अ | इंग्रजी अक्षरांसाठी ओतिव पितळी अक्षरे तयार करुन जागेवर बसविणे.<br>फलकाचा मसुदाः BUTI WADA (एकूण ०८ अक्षरे) अक्षरांची उंची= ६ इंच. | १२,०००/- | १६,८००/- | १३,८४०/- | १८,८००/- |
| १ ब | पितळी अक्षरे बसविणेसाठी CRCA १८ गेजचा पत्रा वापरुन त्यावर काळया रंगाने पावडर कोटींग करणे.<br>फलकासाठी २५X२५X५ एम एम साईजचा स्क्वेअर पाईप वापरुन फ्रेम तयार करणे.<br>साईजः-६६ इंच X १५ इंच. | २,२५०/- | ३,५००/- | २,२००/- | ४,५००/- |
| २ अ | मराठी अक्षरांसाठी ओतिव पितळी अक्षरे तयार करुन जागेवर बसविणे.<br>फलकाचा मसुदाः बुटी वाडा<br>(एकूण ०४ अक्षरे/ काना, मात्रा, ऊकार = ५)<br>अक्षरांची उंची= ६ इंच. | १२,०००/- | १३,६५०/- | ६,९२०/- | १८,६५०/- |
| २ ब | पितळी अक्षरे बसविणेसाठी CRCA १८ गेजचा पत्रा वापरुन त्यावर काळया रंगाने पावडर कोटींग करणे.<br>फलकासाठी २५X२५X५ एम एम साईजचा स्क्वेअर पाईप वापरुन फ्रेम तयार करणे.<br>साईजः-४५ इंच X १५ इंच. | १,५००/- | २,५००/- | १,४५०/- | ४,२००/- |
| | इतर चार्जेस | ५,०००/- | ... | १२,३७५/- | .. |
| | एकूण | **३२,७५०/-** | **३६,४५०/-** | **३६,७८५/-** | **४६,१५०/-** |
| | अधिक व्हॅट १३.५% | ... | ... | ४,९६५.९७५ | ... |
| | **एकूण पूर्णांकीत रक्कम रु.** | **३२,७५०/-** | **३६,४५०/-** | **४१,७५१/-** | **४६,१५०/-** |
| | **शेरा** | दिलेले दर हे मागणी केलेप्रमाणे ओतिव पितळी अक्षरांचे नसल्याने अपात्र. | **निम्नतम** | | |

समाधी मंदिरास सध्या असलेल्या नावाचा फलक हा अर्धगोलाकृती ओतिव पितळी अक्षरांचा आहे. त्यामुळे वर नमूद नियोजीत नामफलक हा त्याच पध्दतीचा ओतिव पितळी अक्षरांचा बनविणे आवश्यक आहे. उपरोक्त ०४ पुरवठाधारकांपैकी देवी आर्टस् साईन, पुणे यांचे दर निम्नतम आहेत. तथापी त्यांनी देऊ केलेले दर हे

स्टील ब्रास बॉक्स टाईपचे अक्षरांचे आहेत. त्यामुळे त्यांचे दरपत्रक विचारात घेता येणार नाही. तसेच उर्वरीत तीन पूरवठा धारकांपैकी गोल्डन आर्टस, पुणे यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत.

**प्रस्तावः-** तरी श्रींचे समाधी मंदिरास " बुटी वाडा" या नावाचा मराठी व इंग्रजी भाषेतील पितळी अक्षरांचे नामफलक तयार करुन बसविणेकामी गोल्डन आर्टस, पुणे यांचे निम्नतम दरानुसार येणारे रु.३६,४५०/- मात्रचे खर्चास तसेच गोल्डन आर्टस, पुणे यांना कार्यादेश देणेकरीता मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरील विषय मा. उपसमिती सभेचे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समाधी मंदिरास बुटी वाडा या नावाचा पितळी अक्षरांचा मराठी व इंग्रजी भाषेतील नामफलक लावणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक गोल्डन आर्टस्, पुणे यांचे दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२८ **संस्थान परिसरात साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी ए.सी.पी.शिटवर रेडीअम लेटरींगमध्ये बोर्ड तयार करुन बसविणेकामी प्राप्त ई-निविदेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे."

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.८९६ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरामध्ये साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी ए. सी. पी. शिटवर लेटरींगमध्ये बोर्ड तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना :** विषयांकीत कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी ई-निविदा सूचना वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि.०६/०३/२०१७ रोजी पर्यंत ई-निविदा अपलोड करणेची व लिफाफा क.०१ (Technical bid) सादर करणेसाठी दि.०८/०३/२०१७ पर्यंत मुदत देणेत आली होती. सदरचे मुदतीत खालील इच्छुक ठेकेदारांनी सिलबंद लिफाफा क.०१ (Technical bid) सादर केलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे. माऊली कन्स्ट्रक्शन, टेंभे, ता. सटाणा जि. नाशिक | २४१६८ / ०७.०३.२०१७ |
| ०२. | मे. स्मिता इंडस्ट्रीज, नांदेड | २४१२९ / ०७.०३.२०१७ |
| ०३. | हेमंत जी. मुथ्था, राहूरी | २४२६६ / ०८.०३.२०१७ |
| ०४. | सोलकर कन्स्ट्रक्शन, नाशिक | २४२६७ / ०८.०३.२०१७ |
| ०५. | एम. एस. इंडस्ट्रीज, नाशिक | २४२६८ / ०८.०३.२०१७ |
| ०६. | क्रांती इंडस्ट्रीज, नाशिक | २४२६९ / ०८.०३.२०१७ |
| ०७. | पवन कन्स्ट्रक्शन, येवला, नाशिक | २४२७० / ०८.०३.२०१७ |
| ०८. | श्री साई समर्थ कृषी सेवा केंद्र, अहमदनगर | २४३०९ / ०९.०३.२०१७ |

वरीलप्रमाणे प्रप्त ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) मा. खरेदीचे समितीचे दि.२०/०३/२०१७ रोजीचे सभेत उघडणेत आलेला आहेत. उघडण्यात आलेल्या ई-निविदांचे टेक्नीकल बिड मधील कागदपत्रांची छाननी केली असून, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | शेरा |
|---|---|---|
| ०१. | मे. माऊली कन्स्ट्रक्शन, टेंभे, ता. सटाणा जि. नाशिक | अपात्र- ठेकेदार यांनी पात्रता निकषातील अ.नं.४ व ८ प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यामुळे अपात्र आहे. |
| ०२. | मे. स्मिता इंडस्ट्रीज, नांदेड | पात्र. |
| ०३. | हेमंत जी. मुथ्था, राहूरी | अपात्र- ठेकेदार यांनी पात्रता निकषातील अ.नं.४,५ व ६ प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यामुळे अपात्र आहे. |

| | | |
|---|---|---|
| ०४. | सोलकर कन्स्ट्रक्शन, नाशिक | अपात्र- ठेकेदार यांनी सादर केलेले डी. डी. वर स्वाक्षरी नाही. तसेच पात्रता निकषातील अ.नं.५,६ व ८ ची कागदपत्रे अपलोड केलेली नाहीत त्यामुळे अपात्र आहे. |
| ०५. | एम. एस. इंडस्ट्रीज, नाशिक | पात्र. |
| ०६. | क्रांती इंडस्ट्रीज, नाशिक | पात्र. |
| ०७. | पवन कन्स्ट्रक्शन, येवला, नाशिक | अपात्र- ठेकेदार यांनी पात्रता निकषातील अ.नं.४ चे प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यामुळे अपात्र आहे. |
| ०८. | श्री साई समर्थ कृषी सेवा केंद्र, अहमदनगर | अपात्र- ठेकेदार यांनी पात्रता निकषातील अ.नं.३ प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यामुळे अपात्र आहे. |

उपरोक्त पात्र ई-निविदा धारकांचे वानीज्यक (Commercal bid) लिफाफा क्र.०२ दि.११/०४/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आला असून, त्याचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | मे. स्मिता इंडस्ट्रीज, नांदेड | **१६,९५,२००/-** | **प्रथम निम्नतम** |
| ०२. | क्रांती इंडस्ट्रीज, नाशिक | २५,८९,८४१.८० | द्वितीय निम्नतम |
| ०३. | एम. एस. इंडस्ट्रीज, नाशिक | ६५,९०,०९०/- | तृतीय निम्नतम |

**प्रस्ताव :** तरी संस्थान परिसरात साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी ए.सी. पी. शिटवर रेडीअम लेटरींगमध्ये बोर्ड तयार करुन बसविणेकामी प्राप्त ई-निविदेमध्ये मे. स्मिता इंडस्ट्रीज, नांदेड यांनी देऊ केलेले दर **रु.१६,९५,२००/-** मात्र निम्नतम स्वरुपाचे आहेत, करीता सदरचे काम त्यांचेकडून करुन घेणेस व त्यांना कार्यादेश देणेकरीता मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरील विषय मा. उपसमितीचे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी ए.सी.पी.शिटवर रेडीअम लेटरींगमध्ये बोर्ड तयार करुन बसविणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्तयामधील निम्नतम दरधारक मे.स्मिता इंडस्ट्रीज, नांदेड यांचे दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा; तसेच महत्वाचे ठिकाणी मराठी, इंग्रजी व तेलगु भाषेतील बोर्ड तयार करुन बसविणेत यावेत, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२९ **मंदिर परिसरालगत एम.एस. स्ट्रक्चर व टेन्साईल फॅब्रिकचे छत असलेल्या शेडस् उभारणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-**

"२१ (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईलः -

(ख) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन;

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे."

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :-** दि. ०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७१३ खालीलप्रमाणे समंत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, तक्तामध्ये नमूद केलेले (१६ गुंठे, साईप्रसाद इमारतीजवळील लाडू विक्री काऊंटर, पिंपळवाडीररस्त्यावरील दर्शन रांग) जागेमध्ये साईभक्तांचा सोयीसाठी एम.एस.स्ट्रक्चर व पी.व्ही.सी. फॅब्रिकचे छत बसविणेस व त्याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना:-**मा. व्यवस्थापन समितीचे वरील निर्णयानुसार मंदिर परिसराचे पूर्वेकडील १६ आर जागेत व जुन्या प्रसादालय परिसरातील लाडू काऊंटरसमोर तसेच मा. कार्यकारी अधिकारी यांचे सूचनेनुसार पिंपळवाडी रस्ता पश्चिम बाजू दर्शनरांग प्रवेशव्दार या ठिकाणी Removable Structure चे टेंसाईल शेडस् करणेसाठी रक्कम रु.१.४७ कोटी मात्रचे खर्चास याकामी तपशिलवार नकाशे व अंदाजपत्रक मंदिर परिसर व दर्शनरांग पुर्नविकास प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे. माथूर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांचेकडून तयार करुन घेणेस मान्यता देण्यात आली.

**प्रस्ताव :-** मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात होती. ठेकेदार यांचे अडीअडचणी बाबत निरसन होणेकामी दि.२३/०२/२०१७ रोजी प्रिबीड मिटींगचे आयोजन करण्यात आले होते. ठेकेदार यांना ई-निविदा अपलोड करण्याची अंतिम मूदत दि.०६/०३/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करणेची अंतिम मूदत ०५ ई-निविदा अपलोड झालेल्या आहेत. तसेच ई-निविदांचे तांत्रीक लिफाफे (हार्ड कॉपी) सादर करण्याची अंतिम दि.०८/०३/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. सदरहू मूदतीत खालील ०५ ठेकेदार यांनी ई-निविदा (तांत्रीक) चे लिफाफे सादर केले होते.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | सुभाष कन्स्ट्रक्शन, डोंबवली | २४१३० | ०७/०३/२०१७ |
| ०२ | देवगिरी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद | २४१६९ | ०७/०३/२०१६ |
| ०३ | वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चरस, प्रा.लि., ठाणे | २४१८९ | ०८/०३/२०१७ |
| ०४ | मेकॉय आर्किटेक्टचरल सिस्टमस प्रा.लि., मुंबई | २४१८८ | ०८/०३/२०१७ |
| ०५ | पुजा आर्किटेक्चर सिस्टम प्रा.लि., मुंबई | २४२५७ | ०८/०३/२०१७ |

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक निविदा मा. खरेदी समितीचे दि.२०/०३/२०१७ सभेपुढे उघडणेत आल्या असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार उपरोक्त पैकी खालील ०३ ठेकेदार पात्र झाले होते.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव |
|---|---|
| ०१ | वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चरस, प्रा.लि., ठाणे |
| ०२ | देवगिरी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद |
| ०३ | मेकॉय आर्किटेक्टचरल सिस्टमस प्रा.लि., मुंबई |

उपरोक्त ०३ पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेला ई-निविदांचा लिफाफा क्र. ०२ (वाणिजीक निविदा) दि.११/०४/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघणेत आले असून, त्यांनी सादर केलेलया दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चरस, प्रा.लि., ठाणे | १,२२,९२,८८१/- | निम्नतम |
| ०२ | देवगिरी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद | १,५२,४८,३८०/- | - |
| ०३ | मेकॉय आर्किटेक्टचरल सिस्टमस प्रा.लि., मुंबई | १,४१,३७,५२२/- | - |

उपरोक्त तपशिलानूसार तिन निविदाधारकांपैकी वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चरस, प्रा.लि., ठाणे यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**मंदिर परिसरालगत एम.एस. स्ट्रक्चर व टेन्साईल फॅब्रिकचे छत असलेल्या शेडस् उभारणेकामी निम्नतम ई-निविदाधारक वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चरस, प्रा.लि., ठाणे हे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरालगत एम.एस. स्ट्रक्चर व टेन्साईल फॅब्रिकचे छत असलेल्या शेडस् उभारणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चरस, प्रा.लि., ठाणे यांचे दर स्विकारणेत यावेत तसेच त्यांनी सदर जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन शेडची उंची किती असावी याबाबत निश्चीती करावी, त्यानंतर त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३० **मौजे निमगाव कोऱ्हाळे गट नं.८७, ८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकरीता आर्किटेक्चरल सल्लागार नेमणूकीसाठी उघडणेत आलेल्या Request for proposal (RFP) प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम– २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये " मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" व खंड (घ) अन्वये "भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालविणे" अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत खालील प्रमाणे निर्णय क्र.७७१ संमत झालेला आहे.

*"... यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसाद लाडू निर्मितीकामी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिटचे बांधकाम करणेसाठी आर्किटेक्ट नेमणूकीकरीता वर्तमान पत्रातील जाहीर सुचनेद्वारे आर्किटेक्चरल सल्लागारांकडून ई – निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावनाः-** मौजे निमगांव – को-हाळे येथील गट नं. ८७, ८८ पैकी मध्ये संस्थानचे एकूण ३ हेक्टर क्षेत्र आहे. त्यापैकी सध्या उपलब्ध असलेल्या वापरयोग्य ५४.६५ आर क्षेत्रामध्ये प्रसाद लाडू निर्मिती युनिट करीता मा. व्यवस्थापन समितीचे वर नमूद केलेल्या निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर निर्णयानुसार प्रकल्पाचे सविस्तर बांधकाम नकाशे व अंदाजपत्रक या क्षेत्रातील तज्ञ सल्लागाराकडून तयार करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आर्किटेक्ट यांचेमार्फत या प्रकल्पासाठी लाडू विभाग यांचे गरजेनुसार नियोजित बांधकाम क्षेत्र निश्चीत करुन त्यानुसार रेखांकन तयार करणेसाठी आर्किटेक्चरल सल्लागार नेमणुकीसाठी मुंबई, पुणे, नाशिक येथील वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर Request for Proposal प्रसिध्द करुन दि.०६/०३/२०१७ पर्यंत प्रस्ताव अपलोड करणेची मुदत ठेवणेत आली होती. सदर मुदतीत खालील ०५ सल्लागार संस्थांनी प्रस्ताव अपलोड केले होते. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| **अ.नं.** | **सल्लागार संस्थेचे नांव** | **आवक क्र.** | **दिनांक** |
|---|---|---|---|
| ०१. | सिर्मक कन्सलटंस् प्रा. लि., हैद्राबाद (तेलंगाना) | २४०७९ | ०६/०३/२०१७ |
| ०२. | क्रीएटीव्ह सर्कल, नागपूर | २४०८१ | ०६/०३/२०१७ |
| ०३. | सुशिल देशमुख ॲण्ड असोशिएटस्, औरंगाबाद | २४१८७ | ०८/०३/२०१७ |
| ०४. | ध्रुवतारा कन्सलटंट, सावेडी, अहमदनगर | २४२६४ | ०८/०३/२०१७ |
| ०५. | एम.बी.मालेवार डिझाईन्स प्रा. लि.,नागपूर | २४६७२ | १४/०३/२०१७ |

उपरोक्त सल्लागार संस्थांचे प्राप्त तांत्रिक माहितीचे (Technical Bid) लिफाफा क्र. १ दि.२०/०३/२०१७ रोजी झालेल्या मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. उघडणेत आलेल्या टेक्नीकल बीड मधील कागदपत्रांची छाननी केली असून, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.न.** | **निविदाधारकाचे नाव** | **शेरा** |
|---|---|---|
| ०१ | सिर्मक कन्सलटंस् प्रा. लि., हैद्राबाद (तेलंगाना) | पात्र |
| ०२ | क्रीएटीव्ह सर्कल, नागपूर | पात्र |
| ०३ | सुशिल देशमुख ॲण्ड असोशिएटस्, औरंगाबाद | पात्र |
| ०४ | ध्रुवतारा कन्सलटंट, सावेडी, अहमदनगर | आर्किटेक्ट सल्लागार संस्था यांची पात्रता निकषातील अ.नं.४ नुसार वार्षिक उलाढाल २५ लक्ष पर्यंत नसल्याने ते अपात्र आहेत. |
| ०५ | एम.बी.मालेवार डिझाईन्स प्रा. लि.,नागपूर | आर्किटेक्ट सल्लागार संस्था यांची पात्रता निकषातील अ.नं.३ नुसार समान काम केलेले नसल्यामुळे तसेच अ.नं.५ नुसार टेक्नीकल पात्रतेबाबत पुरावा सादर न केल्यामुळे ते अपात्र आहेत. |

उपरोक्त पात्र सल्लागार संस्थांचे वाणिज्यीक लिफाफे (Commercial Bid) दि.११/०४/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | फी ची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | सुशिल देशमुख ॲण्ड असोशिएटस्, औरंगाबाद | १.९५% | प्रथम निम्नतम |
| ०२ | क्रीएटीव्ह सर्कल, नागपूर | २.४५% | द्वितिय निम्नतम |
| ०३ | सिर्मेक कन्सलटंस् प्रा. लि., हैद्राबाद (तेलंगाना) | ३.००% | तृतिय निम्नतम |

तरी वरीलपैकी मे. सुशिल देशमुख ॲण्ड असोसिएटस्, औरंगाबाद यांचा १.९५% इतक्या निम्नतम फीचा देकार स्विकारुन त्यांना नेमणूकपत्र देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**मौजे निमगाव कोऱ्हाळे गट नं.८७, ८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकरीता आर्किटेक्चरल सल्लागार नेमणूकीसाठी मागविण्यात आलेल्या ई-निविदांपैकी निम्नतम दरधारक मे. सुशिल देशमुख ॲण्डअसोसिएटस्, औरंगाबाद हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव कोऱ्हाळे गट नं.८७, ८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकरीता आर्किटेक्चरल सल्लागार नेमणूकीसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक यांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना नेमणूकपत्र देण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३१ **शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील दर्शन रांग हॉल वातानुकूलीत करणेसाठी ॲल्युमिनीअम स्लायडींग विंडो, पार्टीशन व फॉल्स सिलींगचे कामासाठी उघडणेत आलेल्या ई-निविदांवर (Commercial Bid) निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.८६७ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"... यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीमधील चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावना:-** शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीतील दर्शन रांगेत साईभक्तांना उष्णतेचा त्रास होऊ नये याकरीता मेकॅनिकल विभागामार्फत एकूण ३० नग जम्बो एअरकूलर ठेवणेत आलेले आहेत. तसेच भूयारी मार्ग सभामंडप, नंदि गाभारा व समाधी मंदिर याठिकाणी देणगीदार साईभक्त यांचे मार्फत सेंट्रल ए.सी प्लॅन्ट देणगी स्वरुपात बसवून कार्यरत करणेत आलेले आहे. मा. अध्यक्ष महोदय यांचे निर्देशानुसार साईभक्तांचे सुविधेकरीता चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करणेकामी वर नमूद मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीचे दर्शनरांग हॉलमध्ये एअर व्हेन्टीलेशनकरीता दोन्ही बाजूस खिडक्या आहेत तसेच सिलींगला मोठया आकाराचे डक्ट आहे. सदरहू हॉल वातानुकुलीत करणेकामी बंदिस्त करणे आवश्यक आहे. याकामी ॲल्युमिनीअम स्लायडींग विंडो, ॲल्युमिनिअम डोअर, डक्टचे सिलींगला फॉल्स सिलींग व फॅब्रीकेशन करणे इ. कामे करणे आवश्यक आहे. अहमदनगर जिल्हा दरसुची २०१६-२०१७ मधील दरानुसार या कामासाठी अंदाजे रु.२३,२२,६७०/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. जा. नं.३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार प्रत्येक विभागाने टेंडरमध्ये नमूद करणेत येणारी इस्टीमेंट कॉस्ट ही मार्केट कॉस्टपेक्षा २० ते ३०% कमी नमूद करावी, असे नमूद केले आहे. त्यानुसार अंदाजपत्रकीय रक्कमेतुन २०% कपात करुन रु.१८,५८,१३६/- मात्रचे खर्चानुसार इकडील दि.२४/०१/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये सदर काम करणेसाठी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन ई - निविदा मागविणेत आल्या होत्या. याकामी एकूण खालील सहा निविदाधारकांनी निविदा अपलोड केल्या होत्या त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | अल्युमिना कन्सेफ्ट, नाशिक | २३८९७ | ०८/०३/२०१७ |
| ०२ | मे. आर एल भुतडा, कोपरगांव | २५३२४ | २२/०३/२०१७ |
| ०३ | पुजा आर्किटेक्चरल सिस्टीम प्रा. लि. मुंबई | २५१११ | २२/०३/२०१७ |
| ०४ | एस जी गायकवाड, राहाता | २५१०८ | २०/०३/२०१७ |
| ०५ | अनिल एस पाटील, सोलापूर | २५१०७ | २०/०३/२०१७ |
| ०६ | स्वप्नील अविनाश भास्कर, राहुरी | २४२६२ | ०८/०३/२०१७ |

उपरोक्त प्राप्त ई – निविदांचा तांत्रिक माहीतीचा लिफाफा दि.०३/०४/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेला आहे. उघडणेत आलेल्या ई – निविदांचे टेक्नीकल बीड मधील कागदपत्राची छाननी केली असता, त्यांचे पात्रतेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| ०१ | अल्युमिना कन्सेफ्ट, नाशिक | पात्र |
| ०२ | मे. आर एल भुतडा, कोपरगांव | पात्र |
| ०३ | पुजा आर्किटेक्चरल सिस्टीम प्रा. लि. मुंबई | पात्र |
| ०४ | एस जी गायकवाड, राहाता | पात्र |
| ०५ | अनिल एस पाटील, सोलापूर | पात्र |
| ०६ | स्वप्नील अविनाश भास्कर, राहुरी | ठेकेदार यांनी बयाना रकमेचा व निविदा फॉर्म फीचा डी.डी. हार्ड कॉपी सादर न केल्यामुळे तसेच पात्रता निकषातील अ.नं. ५ चे प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यामुळे अपात्र आहे. |

उपरोक्त पात्र ई– निविदाधारकांचे वाणिज्यीक (Commercial Bid) लिफाफा दि.११/०४/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेला आहे. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | अनिल एस पाटील, सोलापूर | १७,१२,०९८.०० | प्रथम निम्नतम |
| ०२ | अल्युमिना कन्सेफ्ट, नाशिक | १७,४१,८५९.७० | द्वितिय निम्नतम |
| ०३ | एस जी गायकवाड, राहाता | १८,०९,३५१.७० | तृतिय निम्नतम |
| ०४ | पुजा आर्किटेक्चरल सिस्टीम प्रा. लि. मुंबई | १९,७२,२९७.३८ | - |
| ०५ | मे. आर एल भुतडा, कोपरगांव | २०,६७,६८१.२३ | - |

**प्रस्ताव**:- तरी वरीलपैकी अनिल शामराव पाटील, सोलापूर यांचे निम्नतम दर (रु.१७,१२,०९८/-) स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील दर्शन रांग हॉल वातानुकूलीत करणेसाठी ॲल्युमिनीअम स्लायडींग विंडो, पार्टीशन व फॉल्स सिलींगचे कामासाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक अनिल शामराव पाटील, सोलापूर यांचे दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**परंतु सदरहू इतिवृत्तास पुष्टी देत असताना, शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील दर्शन रांग हॉल वातानुकूलीत करणेचे काम सुरु असून, त्यामध्ये हवा खेळती राहणेसाठी ॲल्युमिनीअम स्लायडींग विंडो, पार्टीशन व फॉल्स सिलींगचे काम करणेत येऊ नये, असे समितीचे मत झाले. सबब प्रस्तावित प्रक्रिया रद्द करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३२ **इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकरिता गोदरेज टेबल खरेदीकामी निम्नतम दरधारकांस कार्यादेश/ पुरवठा आदेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमामधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक –** शाळेच्या मुख्याध्यापिका (प्राथमिक विभाग) व प्राचार्य (माध्यमिक विभाग) यांचेकरीता कार्यालयात वापरणेकामी गोदरेज सनमायका टॉप (T9) ०२ नग ऑफीस टेबल व वर्गात शिक्षकांना वापरणेकामी (T8) १० नग खरेदी करणे आवश्यक आहेत. सदरचा अंदाजीत खर्च हा पुरवठाधारकांशी संपर्क साधुन त्यांचे कडून ई-मेल द्वारे वस्तूंचे दराबाबतचे पत्रके मागविण्यात आली होती.

| अ.नं. | तपशिल | मालाचे वर्णन | नग | अंदाजे किमंत प्रति नग रु | एकुण किमंत. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टेबल | सनमायका टॉप गोदरेज कंपनी T 8, (एक बाजू ड्रावर) | १० | ८८५०/- | ८८५००/- |
| ०२ | ऑफिस टेबल | सनमायका टॉप गोदरेज कंपनी T9 (दोन बाजू ड्रावर) | ०२ | १३८३५/- | २७६७०/- |
| | | | | एकुण | ११६१७०/- |

**(अक्षरी अंदाजे एक लाख सोळा हजार एकशे सत्तर मात्र रुपये)**

उपरोक्त संदर्भ १ अन्वये सदरचे खरेदीसाठी येणा-या अंदाजे रु. १,१६,१७०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली असून सदर खरेदीसाठी अ.नगर जिल्हयातील होलसेल दुकानदारांकडून कोटेशन मागविण्यात आले असून दि. २४.०३.२०१७ अखेर ०३ दरपत्रकांची बंद पाकीटे इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेली आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कोटेशन धारकांचे नांव | आवक नंबर/दिनांक | पाकिट |
|---|---|---|---|
| १. | मे. श्रद्धा ट्रेडर्स , पांचपीर चावडी . अ. नगर | २५४८४ / २४.०३.२०१७ | बंद पाकिट |
| २. | खंडेलवाल स्टील फर्निचर, अ.नगर | २५४८५ / २४.०३.२०१७ | बंद पाकिट |
| ३. | रोहन एन्टरप्रायजेस, अनगर. | २५४८६ / २४.०३.२०१७ | बंद पाकिट |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी/शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदरचा खर्च फर्निचर खरेदी बजेटमधून करता येईल. त्यासाठी रुपये २००,०००/- इतकी तरतूद करण्यात आली असून उपरोक्त टेंडरमध्ये खरेदीसाठी नमूद करण्यात आलेली इस्टीमेट कॉस्ट ही मार्केट कॉस्ट पेक्षा २० ते ३०% कमी रकमेने नमूद करण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकरीता गोरदरेज टेबल खरेदीकामी ०३ बंद दरपत्रके दि. ११.०४.२०१७ रोजीचे खरेदी समिती सभेसमोर उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशिल | मे. श्रद्धा ट्रेडर्स, पांचपीर चावडी . अ. नगर | खंडेलवाल स्टील फर्निचर, अ.नगर | रोहन एन्टरप्रायजेस, अनगर. |
|---|---|---|---|---|
| | | **दर प्रति नग रुपये** | | |
| १ | सनमायका टॉप गोदरेज कंपनी T 8, ( एक बाजू ड्रावर) | रु. १२७५०/- | रु. १२९००/- | **रु. १२२७६/- (सर्व करांसह)** |
| २ | सनमायका टॉप गोदरेज कंपनी T9 ( दोन बाजू ड्रावर) | रु. १९८६०/- | रु. १९९५०/- | **रु. १९४७२/- (सर्व करांसह)** |

उपरोक्त प्रमाणे गोदरेज टेबल मॉडेल T 8 प्रति नग खरेदी खर्च रु. १२,२७६/- प्रमाणे एकूण १० नगासाठी रु. १,२२,७६०/- व गोदरेज टेबल मॉडेल T 9 प्रति नग खरेदी खर्च रु. १९४७२/- प्रमाणे ०२ नगसाठी एकूण रु. ३८९४४/- खर्च येत असून एकूण १२ नग गोदरेज टेबलसाठी सर्व कारांसहीत एकूण रु. १,६१,७०४/- इतका खर्च येणार आहे.

तरी उपरोक्त निम्नतम दरधारकांस मा. स्थानिक उपसमिती सभेपुढे समक्ष उपस्थित ठेऊन त्यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन निवड झालेल्या दरधारकांस कार्यादेश / पुरवठा आदेश देणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस मा. व्यवस्थापन समितीचे सभेत शिफारस करणेसाठी सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकरिता गोदरेज टेबल खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक रोहन एन्टरप्रायजेस, अ.नगर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

३२ **मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना दिल्या, त्या मान्य करण्यात आल्या.**

(१) संस्थानचे विविध विभागाचे प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबीत आहेत. अशा सर्व प्रलंबीत प्रस्तावाची सद्यस्थितीसह माहिती मा.सदस्यांना देण्यात यावी. (कार्यवाही- मागासवर्ग कक्ष)

---

(२) संस्थानमार्फत बाहेरच्या संस्था/मंडळ यांना शिधा देणेबाबत मार्गदर्शन मिळणेकामीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेत यावा. (कार्यवाही- सामान्य प्रशासन वशी-०५ )

---

(३) साईभक्तांना उन्हापासून संरक्षण मिळणेसाठी जुना पिंपळवाडी रोड या ठिकाणी मंडप व मॅटीन (क्वायर) टाकण्यात यावे. तसेच व्दारकामाई दर्शन रांग ते गेट नं.४ पर्यंत मंडप वाढविणेत यावा.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

(४) व्दारावती परिसरात होणा-या चोऱ्यांचे प्रमाण थांबविणेसाठी कपाऊंडची उंची वाढविणेत यावी, अँगल जाळी बसविणेत यावी तसेच रात्रीचे वेळी पुरेसा प्रकाश मिळणेसाठी आवश्यकतेनुसार जादा लाईट बसविणेत यावे व मोठया झाडांच्या फांदया कमी करण्यात याव्यात.

(कार्यवाही- बांधकाम विभाग/विद्युत विभाग/बगीचा विभाग)

---

(५) फिरते वैद्यकीय पथक सध्या बंद असुन ते पुर्वीप्रमाणे पुन्हा सुरु करणेत यावे.

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं. १७७/१७८/२८२/१/२८४/२८८/६ मधील भूखंड क्र.१ मधील इमारत बी व डी साईबाबा संस्थानला दान करणेकामीच्या दानपत्राचे मुद्रांक शुल्कव नोंदणी शुल्काबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७ (२) (ट) विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खेरदी करील, अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७/१७८/२८२/१/२८४/२८८/६ मधील भूखंड क्रं.१ मधील इमारत बी व डी दानपत्राने स्विकारणेकामीच्या दानपत्राच्या नोंदणीकामी होणा-या खर्चास म्हणजेच मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इ.खर्चास मान्यता मिळणेबाबत व दानपत्र नोंदणीकृत करणेबाबत..

**प्रस्तावना-** मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७/१७८/२८२/१/२८४/२८८/६ मधील भूखंड क्रं.१ मधील इमारत बी व डी साईबाबा संस्थानला विनामोबदला हस्तांतर करणेकामी श्री.काशिनाथ गोविंद पाटील, रा.कोपरी, ता.वसई यांनी दि.११/११/२०१६ रोजीच्या अर्जान्वये प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेपूढे प्रस्ताव सादर करणेत आला. त्यावर निर्णय क्रं.९४७ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पूर्व), जि.ठाणे यांची मौजे निघोज,ता.राहाता येथील गट नं.१७७/१७८/२८२/१/२८४/२८८/६ मधील भूखंड क्रं.१ मधील इमारत बी व डी विनामोबदला हस्तांतर करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच या इमारतीमध्ये राज्यातील गोरगरीब,आदीवासी,वंचित,दुर्बल विद्यार्थ्यांसाठी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करुन घेणे व त्यांना प्रशासकीय सेवेचा लाभ मिळवून देणेकामी निवृत्त राजपत्रित अधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली आय.ए.एस.अकॅडमी सुरु करणेचा अभ्यासपूर्वक सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा,असे ठरले."

उक्त निर्णयाच्या अनुषंगाने व इकडील दि.२२/०३/२०१७ रोजीच्या कार्यालयीन टिपणीच्या अनुषंगाने उक्त दानपत्र नोंदणीकामी येणा-या मुद्रांक शुल्काची रक्कम माफ करुन मिळणेकामी मा.सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/६४५२/२०१७

दि.२४/०३/२०१७ अन्वये उक्त मिळकतीचा ७/१२ उतारा,दानपत्राचा मसुदा,मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय क्रं.९४७ ची प्रत व इतर आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करणेत आला होता.

तथापि मा.सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील आदेश क्रं.कक्ष-३/ अभि.प्रक्र.३०/१७/९५८/२०१७ दि.२४/०३/२०१७ अन्वये "उक्त दानपत्राचे प्रारुपमध्ये नमूद मिळकतीचे या कार्यालयातील सहायक नगररचनाकार यांनी सन २०१६-१७ चे केलेले मुल्यांकन रु.३२,२७,१३,५००/- इतके होत असून सदर दस्त हा त्यात नमूद मिळकतीबाबत अटी व शर्ती व बाबी पाहता दानपत्राचा होत आहे,असे माझे मत झाल्याने त्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम चे अनुसूची १ मधील अनुच्छेद ३४ च्या अंतर्गत अनुच्छेद २५ नुसार प्रभाव क्षेत्रासाठी ४ % प्रमाणे मुद्रांक शुल्क रु.१,२९,०८,५४०/- व जिल्हा परिषद अधिभार १ % प्रमाणे रु,३२,२७,१३५/- असे एकूण मुद्रांक शुल्क रु.१,६१,३५,६७५/- इतके येईल. परंतु महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाचे कलम ७० अन्वये मुद्रांक शुल्क रु.१,६१,३५,६८०/- (अक्षरी रु.एक कोटी एकसष्ट लाख पस्तीस हजार सहाशे ऐंशी मात्र) इतके देय आहे. मान्य असल्यास ६० दिवसांचे आत ई-चलनाद्वारे शासनास जमा करण्यात यावे. अन्यथा सदर बाबतीत समाधानी नसल्यास महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमचे कलम ५३(अ) अन्वये मुख्य नियंत्रक, महसुल प्राधिकारी यांचेकडे किंवा मुल्यांकनाच्या बाबतीत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमचे कलम ३२ (ब) अन्वये मा.नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,नाशिक विभाग,नाशिक यांचेकडे अपील दाखल करावे" असेबाबत आदेश निर्गत केलेले आहेत.

तद्नुषंगाने मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इ.खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीच्या सभेत सादर करण्यात आला. त्यास अनुसरुन निर्णय क्रं.२४० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय करण्यात आलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निघोज, ता.राहाता येथील श्री.काशिनाथ गोविंद पाटील हे संस्थानला दान स्वरुपात देत असलेल्या बी व डी इमारतीचे दस्त नोंदणीकरीता मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणेकामी मा.कार्यकारी अधिकारी यांनी मुद्रांक व नोंदणी शुल्काची खातरजमा करुन दस्त नोंदणीबाबत पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.

उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने दि.१८/०४/२०१७ रोजी मा.कार्यकारी अधिकारी व मा.उपकार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी श्री.धनंजय निकम,नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक विभाग, नाशिक यांचेशी समक्ष चर्चा केली असता मा.नोंदणी उपमहानिरीक्षक यांनी सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी उक्त दानपत्राच्या मुद्रांक शुल्काबाबत निर्गत केलेला दि.२४/०३/२०१७ रोजीचा अभिनिर्णय हा यथायोग्य असून त्याप्रमाणे उक्त दानपत्राचे मुद्रांक शुल्क रक्कम रु.१,६१,३५,६८०/- (रु.एक कोटी एकसष्ट लाख पस्तीस हजार सहाशे ऐंशी मात्र) इतकी भरणे आवश्यक असलेचे सांगितलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी अपील करण्यात तथ्य असलेचे दिसून येत नाही.

**विभागाचा अभिप्राय-** उक्त दानपत्र दस्त नोंदणीकामीचे मुद्रांक शुल्काची रक्कम रु.१,६१,३५,६८०/- (रु.एक कोटी एकसष्ट लाख पस्तीस हजार सहाशे ऐंशी मात्र) इतकी संस्थानचे लेखाशाखेमार्फत RTGS द्वारे सरकारजमा करणे व मा.दुय्यम निबंधक श्रेणी-१, राहाता यांचेकडील दि.२८/०३/२०१७ रोजीच्या पत्राप्रमाणे उक्त दस्त नोंदणी शुल्क रक्कम रु.३०,०००/- (रु.तीस हजार मात्र) इतकी RTGS द्वारे शासनास जमा करणे व सदरचे दानपत्र मा.दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडेस नोंदविणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं. १७७/१७८/२८२/१/२८४/२८८/६ मधील भूखंड क्र१ मधील इमारत बी व डी साईबाबा संस्थानला दान म्हणून स्विकारणेकामी दानपत्र दस्त नोंदणीकामीच्या मुद्रांक शुल्काची रु.१,६१,३५,६८०/- मात्र रक्कम संस्थानचे लेखाशाखेमार्फत RTGS द्वारे सरकारजमा करणे व मा.दुय्यम निबंधक श्रेणी-१, राहाता यांचेकडील दि.२८/०३/२०१७ रोजीच्या पत्राप्रमाणे उक्त दस्त नोंदणी शुल्क रु.३०,०००/- मात्र रक्कम RTGS द्वारे शासनास जमा करणे व सदरचे दानपत्र मा.दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडे नोंदविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेसाठी कायम खरेदी करणेकामी सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविणेच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करीत किंवा खरेदी करील, असे नमूद आहे.

**प्रस्ताव–** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील जमीनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी कायम खरेदी करणेकामी सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत.

**पूर्वपिठीका-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०२/२००९ रोजीच्या सभेत महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या लक्ष्मीवाडी मळया अंतर्गत येणा-या जमीनी विविध कारणांसाठी संस्थानने घेणेबाबतचा निर्णय क्रं.१६५ झालेला आहे. त्या अनुषंगाने मा.कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/भूसंपादन/२१२६/२००९ दि.२०/०२/२००९ अन्वये खालील गावांचे त्यांचेपुढे दर्शविलेले क्षेत्र संस्थानला खरेदी देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

| **अ.नं.** | **गावाचे नाव** | **क्षेत्र हे.आर** |
|---|---|---|
| १ | निमगाव-को-हाळे | ६३.०९ |
| २ | कनकुरी | ०६.६५ |
| ३ | शिर्डी | ११.८२ |
| ४ | निमगाव-को-हाळे (जी.आर.बी.वाडी) | ०५.९५ |
| ५ | साकुरी | १३.८२ |
| ६ | सावळविहीर बु. | ७५.७० |
| ७ | सावळविहीर खु. | ३३.६७ |
| ८ | चांदेकसारे/सोनेवाडी | १५३.७३ |
| | **एकूण** | **३६४.४३** |

उपरोक्त मागणी केलेल्या क्षेत्राबाबत शेती महामंडळाचे स्थानिक अधिकारी यांचेकडेस समक्ष चौकशी केली असता व सदर क्षेत्राचा ताळमेळ घेतला असता त्यापैकी काही गावातील काही क्षेत्र शेती महामंडळाने शासनामार्फत खंडकरी शेतक-यांना वाटप केलेले असलेचे व काही क्षेत्र वाटप करावयाचे प्रस्तावित असलेचे त्यांनी सांगितले. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी खाली नमूद केलेल्या गावांचे त्यांचेपूढे दाखविलेले क्षेत्र संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचेकडेस सादर करणेकामी व त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडेस सादर करणेकामीच्या निर्णयार्थ प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीच्या सभेत सादर करण्यात आला. त्यात निर्णय क्रं.७४५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे निमगाव-को-हाळे, शिर्डी, साकुरी, सावळविहीर बु., सावळविहीर खु. व चांदेकसारे/सोनेवाडी येथील शेती महामंडळाची ३०१.८४ हेक्टर जमीन दुय्यम निबंधक यांनी कळविलेल्या रु.३६९,२८,९०,५३०/- मात्र मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आली व तसा प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे व मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,महाराष्ट्र शासन,मुंबई यांचेकडे सादर करणेत यावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे सुधारीत प्रस्तावात खालील जमीनी दर्शविण्यात आल्या.

| **अ.नं.** | **गावाचे नाव** | **क्षेत्र हे.आर** |
|---|---|---|
| १ | निमगाव-को-हाळे | ७१.०५ |
| २ | शिर्डी | ११.६२ |
| ३ | साकुरी | १३.८२ |
| ४ | सावळविहीर बु. | ७५.६१ |
| ५ | सावळविहीर खु. | ३३.६७ |
| ६ | चांदेकसारे/सोनेवाडी | ९६.०७ |
| | **एकूण** | **३०१.८४** |

उपरोक्त निर्णय क्रं.७४५ प्रमाणे उपरोक्त जमीनी संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/३८९८/२०१६ दि.२४/१०/२०१६ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडे सादर करणेत आला व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेला आहे

**सुधारीत प्रस्ताव-** वरील जमीनींची संस्थानचे मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांनी दि.२८/०३/२०१७ रोजी समक्ष पाहणी केली असता त्यापैकी खालील नमूद केलेल्या जमीनी या संस्थानच्या जमीनीचे लगत असून सन २०१७-१८ हे श्रीं चे समाधी शताब्दी वर्ष असल्याने या कालावधीत साईभक्तांच्या गर्दीत मोठया प्रमाणात वाढ होण्याची शक्यता असलेने त्यासाठीचे नियोजन करणे, साईभक्तांना अन्न, निवारा, वैद्किय सेवा या मुलभूत सोयी-सुविधा विनासायास,विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे,उद्यानांची उभारणी करणे,वाहनतळ व्यवस्था करणे व प्रसादालयाचे विस्तारीकरण करणे यासाठी सदर जमीनींची संस्थानला तातडीने खरेदी करणे आवश्यक असलेचे मत झालेले आहे.

त्यासाठी खालील नमूद केलेल्या गावांचे त्यांचेपुढे दर्शविलेले क्षेत्र संस्थानला तातडीने कायम खरेदीने मिळणेकामी सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या.पुणे यांचेकडेस सादर करता येईल.

| अ.नं. | गावाचे नाव | क्षेत्र हे.आर |
|---|---|---|
| १ | निमगाव-को-हाळे | ४०.७३ |
| २ | शिर्डी | ११.६२ |
| | **एकूण** | **५२.३५** |

(गावनिहाय व सर्वे नंबर निहाय क्षेत्राची यादी सोबत सादर केली आहे.)

उपरोक्त क्षेत्र संस्थानला खालील विविध कारणांसाठी आवश्यक असलेबाबत प्रस्तावात नमूद करता येईल.

**१)** उपरोक्तपैकी मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८५ या जमीनीलगत संस्थानचे प्रसादालय आहे. त्या प्रसादालयात लाडू निर्मिती व्यवस्था आहे. लाडू निर्मितीसाठी १) विभाग प्रमुखकार्यालय २) स्टोअर ३) ऑनलाईल चक्की ४) पुरुष स्वच्छतागृह,स्त्री स्वच्छतागृह ५) एल.पी.जी.शेगडया त्याठिकाणी फलाईंग पॅन असतात. ६) बुंदी सुकविणे. ७) बुंदीपासून लाडू तयार करणे. ८) लाडू सुकविणे ९) मेंटेनन्स रुम १०) कर्मचा-यांचे कपडे बदलण्याची जागा ११) कंट्रोल कॅबिन सुपरवायझर कार्यालय १२) वॉशिंग प्लॅन्ट तसेच एल.पी.जी.गॅससाठी स्वतंत्र गोडावून इ.साठी किमान ०.३० आर जागा लागते. १३) लायटींग रुम १४) पार्कीग इ.साठी संस्थानला उक्त सर्वे नं.८५ मधील पुरेशा जागेची आवश्यकता आहे व उर्वरित क्षेत्रात

**२)** साईभक्तांना जास्तीत जास्त निवासस्थाने उपलब्ध करुन देणे.

**३)** तात्पुरत्या स्वरुपाच्या निवासव्यवस्थेसह कॅम्पिंग ग्राऊंड.

**४)** पालखी तळ.

**५)** वाहनतळ व कॅम्पिंग ग्राऊंड इ.साठी सदर क्षेत्राची संस्थानला आवश्यकता आहे.

तसेच उपरोक्त मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील जमीनींच्या किंमतीबाबतची माहीती मा.दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून प्राप्त करुन घेतली असून त्याप्रमाणे उपरोक्त जमीनींची एकूण किंमत रक्कम रु.१५७,२४,४३,०००/- (अक्षरी रु.एकशे सत्तावन्न कोटी चोवीस लाख त्रेचाळीस हजार मात्र) इतकी होत आहे.

**विभागाचा अभिप्राय- अ)** उपरोक्तप्रमाणे सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचेकडेस सादर करणेच्या मान्यतेसाठी व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करणेच्या मान्यतेसाठी आणि **ब)** उक्त जमीनींचे मा.दुय्यम निबंधक, राहाता यांनी कळविलेल्या मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता मिळणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेसाठी कायम खरेदी करणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचेकडेस सादर करणेत येऊन, त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना देणेस व सदरहू जमीन मा.दुय्यम निबंधक, राहाता यांनी कळविलेल्या मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ पाच प्रवासी बसेसचा वार्षिक टॅक्स भरणेबाबत.**

**प्रस्ताव– महाराष्ट्र शासन अधिनियम- २००४ मधील तरतुदः-**

१) कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व व कामाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगंणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील" असे नमुद केलेले आहे.

२) कलम २१ (१)(ज)मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून,त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करण्यात येईल, नमुद केलेले आहे.

**प्रस्ताविकः-** वाहन विभागाकडील प्रवासी बस क्र. एमएच-१७-एजी-९७४७, एजी-९७४८, एजी-९७४९, एजी-९७५० व एजी-९७५१ या पाच बसेसचा वापर साईआश्रम व भक्तनिवासस्थान येथे निवास करणा-या साईभक्तांना मंदीर परिसर व प्रसादालय येथे घेवुन जाणे व घेवुन येणे कामी होत आहे. सदर पाच बसेसच्या टॅक्सची मुदत दि.३०/०६/२०१७ रोजी संपुष्टात येत असलेने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांनीएटी फॉर्मवर पुढील एक वर्षाकरीता म्हणजे दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ अखेर या कालावधी करीता खालील तपशिला प्रमाणे रक्कम भरणेचे कळविले आहे.

| **अ.नं.** | **बस क्रमांक** | **वाहन प्रकार** | **आसन क्षमता** | **रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७-एजी-९७४७ | प्रवासी बस | ३१+१ सिटर | ३१,०००.०० |
| ०२ | एमएच-१७-एजी-९७४८ | प्रवासी बस | ३१+१ सिटर | ३१,०००.०० |
| ०३ | एमएच-१७-एजी-९७४९ | प्रवासी बस | ३१+१ सिटर | ३१,०००.०० |
| ०४ | एमएच-१७-एजी-९७५० | प्रवासी बस | ३१+१ सिटर | ३१,०००.०० |
| ०५ | एमएच-१७-एजी-९७५१ | प्रवासी बस | ३१+१ सिटर | ३१,०००.०० |
| | **एकुण रक्कम(रु.)** | | | **१,५५,०००.००** |

**विभागाचा अभिप्रायः-** उपरोक्त प्रमाणे पाचप्रवासीबसेस वाहनांचा आर.टी.ओ. कार्यालयात वार्षिक टॅक्स भरणे कामी रु.१,५५,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख पंच्चावण्ण हजार) मात्र खर्च येणार आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल. सदर टॅक्सची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांचे नांवे ॲडव्हान्स डी.डी. द्वारेआदा करावी लागणार आहे.

**मागणीः-** तरी प्रवासी बस क्र. एमएच-१७-एजी-९७४७, एजी-९७४८, एजी-९७४९, एजी-९७५० व एजी-९७५१ या पाच बसेसचा वार्षिक (दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ अखेर) टॅक्सची रक्कम भरणे कामी येणा-या एकुण रक्कम रु.१,५५,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख पंच्चावण्ण हजार)मात्र रक्कम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे भरणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता असावी

**निर्णय क्र.३२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या पाच बसेसच्या दि.०१/०७/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ अखेर या कालावधीतील वार्षिक टॅक्सची रु.१,५५,०००/- मात्र रक्कम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे भरणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ संस्थान संचलित श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थिनींसाठी बससेवा सुरु करणे बाबत.**

**प्रस्ताव– महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुदः-**

१) कलम १७ मध्ये (१), राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व व कामाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगंणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील" असे नमुद केलेले आहे .

२) कलम १७ (२) (ढ) मध्ये, विशेषकरुन आणि पोट-कलम (१) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, समिती सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील,असे नमुद आहे.

**प्रास्ताविकः-** उपरोक्त विषयांस अनुसरून, यापुर्वी मा.ना.श्री राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्ष नेता यांचेकडेस शिर्डी शहर आणि परिसरातील स्थानिक ग्रामस्थांनी /कर्मचा-यांनी विविध प्रश्नांबाबत मागण्या केलेल्या आहेत. यात श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय मधिल मुलींसाठी बससेवा सुरु करणे बाबत मागणी केलेली आहे.

त्यानुसार, संस्थानचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय मधील विद्यार्थीनीकरीता नवीन ०९ स्कुलबस खरेदी करणे किंवा स्कुलबस सुविधा पुरविण्याचे काम ट्रॅव्हलर कॉन्ट्रॅक्टर मार्फत आऊटसोर्सीग पध्दतीने (भाडोत्री बसेस) घेणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता.

दि.१६/०२/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८६ नुसार,ज्या-ज्या गांवामध्ये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी बससेवा सुरु करावयाचे प्रस्तावीत आहे. त्यागावांमध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बस सुविधा नसलेबाबत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून लेखी माहिती घ्यावी व अशी बससेवा उपलब्ध नसलेने संस्थानची बससेवा सुरु करणे बाबत त्या ठिकाणच्या ग्रामपंचायतीचा ठराव घेण्यात यावा व त्यासह सविस्तर प्रस्ताव पुढील शैक्षणिक वर्ष सुरु करणेपुर्वी सभेपुढे फेरसादर करणेत यावा, असे ठरले होते.

उपरोक्त निर्णयानुसार इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/६९५४/२०१६ दिनांक १७/०३/२०१६ रोजीचे पत्रान्वये,श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय मधील मुलींसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची बससेवा उपलब्ध नसलेचा ग्रामपंचायतीचा ठराव करणे बाबत नगर-मनमाडरोड वरील सावळीविहीर, निमगांव, निघोज, राहाता ही गावे वगळुन परिसरातील ०१) अस्तगांव, ०२) पिंपळस ३) साकुरी ४) नांदुर्खी खु. ५) नांदुर्खी बु. ६) डो-हाळे ७) को-हाळे ८) काकडी, ९) केलवड १०) मनेवाडी ११) वेस १२) वाकळी १३) कनकुरी१४) न.पा.वाडी १५) पिंपळवाडी १६) पुणतांबा १७) रुई/ कोहकी या ग्रामपंचायतींना पत्र देण्यात आले होते. त्यापैकी आजतागायत पुणतांबा, न.पा.वाडी व रुई या ग्रामपंचायतीचे ठराव प्राप्त झालेले होते.

तसेच इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/५२२/२०१६ दि.०६/०५/२०१६ अन्वये मा.आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,कोपरगांव आगार यांना उपरोक्त गावांमध्ये म.रा.प.महामंडळाची बससेवा बाबतची माहिती मिळणे कामी पत्र देण्यात आले होते. त्यानुसार आगार व्यवस्थापक, कोपरगांव यांनी त्यांचे जा.क्र.रा.प./ आ.व्य.का/कोपर-३२६ दि.१०/०५/२०१६ अन्वये अस्तगांव, शिंगवे, पुणतांबा, सोनेवाडी या गावांमध्ये बससेवा सुरु असलेबाबत कळविलेले आहेत. तसेच नांदुर्खी बु., नांदुर्खी खु., कनकुरी, डो-हाळे, को-हाळे, मनेवाडी, काकडी, साकुरी, पिंपळस, एकरुखे, पिंपळवाडी, रुई, कोहकी, न.पा.वाडी, वेस, वाळकी, केलवड या गांवामध्ये बससेवा नसलेबाबत कळविलेले होते.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, शिर्डी शहर यांनी दिनांक२७ ऑगष्ट, २०१६ चे निवेदनान्वये कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुलींना बस सेवा उपलब्ध करुन देणेचे कळविलेले होते .

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी सन-२०१६-१७ करीता स्कुलबस सुविधाकरीता गाव निहाय विद्यार्थीनी संख्या खालील प्रमाणे कळविलेली आहे.

| अ.नं. | गाव | संख्या | अ.नं. | गाव | संख्या | अ.नं. | गाव | संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिर्डी | २५२ | १० | पिंपळस | २ | १९ | सावळीविहीर खु. | १६ |
| २ | नांदुर्खी खु. | १५ | ११ | अस्तगांव | ५ | २० | निघोज | ३५ |
| ३ | नांदुर्खी बु. | २९ | १२ | पिंपळवाडी | ६० | २१ | निमगांव | ४३ |
| ४ | कनकुरी | १८ | १३ | बिरेगांव बन | ६ | २२ | सोनेवाडी | २ |
| ५ | डो-हाळे | ३६ | १४ | रुई | ३२ | २३ | न.पा.वाडी | ८ |
| ६ | को-हाळे | ७ | १५ | शिंगवे | २ | २४ | निमगांववाडी | १० |
| ७ | काकडी | १ | १६ | पुणतांबा | २ | २५ | निमशेवाडी | ७ |
| ८ | साकुरी | १७ | १७ | कोह्की | ४ | | **एकुण** | **६६६** |
| ९ | राहाता | १७ | १८ | सावळीविहीर बु. | ४० | | | |

**अ) संस्थानमार्फत, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींकरीता स्कुल बसेस सेवा द्यावयाची झाल्यास-**

१) सदरचे ज्युनिअर कॉलेज सकाळी १०.०० ते सायं.०५.०० या वेळेत असल्यामुळे सर्व मुलींना एकाच वेळेस शाळेमध्ये घेवुन यावे लागेल व परत घरी सोडावेलागेल. त्याकामी उपरोक्त मुलींची संख्या विचारात घेता शिर्डीव परिसरातील मुली बसचा वापर करणार नाही असे गृहीत धरुन नवीन ०६ बसेस (५४+२ सिटर) खरेदी करणे आवश्यक आहे. सदर कामी प्रति बस अंदाजे रु.२२,००,०००/- प्रमाणे एकुण बसेस करीता रु.१,३२,००,०००/- इतका खर्च येईल.

२) प्रति बसकरीता ०१ वाहन चालक व ०१ मतदनीस या प्रमाणे एकुण ०६ बसेस करीता ०६ वाहन चालक व ०६ मदतनीस कर्मचारी उपलब्ध करुन द्यावे लागतील, त्यानुसार या सेवेसाठी ०१ वाहन चालकाचे प्रति महा वेतन रु.२०,०००/- व मदतनीस कर्मचारी प्रतिमहा वेतन रु.१५,०००/- प्रमाणे ०६ बसेस करीता प्रतिमहा रु.२,१०,०००/- प्रमाणे रु.२५,२०,०००/- इतका वार्षिक वेतन खर्च अपेक्षीत आहे.

३) ०६ बसेस करीता प्रति दिन अंदाजे १८०कि.मी. अंतराकरीता ७० लिटर डिझेल Xअंदाजे रु.५५/- प्रति लिटरप्रमाणे रु.३,८५०/- प्रति दिवस याप्रमाणे वार्षिक (२३० दिवसाकरीता) अंदाजे रु.८,८५,५००/- मात्र इंधन खर्च अपेक्षीत आहे.

४) ०६ बसेसचे दुरुस्ती व देखभाल खर्च- प्रति बस रु.६०,०००/- प्रमाणे ०६ बसेस करीता रु.३,६०,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

५) सर्व बसेसची किंमत व विद्याथीनी संख्या (५४+२) नुसार विमा करणे करीता अंदाजे प्रति बस फी रु.९०,०००/- X ६ प्रमाणे रु.५,४०,०००/- खर्च येतील.

६) RTO कार्यालयाचे प्रचलित नियमानुसार, इयत्ता दहावी पेक्षा पुढील वर्गाकरीता टॅक्ससाठी प्रति सिट रु.१९००/- प्रमाणे X ५४ सिट करीता रु.१,०२,६००/- प्रति बस प्रमाणे ६ बसेस करीता एकुण रक्कम रु.६,१५,६००/- खर्च येईल. याकरीता सदरच्या बसेस कनिष्ठ महाविद्यालयाचे नावावर रजिष्ट्रेशन कराव्या लागतील, याकामी कनिष्ठ महाविद्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

उपरोक्त अ.नं.०१ ते ०६ करीता खालील प्रमाणे एकुण खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | भांडवली खर्च (रु.) | अंदाजे वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | नवीन ०६ बसेस खरेदी खर्च | १,३२,००,०००.०० | २६,४०,०००.०० (२०% घसारा) |
| ०२ | कर्मचारी वेतन खर्च (वार्षिक) | --- | २५,२०,०००.०० |
| ०३ | इंधन खर्च (वार्षिक) | --- | ८,८५,५००.०० |
| ०४ | दुरुस्ती व देखभाल खर्च (वार्षिक) | --- | ३,६०,०००.०० |
| ०५ | विमा खर्च(वार्षिक) | --- | ५,४०,०००.०० |
| ०६ | RTO टॅक्स खर्च(वार्षिक) | --- | १,०२,६००.०० |
| | **एकुण अंदाजे खर्च** | **१,३२,००,०००.००** | **७०,४८,१००.००** |

**ब) भाडोत्री बसेस उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास-**

सध्या प्रायोगिकतत्वावर श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींना ने-आण करणे कामी स्कुलबस सुविधा पुरविण्याचे काम ट्रॅव्हलर कॉन्ट्रॅक्टर मार्फत आऊट सोर्सिंग पध्दतीने (भाडोत्री बसेस)ई-निविदा काढुन देता येईल. सदर कामी प्रति दिनी (५२ सिटर) बसेससाठी प्रति बस / प्रति दिन रु.७,०००/- प्रमाणे शिर्डी व्यतिरीक्त बाहेरगांवावरुन येणा-या मुलींसाठी ०६बसेससाठी २३० शालेयदिवसांसाठी (प्रति वर्षी )**अंदाजे एकुण रु.९६,६०,०००/- मात्र**खर्च अपेक्षीत आहे.

**क) बस थांबे:-**

०१) **शिर्डी व नगर-मनमाड रस्त्यावरील गांवे** वगळुन इतर गावातील मुलींना बससेवा संस्थान मार्फत द्यावयाची असल्यास खालील प्रमाणे रुट/ बस थांबे करावे लागतील.

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं. | ठिकाण | जाणे+ येणे अंतर कि.मी. (आणणे + सोडणे) | संख्या | एकुण | प्रस्तावित बस शुल्कनुसार जमा होणारी अंदाजित रक्कम (०३X०४X२३०शालेय दिवस ) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** |
| ०१ | पिंपळवाडी | १८+१८=३६ | ६० | ७२ | ५,९६,१६०/- | नपावाडी+ पुणतांबा+ शिंगवे येथील मुलींना पिंपळवाडी येथे बोलवावे लागेल. |
| | शिंगवे-२+नपावाडी-८+ पुणतांबा-२ | | १२ | | | |
| ०२ | रुई | २१+२१=४२ | ३२ | ३६ | ३,०९,१२०/- | कोहकी येथील मुलांना दत्त मंदीर स्टॉप येथे बोलवावे लागेल. |
| | कोहकी (दत्त मंदिर) | २३+२३=४६ | ०४ | | ०,४२,३२०/- | |
| ०३ | नांदुर्खी बु. | २४+२४=४८ | २९ | ५१ | ३,२०,१६०/- | काकडी येथील ०१ मुलगी को-हाळे येथे बोलवावे लागेल. |
| | नांदुर्खी खु. | २६+२६=५६ | १५ | | १,९३,२००/- | |
| | को-हाळे | ३६+३६=७२ | ०७ | | १,१५,९२०/- | |
| ०४ | डो-हाळे | २४+२४=४८ | ३६ | ५४ | ३,९७,४४०/- | |
| | कनकुरी | १८+१८=३६ | १८ | | १,४९,०४०/- | |
| | | **एकुण** | **२१३** | **२१३** | **२१,२३,२६०/-** | |

०२) **शिर्डी, निमगांव व निघोज व्यतिरीक्त** इतर सर्व ठिकाणचे मुलींना संस्थान बस देणेचे असल्यास खालील प्रमाणे रुट / बस थांबे करावे लागतील.

**तक्ता क्रमांक ०२**

| अ.नं. | ठिकाणी | जाणे+ येणे अंतर कि.मी. (आणणे + सोडणे) | संख्या | एकुण | प्रस्तावित बस शुल्कनुसार जमा होणारी अंदाजित रक्कम (०३X०४ X२३०शालेय दिवस ) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** |
| ०१ | पिंपळवाडी | १८+१८=३६ | ६० | ७२ | ५,९६,१६०/- | नपावाडी+ पुणतांबा+ शिंगवे येथील मुलींना पिंपळवाडी येथे बोलवावे लागेल. |
| | शिंगवे-२+नपावाडी-८+ पुणतांबा-२ | | १२ | | | |
| ०२ | रुई | २१+२१=४२ | ३२ | ३६ | ३,०९,१२०/- | कोहकी येथील मुलांना दत्त मंदीर स्टॅप येथे बोलवावे लागेल. |
| | कोहकी (दत्त मंदिर) | २३+२३=४६ | ०४ | | ०,४२,३२०/- | |
| ०३ | सावळीविहीर खु. | १६+१६=३२ | ४० | | २,९४,४००/- | |
| | सावळीविहीर बु. | १७+१७=३४ | १६ | ५६ | १,२५,१२०/- | |
| ०४ | नांदुर्खी खु. | २६+२६=५६ | १५ | | १,९३,२००/- | काकडी येथील ०१ मुलगी को-हाळे येथे बोलवावे लागेल. |
| | नांदुर्खी बु. | २४+२४=४८ | २९ | | ३,२०,१६०/- | |
| | को-हाळे | ३६+३६=७२ | ०७ | ५१ | १,१५,९२०/- | |
| ०५ | कनकुरी | १८+१८=३६ | १८ | | १,४९,०४०/- | |
| | डो-हाळे | २४+२४=४८ | ३६ | ५४ | ३,९७,४४०/- | |
| ०६ | राहाता | १९+१९=३८ | १७ | ४१ | १,४८,५८०/- | साकुरी येथील मुली नगर-मनमाड रोडवरुन घेता येतील व सोडता येतील. |
| | साकुरी | १७+१७=३४ | २४ | | १,८७,६८०/- | |
| | | **एकुण** | **३१०** | **३१०** | **२८,७९,१४०/-** | |

**०३)** कनिष्ठ महाविद्यालयाकडे सध्या एकुण ६६६ मुली शिक्षण घेत असलेचे विद्यालयाकडुन कळविण्यात आलेले आहे. या सर्व मुलींना संस्थान मार्फत / भाडोत्री बस सेवा उपलब्ध करुन द्यावयाचे असल्यास एकुण १३ (५२ सिटर) बसेस लागतील त्यामुळे बसेस खरेदी व इतर अनुषंगीक खर्चात उपरोक्त अ / ब मधील खर्चाचे प्रमाणात त्यानुसार वाढ होईल.

**ड) मुलींकडून घ्यावयाचे फी बाबतः-**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एस.टी.) मधील प्रवाशांकडून सध्या एक रुपया प्रति कि.मी. पेक्षा भाडे आकारले जाते. तसेच प्रति तिकीट एक रुपया अधिभार घेण्यात येतो.

श्री साईबाबा संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाकडील विद्यार्थीकरीता बससेवा उपलब्ध करुन दिल्यास येणारा खर्च विचारात घेता सवलतीच्या दरात उपरोक्त बस थांब्यानुसार व प्रत्यक्ष होणा-या प्रवासानुसार,प्रति कि.मी. एक रुपया (प्रति दिवसा प्रमाणे) एकुण शालेय २३० दिवसा करीता (वार्षिक) बस शुल्क वसुल करता येईल, असे मत आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने, खाली नमुद केलेल्या बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे -

०१. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी संस्थान मार्फत बससेवा उपलब्ध करुन देणे अथवा भाडोत्री वाहनांमार्फत बससेवा उपलब्ध करुन देणे.

०२. परिच्छेद क मधील तक्ता क्रमांक १ अथवा तक्ता क्रमांक २ अथवा अ.नं. ०३ पैकी कोणत्या गावातील मुलींना बससेवा उपलब्ध करुन देणे.

०३. परिच्छेद डप्रमाणे बस प्रवास शुल्क आकारणे.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस तसेच वर नमुद केलेप्रमाणे संस्थानमार्फत बससेवा उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास, बस खरेदी कामी किंवा भाडोत्री घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया विहित पध्दतीने राबविणेस तसेच याकामी येणारे सर्वसमावेशक अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणे कामी, सदरचा प्रस्ताव दि.३१.०८.२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ तथा निर्णयार्थ सादर करण्यात आला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र.६२५ अन्वये, दरम्यानचे कालावधीमध्ये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थिनींसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ हे बस सेवा पुरविणेस तयार आहेत का? याची विचारणा करणेत यावी, असे ठरले होते.

उपरोक्त निर्णयानुसार, विभाग नियंत्रक प्रमुख, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अहमदनगर विभाग, अहमदनगर यांना जा.नं.एसएसएस/वशी-कनिष्ठ/३०१४/२०१६ दि.१२/०९/२०१६ अन्वये पत्र देणेत आले होते. त्यानुसार दि.१०/१०/२०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांचे शुभहस्ते व मा. विश्वस्त यांचे प्रमुख उपस्थित महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मार्फत स्कुल बससेवेचा शुभारंभ करण्यात आला होता. त्यानुसार महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळमार्फत स्कुलबस सेवा चालु होती.

विविध विद्यार्थिनींनी दि.२१.०४.२०१७ रोजी दिलेल्या अर्जात, "श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी येथे शिर्डी शहर आणि परिसरातुन बरेचसे विद्यार्थी विद्यार्थिनींनी सायकलवर तसेच स्वतःच्या वैयक्तिक वाहनांनी शिक्षणासाठी येत असतात. या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात येतांना व जातांना श्री साईबाबा संस्थान मार्फत स्कुल बस सुविधा यावर्षी फेब्रुवारी २०१७ अखेर पर्यंत सुरु होती त्यानंतर एच.एस.सी. बोर्डाच्या परिक्षा काळात सदरची स्कुलबस सेवा बंद करण्यात आली आहे. शिर्डी शहर व परिसरातुन येणा-या ब-याच महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनींची गैरसोय होऊ नये त्यांच्या महाविद्यालयीन अभ्यासात व्यत्यय येऊ नये म्हणुन श्री साईबाबा संस्थानची ही स्कुल बस सेवा जुन २०१७ पासुन पुन्हा पुर्ववत सुरु करावी अशी आणास नम्रविनंती करीत आहोत, असे नमुद केलेले आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः-** आज दि.२५/०४/२०१७ रोजी शिर्डी डेपोचे विभाग नियंत्रक, श्री जगताप साहेब यांचेशी चर्चाकेली असता, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थिनींनी परिक्षा कालावधी असलेने एस.टी.पास न काढल्याने सदर स्कुल बससेवा बंद करण्यात आलेली आहे. पुढील शैक्षिणीक वर्षाकरीता विद्यार्थिनींनी फी भरुन पास काढल्यास माहे जुन-२०१७ पासुन बससेवा चालु करण्यात येईल असे सांगितलेले आहे.

**मागणीः-** उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने, खाली नमुद केलेल्या बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे-

०१. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थिनींसाठी माहे जुन-२०१७ पासुन पुन्हा पुर्ववत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मार्फत बससेवा सुरु करावी.

०२. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी संस्थान मार्फत बससेवा उपलब्ध करुन देणे अथवा भाडोत्री वाहनांमार्फत बससेवा उपलब्ध करुन देणे.

०३. परिच्छेद क मधील तक्ता क्रमांक १ अथवा तक्ता क्रमांक २ अथवा अ.नं. ०३ पैकी कोणत्या गावातील मुलींना बससेवा उपलब्ध करुन देणे.

०४. परिच्छेद ड प्रमाणे बस प्रवास शुल्क आकारणे.

तरी उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थिनींसाठी बससेवा सुरु करणे कामी बाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी संस्थान मार्फत बससेवा उपलब्ध करुन देणेत यावी व यासाठी स्कुल बस खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा.**

**तसेच, कोणत्या गावांना स्कुलबस सुविधा पुरवावयाची व सदरहू स्कुलबसचे प्रवास शुल्क किती आकारावयाचे यावर सविस्तर चर्चा करणेसाठी स्थानिक उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत व साईटेक प्रकल्प देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणुक होईपर्यंत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत प्रकल्पदेखभाल सुरु ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम 2004 मधील तरतुद:-** १७ (१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** ०१. दि.०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९.
०२. दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७२.
०३. दि.१९.०९.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६५७

**प्रास्ताविक:** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/११/२००९ रोजचे सभेतील निर्णय क्र. ७९९ अन्वये माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. प्रकल्प उभारणीसाठी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सर्व हार्डवेअर, नेटवर्क साहीत्य कार्यान्वीत करुन दिलेले आहे. तसेच, सर्व कार्यप्रणाली (Q Management- II & Integration with HMS वगळता) विकसीत करुन संबधीत विभागात कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत.

साईटेक प्रकल्प कार्यान्वीत करणेकामी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे एप्रिल-२०१७ मध्ये संपुष्टात येणार असल्याने, साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया शासनाचे अधिकृत कन्सल्टंसी कंपनीकडून अंतिम करणेकामी न्युन्तम दरधारकाची नेमणुक व प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभाल चालू ठेवणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेसमोर सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.५७२ अन्वये त्यास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्देशान्वये साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया राबविणेकरीता शासनाचे अधिकृत कन्सल्टंसी M/S. KPMG यांना कार्यादेश देण्यात आलेला असून निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. त्यानुसार दि.२२/०३/२०१७ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

प्रकल्पाची व्याप्ती पाहता, साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभाल निविदा प्रक्रिया कार्यवाही वेळेत (एप्रिल-२०१७ पुर्वी) होणे शक्य नाही. तसेच, नविन कंपनीस प्रकल्प हस्तांतरीत करण्यास अवधी लागणार आहे.

तसेच उपरोक्त निर्देशान्वये जा.क्र.एसएसएसटी/आयटी/४१३०/२०१६,दि.०७/११/२०१६ रोजीचे पत्राद्वारे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना प्रकल्प देखभालीसाठी मुदतवाढी संदर्भात पत्र देण्यात आलेले आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी त्यांचे दि१२/११/२०१६ रोजीचे पत्राद्वारे त्यांचे पेमेंट वेळेवर होत नसले कारणाने मुदतवाढ घेण्यास असमर्थतता दाखविलेली आहे, तसेच त्यांचे देय असलेले पेमेंट लवकरात लवकर अदा करण्याची विनंती केलेली आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे त्यांचे दि.१४/०३/२०१७ रोजीचे पत्राद्वारे पुन:श्च एकदा प्रकल्प देखभालीस एप्रिल-२०१७ नंतर मुदतवाढ घेण्यास असमर्थतता दाखविलेली आहे.

तसचे पत्रामध्ये त्यांनी प्रकल्प हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया सुरु करण्याबाबत विनंती केलेली आहे व त्यांचे देय असलेले पेमेंट लवकरात लवकर अदा करण्याची विनंती केलेली आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये दि. १९.०९.२०१६, निर्णय क्रं.६५७ व दि. ०९/१०/२०१६, निर्णय क्रं. ७३३ (११) अनुक्रमे पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत. साईटेक प्रकल्पाचा Migration Audit रिपोर्ट आलेनंतर अहवालानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे उर्वरीत बील अदा करणेत यावे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे ही कपंनी संस्थानमध्ये सॉफ्टवेअर विकसीत करणेचे काम करत असून यामध्ये करारानुसार त्यांचे काम झालेले नाही. तरी सदरहू अपुर्ण काम त्यांचेकडून मार्च – २०१७ पर्यंत पुर्ण करुन घ्यावे व काम पुर्ण होईपर्यंत त्यांच्या माहे मे-२०१६ पासूनच्या नियमीत बीलाची रक्कम अदा करणेत येऊ नये.

**सद्यस्थितीत प्रकल्पासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही चालू आहे**

मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये M/s. AAA Technologies P. Ltd., Mumbai यांना साईटेक प्रकल्पाचे Information System Audit व ERP या कार्यप्रणालीचे System Audit व Migration Audit करणेसाठी कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार त्यांनी सदर कार्यवाही केलेली असून, ऑडीट अहवाल व त्यावर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी केलेल्या कार्यवाहीचा पुर्तता अहवाल संस्थानला सादर केलेला आहे. सदर अहवाल माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत नोंद घेणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेला आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत लेखाशाखा विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ईआरपी या कार्यप्रणाली बाबतची अपुर्ण असलेली कार्यवाही पुर्ण करण्याची कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पूणे व अकाऊंट विभाग यांचेमार्फत अंतिम टप्प्यात आहे

तसेच माहिती तंत्रज्ञान विभागचे जा.नं.एसएसएसटी/आयटी/४४९९,दि.२७/०३/२०१७ रोजीचे परिपत्रका द्वारे सर्व विभागांना कार्यप्रणालीसंदर्भात असणाऱ्या अडचणी कळविणे संदर्भात निर्देशीत करण्यात आलेले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या अडचणींचे निरसन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत चालू आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींमध्ये श्री साईभक्तांना संस्थानमार्फत पुरविण्यात येणा-या कार्यप्रणाली उदा. ऑनलाईन सर्व्हिसेस, देणगी, रुम बुकींग, प्रसादालय, कँटीन, प्रकाशने व कापड विक्री तसेच प्रशासनासंदर्भात पगारबील, इनवर्ड/आउटवर्ड इ. सारख्या कार्यप्रणाली कार्यरत आहेत. तसेच, सदरच्या कार्यप्रणाली कार्यान्वीत राहणे करीता २० सर्व्हर, १७० संगणके, १३० प्रिंटर्स, नेटवर्क कनेक्टीव्हीटीसाठी फायबर केबल, ३४९ लॅन पॉईंट, ३५ युपीएस अशी अनुषंगिक साहीत्य कार्यान्वीत करण्यात आलेली आहेत. कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणालीपैकी ऑनलाईन सर्व्हिसेस, देणगी, रुम बुकींग, प्रसादालय इ. कार्यप्रणाली अविरतपणे सुरु असणे अत्यावश्यक असते सदरच्या कार्यप्रणाली काही मिनीटेही बंद पडल्यास साईभक्तांचे रोषास सामोरे जावे लागते, व माध्यमांमध्ये सदरच्या बाबीस त्वरीत अपप्रसिध्दी मिळते. तसेच पगारबील, इनवर्ड/ आऊटवर्ड सारख्या कार्यप्रणाली बंद पडल्यास संस्थान कामकाजात अडथळा निर्माण होऊन अनुषांगीक कामकाज बंद पडते.

उपरोक्त ठिकाणी अत्यावश्यक प्रिंटीगसाठी वापरात असलेले एकूण ६६ प्रिंटर करारनाम्यामध्ये नमुद केलेप्रमाणे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत भाडेतत्वावर वापरात आहेत, सदर प्रिंटरचे मासिक भाडेपोटी येणारी रक्कम कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे हे अदा करतात, तसेच सदर प्रिंटरचे अतिरीक्त होणा-या प्रिंटींगचे बिल संस्थान मार्फत अदा करणेत येते. दि.०१/०५/२०१७ पासून नविन कंपनीची नेमणुक होईपर्यंत सदर प्रिंटर्सची पुर्तता संस्थानमार्फत करावी लागणार आहे.

सद्यस्थितीत प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेले सॉफ्टवेअर, हार्डवेअर तसेच नेटवर्क संदर्भातील अडी-अडचणी सोडविण्यासाठी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत १५ तांत्रिक कर्मचारी व २ मॅनेजर शिर्डी येथे कार्यरत आहेत. तसेच कार्यप्रणालीमध्ये करावयाच्या आवश्यक सुधारणा तथा बदल यासाठी १८ प्रोग्रामर/डेव्हलपर पुणे येथे कार्यरत आहेत. कर्मचा-यांना कार्यप्रणाली वापरत असताना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी हेल्पडेस्क तीन शिफटमध्ये कार्यरत आहे. सदरची सर्व कार्यवाही सद्यस्थितीत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचेमार्फत केली जाते.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी दि १२/११/२०१६ रोजीचे पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार दि.०१ मे २०१७ पासून कामकाज थांबविल्यास उपरोक्त नमुद कार्यप्रणालीवर त्याचा परिणाम होऊन साईभक्तांची गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. तसेच

प्रशासकीय कामकाजामध्येही अडचणी येऊ शकतात. माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये तांत्रिक शैक्षणिक अर्हता प्राप्त ३ कायम कर्मचारी व ४ कुशल रोजंदारी कर्मचारी कार्यरत आहेत, उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाचा विचार करता साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाज विभागाअंतर्गत पाहणे शक्य होणार नाही, असे नम्र मत आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधी श्रीसंदिप भाले, श्री.मिलींद अर्जुन व श्री सतिष भालेराव हे दि.१९/०४/२०१७ रोजी, प्रकल्पाअंतर्गत त्यांचे पेमेंट व प्रकल्प हस्तांतरणाविषयी चर्चा करणेसाठी शिर्डी येथे आले होते. मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षात सदर विषयी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधी, प्र.आयटी विभाग प्रमुख अनिल शिंदे व तांत्रिक सहाय्यक श्री रमेश पुजारी यांचे उपस्थितीत चर्चा करणेत आली. सदर चर्चेवेळी मा.उपाकार्यकारी अधिकारी सो. यांनी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधींना प्रकल्पाअंतर्गत राहीलेली कार्यवाही (प्रामुख्याने ईआरपी कार्यप्रणाली संदर्भातील) वेळेत पुर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन कपंनीची नेमणुक होईपर्यंत प्रकल्पाचे देखभालीचे कामकाज चालू ठेवून, नविन कंपनीस प्रकल्प योग्य प्रकारे हस्तांतरण करणेसंदर्भात निर्देश दिलेले आहेत.

चर्चेवेळी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधींनी साईटेक प्रकल्पाचे त्यांचे पेमेंट वेळेवर मिळत नसले कारणाने करारनाम्यातील मुतदीनंतर प्रकल्पाची देखभाल चालू ठेवण्यास त्यांचे वरिष्ठांनी असमर्थता दाखविलेली आहे, असे कळविले. प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास उद्धावणा-या परिस्थितीबाबत चर्चेअंती श्री संदिप भाले यांनी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे देय असलेले पेमेंट ३० एप्रिल पुर्वी दिल्यास, सदर प्रकल्प देखभालीचे कामकाज चालू ठेवणेबाबत वरिष्ठांशी चर्चा करुन निर्णय कळविण्याचे मान्य केलेले आहे. तसेच, सदरकामीचा प्रस्ताव लवकरच सादर करण्यात येईल, असे यावेळी कळविलेले आहे.

सबब, साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करणेत आलेले कार्यप्रणाली सुरळीत सुरू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच प्रशासकीय कामकाजात अडचण येऊ नये, याकरीता नविन कंपनीची नेमणूक होऊन प्रकल्प हस्तांतरीत होईपर्यंत पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे.

**अ)** मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना प्रकप्ताअंतर्गत देय असलेल्या बीलांची रक्कम रुपये ४,३८,६२,६४४/- पैकी काही रककम राखीव ठेवून, उर्वरीत रक्कम त्यांना अदा करता येईल व राखीव रक्कम त्यांना उपरोक्त नमुद उर्वरीत कार्यवाही पुर्ण झालेनंतर अदा करता येईल. सदरची कार्यवाही वेळेत पुर्ण करणेसंदर्भात त्यांना पत्राद्वारे कळविता येईल.

**आ)** कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना प्रकल्प देखभालीसाठी दि.०७.११.२०१६ रोजी देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये "आहे त्याच अटी/शर्तीवर" असा उल्लेख करणेत आलेला होता. परंतू, सद्यस्थितीत त्यांचेकडून फक्त आलेल्या अडचणी सोडविण्याची कार्यवाही अपेक्षित असल्याने त्यांना सुचित केलेप्रमाणे त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचा योग्य विचार करुन, त्यांना कार्यादेश देता येईल.

**इ)** कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत सद्यस्थितीत भाडेतत्वावर वापरात असलेले प्रिंटरचे मासिक भाडे अंदाजे रक्कम रु.१,७०,०००/- + कर संस्थानमार्फत अदा करुन, सदरचे आवश्यक प्रिंटर्स कार्यान्वीत ठेवता येतील.

**मागणी:-** साईटेक प्रकल्प दुरस्ती-देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करणेत आलेले कार्यप्रणाली सुरळीत सुरू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच संस्थानचे कामकाजात अडथळा येऊ नये, याकरीता प्रस्ताविकेत नमुद मुद्दा **"अ" "आ" व "इ"** प्रमाणे कार्यवाही करणेच्या मान्यतेस्तव तथा निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय:-** साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करणेत आलेले कार्यप्रणाली सुरळीत सुरू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच संस्थानचे कामकाजात अडथळा येऊ नये, याकरीता प्रस्ताविकेत नमुद मुद्दा **"अ" "आ" व "इ"** प्रमाणे कार्यवाही करणेच्या मान्यतेस्तव तथा निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.३२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांची साईटेक प्रकल्प दुरस्ती-देखभालकामीची मुदत संपुष्टात आलेली असल्यामुळे सदरहूकामी विहीत पध्दतीने नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत साईटेक कार्यप्रणाली सुरळीत चालू रहावी, साईभक्तांची गैरसोय होऊ नये व संस्थानचे कामकाजात अडथळा येऊ नये यासाठी फक्त Functional Support सुरु ठेवणेबाबत**

**कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी व यासाठी त्यांचेकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **श्री साईआश्रम भक्तनिवास येथील इमारतीचे तळमजल्यावर बाहेरील बाजुचे खिडक्यांना सुरक्षिततेकरीता लोखंडी जाळी ग्रील बसविणेसाठी ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम 2004 मधील तरतूद** : कलम २(१४)(घ) – भक्तांचे सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे

**प्रस्तावना–** श्री साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये १२ निवासी इमारती आहेत. प्रत्येक इमारतीमध्ये चार मजले असून, प्रत्येक मजल्यावर ३२ खोल्या आहेत. या इमारतीमधील तळमजल्यावरील प्रत्येक खोलीच्या बाहेरील बाजुस एक खिडकी असून, खिडकीस लोखंडी ग्रील बसविलेले आहे. या तळमजल्याच्या खोल्यामध्ये निवासासाठी राहणा-या साईभक्तांकडून खोलीमधून बाहेर पडतांना नजरचुकीने खिडकी बंद करावयाची राहील्यास बाहेरील कोणतीही व्यक्ती त्या खिडकीमध्ये हात घालून खोलीमधील किंमती वस्तु चोरुन नेऊ शकतो. साईभक्तांचे खोलीमधील ठेवलेले साहित्य सुरक्षित रहावे याकरीता तळमजल्यावरील खोल्यांच्या खिडक्यांना जाळी बसविणेबाबत अधिक्षक, श्री साईआश्रम भक्तनिवास यांनी कळविलेले आहे.

**मागणी–** अधिक्षक, श्री साईआश्रम भक्तनिवास यांचे माणगीनुसार सर्व इमारतींची पाहणी केली असून, तळमजल्यावरील खोल्यांच्या आतील बाजुच्या १६ खिडक्या जवळील पॅसेजच्या गेटला लॉक असलेने, तेथील खिडक्यांना जाळी बसविण्याची आवश्यकता नाही. फक्त बाहेरील बाजुचे प्रत्येक इमारतीचे १६ खिडक्यांना सुरक्षितेच्यादृष्टीन जाळी बसविणे गरजेचे आहे. यानुसार श्री साईआश्रम भक्तनिवास येथील १२ इमारतीना प्रत्येक इमारतीकरीता १६ खिडक्याप्रमाणे १९२ नग खिडक्यांना एम.एस. जाळी बसवावी लागेल. सदर कामांकरीता आवश्यक मटेरिअल इकडील विभागाकडे शिल्लक नसलेने तसेच काम मोठ्या प्रमाणात असलेने सदरचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारक यांचेकडून करुन घ्यावे लागणार आहे. या खरेदीकामी खर्चाचा अंदाजकरीता विविध पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात आली असून, त्यानुसार सदर कामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | मशीनरींचा तपशील | नग | दर रुपये (मटेरिअल, मजूरी व टॅक्ससह) | एकूण किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | M.S. Angle : Size – 35 x 35 x 5 mm | 3,406 Kgs. | 62/- | 2,11,172/- |
| 2. | M.S. Flat : Size – 35 x 5 mm | 850 Kgs. | 62/- | 52,700/- |
| 3. | M.S. Jali : Size – 25 x 25x 3 mm – Height 4” | 1,992 Kgs. | 65/- | 1,29,480/- |
| 4. | Colour : Asian Paint – Ivory | 50 Ltrs. | 300/- | 15,000/- |
| | | | **एकूण :** | **4,08,352/-** |

उपरोक्तप्रमाणे १९२ नग खिडक्यांना लोखंडी जाळी ग्रील बसविणेकामी रुपये ४,०८,३५२/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च सन २०१७-२०१८ या वर्षातील ‘दुरुस्ती व देखभाल खर्च’ या शिर्षातील मंजूर अंदाजपत्रकीय तरतूद रुपये १,३४,००,०००/- या रकमेतून करता येईल. याकामी येणा-या खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**आवश्यक मान्यता** : प्रशासकीय

**विभागाचा स्पष्ट अहवाल–** श्री साईआश्रम भक्तनिवास येथील इमारतीचे तळमजल्यावरील खोल्यांचे बाहेरील बाजुचे खिडक्यांना सुरक्षिततेकरीता लोखंडी जाळी ग्रील बसविणे आवश्यक आहे. सदरचे काम ई-निविदा मागवून करुन घेता येईल.

तरी,

१) श्री साईआश्रम भक्तनिवास येथील इमारतीचे तळमजल्यावरील खोल्यांचे बाहेरील बाजुचे १९२ नग खिडक्यांना सुरक्षिततेकरीता लोखंडी जाळी ग्रील बसविणेकामी येणा-या अपेक्षित खर्चास,

२) या कामाकरीता महाराष्ट्र शासनाचे www\\mahaterders.gov.in व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस,

३) प्राप्त झालेल्या ई-निविदा मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेस

उपरोक्तप्रमाणे अ.नं. १,२ व ३ चे कार्यवाहीस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने साईआश्रम भक्तनिवास येथील इमारतीचे तळमजल्यावरील बाहेरील बाजुच्या खिडक्यांना लोखंडी जाळी ग्रील बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **श्री साई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स / ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन फ्लोअरींग व डॅडो बसविणेबाबत.**

**विषय नं.०९** **शिर्डी येथील सर्व्हे न.१७१/१२ मधील बस स्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्नीशमन यंत्रणा बसविणे व रेनवॉटर हारवेस्टींग प्रकल्प राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.३२९** उपरोक्त विषय नं.०८ व ०९ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **श्रींचे मंदिरात होणाऱ्या आरत्या तालासुरात होणेकामी कंत्राटी पध्दतीने गायकाची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील कर्मचारी आकृतीबंधास शासनाने उपरोक्त संदर्भ क्र.०१ चे आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. श्री साईबाबांच्या प्रति दिवशी काकड आरती, मध्यान्न आरती, धूपारती व शेजारती अशा चार आरत्या होतात. या प्रतीदिवशी होणा-या आरत्या गायणासाठी मंदिर विभागाचे आस्थापनेवर पुजाई-गवई या हुद्याची एकूण ४ पदे मंजुर आहेत. यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती दि.२२/०५/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्र.५१७ नुसार मंदिरातील आरत्या व इतर कार्यक्रम प्रसंगी व्यवस्थीत गाण्यासाठी गायकाची नेमणूक होणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणेत यावेत, असा निर्णय घेणेत आलेला होता. सदर निर्णयानुसार संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत दि.२३/११/२०१० रोजी दै.सकाळ या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेत आलेली होती. जाहीरातीत नमुद केलेली शैक्षणिक पात्रता व इतर अटी-शर्ती धारण केलेले उमेदवार न मिळाल्याने सदरची कार्यवाही स्थगित ठेवणेत आलेली आहे.

**मंदिर विभागाचे आस्थापनेवरील पुजारी-गवई या पदाची माहिती खालीलप्रमाणे -**

| अ.नं. | पदनाम व वेतनश्रेणी | मंजुर पदसंख्या | प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| ०१ | **पुजारी- गवई**<br>(वेतनबॅण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे १९००) | ०४ | 1) Age not more than 33 years;<br>2) Secondary School Certificate Examination passed;<br>3) Minimum five years poojari's training course passed from any recognized Ved Patshala with Sangit Visharad from recognized Music School / Institute.<br>4) Experience of 3 years in singing and pooja vidhi. |

पुजारी-गवई या हुद्याची एकूण ४ पदे मंजुर आहेत. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.२९ मार्च, १९९७ नुसार **आरक्षण –** खुला-०२, अ.जा.१ व अ.ज.१ याप्रमाणे येत आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२५ एप्रिल, २०१६ चे शासन निर्णयानुसार शासन सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे करणेत आली आहे.

पुजारी-गवई असे पदनाम आकृतीबंधात समाविष्ट असल्यामुळे पुजारी व गवई या दोन्ही क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता व अनुभव प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमात नमुद करणेत आलेला आहे. त्यामुळे यापुर्वी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुनही पात्र उमेदवार मिळालेले नाहीत.

शासनाने मान्यता दिलेल्या मंजुर आकृतीबंधात पदनाम, पदसंख्या व वेतनश्रेणी यास मान्यता दिलेली आहे. शासनाने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करणेबाबत आदेशीत केलेले आहे. त्यानुसार प्रस्तावीत सेवाप्रवेश नियम अंतिम करतांना पुजारी-गवई याऐवजी फक्त गवई असे पदनामात बदल करुन त्याची संगित शिक्षकाप्रमाणे शैक्षणिक पात्रता निश्चित करुन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविता येईल.

माध्यमिक शाळा संहितेनुसार संगित शिक्षक या पदासाठी संगित विशारद ही शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. पुजारी-गवई या पदनामाऐवजी गवई असा पदनामात बदल करुन त्याची शैक्षणिक पात्रता "मान्यताप्राप्त संगीत शाळेतून संगीत विशारद ही पदवी प्राप्त केलेली असावी. संगीताचे सखोल ज्ञान असावे तसेच अभंग-भजन चांगल्या प्राकारे म्हणण्याची पात्रता व किमान ५ वर्षे गायन क्षेत्रातील अनुभव", अशी पात्रता निश्चित करता येईल.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन शासन मान्यता घ्यावी लागेल. त्यानंतर बिंदुनामावली तयार करणेचे काम पूर्ण केल्यानंतर गवई या स्थायी पदावर नेमणूक देता येईल. परंतु सदरचे कामकाजास बहुतांश कालावधी लागणार आहे. श्रींच्या मंदिरातील दैनंदिन आरत्या व इतर कार्यक्रम तालासुरात होणे आवश्यक आहे. सदरची बाब ही अत्यावश्यक स्वरुपाची असल्याने तात्पुरत्या स्वरुपात लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटीपध्दतीने संगित विशारद दर्जाचे शिक्षण झालेल्या ४ कर्मचा-यांची कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून नेमणूक करणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे मंदिरामध्ये गायल्या जाणाऱ्या आरत्या तालासुरात होणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ४ कुशल गायकांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **मंजुरआकृतीबंधातील गट-ड मधील पदांचे पदनामात बदल करणेबाबत.**

**प्रस्ताव–** शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी संस्थानचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे. सदर आकृतीबंधात **"गट-ड"** वेतनबॅण्ड ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे १३०० मध्ये खालीलप्रमाणे पदे मंजुर आहेत.

| अ.नं. | पदनाम | मंजुर पदसंख्या |
|---|---|---|
| ०१ | मदतनीस | ७०७ |
| ०२ | शिपाई | ४५ |
| ०३ | सफाई कामगार | १७३ |
| ०४ | वार्डबॉय | ५८ |
| ०५ | आया | ४५ |
| ०६ | सुरक्षा रक्षक | १६१ |
| ०७ | व्यायामशाळा प्रशिक्षक | ०१ |
| ०८ | आर.ओ.प्लॅंट ऑपरेटर | ०१ |
| ०९ | वेल्डर मदतनीस | ०५ |
| १० | हेल्पर नॉन टेक्निकल | ०४ |
| ११ | पंप ऑपरेटर | ११ |
| १२ | भांडार/ कार्यशाळा परिचर | ०४ |
| १३ | ओपीडी मदतनीस | ०९ |
| १४ | कार्यालय मदतनीस | ०२ |
| १५ | टेलर/मदतनीस | ०१ |
| १६ | क्ष-किरण मदतनीस | ०१ |
| १७ | प्रयोगशाळा मदतनीस | ०१ |
| १८ | आय.सी.सी.यु.मदतनीस | ०३ |
| | **एकूण-** | **१२३२** |

मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४० नुसार संस्थान आस्थापनेवरील वेतनबॅण्ड ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे १३०० मधील पदांचे मदतनीस/शिपाई, सफाई कामगार, वार्डबॉय, आया व सुरक्षा रक्षक असे पाच संवर्ग तयार करणेस मान्यता मिळालेली आहे. परंतु या संवर्गाव्यतिरिक्त उपरोक्त अ.नं.०७ ते १८ गट-ड मधील पदे आकृतीबंधात मंजुर आहेत.

त्यापैकी आयसीसीयु मदतनीस-३, लॅब मदतनीस-१, ओपीडी मदतनीस-७, पंप ऑपरेटर/मदतनीस- ७, क्ष-किरण मदतनीस- १, टेलर /मदतनीस-०१ असे एकूण – २० पदावर कर्मचा-यांच्या नेमणूका करणेत आलेल्या आहेत. मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत या पदावरील कर्मचा-यांची नांवे मदतनीस/शिपाई या संवर्गात घेणेस मान्यता मिळालेली आहे.

शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी मान्यता दिलेल्या कर्मचारी आकृतीबंधात अट-शर्त क्र. ७ समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही, असे नमूद केलेले आहे.

उपरोक्त गट-ड पदांपैकी अ.नं.७ व्यायामशाळा प्रशिक्षक हे पद वगळता अ.नं.८ ते १८ मधील मंजुर गट-ड च्या पदांचे कामाचे स्वरुप व मदतनीसाचे कामाचे स्वरुप सारखेच आहे.

संस्थान आस्थापनेवरील गट-ड मधील कार्यरत कर्मचारी व आकृतीबंधातील मंजुर पदे यांचा योग्य ताळमेळ घालणे आवश्यक आहे. या कर्मचा-यांची बिंदुनामावली तयार करणेसाठी सल्लागार श्री.खैरे, नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली कामकाज चालू आहे. संस्थान आस्थापनेवर गट-ड मध्ये मदतनीस/शिपाई, सफाई कामगार, वार्डबॉय, आया व सुरक्षा रक्षक असे पाच संवर्ग ठेवल्यास दैनंदिन प्रशासकीय कामकाज, समकक्ष पदावर बदल्या करणे, पदोन्नती साखळी तयार करणे सोईचे होईल. यासाठी उपरोक्त अ.नं.०८ ते १८ गट-ड चे वेतनबॅण्ड ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे १३०० मधील मंजुर पदांचे पदनाम मदतनीस करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.३३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील गट-ड मधील कार्यरत कर्मचारी व आकृतीबंधातील मंजुर पदे यांचा योग्य ताळमेळ घालुन, या कर्मचाऱ्यांची बिंदुनामावली तयार करणेसाठी संस्थान आस्थापनेवर गट-ड मध्ये मदतनीस/शिपाई, सफाई कामगार, वार्डबॉय, आया व सुरक्षा रक्षक असे पाच संवर्ग ठेवणेस व यासाठी प्रस्तावातील अ.नं.०८ ते १८ गट-ड चे वेतनबॅण्ड ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे १३०० मधील मंजुर पदांचे पदनाम मदतनीस करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **श्री साईबाबांच्या पादुका बाहेरगावी दर्शन सोहळयासाठी नेणेबाबत.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतूद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** श्रीसाईबाबा संस्थानकडे श्रींच्या मुळ पादुका आहेत. पालखी व रथ मिरवणूकीचे वेळी श्रींच्या पादुका साईभक्तांचे दर्शनाकरीता धुपारतीनंतर श्रींचे समाधी चौथ-यावर ठेवण्यात येतात. तसेच रात्रौ पालखीनंतर पुन्हा समाधी मंदिरातील शोरुममध्ये ठेवण्यात येतात. श्रींच्या पादुकांचे संरक्षण व संवर्धन करणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. श्रीसाईबाबांच्या मुळ पादुका यापुर्वी फक्त मुंबई येथे एक वेळेस संस्थानचे कार्यक्रमासाठी कडक बंदोबस्तामध्ये नेण्यात आल्या होत्या. त्याव्यतिरीक्त व त्यानंतर श्रींच्या मुळ पादुका या कोणत्याही ठिकाणी नेण्यात आलेल्या नाहीत. श्रींचे वस्तु संग्रहालयातही श्रींच्या पादुकांचे दोन जोड आहेत. तसेच यापुर्वी संस्थानमार्फत चावडी शताब्दी वर्षामध्ये विविध ठिकाणी झालेल्या कार्यक्रमाकरीता श्रींचे समाधीचे पादुकांचे ठिकाणी पुर्वी असलेल्या व सध्या वापरात नसलेल्या चांदीच्या पादुकांना कार्यक्रमासाठी बाहेरगावी नेऊन संस्थानमार्फत कार्यक्रम करण्यात आलेला आहे.

**प्रस्ताव-**

१) अर्जदार श्री.गणेश अरुण डोईफोडे, सचिव, साईसेवा प्रतिष्ठाण, काष्टी, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांनी आपले दि.१२/०४/२०१७ रोजीचे अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, रविवार, दि.०७/०५/२०१७ रोजी त्यांनी काष्टी, ता.श्रीगोंदा येथे नव्याने स्थापन केलेल्या शिर्डी येथील श्रीसाईबाबांच्या गुरुस्थान मंदिराच्या प्रतिकृतीप्रमाणे बांधण्यात आलेल्या मंदिराचे प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण कार्यक्रमाकरीता परिसरातील अनेक साईभक्त तेथे येणार असल्याने संस्थानमार्फत श्रीसाईबाबांच्या पादुका कलशारोहण कार्यक्रमाचे वेळी दर्शनास मिळणेबाबत विनंती केली आहे.

२) त्याचप्रमाणे अर्जदार श्री.अमित व्यास, विश्वस्त, स्वयंभु श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर, मुंबई यांनी आपले दि.२०.०४.२०१७ रोजीचे अर्जान्वये जेष्ठ नागरीक व शारिरीक दृष्ट्या सक्षम नसलेले साईभक्तांना शिर्डी येथे येणे शक्य नसल्याने तसेच सध्या शालेय विद्यार्थी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षेचा कालावधी असल्याने दि.०१ जुन ते ०४ जुन २०१७ या कालावधीत बोरीवली पश्चिम येथील चंदावरकर विस्तारीत मार्गावरील पाच एकर जागेवर बसलेल्या पुष्पांजली गार्डन येथे पादुका दर्शनासाठी आयोजन करावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

**विभागाचे मत/ अभिप्राय-** श्रीसाईबाबांच्या मुळ पादुकांचे संरक्षण व संवर्धन होणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. श्रीसाईबाबा संस्थानकडे असलेल्या श्रींच्या पादुका वरील नमूद केलेल्या कार्यक्र माकरीता देणेकामी खालीलप्रमाणे बाबींचा विचार व्हावा ही विनंती -

१. अशा पद्धतीने श्रींच्या पादुका बाहेर नेल्यास इतरही साईभक्त पादुकांना घेऊन येणेबाबत अर्ज करतील, त्यामुळे कुठे कार्यक्रमास नाकार दिल्यास नाराजी व्यक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. श्रींच्या पादुका यापुर्वी फक्त संस्थानचे कार्यक्रमासाठी संस्थानमार्फत नियोजित पद्धतीने बाहेरगावी नेण्यात आलेल्या आहेत, कोणत्याही खाजगी/ वैयक्तीक कार्यक्रमाकरीता पादुका यापुर्वी कधीही पाठविण्यात आलेल्या नाही.

३. इतर ठिकाणी गर्दीचे प्रमाण अचानक वाढल्यास श्रींच्या पादुकांना हानी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

४. श्रींच्या मुळ अथवा वस्तु संग्रहालयातील पादुका बाहेरगावी नेणेकामी श्रींचे वस्तूसंग्रहालयाचे सल्लागार व पुरातत्व तज्ञ मा.पद्मश्री सदाशिवराव गोरक्षकर व पुरातन वास्तु तज्ञ मा.श्री.एस.मुखर्जी, संचालक, छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय, मुंबई यांचेही लेखी मत घेणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे.

५. तसेच संस्थानमार्फत पादुका नेऊन त्याठिकाणी संस्थानचा कार्यक्रम करता येईल. परंतु,त्याकामी संस्थानचा कार्यक्रमाचे नियोजन करावे लागेल, तसेच संस्थानचे जबाबदार प्रशासकीय अधिकारी, विभाग प्रमुख, कर्मचारी व संरक्षण विभागाचे कर्मचारी यांचेसह संस्थान वाहनाने ने-आण करुन कार्यक्रम करता येईल, असे नम्र मत आहे.

६. यापुर्वीही अशाच पद्धतीने श्रींच्या मुळ पादुका बाहेरगावी/ परदेशी नेणेबाबत ठरविले असतांना त्याकरीता स्थानिक ग्रामस्थ व साईभक्त यांनी तीव्र विरोध केला होता.

७. श्रींच्या पादुका बाहेरगावी पाठविणे/ नेणे याबाबत कोणतीही नियमावली नाही.

तरी संस्थानच्या ताब्यातील श्रींच्या मुळ अथवा इतर कोणत्याही पादुका अथवा इतर साहित्य बाहेरगावी नेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार व्हावा, याकरीता प्रस्तावात मागणी केलेल्या श्री.गणेश अरुण डोईफोडे, सचिव, साईसेवा प्रतिष्ठाण, काष्टी, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांना दि.०७.०५.२०१७ रोजी व श्री.अमित व्यास, विश्वस्त, स्वयंभु श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर, मुंबई यांना दि.०१ जुन ते ०४ जुन २०१७ या कालावधीमध्ये दर्शन सोहळयासाठी श्रींच्या चांदिच्या पादुका उपलब्ध करुनदेण्यास मान्यता देण्यात आली.**

**सदरहू पादुका दर्शन सोहळयासाठी संस्थान वाहन व कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात यावेत, तसेच याकामी येणारा सर्व खर्च संबंधीतांकडून घेण्यात यावाव पादुका दर्शन सोहळयाच्या ठिकाणी संस्थानची देणगी पेटी/ देणगी पावती पुस्तक ठेवण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **संस्थानमार्फत वितरीत होणारी श्रींची विभुती चे रजिस्ट्रेशन देणगीदाखल करणेस व याकामी श्री.केशु मुर्ती सी. यांना पत्रव्यवहार करणेबाबत परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव–** श्रीसाईबाबांनी शिर्डी येथील आपल्या प्रदीर्घ वास्तव्यात अनेक भक्तांचे आजार स्वत: सुश्रुषा करुन बरे केले आहेत. श्रीसाईबाबांनी स्वहस्ताने प्रज्वलीत केलेल्या व आजमितीस ही अखंडपणे प्रज्वलीत असलेल्या धुनीतील उदीच्या सहाय्याने अनेक भक्तांचे असाध्य असे रोग बरे झालेले आहेत व आजही होत आहेत. त्याचप्रमाणे श्री साईबाबांनी शिर्डी येथेच फक्त धुनी स्वहस्ते प्रज्वलीत केली आहे. भक्तांच्या मनोकामना पुर्ण करण्यासाठी तसेच विविध आजार बरे करण्यासाठी श्रीसाईबाबा याच धुनीतून "विभुती" देत असत. आजही भक्तांना दिली जाणारी पवित्र उदी याच धुनीतुन प्राप्त होते.आता संस्थानमार्फत मंदिर विभागाचे उदी काऊंटरवरुन वाटण्यात येणारी उदी, भक्त मंडळ सभासदांना प्रसाद रुपाने पोष्टाने पाठविण्यात येणारी उदी, देणगी काऊंटरवरुन दिली जाणारी उदी व महत्वाचे मान्यवरांना देण्यात येणारे उदी पॅकेट्सची उदी द्वारकामाईचे धुनीतुनच प्राप्त होते. श्रींची धुनी अखंडपणे प्रज्वलीत रहावी याकरीता संस्थानमार्फत प्रति वर्षी गोवरी खरेदी करण्यात येते व देणगी रुपाने प्राप्त होणारे व बगीचा विभागामार्फत प्राप्त झालेल्या लाकडांचाही वापर धुनीमध्ये करण्यात येतो.

**प्रस्ताव-** साईभक्त श्री.केशु मुर्ती सी., ISOAdvisor & Co-ordinator, प्रो.प्रा.साईएंटरप्रायजेस, बँगलोर यांनी दि.२३.०३.१७ चे पत्रानुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत श्रींचे द्वारकामाईमध्ये तयार होणारी व वितरीत करण्यात येणारी पवित्र "विभुती" (उदी)चे संस्थानमार्फत कायद्यांतर्गत रजिष्ट्रेशन (ट्रेडमार्क) करुन घेणेत यावे असे कळविले आहे. तसेच याकामी होणारा सर्व खर्च श्री.केशु मुर्ती हे स्वत: करणार असल्याबाबत कळविले आहे. तरी याकामी पुढील कार्यवाहीसाठी संस्थानमार्फत परवानगीचे पत्र देणेबाबत त्यांनी पत्रामध्ये नमूद केले आहे

**विभागाचा अभिप्राय-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी प्रमाणे अनेक ठिकाणी अशाच पद्धतीने द्वारकामाई व श्रींची धुनीचे प्रतिकृती तयार करण्यात येत असल्याचे ऐकीव आहे. त्यामुळे श्रींचे विभुतीचा गैरवापर करुन आर्थिक फायदा काही व्यक्ती घेऊ शकतात. श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीतील श्रींचे द्वारकामाईचे धुनीतुन प्राप्त होणारी "विभुती" ही अधिकृत असल्याबाबत रजिष्ट्रेशन करणे अथवा याबाबत ट्रेडमार्क करणे आवश्यक आहे. तसेच श्रींचे "विभुती"चे रजिष्ट्रेशन केल्यास संस्थानला याचा फायदाच होणार आहे. साईभक्त श्री.केशु मुर्ती यांनी संस्थानचे द्वारावती विभाग, प्रसादालय विभागास ISO मानांकन मिळणेकामी मार्गदर्शन व मोलाचे सहकार्य केले असुन अशाच पद्धतीने मंदिर विभाग व इतर विभागही त्यांचे मार्गदर्शनाने ISO मानाकंन प्राप्त होणार आहे. श्री.केशु मुर्ती हे ISO चे सल्लागार असल्याने व ते साईभक्त असल्याने त्यांचे विनंतीनुसार संस्थानमार्फत त्यांना श्रींचे "विभुती"चे रजिष्ट्रेशन करणेकामी परवानगी देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी संस्थानतर्फे वितरीत होणारी श्रीद्वारकामाईतुन प्राप्त होणारी श्रींची पवित्र "विभुती" (उदी) चे साईभक्त श्री.केशु मुर्ती सी., प्रोप्रा.साई एंटरप्रायजेस, बँगलोर हे स्वखर्चाने देणगीदाखल रजिष्ट्रेशन करणेस व त्यांना याकामी पत्रव्यवहार करणेकामी परवानगी देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईभक्त श्री.केशु मुर्ती सी, प्रोप्रा.साई एंटरप्रायजेस, बँगलोर यांचेकडून देणगीदाखल, संस्थानतर्फे साईभक्तांना वितरीत केल्या जाणाऱ्या विभुतीचे रजिस्ट्रेशन ऐवजी पेटंट (स्वामीत्व हक्क) तयार करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाकरीता सत्कार शाल व पट्टे खरेदी करणेस व खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्र. | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढीव प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना**:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११७ नुसार स्क्रीन प्रिंटींगसह संस्थानचा लोगो छापलेल्या नवीन शॉली खरेदी करणेचा प्रस्ताव समिती समोर सादर करणेत यावा, असे ठरले आहे. त्यानुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत श्रीसाईबाबांच्या समाधीस १०० वर्षे पुर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१७ ते श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१८ या कालावधीमध्ये श्रीसाईबाबांचा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करण्याचे आयोजित करण्यात आलेले आहे. त्याकामी विविध कार्यक्रमांचे आयोजन संस्थानमार्फत करण्यात येणार आहे. त्यामध्ये मान्यवरांचे सत्काराकरीता शॉल व इतरांना पट्टे खरेदी करणे गरजेचे आहे.

**प्रस्ताव**:- श्रीसाईबाबा समाधी शताब्दी निमित्त संस्थानमार्फत विविध विभागांमार्फत विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामध्ये श्रींचे समोर कलाकारांचे सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम, शिबीरे, संमेलने, पादुका दर्शन सोहळा तसेच इतर अनुषंगिक कार्यक्रमाचे नियोजित आहे. त्या निमित्त श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत कार्यक्रमाकरीता निमंत्रीत मान्यवरांना तसेच इतरांचा सत्कार करावा लागणार आहे

१. श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१७ चे पुर्वी सत्काराचे साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. श्रीसाईबाबा समाधी शताब्दीचे प्रत्येक कार्यक्रमातील निमंत्रीत असे महत्वाचे व अतिमहत्वाचे मान्यवरांना चिन्ह (Logo) असलेली शॉल सत्कार खरेदी करावी असे मत आहे. त्याकामी ऑक्टोबर-२०१७ ते ऑक्टोबर-२०१८ याकालावधीसाठी अंदाजे २५,००० नग शॉल लागतील. प्रति नग रु.१००/-प्रमाणे असे एकूण रु.२५,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे. (दराचा संदर्भ:- दि.११/१२/२०१६ रोजीचे "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६"चे सत्कार शॉलचे दर रु.१३०/-)

२. त्याचप्रमाणे इतर कालाकार, सहकलाकार व सहकारी यांना सत्काराकरीता गळयातील पट्टे असे स्वरुप असावे असे नम्र मत आहे. त्याकामी ऑक्टोबर-२०१७ ते ऑक्टोबर-२०१८ याकालावधीसाठी अंदाजे ५,००,००० नग गळयातील पट्टे खरेदी करावे लागणार आहे. याकरीता प्रति नग रु.०८/- प्रमाणे रु.४,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. (दराचा संदर्भ:- दि.११/१२/२०१६ रोजीचे "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६"चे सत्कार पट्टू याचे दर रु१२/-)

**विभागाचा अभिप्राय**:- उपरोक्त नमूद केल्यानुसार श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव माहे-ऑक्टोबर-२०१७ ते माहे-ऑक्टोबर-२०१८ या कालावधीकरीता संस्थानमार्फत उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे निमंत्रीत, अतिमहत्वाचे व्यक्तींचे सत्काराकरीता प्रिंटेड शॉल व इतर सहकलाकार, व सहकारी यांचे सत्काराकरीता गळयातील कापडी पट्टे असे साहित्य खरेदी ई-निविदा प्रक्रीयेद्वारे खरेदी करणेस मान्यता असावी. संस्थानचे सर्व विभागांना श्रींचे समाधी शताब्दी वर्षाचे कार्यक्रमाकरीता आवश्यकतेप्रमाणे शॉल व पट्टे संबंधीत विभागामार्फत भांडार विभागाकडुन घेऊन मान्यवरांना देणेसही मान्यता असावी सदर साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे रु.२९,००,०००/- (अक्षरी रुपये एकोणतीस लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे. तसेच सदर साहित्य खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रीयेद्वारे खरेदी करणेस व होणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **अपारंपारीक ऊर्जा अंतर्गत संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम बसविणेबाबत.**

**प्रस्ताव–** **प्रस्तावना :-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** केंद्र सरकारच्या अपारंपारिक उर्जा स्त्रोत मंत्रालयामार्फत अपारंपारिक उर्जा निर्मितीस प्राधान्य देण्यात आलेले आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही अपारंपारिक उर्जा निर्मितीस प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्यानुसार केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार अपारंपारिक ऊर्जा निर्मिती अंतर्गत ८ मेगावॅट क्षमतेची जमिनीवर सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणेबाबत व संस्थानच्या इमारतींवर शक्य असेल तेथे रुफ

टॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणेबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ३०-११-२०१६ रोजी झालेल्या सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावावर चर्चा होऊन विषय नं.२४ निर्णय क्र.७७९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील पुर्वीच्या सोलर प्रकल्पाचे सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि., पुणे यांचेकडून रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी तसेच ८ मेगावॅट सोलर पी.व्ही.सिस्टीम प्रकल्पाकरीता कन्सल्टंटची नेमणूक करणेकामी व्यवहार्यता अहवाल **(Figibility Report)** मागविणेत यावा व त्यानंतर आवश्यकतेनुसार महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण **(**मेडा**)**, पुणे यांचे अधिकृत पॅनेलवरील पाच कन्सल्टंट कडून दरपत्रक मागविण्यात यावे, असे ठरले.

तसेच महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण **(**मेडा**)**, पुणे यांचे अधिकृत पॅनेलवरील पाच कन्सल्टंट यांना दि.०१-१२-२०१६ रोजी सादरीकरणासाठी बोलविण्यात यावे, अशा सुचना दिल्या.

त्यानुसार दि.०१-१२-२०१६ रोजी प्रेझेंटेशनसाठी सर्व पाच कंपनीच्या प्रतिनिधींना बोलविण्यात आले होते. त्यापैकी ०१**).** मे.मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि., पुणे व ०२**).**मे.एएक्सवायकेएनओ कॅपिटल सर्व्हिसेस प्रा.लिमिटेड, नागपूर या दोन कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी या दिवशी मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रेझेंटेशन सादर केले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०-११-२०१६ रोजीचे सभेतील निर्णय ७७९ अन्वये मे.मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि., पुणे यांचेकडून रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणे तसेच ८ मेगावॅट क्षमतेची जमिनीवरील सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणेबाबत कन्सल्टन्सची नेमणूक करणेकामी व्यवहार्यता अहवाल (Figibility Report) मागविणेत आला होता.

मे.मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि., पुणे यांनी दिनांक२३-०२-२०१७ रोजी दोन वेगवेगळे पत्र पाठविले असून एका पत्रात त्यांनी संस्थानच्या एका ठिकाणचा एक कनेक्शनचा कॉन्ट्रॅक्ट डिमांड हा १ MVA पेक्षा कमी असल्याने Open Access व्दारे ८मेगावॅट प्रकल्प उभारणे शक्य होणार नाही असे नमूद केले आहे. संस्थानचे एकुण ९ एच.टी कनेक्शन असून सर्व ठिकाणचा मिळून कॉन्ट्रॅक्ट डिमांड ३.५६१ MVA इतका होत आहे. परंतू हे सर्व पॉईंट वेगवेगळया ठिकाणी आहे. संस्थानचा जास्तीत जास्त कॉन्ट्रॅक्ट डिमांड एका ठिकाणचा ०.५८५ MVA इतका आहे. मे.मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि., पुणे यांनी त्याच दिवशी दुसरे पत्र पाठवून जमिनीवर सोलर पॉवर प्रोजेक्ट उभारणेकरीता MERC च्या गाईड लाईन नुसारच प्रकल्प उभा करता येईल असे कळविले असून याव्यतिरिक्त संस्थान ८० किलोवॅट इतकी रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टिम उभी करु शकते. त्यासाठी रक्कम रुपये ५४,०८,०००/- इतका खर्च येऊ शकेल असे कळविले आहे.

वरील दोन्ही पत्रात मे.मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि., पुणे यांनी कन्सल्टन्टची नेमणूक करणेकरीता व्यवहार्यता अहवाल (Figibility Report) दिलेला नाही. परंतू त्यांनी स्वतच्या म्हणजे मे.मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि., पुणे या कंपनीचे दरपत्रक पाठविले आहे. त्यामध्ये त्यांनी विविध Fees कळविलेल्या आहेत. मे.मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि., पुणे यांचेकडून कन्सल्टन्टच्या नेमणूकी कामी व्यवहार्यता अहवाल (Figibility Report) प्राप्त न झाल्यामुळे त्यांना दूरध्वनीव्दारे विचारणा केली असता त्यांनी असे सागितले की, आम्ही संस्थानच्या सोलर पी.व्ही.सिस्टीमसाठी नेमावयाच्या कन्सल्टन्टच्या स्पर्धेतील एक पार्टी असल्याने कन्सल्टन्स कसा नेमावा याबाबत व्यवहार्यता अहवाल (Figibility Report) पाठविणे प्रशस्त ठरणार नाही, असे सांगितले.

याबाबत त्यांचेकडे वारंवार लेखी पत्राची मागणी केली असता त्यांनी पत्र देण्याची असमर्थता दर्शवून आम्ही आमचे दरपत्रक सादर केले आहे, असे सांगितले.

मे.मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लि., पुणे यांनी यानंतर दिनांक२४-०३-२०१७ रोजी एक ई-मेल पाठविला असून त्यात ८ मेगावॅट सोलर पी.व्ही.सिस्टिम प्रकल्प राबविणे करीता संबंधित ऑथोरिटीजकडून स्वतंत्र परवानगी घ्यावी लागेल असे कळविले आहे.

यानंतर दि.०४-०४-२०१७ रोजी झालेल्या चर्चेत ८ मेगावॅट ऐवजी १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टिम उभारणीबाबत चर्चा झाली. तसेच ही सिस्टिम निव्वळ Open Access ऐवजी Captive Use Open Access अंतर्गत उभारण्यात यावी अशी चर्चा झाली. कारण संस्थानला निव्वळ Open Access व्दारे हा प्रकल्प उभारता येणार नसल्याचे महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे तसेच मे.मिटकॉन यांचे अहवालानुसार निदर्शनास आलेले आहे. तसेच हा प्रकल्प उभारतांना संबंधित प्रकल्प ठेकेदार/ विकासक यांना

प्रकल्पासाठी जमिन उपलब्ध करुन देणे, त्यासंबंधी संपुर्ण खरेदीची प्रक्रिया पुर्ण करणे त्याचे कागदपत्र संस्थानकडे सादर करणे, सर्व शासकीय विभागांच्या ना-हरकती घेऊन संस्थानकडे सुपूर्द करणे, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांचेशी पत्रव्यवहार करुन संबंधित यंत्रणेची शासकीय दरबारी नोंद होऊन गरज पडल्यास एमएनआरई च्या परवानग्या मिळविणे, या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज Captive Use Open Access अंतर्गत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला पुरवून त्या उत्पादित युनिटचे संस्थानच्या विद्युत बीलामधून समायोजन करणे, त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक सर्व परवानग्या मिळविणे व त्यासाठी आवश्यक ते सर्व कागदपत्र संस्थानच्या वतीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे सादर करणे, प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर सलग २५ वर्ष AMC चे मान्य झालेले दरपत्रकानूसार काम करणे अशा सर्व बाबींचा टेंडर मध्ये समावेश राहिल.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांना संस्थानमार्फत पत्र पाठवून संस्थानला हा प्रकल्प Open Access अंतर्गत उभारता येऊ शकेल का ? याबाबत विचारणा केली होती. याबाबत त्यांनी ई-मेल पाठवून निव्वळ Open Access अंतर्गत हा प्रकल्प उभारता येणार नाही. परंतू Captive Use Open Access अंतर्गत प्रकल्प उभारता येऊ शकेल. असे दूध्वनीवरील चर्चेव्दारे सांगितले आहे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांनी दि.१८-०४-२०१७ रोजी ई-मेल पाठवून महाराष्ट्र शासनाचे सोलर पी.व्ही.सिस्टिमबाबत झालेल्या निर्णयाच्या प्रती पाठविलेल्या आहेत. यामध्ये शासन निर्णय क्र.अपाऊ-२०१५/ प्र.क्र.४९ / ऊर्जा-७ अन्वये ६.१४ मध्ये ' या धोरणांतर्गत सौर ऊर्जे पासून वीजनिर्मिती करणा-या प्रकल्प विकासक / प्रकल्पधारकांना वीजेचा स्वयं वापर (Captive Use) करावयाचा असल्यास किंवा तिस-या घटकास विक्री (Third Party Sale) करावयाची असल्यास त्यांना राज्यातील परवानाधारक वीजवितरण कंपन्यांकडून वीजनियामक आयोगाच्या नियमावली नूसार राज्यात व राज्या बाहेरील खुला प्रवेश (Open Access) देण्यात येईल.' असे नमूद आहे.

प्रकल्प चालू होण्यापुर्वी आलेल्या ई -निविदा तयार करणे, ई-निविदांचे वर्गीकरण करुन, अभ्यास करुन त्यातून योग्य तो ठेकेदार निवडणेसाठी मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेकामी अहवाल सादर करणे, प्री-बीड मध्ये ठेकेदारांच्या सर्व शंका, प्रश्न यांना समर्पक व योग्य उत्तरे देऊन शंका निरसन करणे, मा.व्यवस्थापन समितीने ठेकेदार / विकासकाची निवड केल्यानंतर त्यांना देणेसाठी लागणाऱ्या कार्यादेशाचा मसूदा तयार करणे, करारनाम्याचा मसूदा तयार करणे, शासनाकडे परवानगी साठी करावयाच्या पत्राचा मसूदा तयार करणे, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे मंजुरीसाठी सादर कराव्या लागणा-या अर्जाचा मसूदा तयार करणे, सदर प्रकरणासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांची मान्यता घेणेसाठी अर्जाचा मसूदा तयार करणे, ठेकेदाराला / विकासकाला कार्यादेश दिल्यानंतर प्रत्यक्ष कामावर देखरेख करणे, मटेरीअल तपासणी, बीलाबाबत खातरजमा करुन तपासून सदरची बीले अभिप्रायासह संस्थानकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करणे , कामांमध्ये वेळोवेळी येणा-या अडचणींबाबत मार्गदर्शन करुन त्या अडचणी दूर करणे, प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर ग्रीडला जोडणेकामी कराव्या लागणा-या कार्यवाही बाबत पुर्तता करणे इत्यादि कामांचा समावेश कन्सल्टंटच्या कार्यादेशामध्ये नमूद करावा लागेल.

कन्सल्टंट नेमल्यानंतर व ईनिविदाव्दारे ठेकेदार / विकासक यांची निवड झाल्यानंतर महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांचेकडे त्यांनी दि.१८-०४-२०१७ रोजी ई-मेल व्दारे पाठविलेला रजिस्ट्रेशन फॉर्म भरुन रजिस्ट्रेशन फॉर्म मध्ये माहिती भरुन पुन्हा नोंदणीसाठी व पुढील मंजुरीसाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांचेकडे पाठवावा लागणार आहे यासाठी सर्वात आधी कन्सल्टंट नेमणे महत्त्वाचे आहे.

**मागणी:-** या प्रकल्पासाठी सल्लागार नेमणेबाबत महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांनी कळविलेल्या खालील पाच कन्सल्टंटकडून दरपत्रके मागवावे लागेल व त्या दरपत्रकांवर माव्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होऊन कन्सल्टंट नेमावा लागणार आहे.

०१). मे.टीयुव्ही एसयुडी साऊथ एशिया प्रा.लिमिटेड, पुणे
०२). मे.एचआयक्यु पॉवर असोसिएटस प्रा.लिमिटेड, चेन्नई
०३). मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे
०४). मे.एएक्सवायकेएनओ कॅपिटल सर्व्हिसेस प्रा.लिमिटेड, नागपूर
०५). मे. इमरजेन्ट व्हेनचर इंडिया प्रा.लिमिटेड, गुडगाव, हरयाणा

**विभागाचे अभिप्राय/ स्पष्ट मत:-** १० मेगावॅट सोलर पी.व्ही.प्रकल्पाचे काम लवकरात लवकर चालू करणेसाठी प्रथम कन्सल्टंट नेमणे गरजेचे आहे. कन्सल्टंट कडून ईनिविदा तयार करुन घेणे गरजेचे आहे. कन्सल्टंट नेमल्याशिवाय या प्रकल्पाला गती प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण

(मेडा), पुणे यांनी कळविलेल्या यादीतील पाचही कन्सल्टंटकडून दरपत्रके मागविण्यास व कन्सल्टंटची नेमणूक करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अपारंपारीक ऊर्जा अंतर्गत संस्थानकरीता १० मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणी करणेकरीता कन्सल्टंटची नेमणूक करणेकामी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांनी कळविलेल्या यादीतील पाचही कन्सल्टंटकडून दपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **२.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेबाबत.**

**निर्णय क्र.३३६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **व्दारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास व साठवण तलाव परिसरात ओपन जिम (खुली व्यायाम शाळा) सुरु करणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव–** बगीचा विभागामार्फत संस्थान परिसरातील द्वारावती इमारत समोरील बाग, साई आश्रम भक्तनिवास तसेच कनकुरी साठवण तलाव परिसरात बाग-बगीचा तयार करुन तसेच कारंजा, लॉन व वेगवेगळया प्रकारची शोभेची रोपे/ झाडे लावुन परिसर सुशोभीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे या ठिकाणी साईभक्त, गावकरी, संस्थान कर्मचारी यांची नेहमी वर्दळ असते.

दि.16 मार्च 2017 रोजीच्या विभागाकडील चालु, प्रस्तावित प्रकरणांची माहिती तसेच मंत्रालयाकडे प्रलंबीत असलेल्या प्रकरणाबाबत आयोजीत बैठकीमध्ये मा. कार्यकारी अधिकारी यांनी संस्थान परिसरातील बगीच्यांमध्ये खुली व्यायामशाळा सुरु करणेचा प्रस्ताव सादर करणेकामी निर्देश दिलेले आहे.

त्यानुसार संस्थानच्या द्वारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास परिसरात तसेच कनकुरी साठवण तलाव परिसरात खुली व्यायामशाळा सुरु करता येईल.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- आर्थीक विषय आहे.

मागणी- संस्थानच्या द्वारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास परिसरात तसेच कनकुरी साठवण तलाव परिसरात ओपन जिम सुरु करणेकामी नव्याने साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी खालीलप्रमाणे ओपन जिम चे साहित्य खरेदी करुन बसविता येईल.

| अ.नं. | साहित्याचे नाव | अंदाजे किंमत (प्रति नग ) |
|---|---|---|
| 01 | Sky Walker | 61,875 |
| 02 | Leg Press | 37,500 |
| 03 | Air Walker | 35,250 |
| 04 | Rower | 30,000 |
| 05 | Chest Press | 60,750 |
| 06 | Seated Puller | 60,000 |
| 07 | Shoulder Builder | 33,750 |
| 08 | Surf Board | 43,125 |
| 09 | Seated Twister 3 in 1 | 49,500 |
| 10 | Sit up board | 24,375 |
| | एकुण | 4,36,125 |

तरी उपरोक्त प्रमाणे एका ठिकाणी 10 नग ओपन जिमचे साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे रु. 4,36,125/- (चार लाख छत्तीस हजार एकशे पंचविस) मात्र खर्च अपेक्षीत आहे. याप्रमाणे एकुण 03 ठिकाणी (द्वारावती इमारत समोरील बाग, साईआश्रम भक्तनिवास, साठवण तलाव) ओपन जिमचे साहित्य बसविणेकरीता अंदाजे रु.13,08,375 (तेरा लाख आठ हजार तिनशे पंच्याहत्तर) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी वर्तमान

पत्रात जाहिरात देऊन व "इ" निवीदा शासनाच्या वेबसाईट वर प्रसिध्द करुन विविध नामांकित कंपन्याकडुन निवीदा मागविणेस तसेच आलेल्या निवीदांचे तांत्रीक व कमर्शियल बिड माखरेदी समिती सभेपुढे उघडुन न्युनत्तम दर धारकास मा.उपसमिती सभेपुढे समक्ष बोलावुन त्यास पुरवठा आदेश देऊन साहित्य बसवुन घेता येईल.

**विभागाचा** अभिप्राय- संस्थानच्या द्वारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास परिसरात तसेच कनकुरी साठवण तलाव परिसरात ओपन जिम सुरु करणेकामी नव्याने ओपन जिमचे साहित्य खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.13,08,375 (तेरा लाख आठ हजार तिनशे पंच्याहत्तर) मात्र खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास व साठवण तलाव परिसरात ओपन जिम (खुली व्यायामशाळा) तयार करणेकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१३,०८,३७५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१८** **चहा, कॉफी, दुधाचे दर वाढीबाबत.**
**निर्णय क्र.३३८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९** **सन २०१७/१८ करीता मोतीचुर लाडु, सुट्टी बुंदी व बर्फी प्रसाद बनवुन पॅकींग करणे इत्यादी कामासाठी नविन ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्या चालू असलेल्या ठेकेदारास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव–** श्री साईभक्तांना मोतीचुर लाडु प्रसाद, सुटी बुंदी प्रसाद तसेच बर्फी प्रसाद इ. पदार्थ लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन ठेकेदारामार्फत तयार करुन घेतले जातात. सन २०१७-१८ करीता दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.२३ अन्वये, मोतीचुर लाडु व मोफत सुटी बुंदी प्रसाद तसेच बर्फी प्रसाद उक्ते पध्दतीने बनविणेकामी दि.२१/३/२०१७ रोजी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. नविन कॉन्ट्रॅक्टर नियुक्त करणेसाठी www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार ई-निविदा Online भरणेची शेवटची तारीख ३०/०३/२०१७ होती.

त्यानुसार खालीलप्रमाणे ठेकेदारांनी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेऊन, निविदेचे बंद लिफाफे संस्थानचे लाडु प्रसाद निर्मिती विभागाकडे जमा केलेले आहेत.

१. श्री साई केटरर्स, श्रीरामपुर
२. सदगुरु हरीहर महाराज स्वंयरोजगार संस्था, अ.नगर
३. श्री सच्चिदानंद केटरर्स, अ.नगर
४. दि यशोधरा महिला सहकारी औद्यो. उत्पादक, संस्था, नाशिक

उपरोक्त प्रमाणे सर्व ठेकेदारांच्या निविदेचे बंद लिफाफे लाडु प्रसाद निर्मिती विभागास प्राप्त झालेले होते. सदर ई-निविदेचे बंद लिफाफे व ऑनलाईन तांत्रिक निविदा(Technical Bid) दि.११/०४/२०१७ रोजीच्या सभेत खरेदी कमिटीसमोर उघडण्यात आले आहेत. त्यामध्ये,

१. दि यशोधरा महिला सहकारी औद्यो. उत्पादक, संस्था, नाशिक
या ठेकेदारांची निविदा तांत्रीक कागदपत्रे तपासलेनंतर**पात्र** ठरविण्यात आले आहेत. व उर्वरीत

१. श्री साई केटर्स, श्रीरामपुर
२. श्री सच्चिदानंद केटर्स, अ.नगर

सदरची दोन निविदाधारक टेंडरमधील नमुद नियम, अटी-शर्तीमध्ये २.५ कोटी उलाढाल अशी अट असल्यामुळे अपात्र ठरली आहेत.

तसेच सदगुरु हरीहर महाराज स्वंयरोजगार संस्था, अ.नगर यांचे सी.ए. सर्टीफिकेटमध्ये Subject to Verification असे नमुद केल्याने ते ही ग्राह्य धरता येणार नसल्याने अपात्र ठरविण्यात आले आहे. त्यामुळे सदर टेंडरमध्ये फक्त एकच निविदाधारक पात्र ठरले असल्याने फेर ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेसाठीची टिपणी प्रशासकीय मान्याता घेणे कामी दि.१९/४/२०१७ रोजी सादर केलेली आहे.

फेर ई-निविदेसाठी वर्तमानपत्रात जाहीरात देणे, ई-निविदा Online भरणेसाठी १०-१५ दिवसांची मुदत देणे, कागदपत्रे जमा करावी, Technical Commotional Bid उघडणे ,न्युनतमदरधारकास कार्यादेश देणे, इ.कामासाठी साधारण दीड महीना कालावधी जाईल.

सध्या असलेले ठेकेदार दि यशोधरा महिला सहकारी औद्यो. उत्पादक, संस्था, नाशिक हे दि.१/६/२०१६ पासुन काम करीत असुन त्याची मुदत दि.३१/५/२०१७ अखेर संपत आहे.

उपरोक्त फेर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नवीन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत तरी सध्याची असलेली दि यशोधरा महिला सहकारी औद्यो. उत्पादक, संस्था, नाशिक यांना सध्या असलेल्या दरात व त्याच अटी शर्तीवर नविन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता असावी. तत्पुर्वी नवीन ठेकेदाराची नेमणूक झालेनंतर त्यांची मुदत त्या दिवसापासुन आपोआप संपुष्टात येईल. तरी दि यशोधरा महिला सहकारी औद्यो. उत्पादक, संस्था, नाशिक यांना नविन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता असावी.सदरचा मुदतवाढीचा विषय मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.३३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ करीता मोतीचुर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी प्रसाद बनवुन पॅकींग करणे इत्यादी कामासाठीची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन, नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत सध्याचे ठेकेदार दि यशोधरा महिला सहकारी औद्यो. उत्पादक, संस्था, नाशिक यांना मागील मंजुर दराने, आहे त्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२०** **दि.०८/११/२०१६ ते दि.३०/१२/२०१६ या कालावधीतील जमा झालेल्या रुपये ५००/- व १०००/- च्या चलनी नोटा "पंतप्रधान गरीब कल्याण डिपॉझीट स्किम" मध्ये जमा करणेबाबत.**

**निर्णय क्र.३४०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२१** **मे.क्लासिक स्टेशनरीज् कंपनी, मुंबई यांच्याकडील चैनसह ५०० नग बॅग खरेदी बिल अदा करणेकामी कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम तरतुद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७. नं ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविकः-** रविवार दि.११.१२.२०१६ रोजी झालेल्या जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद कार्यक्रमासाठी निमंत्रीत देशविदेशातील श्री साईमंदिर विश्वस्त व प्रतिनिधी यांना चैनसह बॅग देणेकामी निर्णय झालेला आहे.

इकडील जा.नं. एसएसएस/प्रकाशने/ ४३०५/२०१६ दि.१७.११.२०१६ अन्वये चैनसह बॅग खरेदीकामी निम्नतम पुरवठाधारक मे. क्लासिक स्टेशनरीज कं, मुंबई यांना २४९९ नग खरेदीकामी कार्यादेश देण्यात आलेला होता.

**मागणीः-** प्रस्तावात नमूद केले प्रमाणे चैनसह बॅग खरेदीकामी निम्नतम पुरवठाधारक मे. क्लासिक स्टेशनरीज कं, मुंबई यांना दुरध्वनीवरुन एकूण ५०० नग तातडीची गरज व वेळेत पुरवठा होणे आवश्यक असल्याने, आदेशातील अटी/शर्तीस अं.नं.०५ ला अनुसरुन ५०० नग चैनसह बॅगेचा पुरवठा करुन घेण्यात आलेला आहे.

मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी दि.०८.०३.२०१७ चे टिपणीवर दिलेल्या निर्देशाबाबत खालील प्रमाणे खुलासा सादर करित आहोत.

**१)** **बॅग वापराचा सविस्तर तपशिलः-** जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेसाठी उपस्थितीत देश-विदेशातील साई मंदिरातील अध्यक्ष व प्रतिनिधी तसेच इतर मान्यवर महोदयांसाठी वाटप केलेला बॅग तपशिल खालील कोष्टकात दिलेप्रमाणे.

| चैनसह बॅग खरेदी तपशिल 'अ' | खरेदी नग संख्या | चैनसह बॅग सप्रेम भेट तपशिल 'ब' | वाटप नग संख्या |
|---|---|---|---|
| कार्यादेश संख्या | २४९९ | साई आश्रम व्दारे निमंत्रित मान्यवरांना | १८१६ |
| अतिरिक्त मागणी संख्या | ५०० | सत्कार प्रसंगी मान्यवरांना | १५ |
| | | जनसंपर्क कार्यालयामार्फत पत्रकारांना भेट | ६० |
| | | श्री. रघूनाथ रेड्डी, तिरुपती यांना | १३ |
| | | मा. अध्यक्ष महोदय व व्यवस्थापन समिती सदस्य यांना संस्थानमार्फत सप्रेम भेट | ४४ |
| | | मा. का.अ. सो.व मा. उप.का.अ. तसेच सर्व प्र.अ., स्वीय सहा. यांना भेट | १४ |
| | | समन्वय अधिकारी (विभाग प्रमुख) यांना सप्रेम भेट | ६० |
| | | समन्वय अधिकारी यांचे सहा. कर्मचारी | १०४ |
| | | एकूण मोफत वितरण नग संख्या | २१२६ |
| | | **शिल्लक चैनसह बॅग नग संख्या** | **८७३** |
| एकूण आवक | २९९९ | एकूण नग संख्या | २९९९ |

**२)** बॅग शिल्लक असल्यास त्याबाबत मार्गदर्शन घ्यावे किंवा साईपालखी मंडळ साईसेवा कार्यक्रमासाठी असलेल्या फाईल्स/ फोल्डर वापरावीत.

-वरिल तक्त्यात दर्शविले प्रमाणे ८७३ चेनसह बॅग शिल्लक असून, सदर बॅग्ज दि. २८.०५.२०१७ रोजी शिर्डी येथे होणा-या साई पालखी मंडळ समितीचे उपस्थित प्रतिनिधींना वाटप करता येतील व शिल्लक बॅग हया साई सेवेशी निगडीत कार्यक्रमासाठी वापरात येऊन खर्ची टाकता येईल.

दि.२८.०५.२०१७ रोजी श्री साई पालखी मंडळ संमेलन अयोजित होणार असल्याने त्यासाठी शिडी येथे संपूर्ण महारातील साई पालखी मंडळाचे प्रतिनिधी उपस्थितीत राहाणार असल्याने त्यांना संस्थानतर्फे चैनसह बॅग फोल्डर त्यात नोट पॅड व पेन देणे संदर्भात नमूद आहे.

संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय ई छाननी करुन अनुमानः- आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** मे.क्लासिक स्टेशनरीज, मुंबई यांचे चैनसह बॅग खरेदी ५०० नग X रु. १२०/- प्रती नग प्रमाणे एकूण रुपये. ६०,०००/- (अक्षरी रु. साठ हजार मात्रचे) बिल आदा करणेबाबत सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तवास व त्याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२२** **प्लास्टीक ट्रे खरेदीकामी आलेल्या ई-निविदा तसेच प्लास्टीक ट्रे खरेदी पुर्नविचार घेणेबाबत.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२३** **विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागाचे वार्षिक साहित्य खरेदीकामी तिसऱ्यांदा व चौथ्यांदा राबविणेत आलेल्या ई-निविदेतील खालील "ख" मधील आयटेम्ससाठी निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३४२** आयत्या वेळेच्या उपरोक्त विषय नं.२२ व २३ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२४** **साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या पदयात्री पालख्यांचे संमेलनाकामी विविध विभागांनी करावयाचे कामास व येणाऱ्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव–** दि.१६ व ३१ ऑगष्ट २०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील चर्चेच्या वेळी श्री गजाजन महाराज संस्थान, शेगांव यांचे धर्तीवर संस्थानमध्ये सेवेक-यांची नेमणूक करण्याबाबतच्या संकल्पनेचा

विचार करणेबाबत सूचना देण्यात आली आहे. तसेच १६/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीमध्ये श्री क्षेत्र गजानन महाराज संस्थान, शेगांवचे धर्तीवर सेवेकरी उपक्रम राबविणेचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने दि.२४/०२/२०१७ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.व्य.स.चे बैठकीमध्ये विविध विभागांचे संबंधीत करावयाचे कामांबाबत दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणेबाबत जा.क्र.काअ-स्वीय/४१५७ दि.०१/०३/२०१७ चे परीपत्रकान्वये कळविणेत आलेले आहे. यामध्ये संरक्षण विभागाचे संबंधीत मुद्दा क्र.१६ मध्ये– वेगवेगळया ठिकाणाहून येणा-या सर्व पालख्यांची माहिती एकत्र करणे व सर्व पालख्यांचे एकत्रीत संमेलन आयोजीत करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

त्यास अनुसरुन साई पालखी निवारा, निमगांव येथे समक्ष जाऊन पहाणी केली असता, त्याठिकाणी साई पालखी संमेलन आयोजीत करावयाचे दृष्टीने हॉल, निवास व्यवस्था तसेच इतर व्यवस्था फारच अपुरी पडत असलेने सदरचे पालखी संमेलन हे संस्थानमार्फत "सिध्द् संकल्प मॅरेज हॉल, साकुरी" येथे दि. २८ मे २०१७ रोजी आयोजीत करण्याचा निर्णय घेणेत आलेला आहे. सदरचे संमेलनासाठी हॉल, साऊंड सिस्टिम, पिण्याचे पाणी, चहा, नाष्टा इ. सिध्द् संकल्प मॅरेज हॉल, साकुरी यांचेमार्फत मोफत करण्यात येणार आहे. तसेच भोजनाची व्यवस्थाही (त्यामध्ये पुरणपोळी, आमरस, बटाटा चटणी, वरण भात, पणीर भाजी, पूरी, भजे, कुरडाई, नागली पापड, खोबरा बर्फी इ. पदार्थ) ते 'ना नफा ना तोटा' या तत्वावर करण्याचे त्यांनी मान्य केले असून, त्याकरीता फक्त ९५/- रुपये प्रती व्यक्ति (अंदाजे २००० ते २५०० पालखी पदाधिकारी) याप्रमाणे होणारी रक्कम त्यांना संस्थानमार्फत आदा करण्याचे ठरले आहे.

त्या अनुषंगाने, मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबांच्या दर्शनासाठी विविध ठिकाणाहून/ राज्यातून येणाऱ्या पदयात्री पालख्यांचे प्रतिनीधी संमेलन आयोजीत करणेसाठी सर्व संबंधीत विभागांकडून करावयाच्या कामांबाबत येणारा अंदाजित खर्च मागीतला असता त्यांनी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च कळविलेला आहे.

| अ.नं. | विभागाचे नावं | कामाचा तपशिल | अंदाजे खर्चाची रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | **जनसंपर्क विभाग** | सुत्रसंचालनकामी | १०,०००/- |
| ०२ | **संरक्षण विभाग** | भोजन व्यवस्था खर्च (सुमारे २५०० व्यक्ती), कंत्राटी सुरक्षा कर्मचारी खर्च | २,५०,०००/- |
| ०३ | **प्रशासन शाखा (वशी-५)** | निमंत्रण पत्रिका छपाई, पोस्टेज खर्च, कलाकार खर्च | १,५३,०००/- |
| ०४ | **कॅन्टीन विभाग** | कंत्राटी कर्मचारी मजुरी, चहा, कॉफी, दुध, बिस्कीटे | २७,६००/- |
| ०५ | **मंदिर विभाग** | शॉल, वेलवेट पट्टी, मुर्ती, सन्मान चिन्हाकरीता लाकडी बॉक्स, प्रिंटेड कापडी पिशवी, शहनाई वादन, तुतारी | ४,२८,००१/- |
| ०६ | **प्रकाशने विभाग** | मान्यवरांना चैनसह फोल्डर, नोट पॅड, पेन देणे अंदाजे २५०० मान्यवर X १२०/- | ३,००,०००/- |
| ०७ | **सीसीटीव्ही विभाग** | फोटो, व्हीडीओ शुटींगकामी | २५,०००/- |
| ०८ | **मेकॅनिकल विभाग** | कार्यक्रमाचे ठिकाणी स्प्रिंकलर शॉवर/फॉग सिस्टीम व्यवस्थेकामी | २५,०००/- |
| ०९ | **ध्वनीक्षेपण विभाग** | निरंक | ---- |
| | | **एकूण अंदाजे खर्च रु.** | **१२,१८,६०१/-** |
| **अक्षरी रुपये बारा लक्ष अठरा हजार सहाशे एक मात्र** | | | |

तरी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे साईबाबांचे दर्शनासाठी पायी येणा-या पदयात्री पालख्यांचे संमेलनाचे आयोजनकामी प्राथमिक अंदाजानुसार येणारे एकूण रु. १२,१८,६०१/- (अक्षरी रुपये बारा लक्ष आठरा हजार सहाशे एक) मात्रचे खर्चास व उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या पदयात्री पालख्यांचे संमेलन आयोजित करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे विविध विभागांनी करावयाचे कामास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५** **श्री साईबाबा संस्थानचे व्यायाम शाळेकरीता नविन साहित्य खरेदीकरणे व व्यायामशाळा अद्ययावत करणेबाबत.**

**प्रस्ताव–** श्री साईबाबा संस्थानची व्यायामशाळा सन-२००० साली सुरु झाली असून त्यांस आज रोजी १६ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे व्यायामशाळेतील साहित्य ब-याच प्रमाणात खराब झालेले आहे. तसेच व्यायामशाळेतील सभासदांची संख्या ४५० ते ५०० च्या दरम्यान आहे. तरी सध्या उपलब्ध असलेले व्यायामशाळा साहित्य अपुरे पडत आहे. जास्त कालावधी झाल्यामुळे काहि साहित्य खराब झाल्यामुळे व्यायाम साहित्य हाताळतांना जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे व्यायामशाळेकरीता नविन साहित्य खरेदी करुन मिळणेबाबत इकडील विभागामार्फत उपरोक्त संदर्भिय टिपणी सादर केली असता त्यावर मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांनी "पुर्वी खरेदी केलेल्या साहित्यांचा तपशिल तसेच सदर व्यायामशाळेचा किती सभासद लाभ घेतात व त्यापासुन संस्थानला किती उत्पादन मिळते याचा तपशिल सादर करुन मा.मुख्यलेखाधिकारी यांचेमार्फत सादर करणेबाबत " सुचना केलेल्या आहे.

त्याबाबतचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.

**अ) व्यायामशाळेतील सध्याचे साहित्याची माहिती/ तपशिल खालीलप्रमाणे–**

| अ.नं. | पुर्वीचे साहित्याचा तपशिल | नग | खरेदी दिनांक | खरेदी किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | स्कॉट बेंच | ०१ | २५/०६/२००२ | ४,०२२.०० |
| ०२ | हायपर एक्सटेंशन | ०१ | २५/०६/२००२ | ३,४६३.०० |
| ०३ | रोमन खुर्ची | ०१ | २५/०६/२००२ | ३,१७१.०० |
| ०४ | BNET OVER ROVER (T-BAR) | ०१ | २५/०६/२००२ | ६,२५९.०० |
| ०५ | इनोलाईन बेंच | ०१ | २५/०६/२००२ | ३.७५५.०० |
| ०६ | डिकलाईन बेंच | ०१ | २५/०६/२००२ | ३.५८८.०० |
| ०७ | हक स्वायट | ०१ | २५/०६/२००२ | २०,०२८.०० |
| ०८ | इनलाईन लेग प्रेस | ०१ | २५/०६/२००२ | २०,०२८.०० |
| ०९ | व्हरटिकल लेग प्रेस | ०१ | २५/०६/२००२ | १५,०२१.०० |
| १० | पुश अप स्टॅण्ड | ०१ | २५/०६/२००२ | ७०९.०० |
| ११ | प्लेन बेंच | ०१ | २५/०६/२००२ | १,४८०.०० |
| १२ | पेट प्लेट एकूण वजन २९० किलो. | ३२ | २५/०६/२००२ | १६,९३९.०० |
| १३ | क्रॉस ओव्हर मशीन | ०१ | २६/०१/२००७ | २४,३००.०० |
| १४ | बेंच-२, मॅट-१ | ०३ | २६/०१/२००७ | १५,३००.०० |
| १५ | लॉक बुशिंग (बार लॉक) | १४ | २६/०१/२००७ | ७००.०० |
| १६ | मल्टीजिम युनीट ॲण्ड स्टेशन<br>अ) चेस्ट प्रेस शोल्डर प्रेस<br>आ) लॅट पुल डाऊन<br>इ) डिपींग लेग लेझ<br>ई) ॲबडोमन बोर्ड<br>उ) लेग कर्ल ॲण्ड लेग एक्सेन्स | ०१ सेट | १९/०१/२००० | १,०५,८६३.०० |
| १७ | मॅन्युअल ट्रिड मिल | ०१ सेट | १९/०१/२००० | १९,३३७.०० |
| १८ | बेल्ट मॅसेंजर | ०१ सेट | १९/०१/२००० | १४,८५०.०० |
| १९ | एम.एस.वेट प्लेट ५०० के.जी. | ०१ सेट | १९/०१/२००० | ३५,२४५.०० |
| २० | एम.एस.डंबेल्स ३०० के.जी. | ०१ सेट | १९/०१/२००० | ४२,०९९.०० |
| २१ | ॲडजेस्टेबल बेंच | ०१ सेट | १९/०१/२००० | १०,९८६.०० |
| २२ | बार वेल बार | ०७ नग | १९/०१/२००० | ५,६१४.०० |
| २३ | एक्सर सायकल | ०१ नग | १९/०१/२००० | ६,७२७.०० |
| २४ | डंबेल्स रॅक(२०)<br>डंबेल्स रॅक (१२) | ०१ सेट<br>०१ सेट | १९/०१/२००० | २४,०६५.०० |
| २५ | वेट प्लेट रॅक | ०२ सेट | १९/०१/२००० | ९,१४२.०० |

| | |
|---|---|
| एकूण रक्कम:- | ४,१२,६९१ |
| **( अक्षरी रुपये चार लाख बारा हजार सहाशे एक्क्यान्नव मात्र )** | |

**ब)** सध्याच्या काळात व्यायामशाळेत साधारपणे ४५० ते ५०० सभासद असून प्रति मासिक रु. ४५,०००/- ते ५०,०००/- मात्र उत्पन्न होते. जुन्या सभासदास रु.१००/- व नविन आलेल्या सभासदास सुरुवातीस रु.१२०/- याप्रमाणे फी आकारण्यात येते.

सदर व्यायामशाळेचे साहित्य हे जास्त कालावधी झाल्यामुळे व दैनंदिन वापरामुळे खराब झालेले असल्याने व्यायामशाळेसाठी नविन साहित्य खरेदी करुन व्यायामशाळेची क्षमता वाढवून (नविन शेडसह) वातानुकुलित यंत्रणेसह अद्यावत करणेकामी मा.श्री. सचिन तांबे, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान यांनी तोंडी सुचना केलेल्या आहेत. त्यास अनुसरुन व्यायामशाळा अद्यावत करणेकामी पुर्वीच्या टिपणीत नमुद केलेल्या साहित्याच्या व्यतिरीक्त व्यायामशाळा प्रशिक्षक यांनी कळविलेनुसार नविन साहित्य खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर दि.३०.११.२०१६ रोजीचे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील पुरवणी विषय नं.०६ चे निर्णय क्र.८९५ अन्वये सदरचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, " श्री साईबाबा संस्थानची व्यायामशाळा अद्यावत करणेसाठी बांधकाम व संरक्षण या विभागांनी आवश्यकतेनुसार सविस्तर प्रस्ताव सभेसमोर फेरसादर करणेत यावा, तसेच यामध्ये भारतीय बनावटीचे साहित्य खरेदी करणेचा समावेश करावा, असे ठरले होते."

त्यानुसार खालील साहित्यांच्या तपशिलाप्रमाणे अंदाजे किंमतीसह फेरप्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

| अ. नं. | साहित्याचा तपशिल | नग | अंदाजे प्रती नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| 01 | PEC PLY / REAR DELT(JC 101) | 01 | 97,000.00 | 97,000.00 |
| 02 | VERTICAL CHEST PRESS (JC 103) | 01 | 1,02,000.00 | 1,02,000.00 |
| 03 | LAT PULL DOWN (JB201) | 01 | 88,000.00 | 88,000.00 |
| 04 | LONG PULL ROW (JB204) | 01 | 95,000.00 | 95,000.00 |
| 05 | SHOULDER PRESS (JS302) | 01 | 90,000.00 | 90,000.00 |
| 06 | BICEP CURL (JBT401) | 01 | 90,000.00 | 90,000.00 |
| 07 | LEG EXTENSION WITH R.O.M. (JL 501) | 01 | 95,000.00 | 95,000.00 |
| 08 | PRONE LEG CURL (JL503) | 01 | 95,000.00 | 95,000.00 |
| 09 | 45° LEG PRESS (JL510) | 01 | 1,10,000.00 | 1,10,000.00 |
| 10 | SEATED CALF (JL513) | 01 | 60,000.00 | 60,000.00 |
| 11 | MULTI FUNCTIONAL STATION (JMP 702) | 01 | 1,50,000.00 | 1,50,000.00 |
| 12 | SMITH MACHINE- COUNTER BALANCED (JMP707) | 01 | 1,10,000.00 | 1,10,000.00 |
| 13 | OLYMPIC FLAT BENCH (JBR801) | 02 | 30,000.00 | 60,000.00 |
| 14 | OLYMPIC INCLINE BENCH (JBR 802) | 02 | 32,000.00 | 64,000.00 |
| 15 | OLYMPIC DECLINE BENCH (JBR 803) | 02 | 32,000.00 | 64,000.00 |
| 16 | SUPER BENCH (JBR 804) | 04 | 30,000.00 | 1,20,000.00 |
| 17 | UTILITY BENCH (JBR 805) | 01 | 25,000.00 | 25,000.00 |
| 18 | BACK EXTENSION (JBR 808) | 01 | 32,000.00 | 32,000.00 |
| 19 | TWISTER (JBR 812) | 01 | 25,000.00 | 25,000.00 |
| 20 | DUMBBELLS-RUBBERIZED (25X4/5X4/ 7.5X4/ 10X4/12.5X4/15X2/20X2/25X2/30X2/ 35X2/ 40X2/ 45X2/50X2/55X2/60X2) | 900 | 250.00 | 2,25,000.00 |
| 21 | DUMBBELL RACK- TWIN TIER (JBR 815) | 02 | 27,000.00 | 54,000.00 |
| 22 | WEIGHT PLATES- RUBBERIZED (2.5X8/5X12/10X12/15X10/20X12) | 590 | 250.00 | 1,47,500.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 23 | OLYMPIC BARBELL (7`X3/4`X1) | 25 | 2,500.00 | 62,500.00 |
| 24 | EZ BAR (4`X1) | 04 | 2,500.00 | 10,000.00 |
| 25 | BARBELL RACK (JBR816) | 01 | 25,000.00 | 25,000.00 |
| 26 | ACCESSORIES RACK (JBR 818) | 01 | 25,000.00 | 25,000.00 |
| 27 | ACCESSORIES – HAMMER CURL BAR, STRAIGT HANDLE, EZ CURL HANDLE, V-TRICEP HANDLE, STRAP HANDLE, ROWING HANDLE, BICEP/TRICEP HANDLE, TRICEP ROPE | 01 (EACH) | 31,000.00 | 31,000.00 |
| 28 | ELECTRICAL CROSS TRAINER-E7 | 02 | 2,30,000.00 | 4,60,000.00 |
| 29 | SPINNING BIKE | 02 | 60,000.00 | 1,20,000.00 |
| 30 | Tread Mill (5 HP motor) | 02 | 3,50,000.00 | 7,00,000.00 |
| 31 | RUBBER TILE -20 MM (500MM X 500MM) | 1500 Pcs. | 350.00 | 5,25,000.00 |
| | | | Gross Total :- | 39,56,500.00 |
| | | | Vat 12.5% | 4,94,562.50 |
| | | | Excise Duty 12.5% | 4,94,562.50 |
| | | | **Net Total :-** | **49,45,625.00** |
| **In words Fourty Nine Lakhs Fouty Five Thousands Six Hundred Twenty Five Only** | | | | |

तसेच दि.०४ जानेवारी २०१७ रोजीचे मा.अध्यक्ष सो. यांचे जा.नं.एसएसएस/काअ-स्वीय/३६२१/ दि.०६/०१/२०१७ चे परीपत्रकानुसार " प्रत्येक विभागाने टेंडरमध्ये नमुद करणेत येणारी इस्टीमेट कॉस्ट् ही मार्केट कॉस्टपेक्षा २० ते ३०% कमी नमुद करावी" असे निर्देश करण्यात आलेले आहे.

त्यानुसार व्यायामशाळेकरीता उपरोक्त दर्शविलेल्या तक्तयाप्रमाणे नवीन साहित्य खरेदी व व्यायामशाळा अद्यावत करणेबाबतचा बांधकाम व संरक्षण विभागाचे (२०% कपात करुन) एकत्रित खर्च रु. ३९,५६,५०० + २३,१२,३९० = ६२,६८,८९०/- (अक्षरी रुपये बासष्ठ् लाख अडुसष्ठ् हजार आठशे नव्वद) मात्रचा फेरप्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

परंतु दि.१२ एप्रिल, २०१७ रोजी मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांनी उपकार्यकारी अधिकारी, सर्व प्रशासकिय अधिकारी व विभाग प्रमुख यांचे समवेत लेंडीबाग येथे झालेल्या मिटींगमध्ये "संस्थान व्यायाम शाळेकरीता अत्याधुनिक साहित्य खरेदी करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करावा " असे निर्देश देण्यात आले होते.

त्या अनुषंगाने सध्याचे संस्थान व्यायामशाळा प्रशिक्षक श्री. महेश गोसावी यांचेकडुन व्यायामशाळेकरीता आवश्यक असणा-या देशी व विदेशी अत्याधुनिक साहित्यांचा तपशिल मागवून त्याबाबत माहिती घेण्यात आली आहे. सदरच्या देशी व विदेशी अत्याधुनिक साहित्य खरेदीचा अंदाजित किंमतीचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Particulars | Qty | Unit Cost | Total |
|---|---|---|---|---|
| 01 | Tread Mill | 4 | 4,90,000 | 19,60,000 |
| 02 | Elliptical | 2 | 3,49,000 | 6,98,000 |
| 03 | Spinning Bike | 2 | 78,000 | 1,56,000 |
| 04 | Vibrator | 1 | 75,000 | 75,000 |
| 05 | Prctoral Fly/Rear Delt | 1 | 2,53,000 | 2,53,500 |
| 06 | Vertucal Chest Press | 1 | 2,47,000 | 2,47,000 |
| 07 | Lat Pull Down | 1 | 2,47,000 | 2,47,000 |
| 08 | Seated Rowing | 1 | 2,34,000 | 2,34,000 |
| 09 | Shoulder Press | 1 | 2,50,500 | 2,50,500 |
| 10 | Bicep Curl | 1 | 2,02,000 | 2,02,000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | Leg Extension with R.O.M | 1 | 2,34,000 | 2,34,000 |
| 12 | Prone Leg Curl | 1 | 2,64,000 | 2,64,000 |
| 13 | 45 Leg Press | 1 | 4,88,000 | 4,88,000 |
| 14 | Adj Cross Over | 1 | 4,07,000 | 4,07,000 |
| 15 | Seated Calf | 1 | 1,17,000 | 1,17,000 |
| 16 | Smith Machine | 1 | 3,77,000 | 3,77,000 |
| 17 | Olympic Flat Bench | 2 | 1,17,500 | 2,35,000 |
| 18 | Olympic Decline Bench | 2 | 1,39,900 | 2,79,800 |
| 19 | Olympic Incline Bench | 2 | 1,52,750 | 3,05,500 |
| 20 | Multi Adjustable Bench | 4 | 1,00,900 | 4,03,600 |
| 21 | Utility Bench | 1 | 35,100 | 35,100 |
| 22 | Bach Extion Bench | 1 | 71,500 | 71,500 |
| 23 | Twister | 1 | 15,000 | 15,000 |
| 24 | Dumbbell Rack | 2 | 1,01,000 | 2,02,000 |
| 25 | Olympic Plate Tree | 1 | 55,500 | 55,500 |
| 26 | Hex Rubber Dumbbell<br>2.5, 5, 7.5, 10, 12.5 - 2 pair | 150kg | 22,500 | 22,500 |
| 27 | 15, 20, 25, 30, 35, 40, 45, 50, 55, 60 – 1 pair | 750kg | 1,12,500 | 1,12,500 |
| 28 | Olympic Rubber Plate<br>2.5-4, 5-5, 10-5, 15-5, 20-6 – 1 pair | 590kg | 88,500 | 88,500 |
| 29 | Olympic Bar<br>7ft.- 3, 4ft. – 1, EZ4ft. -1, | 29ft | 29,000 | 29,000 |
| 30 | Accessories (Hammer curl Bar, Straight Handle. Ez curl handle, V tricep Handle starp, Rowing, bicep/tricep handle | 1 set | 16,500 | 16,500 |
| 31 | Rubber Tile -20mm (500mm x 500mm) | 1500 Pcs. | 350 | 5,25,000 |
| | | | **Total Rs. -** | **86,07,000** |
| | | | **13.5 % Vat -** | **11,61,945** |
| | | | **Grand Total -** | **97,68,945** |
| **(In word Rs. Ninety Seven Lacs Sixty Eight Thousands Nine Hundred Forty Five Only)** | | | | |

बांधकाम विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या मंजुर टिपणी अन्वये “ व्यायामशाळा अद्यावत करणेसाठी सर्व्हे नं.१२४ पैकी मध्ये संस्थानचे मध्यवर्ती भांडार विभागाचे समोरील हॉस्पीटलच्या गोडावूनच्या जागेवर असलेले शेडमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणेसाठी बांधकाम करणे, स्वच्छता गृह बांधकाम करणे, प्लास्टर करणे, दरवाजा, खिडक्या बसविणे, मॅटीन टाकणे, फॉल सिलींग करणे इ. कामे व परीसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामांसाठी सन २०१६-१७ चे जिल्हा दरसुचीनुसार (तसेच २०% कपात करुन) तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार **रु.२३,१२,३९०/- मात्र** इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविण्यात आले आहे **”.**

तसेच दि.०४ जानेवारी २०१७ रोजीचे मा.अध्यक्ष सो. यांचे जा.नं.एसएसएस/काअ-स्वीय/३६२१/ दि.०६/०१/२०१७ चे परीपत्रकानुसार “ प्रत्येक विभागाने टेंडरमध्ये नमुद करणेत येणारी इस्टीमेट कॉस्ट् ही मार्केट कॉस्टपेक्षा २० ते ३०% कमी नमुद करावी” असे निर्देश करण्यात आलेले आहे.

तरी व्यायामशाळेकरीता नव्याने अद्यावत (Indian & Imported made) साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु. ७८,१५,१५६/- (अक्षरी रुपये अठयाहत्तर लक्ष पंधरा हजार एकशे छप्पन मात्र ) व बांधकाम विभागाकडील अंदाजपत्रकानुसार रु.२३,१२,३९०/- (अक्षरी रुपये तेवीस लाख बारा हजार तीनशे नव्वाद) असे दोन्ही मिळून एकणू रु. ७८,१५,१५६/- + २३,१२,३९० = १,०१,२७,५४६/- (अक्षरी रुपये एक कोटी एक लाख

सत्तावीस हजार पाचशे शेहचाळीस ) मात्र इतका खर्च अपेक्षित असून सदरच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानची व्यायामशाळा अद्ययावत करणेकामी यापुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत यावा व नामांकित व्यावसायिक कंपन्यांमार्फत मोठ-मोठया शहरामध्ये व्यायामशाळा चालविण्यात येतात, संस्थानची व्यायामशाळा अद्ययावत करणे व चालविणे यासाठी अशा नामांकित कंपन्यांकडून प्रस्ताव मागविणेस प्राधान्य देण्यात यावे.**

**तसेच या कंपन्यांकडून प्रतिसाद न मिळाल्यास श्री साईबाबा संस्थानचे व्यायाम शाळेकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नविन अत्याधुनिक साहित्य खरेदी करणे व व्यायामशाळा अद्ययावत करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६** **श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची आवश्यक रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने (११ महिने कालावधीसाठी) भरणेबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम २००४ मधील तरतुद –** कलम १३ (४) नुसार समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमन्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यां व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात्त येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट शर्त अ.नं. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८८१.

मा. डीन, बी.जे.एम.सी, पुणे यांनी दिलेल्या सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार तसेच संस्थान आकृतीबंधातील मंजुर वेतनश्रेणीएवढे एकत्रित मानधनावर श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे कंत्राटदारामार्फत कंत्राटी पद्धतीने भरण्यात यावी.

**प्रास्तविक–** दि. ०९/१०/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये श्री साईबाबा संस्थानचे सेवाप्रवेश नियम अंतिम करणेपूर्वी संस्थानचे रुग्णालयातील पदनामांची शैक्षणिक, वेतन व इतर पात्रता ठरविणेबाबत विषय सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. ७३० नुसार सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) अंतिम करणेपूर्वी श्री साईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयातील विभाग व खाटांच्या (Bed) संख्येनुसार कर्मचारी वर्ग, त्यांची पदनामे, शैक्षणिक पात्रता, वेतन संरचना, अनुभव इ. बाबी मा. डीन, बी.जे.एम.सी., पुणे यांचेकडून निश्चित करुन घेणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चासमान्यता देणेत आली.

मा. डीन बीजेएमसी यांनी उपरोक्त कामकाजाची तयारी दर्शविलेनुसार संस्थानकडून त्यांना तसे पत्र देण्यात आले असुन पहिल्या टप्प्यात सध्या असलेल्या आकृतीबंधातील मंजूर पदांचे सेवाप्रवेश नियम बनवून देत आहेत तर दुस-या टप्प्यात दोन्ही रुग्णालयातील १४५ प्रकारची पदनामांची शैक्षणिक पात्रता, वेतनसंरचना, अनुभव तसेच संस्थानचे रुग्णालयात असलेले विभाग व खाटांच्या (Bed) संख्येनुसार किती कर्मचारी वर्ग असावा इ. याबाबत अहवाल देणार आहे.

तसेच, संस्थान कर्मचा-यांची बिंदुनामावली बनविण्याचे काम पुर्ण झालेनंतर संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे अनुशेषानुसार जाहिरात प्रसिद्ध करुन विहीत पद्धतीने मुलाखती घेऊन स्थायी स्वरुपात भरती प्रक्रिया अवलंबिता येईल.

**मागणी –** तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधी अथवा स्थायी पद्धतीने नेमणूक होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत संबंधित पदाची वेतनश्रेणीचे (मुळ वेतन + ग्रेड पे + महागाई भत्ता + एन.पी.ए.) जवळपासचे मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देऊन सोबतचे परिशिष्ट ०१ श्री साईबाबा रुग्णालय

व परिशिष्ट ०२ श्री साईनाथ रुग्णालयाकरिता आवश्यक वैद्यकीय अधिका-यांची एकूण ५९ पदे भरुन त्यांना कायम कर्मचा-यां प्रमाणे फक्त हक्काच्या रजा तसेच संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेबाबत.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –** श्री साईबाबा रुग्णालयातील ५८ वैद्यकीय अधिका-यांसाठी एकत्रित मासिक मानधन रु. ३५,०५,०८६/- (पस्तीस लाख पाच हजार शहाऐंशी रुपये मात्र) + श्री साईनाथ रुग्णालयातील १७ वैद्यकीय अधिका-यांसाठी एकत्रित मासिक मानधन रु. ९,९६,०६६/- (अक्षरी रु. नऊ लाख शहाण्णव हजार सहासष्ट मात्र) असा एकूण मासिक मानधन खर्च ४५,०१,१५२/- (पंचेचाळीस लाख एक हजार एकशे बावन्न रुपये मात्र).

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–** परिशिष्ट ०१ व ०२ मध्ये नमुद केलेप्रमाणे आवश्यक वैद्यकीय अधिका-यांची पदभरतीसाठी संस्थानचे संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात डीन, बी.जे.मेडीकल कॉलेज, पुणे यांनी प्रस्तावित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार जाहिरात प्रसिद्ध करुन पात्र अर्जदारांच्या मुलाखती घेणेसाठी संस्थानचे मा. कार्यकारी अधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा. वैद्यकीय संचालक, मा. वैद्यकीय अधिक्षक (श्री साईनाथ रुग्णालय) यांची वैद्यकीय अधिकारी निवड समिती गठीतकरता येईल.

१) समितीने निवड केलेल्या अधिका-यांची तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधी अथवा स्थायी पद्धतीने नेमणूक होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नेमणूक करता येईल. रुग्णालयाचे मंजूर आकृतीबंधातील संबंधित पदाची वेतनश्रेणीचे जवळपासचे मानधनावर नेमणूक करता येईल व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देता येईल.

२) भरती करणेत येणाऱ्या वैद्यकीय अधिका-यांचा ११ महिने कालावधी संपलेनंतर आवश्यकतेनुसार पुन्हा ११ महिने कालावधीकरीता नेमणूक करण्याचे अधिकार मा. कार्यकारी अधिकारी यांना देता येईल, असे मत आहे.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची आवश्यक रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने (११ महिने कालावधीसाठी) तात्पुरत्या स्वरुपात भरणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील ११ महिने कालावधी तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, टेक्नीशियन कर्मचाऱ्यांचे वेतन वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव–** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.-** मा.त्रिसदस्य समितीचे दि. २०/११/२०१४ निर्णय क्र.१०१६ प्रस्तावित तज्ञ वैद्यकीय अधिकारी,आर.एम.ओ, सी.एमओ./ बी.टी.ओ. टेक्निशियन्स वस्टाफ नर्स यांना त्याच पदावर काम करणा-या स्थायी कर्मचा-यांच्या वेतनाचे जवळपासचे वेतन देणेस मान्यता देण्यात आली.

मात्र या निर्णयाची अंमलबजावणी करणेपूर्वी अशा संपूर्ण पदाचा आढावा व प्रत्यक्ष द्यावयाचे वेतन यासह सविस्तर प्रस्ताव सादर करणेत येऊन, मा. त्रिसदस्य समितीची मान्यता घेण्यात यावी.

**प्रास्ताविक-** निर्णय क्र. १०१६ तसेच मा. उच्च न्यायलायात दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन नं. १६५२२/२०१५ वरील दि. १८/१२/२०१५ रोजीचे आदेशास अनुसरुन आरएमओंचे वेतनात रु २७,०००/- ऐवजी रु. ४०,०००/- अशी वाढ करणेत आलेली आहे.

संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी दि २६/०६/२०१०, ३०/०५/२०१२, ०३/०७/२०१२, २५/०२/२०१३, २६/०१/२०१६, २९/०१/२०१६ १६/०६/२०१६, १२/०७/२०१६, १५/०८/२०१६ असे वेळोवेळी अर्ज करुन वेतन वाढवून मिळणेबाबत विनंती केली आहे.

सध्या रुग्णालयामध्ये तात्पुरते स्वरुपात ११ महिने किंवा १ वर्ष कालावधीसाठी अथवा सदर पदांवर स्थायी कर्मचारी मिळेपर्यंत वैद्यकीय अधिकारी / इतर कर्मचा-यांच्या कंत्राटदारामार्फत कंत्राटी पद्धतीने नेमणूका करण्यात येतात. परंतू त्यांना देण्यात येणार वेतन हे त्याच पदावर काम करणा-या स्थायी कर्मचा-यांचे वेतनापेक्षा फारच कमी असल्याने ते आपले रुगणालयाकडे येण्यास इच्छूक नसतात. सुदैवाने येथे आलेच तर मध्येच सेवा सोडून जातात त्यामुळे रुग्णलयातील दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होतात. स्थायी कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू केला आहे तसेच महागाई भत्यामध्ये वेळोवळी होणा-या बदलाप्रमाणे वेतन देण्यात येते. परंतु कंत्राटी कर्मचा-यांचे वेतनात महागाईचा विचार करता त्याप्रमाणात सुधारणा करण्यात आलेली नाही.

दि. २०/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये जिल्हा रुग्णालय, अहमदनगर; ससुन रुग्णालय, पुणे; के.ई.एम, पुणे व इतर ७ रुग्णालयांकडून त्यांचे रुग्णालयात स्टाफनर्स, टेक्निशियन व तत्सम पदांवर कंत्राटी पद्धतीने/ ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना देण्यात येणा-या वेतनाबाबत सविस्तर माहिती मागविणेत आली होती. सदर पत्रानुसार ससुन हॉस्पिटल, पुणे व जिल्हा रुग्णालय, अहमदनगर यांनी दि. २२/०७/२०१६ चे पत्रान्वये त्यांचे रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने कार्यरत कर्मचा-यांचे वेतन व रजा सुट्टयांबाबत खालीलप्रमाणे माहिती कळविली आहे.

| अ.नं. | पदनाम | मासिक वेतन | रजा सुट्टया | वार्षिक वेतनवाढ |
|---|---|---|---|---|
| **ससुन हॉस्पिटल, पुणे** | | | | |
| ०१. | स्टाफनर्स | १३,०००/- | किरकोळ रजा- ३०, आजारी रजा – १० | १५ % |
| ०२. | फार्मासिस्ट | १३,०००/- | | |
| ०३. | ज्यु. लॅब टेक्निशियन | १३,०००/- | | |
| **जिल्हा रुग्णालय, अहमदनगर** | | | | |
| ०१. | अकौटंट | १०,०००/- | किरकोळ रजा- ०८, आजारी रजा – ०७ | शासननियमानुसार वेतनवाढ |
| ०२. | बायोमेडीकल इक्वीपमेंट इंजिनियर | २१,६००/- | | |
| ०३. | स्टाफनर्स | १५,०००/- | | |
| ०४. | फार्मासिस्ट | ८,०००/- | | |
| ०५. | डायलेसिस टेक्निशियन | १५,०००/- | | |
| ०६. | लॅब टेक्निशियन | ८,०००/- | | |

ससुन हॉस्पिटल पुणे येथे कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांना दरवर्षी १५ % वेतनवाढ देऊन किरकोळ रजा ३० व आजारी रजा १० दिल्या जातात तसेच जिल्हा रुग्णालय, अहमदनगर येथे शासन नियमानुसार वेतनवाढ देण्यात येते व किरकोळ रजा ०८ व आजारी रजा ०७ देण्यात येत आहे.

मा व्यवस्थापन समिती सभा दि. २५/०२/२०१७ निर्णय क्र १४१ नुसार संस्थानमध्ये आजअखेर कंत्राट दारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१/०४/२०१७ पासुन प्रतिदीन वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

तथापि, श्री साईबाबा व श्रीसाईनाथ रूग्णालयाकडील ११ महिने कालावधी तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, टेक्निशियन यांना ४०% वेतनवाढ दिल्यास खालीलप्रमाणे अतिरीक्त मासिक भार येईल.

| अ. नं. | पदनाम | सध्या कार्यरत | | सध्याचे वेतन | | वेतनश्रेणीनुसार सुरुवातीचे वेतन | ४०% वेतनवाढ दिल्यास होणारे वेतन | सध्याचे वेतन व ४०% वेतनवाढ दिल्यास अतिरिक्त मासिक भार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | फिक्स पे (११ महिने ) | कंत्राटदारा-मार्फत | फिक्स पे | कंत्राटदारा-मार्फत (२६ दिवसां-करिता) | | | |
| ०१. | Staff Nurse (परिचारीका) | ११ | १४७ | ११,००० | ११,००० | ३०,३७५ | १५४०० | ६९५२०० |
| ०२. | Jr. Physiotherapists सहाय्यक भौतिक उपचार तज्ञ | ० | २ | ० | ११,००० | ३०,३७५ | १५४०० | ८८०० |
| ०३. | Junior Bio-Medical Equipment Engineers (सहाय्यक जीव वैद्यकीय यंत्र अभियंता) | ० | १ | ० | ११,००० | ३०,३७५ | १५४०० | ४४०० |
| | | | १ | | ८,४५६ | ३०,३७५ | ११८३८.७३ | ३३८२.४९ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४. | Dialysis Technician (डायलेसिस तंत्रज्ञ) | ० | १ | ० | ११,००० | ३०,३७५ | १५४०० | ४४०० |
| | | ० | २ | ० | ८,४५६ | | ११८३८.७३ | ६७६४.९९ |
| ०५. | MRI Technician (एमआरआय तंत्रज्ञ) | ० | १ | ० | ११,००० | ३०,३७५ | १५,४०० | ४,४०० |
| ०६. | Sr. Lab Technician (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) | ० | ९ | ० | ८,४५६ | ३०,३७५ | ११८३८.७३ | ३०४४२४६ |
| ०७. | Blood Bank Tech. (रक्तपेढी तंत्रज्ञ) | ० | ३ | ० | ८,४५६ | ३०,३७५ | ११८३८.७३ | १०१४७.४८ |
| ०८. | Pharmacist (फार्मासिस्ट) | ० | ९ | ० | ८,४५६ | १८,००० | ११८३८.७३ | ३०४४२.४६ |
| ०९. | Jr. C.T. Scan Technician (क. सी.टी. स्कॅन तंत्रज्ञ) | ० | १ | ० | ८,४५६ | १७,१०० | ११८३८.७३ | ३३८२.४९ |
| १०. | Jr. X-Ray Technician (क. क्ष-किरण तंत्रज्ञ) | ० | ५ | ० | ८,४५६ | १७,१०० | ११८३८.७३ | १६९१२.४८ |
| ११. | Jr. Lab Tech. (क. प्रयोगशाळा तंत्रज्ञ) | ० | ८ | ० | ८,४५६ | १६,२०० | ११८३८.७३ | २७०५९.९६ |
| १२. | Biomedical Technician (बायोमेडिकल तंत्रज्ञ) | ० | ६ | ० | ८,४५६ | १५,९७५ | ११८३८.७३ | २०२९४.९७ |
| १३. | Oxygen Plant Technician (ऑक्सिजन प्लॅन्ट टेक्निशियन) | ० | ५ | ० | ८,४५६ | १५,९७५ | ११८३८.७३ | १६९१२.४८ |
| | एकूण | ११ | २०१ | | | | | ८८२९४२.३० |

**मागणी –** वेतनवाढीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेबाबत.

**संस्थान अधिनियम ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** प्रतिमाह रु. ८८२९४२.३०/- अतिरिक्त आर्थिक भार.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्टमत-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकडील स्टाफनर्स व पॅरामेडीकल कर्मचा-यांना प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ दिल्यास संस्थानवर प्रतिमाह रु.८८२९४२.३० अतिरिक्त आर्थिक भार वाढेल सोबत परिशिष्ट "अ" जोडले आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणेच दि.२५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४१ मधील अटीस अधीन राहून श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील ११ महिने कालावधी तसेच कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या स्टाफनर्स, टेक्नीशियन कर्मचाऱ्यांना त्यांचे प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात यावी.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **रुग्णालयामधील व्हिजीटींग वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मानधन नियमावलीबाबत.**

**प्रस्ताव–** **अधिनियम २००४ तरतुद–** कलम १३(४) नुसार समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये आणि कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल

शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा, मंत्रालय, मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे

शासन मान्य आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३- "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी. तसेच अटी-शर्त क्र. ८ समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही."

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –**

**१)** दि. २२/०९/२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ७७०

"पूर्वीच्या दरपत्रकात कन्सलटेशनवर लागू असलेल्या ७०% दर ६०% वर, जनरल सर्जरीवर डॉक्टर ५५.५५%, भुलतज्ञ १६.६६% वरुन डॉक्टर ४५%, भुलतज्ञ १३%, पूर्वी कन्सलटेशनचे दर वॉर्डप्रमाणे वाढत जात होते ते सर्व वॉर्डमध्ये जनरल वॉर्डप्रमाणे कमी राहतील. डिलक्सचे रुमचा दर रु. ८००/- वरुन रु. ५००/- व हृदय शस्त्रक्रिया विभागात अॅन्जीओग्राफी रु. ६,०००/- वरुन रु. ५,०००/- तर परफ्युजनिस्ट व कॅथलॅब ऑपरेटरला प्रतिकेसनुसार मसिक वेतनाव्यतिरीक्त मोबदला, इंन्सेटीव्हीस्ट यांना मासिक रु. २०,०००/- ऐवजी प्रति केस नुसार मोबदला, पॅथॉलॉजिस्ट यांना २% वरुन ५% वाढ असे ठळक बदल करण्यास मान्यता देण्यात आली. "

**२)** दि. ०८/१०/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.३७५(५).

"संस्थान रुग्णालयामध्ये व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठीबरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरिता यापुढे व्हिजीटींग पद्धतीने सेवाकरण्याची इच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले. "

**३)** दि. २८/११/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ५३४.

"संस्थान रुग्णालयामधील व्हिजीटींग डॉक्टरांच्या मानधनाची नियमावली ठरविणे अगोदर आज रोजी संस्थान रुग्णालयामध्ये किती व्हिजीटींग डॉक्टर आहेत, त्यांना सध्या किती मानधन देण्यात येते व किती मानधन द्यावयाचे आहे याच्या संपूर्ण तपशीलासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा."

**४)** दि. ०९/१०/२०१६ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६९०(७).

"रुग्णालयामध्ये असलेले व्हिजीटींग डॉक्टर वेळेवर हजर होत नाही व रुग्णाची गैरसोय होते, असे समितीच्या निदर्शनास आले आहे. व्हिजीटींग डॉक्टरांना वेळेचे बंधन राहावे याकरिता त्यांना बायोमेट्रिक सिस्टीम बसविणेत यावी व त्या वेळेनुसार, त्यांचे मानधन काढणेत यावे. तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांकडून आकारण्यात येणा-या दरामध्ये व डॉक्टरांना देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्यामध्ये बरीचशी तफावत आहे. याकरीता दोन्ही रुग्णालयामधील समान कार्य असणारे विभाग एकत्रित यावे. या व इतर अनुषंगिक बाबींचा अंतर्भाव करणेत येऊन, सदरहू नियमावली फेरसादर करणेत यावी." अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.

**प्रास्ताविक–** मा. त्रिसदस्य समिती दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३७५ (५) नुसार व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणूका करून मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८.११.२०१५ रोजीचे सभेत प्रस्तावित केलेल्या मानधन नियमावलीनुसार मानधन देण्यात आलेले आहे. मा. व्यवस्थापन समिती दि. २८.११.२०१५ रोजीचे सभेत संस्थान रुग्णालयातील व्हिजीटींग डॉक्टरांच्या मानधनाची नियमावली ठरविणे अगोदर आज रोजी संस्थान रुग्णालयामध्ये किती व्हिजीटींग डॉक्टर आहेत?. त्यांना सध्या किती मानधन देण्यात येते? व किती मानधन द्यावयाचे आहे ? याच्या संपूर्ण तपशीलासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा. असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार मा.व्यवस्थान समिती दि.०८/१०/२०१६ रोजीचे सभेत मानधनाबाबत फेरप्रस्ताव सादर करणेत आला. त्यावर सध्या रुग्णालयामध्ये असलेले व्हिजीटींग डॉक्टर वेळेवर हजर होत नाहीत व रुग्णांची गैरसोय असे समितीचे निदर्शनास आले आहे. व्हिजीटींग डॉक्टरांना वेळेचे बंधन राहावे, याकरिता त्यांना बायोमेट्रिक सिस्टीम बसविण्यात यावी व त्या वेळेनूसार त्यांचे मानधन काढण्यात यावे. तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांकडून आकारण्यात येणा-या दरामध्ये व डॉक्टरांना देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्यामध्ये बरीचशी तफावत आहे. याकरीता दोन्ही रुग्णालयामधील समान कार्य असणारे विभाग एकत्रित करण्यात यावे व इतर अनेक अनुषंगिक बाबींचा अंतर्भाव करणेत येऊन सदरहु मानधन नियमावली फेरसादर करण्यात यावी, असा निर्णय क्र. ६९० (७) झालेलाआहे.

दि. ०८/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार सर्व व्हिजीटींग अधिकारी यांना ठरवून दिलेल्या ओ.पी.डी. दिवशी व ओ.पी.डी. वेळेत रुग्ण तपासणीसाठी रुग्णालयात उपस्थित राहणेबाबत दि. ०३.१२.२०१६ रोजीचेपत्राद्वारे कळविलेली आहे तसेच आ.टी. विभागास दि. ०७.१२.२०१६ रोजीचे पत्रान्वये सर्वव्हिजीटींग वैद्यकीयअधिका-यांचे थंब इम्प्रेशन घेणेबाबत कळविले आहे.

यापूर्वी श्री साईबाबा रुग्णालयाकडील नेत्ररोग विभाग व स्त्रीरोग विभाग श्री साईनाथ रुग्णालयात एकत्रित करण्यात आले आहे. सध्या श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात खालील विभाग कार्यान्वित आहेत.

| अ.नं. | श्री साईबाबा रुग्णालयातील विभाग | दोन्ही रुग्णालयाकडे समान कार्य असलेले विभाग | श्री साईनाथ रुग्णालयाकडील विभाग |
|---|---|---|---|
| ०१. | ह्यदयविकार विभाग | ------- | कान, नाक, घसा |
| ०२. | हद्यशस्त्रक्रियाविभाग | ------- | नेत्र विभाग |
| ०३. | मेंदू शस्त्र क्रिया विभाग | ------- | स्त्रीरोग विभाग |
| ०४. | मुत्रविकार विभाग | ------- | बालरोग विभाग |
| ०५. | अस्थिरोग व शस्त्रक्रिया विभाग | १) अस्थिरोग व शस्त्रक्रिया विभाग | अस्थिरोग व शस्त्रक्रिया विभाग |
| ०६. | मॅक्सिलोफेसियलविभाग | ------- | होमिओपॅथी |
| ०७. | शल्यचिकीत्सा विभाग | २) शल्यचिकीत्सा विभाग | शल्यचिकीत्सा विभाग |
| ०८. | वैद्यकीय उपचार विभाग | ३) वैद्यकीय उपचार विभाग | वैद्यकीय उपचार विभाग |
| ०९. | दंत विभाग | ४) दंत विभाग | दंत विभाग |
| १०. | रेडिओलॉजी विभाग (एमआरआय, सीटी स्कॅन, एक्स रे, सोनोग्रोफी) | ५) रेडिओलॉजी विभाग | रेडिओलॉजी विभाग (एक्स रे, सोनोग्रोफी) |
| ११. | पॅथॉलॉजी विभाग | ६) पॅथॉलॉजी विभाग | पॅथॉलॉजी विभाग |
| १२. | फिजिओथेरपि विभाग | ७) फिजिओथेरपि विभाग | फिजिओथेरपि विभाग |
| १३. | आहार तज्ञ विभाग | ------- | आयुर्वेद विभाग |
| १४. | ------- | ------- | त्वचारोग विभाग |
| १५. | ------- | ------- | डायबेटिक केअर सेंटर |

उपरोक्त विभागांपैकी समान कार्य असलेले सहा विभाग दोन्ही रुग्णालयाकडे कार्यान्वित आहेत. ट्रोमा, मेंदूशस्त्र क्रिया व ॲक्सीडेंट केसेस मध्ये अस्थिरोग, शस्त्रक्रिया विभाग (जन.सर्जरी, फेसिअल सर्जरी), शल्यचिकीत्सा विभाग, वैद्यकीयउपचार विभाग, रेडीओलॉजी विभाग, फिजीओथेरपी विभाग हे विभाग दोन्ही रुग्णालयाकडे आवश्यक आहेत.

सबब, श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयासाठी व्हिजीटींग डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व स्पेशियालीटी यावरुन पुढीलप्रमाणे नियमावली बनविता येईल.

| अ.नं. | स्पेशियालिटी | प्रति व्हिजीट (पूर्ण दिवस) मानधन |
|---|---|---|
| ०१. | एमबीबीएस+डीप्लोमाधारक | ४००० |
| ०२. | एमबीबीएस+एमडी/डीएनबी/एफसीपीएस (फिजीशियन ब्रांचेस) | ५००० + संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०३. | एमबीबीएस+एमएस/डीएनबी/एफसीपीएस (सर्जिकल ब्रॅचेस उदा. गायनॅक आर्थो, जन.सर्जरी, फेसिअल सर्जरी) | संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०४. | एमबीबीएस+एमडी/डीएनबी/एफसीपीएस+डीएम/ डीएनबी (सुपर स्पेशियालीटी फिजीशियन, न्युरो, नेफ्रो, गॅस्ट्रो, आन्को) | ५००० + संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०५. | एमबीबीएस+डीएम/डीएनबी कार्डीओलॉजी | संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |
| ०६. | एमबीबीएस+एमएम/डीएनबी/एफसीपीएस+एमसीएच/डीएनबी (सुपरसर्जिकल ब्रांचेस उदा, न्युरोसर्जन, आन्कोसर्जन, | संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता |

| | | |
|---|---|---|
| | युरोसर्जन, सीव्हीटीएस, प्लास्टिक सर्जरी) | |
| ०७. | एमबीबीएस+डीग्री/ डीप्लोमाधारक | श्री साईनाथ रुग्णालय<br>पदविकाधारक रु. ४,००० मानधन<br>पदविधारक रु. ५,००० मानधन |

**मागणी–** व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांकरिता प्रस्तावीत केलेली मानधन नियमावली मंजूर करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत –** सध्या नव्याने व्हिजीटींग अधिका-यांच्या नेमणूका करावयाच्या असून काही व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणूकीचा कालावधी संपलेला आहे व त्यांना पुन्हा नेमणूक देणे आवश्यक आहे.

तरी, नव्याने नेमणूक द्यावयाची व सध्या कार्यरत व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांना उपरोक्त व्हिजीटींग मानधन नियमावलीत नमुद केलेले मानधन देणेकामी प्रस्तावित केलेली मानधन नियमावली बाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३४७** **रुग्णालयामधील व्हिजीटींग वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मानधनाबाबतची उपरोक्त नियमावली रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९** **रामचंद्र नाईक विद्यालय सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रक्कम रु.१,७१,००,०००/- आर्थिक सहाय्य देणेबाबत.**

**प्रस्ताव–** पंडीत दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था औरंगाबाद ही संस्था शैक्षणीक क्षेत्रात सन १९८० पासून कार्यरत आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र औरंगाबाद व जालना जिल्हयातील चार तालुके आहेत. तसेच औरंगाबाद महानगरात शिक्षणाची २८ संस्कार केंद्रे संस्था चालवित आहे. एक महाविद्यालय, सहा कनिष्ठ महाविद्यालय, नऊ माध्यमिक विद्यालय, चार प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय, चार पुर्व प्राथमिक विद्यालय, दोन आश्रमशाळा व दोन वस्तीगृह असून त्यात सात हजार तीनशे एकोनपन्नास विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. असा संस्थेचा कार्यविस्तार असलेबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

राष्ट्र व समाज भक्तीभावाच्या अधिष्ठानावर समग्र व्यक्तीविकास घडविणेसाठी ध्येय प्रेरित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संस्थेत कार्यरत आहे. एकात्म मानव दर्शन या पंडीत दिनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या भारतीय जीवन दर्शनाच्या प्रकाशात शिक्षण व्यवस्थेची संरचना संस्थेने केली आहे. सर्वांसाठी गुणात्मक शिक्षण हा संकल्प संस्थेने केला असून समाजातील सामान्य घटकांसाठी दर्जेदार शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी संस्था कार्यरत आहे. संस्था सर्व शाळा व महाविद्यालयासाठी अद्यायावत इमारती मैदाने, प्रयोग शाळा, संगणक इ. सुविधा व निसर्गरम्य परिसर निर्माण करीत असून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नित्य प्रशिक्षण उद्‌बोधन करून त्यांचा क्रियाशील सहभाग निर्माण करीत आहे. त्यामुळे पालकांना दर्जेदार व संस्कारक्षम शिक्षण मिळण्याची हमी असल्याने सतत वाढत असलेल्या विद्यार्थी संख्येसाठी शैक्षणीक सुविधाही वाढविण्यात संस्था प्रयत्नशील आहे. असे त्यांचे प्रस्तावात नमूद केले आहे.

**संस्थेची मागणी:-** त्यासाठी सदर संस्थेने इमारत बांधकामासाठी रु. १.२३ कोटी व शालेय साहित्य घेण्यासाठी रु. ४८.००लक्ष असे एकूण रक्कम रु १.७१ कोटीची मागणी केली त्याचे विवरण खालीलप्रमाणे

**अ. इमारत बांधकाम खर्च :-**

| **अ.न.** | **विवरण** | रक्कम |
|---|---|---|
| १ | इमारत बांधकाम खर्च | रु. २,२२,००,०००/- |
| २ | इमारत बांधकाम निधीतून केलेला खर्च | रु. ९९,००,०००/- |
| ३ | **उर्वरीत** बांधकामसाठी लागणारी एकूण रक्कम | **रु. १,२३,००,०००/-** |

**ब. शालेय साहित्य खरेदीसाठी लागणारा खर्च**

| **अ.न.** | **विवरण** | रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांसाठी नवीन ६०० बाके | रु. १५,००,०००/- |
| २ | क्रिडा साहित्य | रु. १०,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | ग्रंथालय | रु. ३,००,०००/- |
| ४ | सुसज्ज प्रयोगशाळा | रु. ५,००,०००/- |
| ५ | संगणक, लॅब व फर्निचर | रु. १५,००,०००/- |
| ६ | एकूण | **४८,००,०००/-** |
| एकूण | **अ + ब रु. १,२३,००,०००+४८,००,०००/-** | **१,७१,००,०००/-** |

अशी एकूण रक्कम रु.१.७१कोटी मात्र मिळणेबाबत विनंती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना केली आहे.

**अर्थ साहाय्य करणेबाब संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे.**

अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही **शैक्षणिक संस्था,** क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

**विभागाचा अभिप्राय-**

१) दररोज बांधकाम, शैक्षणीक, आर्थिक, अशा वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात, त्यामुळे एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

२) श्री साईबाबा संस्थान मार्फत चालविले जाणारे श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम स्कूल हे इमारतीअभावी दोन सत्रात चालविले जाते. श्री साईबाबा संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाची इमारती अभावी साईआश्रम येथे पर्यायी व्यवस्था केलेली आहे, वरिष्ठ महाविद्यालय,इतर शैक्षणीक सुविधा सुरू करण्याचे नियोजन असल्याने त्यांना मदत देणे योग्य होणार नाही असे वाटते.

तरीही पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय यांना अनुदान द्यावयाचे असल्यास सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती, छाननी समिती, व विधी व न्याय महाराष्ट्र यांचेकडे मंजूरीस्तव सादर करता येईल. तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी आर्थिक सहाय्य देणेपुर्वी या रकमेचा विनियोग ते कशा प्रकारे करणार आहेत, याचे सादरीकरण व चर्चा करणेसाठी त्यांना सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०** **मिडटाऊन लायन्स मेडीकल ट्रस्टसाठी अद्यायावत डायेलेसीस व अतिदक्षताव्हॅनसाठी रक्कम रु.३८ लाख देणेबाबत.**

**प्रस्ताव–** मिडटाऊन चॅरिटेबल ट्रस्ट, औरंगाबाद या ठिकाणी गरीब व गरजुवंत रुग्णासांठी अत्यल्प दरात सेवा पुरवित आहे. त्यांचेमार्फत अत्यल्प दरात अतिदक्षता विभाग, ॲम्बूलन्स, किडनी ट्रान्सपर अशा सुविधा राबविल्या जात आहेत.

मिडटाऊन चॅरिटेबल ट्रस्ट यांचेकडे उच्च दर्जाची उपकरणे असलेली दोन अतिदक्षता व्हॅन उपलब्ध आहेत. ना नफा ना तोटा या तत्वावर चालविल्या जातात. त्यासाठी तज्ञ डॉक्टर्स, नर्स उपलब्ध आहेत. आतापर्यंत ५००० रुग्णांनी किडनी ट्रान्सपर ची यशस्वी शस्त्रक्रिया करवून घेतली आहे.

सध्या हॉस्पीटल मध्ये उच्च दर्जाची अधूनिक, सुधारीत उपकरणे उपलब्ध असून डायलेसिस साठी १० मशीन उपलब्ध आहेत. त्यांचेमार्फत रुग्णांना सेवा पुरविल्या जातात. सध्याच्या परिस्थीतीत इतर हॉस्पीटलमध्ये डायलेसीस करणेसाठी २०००/- खर्च येतो. तर मिडटाऊन यांनी ही सेवा फक्त रु. ७००/- मध्ये उपलब्ध करून देत आहेत, सध्याच्या परिस्थीतीत रु. ५००/- तोटा होत आहे. त्यामुळे ५०० पेशंटची क्षमता असतांनाही फक्त २०० रुग्णांना सेवा पुरविली जात आहे. प्रत्येक रुग्णामागे किमान ५००/- तोटा असल्याने मासिक किमान रु. १

लाख तोटा होत आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, गरीब पेशंट रु. ७०० सुद्धा देऊ शकत नाही. या कारणामुळे उपचाराअभावी त्यांचा मृत्यु होत आहे.

**<u>मागणी</u>:-** १) मासिक होणारा तोटा रु. १ लाख असे वार्षिक १२ लाख रु. श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचेकडून मिळावेत.

२) एक अत्याधुनिक अतिदक्षता रुग्णवाहिकासाठी किमान रु.१६ ते १८ लाख व त्यातील उपकरणांसाठी रु. ०८ लाख असे एकूण रक्कम रु. ३६ ते ३८ लाखाची मागणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांचे कडे केली आहे.

**<u>अर्थ साहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद</u>-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (१क) पोटकलम १ च्या तरतुदीस अधीन राहुन विश्वस्तव्यस्थेस राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अटी शर्तींच्या अधीन राहून, भक्तांना पायाभुत सुविधा पुरविणे किंवा त्या वाढवण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या <u>वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग,</u> समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

**<u>विभागाचा अभिप्राय</u>-**

**१)** दररोज वैद्यकीय ट्रस्ट, शासकीय/ निमशासकीय कार्यालयाकडुन, नोंदणीकृत संस्थांचे, वैयक्तीकरित्या, वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

**२)** श्री साईबाबा संस्थान मार्फत चालविल्या जाणा-या साईबाबा हॉस्पीटल मध्ये डायलेसीसबाबत मोफत उपचार केले जातात. त्यामुळे त्यांचेकडील उर्वरीत पेशंटला श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालयांत मोफत उपचारा साठी पाठविणेबाबत कळविता येईल.

**३)** श्री साईबाबा संस्थान मार्फत सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल मध्ये डायलेसिस साठी स्वतंत्र अत्याधुनिक व्हॅन उपलब्ध नाही. जर संस्थानकडे अशा प्रकारची व्हॅन उपलब्ध नसतांना इतरत्र व्हॅन देणे योग्य होणार नाही, किंवा अशा प्रकारची व्हॅन उपलब्ध करून ती ग्रामीण भागात सुरू केल्यास श्री साईबाबांनी केलेल्या रुग्ण सेवेचा वारसा अद्यापही चालू आहे याची प्रचिती येईल असे वाटते.

तरीही सदर प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यास, छाननी समिती, व विधी व न्याय महाराष्ट्र शासन यांचेकडे मंजूरीस्तव सादर करता येईल तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मिडटाऊन लायन्स मेडीकल ट्रस्टसाठी मानव जातीचे कल्याण या उदात्त हेतूने अद्यायावत डायेलेसीस व अतिदक्षताव्हॅनसाठी रक्कम देणेकामी चर्चा करणेसाठी त्यांना सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**<u>आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये वेगवेगळया विषयाच्या अनुशंगाने/ प्रसंगानुरुपसंस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने सदस्यांच्या सुचनांवरुनखालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.</u>**

**निर्णय क्र.३५०** जानेवारी- २०१६ ते माहे ऑक्टोबर- २०१६ या कालावधीत ३१% पेक्षा जास्त गैरहजरी असलेल्या अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि.२५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४२ अन्वये कामावर घेणेस

मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी बऱ्याच कंत्राटी कर्मचाऱ्यांना आजपर्यंत हजर करुन घेतलेले नाही, असे दिसून येते. तरी या गैरहजर कर्मचाऱ्यांपैकी आजारी अथवा गंभीर कारणांमुळे६ ते ९ महिन्यांपर्यंत सलग गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कामावर हजर करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**निर्णय क्र.३५१** मौजे शिर्डी येथील स.नं. १ (गेट नं.४ समोरील) मधील दुकानदारांचे आरक्षण उठविणेबाबतचे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायायलाने दि.२२.०२.२०१६ रोजीचे आदेशान्वये निकाली काढले असून याठिकाणच्या लहान-मोठया १०१ दुकानदारांना पर्यायी योग्य जागा किंवा नुकसान भरपाईची रक्कम अदा करणेबाबत आदेश दिलेला आहे.

सदरहू अतिक्रमीत दुकानदार आजचे सभेसमोर उपस्थित होते, त्यांनी संस्थानच्या जुने प्रसादालय परिसरातील विद्युत गृहाशेजारील जागा मिळणेबाबत विनंती केली.

यावर चर्चा होऊन, अतिक्रमीत दुकानदारांनी मागणी केलेल्या जागेची कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष पहाणी करुन, सदरहू जागा दुकानदारांना देणेकामी महसुल विभागासोबत चर्चा करावी व त्याचा अभ्यासपुर्वक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

**निर्णय क्र.३५२** श्रींचे समाधी मंदिरामध्ये दर्शनाकरीता जाणेसाठी जुन्या पिंपळवाडी रस्त्यावर संस्थानची दर्शन रांग असून, साईभक्त या रस्त्यावरुन अनवाणी पायाने चालतात. परंतु सध्याचे उन्हाळयाचे दिवसामध्ये साईभक्तांना या रस्त्यावर उन्हाचा त्रास होत आहे. याकरीता साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण होणेकरीता या रस्त्यावर तात्पुरते स्वरुपात विहीत पध्दतीने मंडप टाकणेत यावा, अशी सुचना समिती सदस्य मा.श्री.सचिन तांबे यांनी केली, ती मान्य करण्यात येऊन, त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.३५३** सध्याची व्यवस्थापन समिती रुग्णांना कमी खर्चात जास्तीत-जास्त चांगली रुग्णसेवा देण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहे. परंतु संस्थान रुग्णालयांमध्ये स्पेशालिस्ट डॉक्टरांबरोबरच इतर कर्मचाऱ्यांचीही कमतरता आहे व त्यामुळे रुग्णांना रुग्णसेवा देण्यामध्ये अडचणी येत आहेत व मंजूर आकृतीबंधाच्या मर्यादेमुळे नवीन कर्मचाऱ्यांची भरती करता येत नाही. याकरीता रुग्णालय कर्मचारी भरती संदर्भात सर्वसमावेशक तौलानिक प्रस्ताव सविस्तर चर्चेसाठी रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**निर्णय क्र.३५४** व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखर कदम तसेच समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे व मा.श्री.प्रताप भोसले यांनी देवळाली, तळेगाव, गळनिंब, शहापुर (कोपरगाव), सुरेगाव, वळदगाव, शिंगणापूर या गावांमध्ये होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांसाठी रु.२५,०००/- मात्र पर्यंत वस्तुस्वरुपात अथवा रोख रक्कम मदत म्हणून देण्यात यावी, अशा सुचना केल्या. (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**निर्णय क्र.३५५** संस्थान परिसरात पादत्राने गृह, बॅग क्लोकरुन, मोबाईल व कॅमेरा लॉकर या सुविधा श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटीमार्फत सशुल्क चालविणेत येत होते. व्यवस्थापन समितीच्या दि.२२.१२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९६६ (४) अन्वये साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी पादत्राने गृह व बॅग क्लोकरुम विनामुल्य सुरु करणेबाबत निर्णय संमत झालेला असून या निर्णयाची अंमलबजावणी सुरु आहे.

आजचे सभेत सदरहू सोसायटीचे सचिव उपस्थित होते, त्यांनी अध्यक्ष महोदय व समिती सभेस विनंती केली की, संस्थानमार्फत पादत्राने गृह, बॅग क्लोकरुन, मोबाईल व कॅमेरा लॉकर या सुविधा सुरु केल्यास सध्या तेथे काम करत असलेल्या सोसायटीच्या कर्मचाऱ्यांचा रोजगार बंद होऊन, त्यांचेवर उपासमारीची वेळ येईल व सोसायटीचे उत्पन्नही कमी होईल, तरी सदरहू कर्मचारी संस्थानकडे वर्ग करणेत यावे किंवा पादत्राने गृह, बॅग क्लोकरुम, मोबाईल व कॅमेरा लॉकर या सुविधा पुर्वीप्रमाणेच सोसायटीमार्फत चालू ठेवणेत याव्यात.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, पादत्राने गृह, बॅग क्लोकरुन, मोबाईल व कॅमेरा लॉकर या सुविधा सोसायटीस पुढील अटीवर चालविणेस देण्यात याव्या. पादत्राने गृह व बॅग क्लोकरुम या सुविधा सोसायटीने विनामुल्य चालवाव्यात व मोबाईल/ कॅमेरा यासाठी प्रती नग रु.५/- मात्र आकार आकारणेत यावा. तसेच याबाबत श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटी यांचेकडून लेखी स्वरुपात करारनामा करुन घेण्यात यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**निर्णय क्र.३५६** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देशभरात व जगभरात श्रींचे कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा या दृष्टीकोनातून खास बाब म्हणून श्री साईबाबांचे प्रतिमा असलेले टपाल तिकीट काढणेबाबत केंद्र शासनाच्या संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करणेत यावा. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.२७८ते ३५६ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०५.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**